जन्मशताब्दी

२००४ - २००५ स्मृती सौरभ ६

# संतशिरोमणी नामदेव महाराज

ह. भ. प. श्री. नंदकुमार विश्वंभर बोंगाळे



संतशिरोमणी नामदेव महाराज
संबंधी माहिती वजा भावचरित्र

# संत शिरोमणी नामदेव महाराज

# ई साहित्य प्रतिष्ठान

---

हे पुस्तक प्रतिधिकार मुक्त असून आपण जास्तीत जास्त लोकापर्यंत याचा प्रसार करावा ही विनंती

–

# ई साहित्य प्रतिष्ठान

---

## ग्रंथ प्रकाशना संबंधी

।। वंदे श्री सिद्धराम - काडसिद्धेश्वराभ्याम ।।

**।। संत नामदेव महाराज ।।**

लेखक - ह. भ. प. नंदकुमार विश्वंभर बोंगाळे.

| | |
| --- | --- |
| प्रथम मुद्रण | द्वितीय मुद्रण |
| श्री प्रसाद दुभाषी | नंदकुमार बोंगाळे |
| देवीका आर्ट प्रिंटर्स | सॉफ्ट कॉपी |
| मुखपृष्ठ - | मुखपृष्ठ |
| श्री माधव लाड | श्री माधव लाड |
| मजकूर तपासणी | मजकूर तपासणी |
| श्री ज्ञानेश्वर भालेकर | श्री नंदकुमार बोंगाळे |
| अक्षर जुळवणी | अक्षर जुळवणी |
| वैभव बेर्डे, पॅसिफिक क्रियेशन | श्री नंदकुमार बोंगाळे |
| आवृत्ती पहिली | आवत्ती दुसरी |
| सप्टेंबर २००४ | आगस्ट २०१९ |


प्रकाशक

ज्ञानम सत्य समता
सिद्धगिरी गुरुकूल फाऊन्डेशन
कणेरी, कोल्हापूर

---

## प. पू. काडसिद्धेश्वर स्वामींचा आशीर्वाद

# ।। आशीर्वाद ।।



प. पू. श्री. अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामीजी
सिध्दगिरी मठ, कणेरी

## प्रस्तावना

प्रस्तावना

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. हे आपणा सर्वाना ज्ञात आहे. येथे श्री ज्ञानेश्वर महाराज, श्री तुकोबा, श्री समर्थ रामदास स्वामी, संत शिरोमणी नामदेव माहाराज, या सारखे थोर संत आज पर्यंत होऊन गेले. या सर्व संतांनी सांगितलेले तत्त्वज्ञान जरी अजरामर झालेले असले, तरी सद्य परिस्थितीमध्ये या थोर महात्म्यांच्या जीवन चरित्राविषयी उपलब्ध असलेली माहिती फार प्राथमिक स्वरुपाची व संक्षिप्त आहे. म्हणून ह. भ. प. श्री. नंदकुमार वि. बोंगाळे, यानी सदर पुस्तका द्वारे संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांचे भाव चरित्र आपल्या समोर आणण्याचे जे बहुमोल कार्य केलेले आहे, त्याबद्दल त्यांचे आभर मानावेत, तेवे थोडेच आहेत.भागवत धर्माची पताका संपूर्ण भारतभर फडकवणारे श्री संत नामदेव महाराज हे राष्ट्रीय संत आहेत. उत्तर भारतामध्ये व विशेषतः पंजाब प्रांतामध्ये श्री नामदेव महाराजांची अनेक मंदिरे आजही पहावयास मिळतात. श्री नंदकुमार बोंगाळे यानी अशा ठिकाणी जाऊन श्री संत नामदेव महाराजा विषयीची दुर्मिळ माहिती अतिशय परिश्रम पूर्वक मिळवली व त्याचा सखोल अभ्यास केल्या नंतरच आपल्या सुरेख भाषा शैलीत संत नामदेवांचे हुबेहूब चरित्र रेखाटन केलेले आहे.

इ. स. २००४ - २००५ हे वर्ष प. पू. सद्गुरू माऊली श्री काडसिद्धेश्वर महाराज यांचे जन्म शताब्धीवर्ष म्हणून साजरे होत आहे. या वर्षी १०० पुस्तके प्रकाशित करण्याचा संकल्प प. पू. श्री अदृश्य काडसिद्धेश्वर महाराजानी सोडलेला आहे. या पुस्तक मालिकेतील हे सहावे पुष्प श्री संत शिरोमणी नामदेव महाराज आपल्या समोर येत आहे. हा एक दुग्ध शर्करा योग आहे असे म्हटल्यास ते वावगे ठरणारे नाही.

हे हा अभिनव संकल्प साकार करण्या साठी ज्यानी प्रत्यक्ष वा

---

## प्रस्तावना, लेखकाचे निवेदन

अप्रत्यक्ष पणे हातभार लावला, ते सर्व ही मनःपूर्वक आभार मानण्यास पात्र आहेत. आपण सर्वजण या पुस्तकाचे ह्रदयपूर्वक सावगत करूया व आपला ज्ञानभांडार असेच उत्तरोत्तर समृद्ध करून घेऊया हीच भगवंता चरणी प्रार्थना.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## लेखकाचे निवेदन

भारतीय जीवनात संत महात्म्यानी केलेले कार्य फार मोलाचे आहे. त्यामुळे त्यांचे आपल्या इतिहासातील स्थान अलौकिक असेच आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणजे पंढरीराय हे होत. आज शतकानु शतके त्यांची भक्ती केली जाते. महाराष्ट्रात अनेक संत निर्माण झाले. यातील प्रमुख मार्गदर्शक संत म्हणजे ज्ञानोबाराय, नामदेवराय, नाथराय, तुकोबाराय व निळोबाराय हे आहेत. या संतांचे कार्य अद्वितीय असेच आहे. या संतांची अभंगवाणी महाराष्ट्रीय मनाला सतत संजीवनी देत आली आहे. हे संत म्हणजे महाराष्ट्र जीवनाचे पंचप्राण आहेत. ह्यांचे साहित्य हे जगाच्या कल्याणा करता निर्माण झालेले आहे.

संत शिरोमणी नामदेवरायांच्या कर्तृत्वाचा एक आगळाच व दैदिप्यमान असा पैलू आहे. वारकरी संप्रदायातील भजन, कीर्तनाच्या पद्धतीचा व संकेतांचा त्यानी यथायोग्य पाया घालून दिलेला आहे. यातील अनेक रूढी, परंपरांचे नामदेवराय आद्य उद्‌गाते आहेत. त्यानी आपल्या बहुमोल कार्याचा ठसा संपूर्ण भारतभर उमटवलेला आहे. भागवत धर्माची पताका संपूर्ण भारतभर फडकवणारे ते महाराष्ट्रातील आद्य राष्ट्रीय संत आहेत.

संत नामदेवरायांच्या संपूर्ण चरित्राची माहिती उपलब्ध नाही. त्यापैकी उत्तर भारतातील माहिती फार त्रोटक स्वरूपात उपलब्ध आहे. नामदेवरायानी स्वतः आपला, त्यांच्या समकालीन व नंतर झालेल्या

## लेखकाचे निवेदन

संतांच्या चरित्रातील काही भाग काव्यरुपाने ग्रंथीत केलेला आहे. तोही पूर्ण नाही. परंतु त्याच्या आधाराने काही थोडेफार का होईना, नामदेवरायांचे चरित्र वर्णन करता येणे शक्य आहे. तसेच उत्तर भारतातील काही संत कवीनी, पुरणदास, भाई खेमदास यानी नामदेव चरित्राचे काही वर्णन केलेले आहे. चरित्र लिहिताना नामदेव जनमसाखी, भक्तमाळ वगैरे काही उत्तर भारतातील पुस्तकांचा उपयोग झालेला आहे. श्रीगुरू बाबासाहेब आजरेकर फडावरील श्रीगुरू व अधिकारी वारकऱ्यांची कीर्तने ऐकून, त्याची टिपणे करून माहिती संकलीत केली. तसेच वारकरी संप्रदायात काही प्रचलित व वरचेवर सांगितल्या गेलेल्या घटना व गोष्टी यांचाही फार मोलाचा उपयोग चरित्र लिहिताना झालेला आहे. इ. सन २००० साली महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायानी पंजाब मधील घोमान येथे नामदेव गाथा पारायण आयोजित केलेले होते. त्या करता महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश येथील भाविक बहुसंखेने आलेले होते. यातील बऱ्याच भाविकांची व पंजाब मधील भाविकांची तेथे कीर्तने व प्रवचने झाली. याचाही उपयोग हे चरित्र लिहिताना झालेला आहे. पंजाब, राजस्थान, गुजरात मधील नामदेव स्मारके पहाण्याचा या निमित्ताने योग आला. मी स्वतः सन १९६५ पासून श्रीगुरू बाबासाहेब आजरेकर फड, पंढरपूर यांचा माळकरी व वारकरी आहे. सन १९७५ पासून कीर्तन व प्रवचन करत आहे. विविध मासिकात आध्यात्मिक लेख लिहिलेले आहेत. प. पू. श्री. अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामीजी, सिद्धगिरी मठ, कणेरी, कोल्हापूर यानी प्रेरणा दिली. नामदेव चरित्र लिहिण्यास सांगितले. ते त्यानी सन २००४ मध्ये प्रकाशित केले. याबद्दल मी त्यांचा शतशः ऋणी आहे. स्वामींच्या प्रेरणेने व श्रीगुरू बाबासाहेब आजरेकर यांच्या कृपेने मी हे भाव चरित्र लिहिले आहे. तसेच हे भाव चरित्र लिहवून घेण्याचे कार्य नामदेवरायांच्या कृपेने

## लेखकाचे निवेदन, अर्थदान

शक्य झाले आहे. त्यातील उणिवा व चुका असतील त्या माझ्या आहेत. आणि जे काही चांगले असेल त्याचे श्रेय श्रीगुरू बाबासाहेब, दादासाहेब, नानासाहेब, नामदेव आण्णा माळी, काकासाहेब, भुरे माऊली, केशवराव जाधव, काळे माऊली या आजरेकरमाऊली श्रीगुरूना आहे.

नव्हे मी बहू श्रुत नव्हे ज्ञानशीळ । दास मी दुर्बळ वैष्णवांचा ।। - नामदेव.

ह. भ. प. नंदकुमार विश्वभंर बोगाळे.
५, सुंदरम अपार्टमेंट, विलींग्डन
कॉलेजजवळ, विश्रामबाग,
सांगली. - ४१६४१५.
मोबाईल ९८५०९६९१६८,
७७७४८६५९२२

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

### अर्थदान

संत शिरोमणी नामदेव महाराज हा चरित्र ग्रंथ प्रकाशित करण्या करता अंशतः आर्थिक हातभार लावणारे आपल्या संप्रदायातील एक सेवाभावी तसेच प. पूज्य सद्‌गुरू माऊलींचे आवडते शिष्य श्री. चंद्रकांत श्रीधर पाटोळे हे होय.

४ डिसेंबर १९४३ रोजी तळवडे गावी त्यांचा जन्म झाला. पुढे सातवी पर्यंत शिक्षण गावीच झाले. मुंबईत माध्यमिक शिक्षण घेतल्यावर १९७० साली प्रिंटिंग टेक्नॉलॉजीचा डिप्लोमा पूर्ण केला. एवढ्या ज्ञानाच्या व अनुभवाच्या जोरावर एका नावाजलेल्या कंपनीमध्ये नोकरी करत असता पुढे त्वचेवरील झालेल्या रोगाचा जीवनावर फार मोठा दुष्परिणाम झाला. मनाची शांती नाहीशी झाली. कशातच मन लागेना. शेवटी पूर्व पुण्याईने १९९७ च्या जून महिन्यात गोतेगाव मठावर प. पू. अदृश्य

**अर्थदान,** वंशावळ नकाशा

स्वामीजींचे दर्शन झाले. व त्याच दिवशी दिनांक १५ जून रोजी अनुग्रह घेतला. आणि खऱ्या अर्थाने जीवनाचा अर्थ उमगला. प्रपंचातील कटकटी व शरीराची व्याधी यातून आपसूक सुटका होत गेली. मुलही उच्च विद्या विभूषीत झाली.

सद्विचार, सद्भावना व भूतदया यांचा त्रिवेणी संगम श्री. पाटोळेंच्या जागी पहावयास मिळतो, आणि म्हणूनच ते सद्गुरू माऊलींच्या चरणी लीन झालेले दिसून येतात. ते व त्यांचे कुटुंबीय
नेहमी समाधानी, प्रसन्न व तृप्त दिसतात. म्हणून त्यांचे हे समाधानी आयुष्य सद्गुरू माऊलींच्या कृपेने असेच टिकून राहो, ही त्या सद्गुरू चरणी प्रार्थना.

या निमित्ताने आपणा सर्वाना श्री. पाटोळेंच्या पूर्वजा विषयी थोडक्यात माहिति व्हावी म्हणून पुढे त्यांच्या वंशावळी संबंधी माहिति देत आहोत.

वंशावळ नकाशा

शंकर | श्रीधर | शांताराम | सूर्याजी

श्रीधर → चंद्रकांत — प्रतिभा

चंद्रकांत, प्रतिभा → अमीत | प्राजक्त

सिद्धगिरी गुरुकुल फाऊंडेशन

प्रकाशक

**नंबर विषय पान नंबर**

**संत शिरोमणी नामदेव महाराजा संबंधी माहितीवजा भाव चरित्र**

ई साहित्य प्रतिष्ठान, मुद्रण, आशीर्वाद, प्रस्तावना,
लेखकाचे निवेदन, अर्थदान, वगैरे १ ते १०

अनुक्रमणिका ११ ते १५

**नंबर विषय शीर्षक पान क्रमांक**

**क) संत शिरोमणी नामदेवरायांची अल्पशी ओळख.**

अ नामदेवरायांचा जीवन पट १६

आ नामदेवरायांची व परिवाराची अभंग रचना १७

आ) १. नामदेवरायाचे मराठी व हिंदी अभंग १७

आ) २. नामदेवरायांच्या परिवाराचे अभंग १७

इ नामदेवरायांची वैशिष्ठे १८

इ) - १.भजन, कीर्तनाच्या विशिष्ट पद्धती रूढ केल्या १८ ते १९

इ) - २.गोपाळ काल्याची सुरुवात केली. २० ते २१

इ) -३. काला व कीर्तन परंपरा गद्य व पद्यात सुरू केली २२

इ) - ४. पर प्रांतात जाऊन लोकभाषेत काव्य करणारे
आद्य हिंदी संत. २२ ते २३

ई नामदेवांचे तत्त्वज्ञान २३ ते २४

ए. नामदेव हे वैष्णवांचे राव म्हणजे राजे आहेत. २४ ते २५

ऐ. नामदेवरायांच्या मनाची ठेवण व सर्वांशी
आत्मियतेने वागणारे २५ ते २७

ओ. नामदेवरायांचा भागवत धर्म. २७ ते २८

औ. हिंदी भक्ती काल २८ ते २९

नामदेवांच्या जीवनातील काही घटना २९ - ३१

**ख) नामदेव महाराजांचे महाराष्ट्रातील कार्य व माहिती.**

---

| नंबर विषय | पान नंबर |
|---|---|
| १) नामदेवांचे पूर्वज मूळ रिळे गावाचे, नंतर वास्तव्य नरसीला | ३२ ते ३३ |
| २) नामदेवरायांचे मूळ पुरुष यदुशेट रेळेकर (नरसी) | ३३ ते ३४ |
| ३) नामदेवरायांचे वडील दामाशेटी व आई गोणाबाई | ३५ - ३६ |
| ४) नामदेवरायांचा पंढरी मध्ये अवतार | ३६ ते ३८ |
| ५) नामदेवांचे जन्म कूळ व व्यवसाय | ३८ ते ३ |
| ६) नामदेवरायानी देवाला नैवेद्य खावयास लावला | ४० ते ४३ |
| ७) नामदेवरायांचे राजाई बरोबर लग्न झाले | ४३ ते ४६ |
| ८) गोणाई व नामदेवरायांचा संसाराविषयी संवाद | ४६ ते ४७ |
| ९) नामदेवांचा बाजारहाट, दगड सोन्याचा केला | ४८ ते ५२ |
| १०) ज्ञानदेवादी संतांना भेटावयास आळंदीला गेले | ५३ ते ५४ |
| ११) परमार्थात गुरू कृपेची नितांत आवश्यकता आहे | ५४ ते ५८ |
| १२) बोधाकरता चार मार्गाने वाटचाल करणे आवश्यक | ५८ ते ६२ |
| १३) मुक्ताईने गोरोबा कडून परिपक्वतेची परीक्षा घेतली | ६२ ते ६३ |
| १४) देवानी गुरू करून घेण्या विषयी समजावणे | ६३ ते ६४ |
| १४-१ सद्गुरू शिवाय संशय निवृत्ती व तरणोपाय नाही. | ६५ ते ६८ |
| १४-२ देवानी नामदेवाना विसोबाला शरण जाण्यास सांगितले | ६८ |
| १५) विसोबा चाटी पुढे औंढ्या नागनाथला विसोबा खेचर | ६८ |
| १६) नामदेवराय विसोबा खेचराना शरण गेले | ६९ ते ७२ |
| १७) कुत्रे भाकरी घेऊन पळाले, नामदेवाचा समभाव | ७३ ते ७५ |
| १८) नामदेवाना कवित्व करण्याची स्फूर्ती | ७६ ते ७७ |
| १९) नामदेवानी एकादशी व्रताची निष्ठा दाखवून दिली | ७८ |
| १९-२ नामदेवाकडे मेव्हणे दशमीला दुपारी आले | ७८ ते ७९ |
| १९-३ उपाशी पोटी मेव्हण्याना झोप आली नाही | ८० |
| १९-४ राजाईने देवाला व दैवाला दोष देणे | ८१ |


---

| नंबर विषय | पान नंबर |
|---|---|
| १९-५ देव शेट्या झाले व गोणाईजवळ होन दिले | ८२ |
| १९-६ नामदेवानी ते सोन्याचे होन ब्राह्मणाना वाटले | ८३ |
| १९-७ राजाईने लपवलेले होन नामदेवानी वाटले | ८४ |
| २०) देवानी विप्र वेषाने एकादशीला भोजन मागणे | ८५ |
| २०-१ ब्राह्मणाचा हट्ट उपवासाचे नको, जेवणच पाहिजे | ८६ |
| २०-२ उपवासामुळे देवानी प्राण सोडणे, स्मशानात नेणे | ८७ |
| २०-३ नामदेव प्रेता शेजारी झोपले, अग्नी लागल्यावर देव घाबरणे | ८८ |
| २१) ज्ञानदेव भेटावयाला आले, ज्ञानदेव नामदेव सख्यत्त्व | ८९ |
| २१-१ ज्ञानदेव व नामदेव यांचे फार सख्यत्त्व होते | ९० |
| २१-२ ज्ञानदेव भेटल्यावर नामदेवाना फार आनंद झाला | ९१ ते ९२ |
| २२) ज्ञानदेवांचा नामदेवा बरोबर तीर्थ यात्रा विचार | ९२ ते ९३ |
| २२-१ तीर्थयात्रेकरता देवाची परवानगी मागणे, देवानी परवानगी देणे | ९४ |
| २२-२ देवानी परवानगी दिली व दोघे पदयात्रेला निघाल | ९५ ते ९६ |
| २३) ज्ञानभक्ती व एकविध भक्ती विषयी दोघांचा संवाद | ९६ |
| २३-१ हरीण नादाला भुलते, कृपनाला धनाचे चिंतन असते | ९७ ते ९८ |
| २३-२ कीटकाला भुंग्याचे जसे ध्यान लागते, तसे ध्यान लागावे | ९९ |
| २३-३ ज्ञानोबा म्हणाले की नामदेवाचे बोलणे म्हणजे भक्तीचा अद्‌भूत रस | १०० |
| २४) नामदेवानी राजस्थानातील वाळवंटातील खोल विहिरीचे पाणी ओसंडून वर आणले | १०१ ते १०६ |
| ३१) परसा भागवताचे अहंकार युक्त भाषण | १०६ ते १०८ |
| ३२) परसाचे रामायण वाचन व लंका दर्शन | १०९ ते ११४ |
| ३३) परसा भागवत नामदेवाना शरण गेले | ११५ ते ११६ |
| ३४) परसा करिता नामदेवानी वाळवंट परीस केले | ११६ ते १२१ |


---

**नंबर विषय** **पान नंबर**

३५) देवानी नामदेवरायाच्या घराचे छप्पर शाकारले १२२
३६) जनाबाईचा जन्म व बालपण १२३
३७) जनाबाईवर देवाच्या पदकाच्या चोरीचा आरोप १२३ ते १२६
३८) जनाबाईच्या शेणीतून विठ्ठल नामाचा गजर होई १२६ ते १२८
३९) नामदेव मागेलागल्यावर देव सांवताच्यापोटात लपले १२८
३९-१ सावताने देवाला पोटात लपावयाला जागा दिली १२९
४०) नामदेवानी चोखोबास शिष्यत्व बहाल केले १३० ते १३३
४१) नामदेवानी चोखाची समाधी समोर महाद्वारात बांधली १३३- १३५
४१-१ देवानी नामदेवाना चोखाच्या अस्थी आणण्यास सांगितले १३५
४२) संत राका कुंभाराची निष्काम भक्ती दर्शन १३६ ते १३८
४३) गोरा कुंभाराने स्वतःचे तोडलेले हात नामदेवांच्या कीर्तनात परत फुटले व मूल जिवंत झाले १३८ ते १४०
४४) नामदेवरायांच्या एकूण केलेल्या पदयात्रा १४०ते १४२

**ग) नामदेवरायांचे उत्तर भारतातील कार्य व तेथील शिष्य परिवार**

४५) नामदेवरायानी भोपाळच्या मेलेल्या कमलाकर ब्राह्मणाच्या पद्माकर या पुत्रास जिवंत केले १४३ ते १४५
४६) नामदेवरायानी औंढ्या नागनाथाचे देऊळ फिरवले १४५ ते १५०
४७) नामदेवरायानी दिल्लीत बादशहाने मारलेली गाय जिवंत केली १५१ ते १६३
४८) भट्टीवाल येथील वाळलेल्या काठीस पालवी फुटविली१६४ ते १६५
४९) भट्टिवाल येथील शिष्यजल्लो उर्फ जाल्हण सुतार १६५ ते १६६
५०) मथुरा येथील नामदेवरायांचे शिष्य विष्णू स्वामी १६६ ते १६६
५१) भट्टीवाल येथील गहूकापणी, गुरू नामियानासाहेब१६६ ते १६८
५२) भूतविंड येथील शिष्य बहोरदासला जिवंत केले १६८ ते १६९
५३) मरडला आंधळ्याला दृष्टी दिली व बरे केले १७० ते १७१

---

| नंबर विषय | पान नंबर |
|---|---|
| ५४) घुमान येथील नामदेवांची नादी शिष्य परंपरा | १७१ ते १७३ |
| ५५) गुरूदासपूर जिल्ह्यात नामदेवरायानी घुमान वसवले | १७३ |
| ५६) घुमान मधील नामदेव दरबार | १७४ |
| ५७) घुमान मधील तापियाना | १७४ ते १७५ |
| ५८) घुमान मधील चरण कवल साहेब | १७५ |
| ५९) घुमान येथील नामदेवांचा शिष्य फिरना शहीद | १७६ ते १७९ |
| ५९-१) युद्धात मुंडके उडवलेल्या फिरनाला लढवले | १८० ते १८१ |
| ६०) शिष्य केशो कलंधर याचा महारोग बरा केला | १८१ ते १८२ |
| ६१) धारीवाल येथील शिष्य लध्दा खत्री कुपी साहेब | १८३ ते १८५ |
| ६२) नामदेवरायांचा हरिद्वार येथील शिष्य त्रिलोचन | १८५ ते १८९ |
| ६३) नामदेवरायानी घुमानलाच समाधी घ्यावी अशी शीख शिष्यांची इच्छा होती | १८९ ते १९० |
| ६४) हिंदी भक्तीकाल | १९० ते १९१ |
| ६५) गुरु ग्रंथ साहेब निर्मिती संबंधी | १९१ ते १९२ |
| ६६) उत्तरेतील नामदेव मंदिरांची माहिती | १९२ ते १९४ |
| ६७) नामदेवरायांनी कुटुंबातील एकूण चौदा व्यक्तीसह पंढरीत पायरी खाली संजीवन समाधी घेतली. | १९५ ते २०० |
| ६८) नामदेवरायांची परसानी केलेली आरती | २०० |
| ६९) संत नामदेवरायांच्या जवळची केशी राजाची मूर्ती | २०० ते २०१ |
| ७०) पंढरीरायाची काकड आरती | २०१ |
| ७१) शिंपी, दर्जी जमात, नामदेवरायांचा अनुग्रह | २०१ ते २०२ |
| ७२) नामदेवरायांची वंशावळ | २०३ ते २०५ |
| ७३) नामदेवरायानी देवा जवळ मागितलेले पसायदान | २०५ |
| नामदेवांचे काही फोटो | २०६ ते २०७ |
| लेखकाचा परिचय | २०८ |

## अ) - नामदेवांचा जीवनपट

नामदेवरायांच्या एकंदर आयुष्याचा कालखंड कार्तिक शुद्ध एकादशी शके ११९२ ते आषाढ वद्य त्रयोदशी शके १२७२ ( २६ आक्टोबर १२७० ते ३ जुलै १३५० ) म्हणजे एकोणऐसी वर्षे आठ महिने.

आयुष्यातील महत्त्वाच्या घटना.

| शके | सन | वय | कार्य व महत्त्वाच्या घटना. |
|---|---|---|---|
| ११९२ | १२७० | - | पंढरपूर मध्ये अवतार. |
| ११९७ | १२७५ | ५ | देवाला दूध पाजले, |
| १२०३ | १२८१ | ११ | लग्न |
| १२१२ | १२९० | २० | खेचरांच्या कडून गुरू उपदेश |
| १२१३ते १२१८ | १२९१ते १२९६ | २१-२६ | ज्ञानोबाराया बरोबर पहिली तीर्थयात्रा, |
| १२२०ते १२२१ | १२९८ते १२९९ | २८-२९ | एकट्याची दक्षिण भारत पदयात्रा, |
| १२२१ते १२२६ | १२९९ते १३०४ | २९-३४ | पश्चिम, उत्तर व पूर्व भारत पदयात्रा, |
| १२४३ते १२६० | १३२१ते १३३८ | ५१-६८ | मध्य व उत्तर भारत पदयात्रा, |
| १२६० | १३३८ | ६८ | चोखोबाची समाधी बांधली, |
| १२६१ते १२७१ | १३३९ते १३४९ | ६९-७९ | उत्तर भारत पदयात्रा, |
| १२७२ | १३५० | ८० | पंढरपूरला विठ्ठल मंदिराच्या पायरीखाली घरच्या इतर तेराजणासह समाधी घेतली. |

---

**नामदेवरायांची व परिवारांची अभंग रचना,**

## ।।श्री रुक्मिणी पांडुरंग प्रसन्न।।

## ।।संत नामदेवाय नमः।।

### आ) **नामदेवरायांची व परिवाराची अभंग रचना**

नामदेवरायानी खालील प्रकारची पदे रचली आहेत.

### आ - १) **नामदेवरायाचे मराठी व हिंदी अभंग**

यात नाम महात्म्य, विठ्ठल महात्म्य, पंढरी महात्म्य, गंगा महात्म्य, भूपाळी, काकडा अभंग व काकड आरत्या, स्वतःचे व अन्य संतांचे चरित्र वर्णन, ज्ञानदेवादी संतांच्या पूर्वजांची माहिती व समाधी वर्णन, पूर्वपंगतीच्या भक्तांचे चरित्र वर्णन, आख्याने, देव अवतार वर्णन, देवजन्मकाळ वर्णन, देवचरित्र वर्णन, गौळणी, विरहिणी, महाशिवरात्री महात्म्य, उपदेशपर अभंग, यात मनास, जनास, खल दुर्जनास, दांभिक लोकास, मुमुक्षूला उपदेश, रूपकात्मक अभंग, यात वासुदेव, आंधळे, पांगळे, बोबडे, खेळिये, कूट, पिंगळा, इत्यादी, करूणापर, प्रेम कलहापर, आत्म प्रचीतीपर, मागणीपर, आरत्या,

### आ - २) **नामदेवरायांच्या परिवाराचे अभंग**

नामदेवारायांच्या गाथ्यात त्यांच्या परिवाराचेही अभंग समाविष्ट करण्यात येतात. यामध्ये जनाबाई, नामदेवरायांची मुले नारायण, विठोबा, गोविंदा, महादेव, सून लाडाई, बहीण आऊबाई, लेक लिंबाई, गुरू विसोबा खेचर, शिष्य परसा भागवत, इत्यादींचा समावेश आहे.

---

## इ) नामदेवरायांची वैशिष्ठ्ये

वारकरी संप्रदायात आज रूढ असलेल्या बहुतेक सर्व कार्य पद्धतीचे उद्‌गाते संत नामदेवरायच आहेत.

नामदेवरायानी भजन, कीर्तन या प्रकारात अनेक रूढी तयार केल्या.

## इ) - १) वारकरी पद्धतीच्या भजन, कीर्तनामध्ये काही पद्धती रूढ केल्या.

वीणा हातात घेऊन कीर्तन करावयाची पद्धत नामदेवारायानी सुरू केली. यापूर्वी वीणा हातात घेऊन फक्त भजन करावयाची पद्धत होती. संत परंपरेत विण्याला फार महत्त्व आहे. आपण म्हणतो की वीणा चालत आला, म्हणजे परंपरा चालत आली. इतर गायकी भजन, कीर्तन पद्धतीत वीणा नसतो. अगदी हरिदासी पद्धतीत सुद्धा वीणा नसतो. वीणा घेऊन उभे राहून भजन करण्याची पद्धत आहे. अभंग अथवा भजन म्हणत असताना वीणा उभा धरावा असाही दंडक आहे. एऱ्हवी बोलताना वीणा आडवा घेतला तर चालते. लळिताचे प्रसंगी बसून भजन असले तरी वीणा उभा धरला जातो. '**वीणा घेऊनिया करी । उभा राउळा भीतरी ।।**' नामदेव

'**टाळ मृदंग दक्षिणेकडे । माझे गाणे पश्चिमेकडे ।।**' नामदेव पंढरीत देवासमोर भजन कीर्तनासाठी उभे रहात असत. देव पूर्वाभिमुख आहे. देवासमोर उभा रहाणाऱ्याचे तोंड पश्चिमेकडे होते. म्हणजे देवासमोर उभे राहून भजन, कीर्तन करावे, असा प्रघात नामदेवरायानी पाडला. म्हणजे वक्त्याचे तोंड देवाकडे असावे, असा संकेत आहे. तसेच टाळ, मृदंग दक्षिणेकडे, म्हणजे कीर्तनकाराच्या उजवीकडे असावेत, असा

## भजन, कीर्तनाच्या विशिष्ट पद्धती रूढ केल्या

संकेत नामदेवरायानी सुरू केला.

भजन, कीर्तन, दिंडीचा प्रारंभ ' **रामकृष्ण हरी** ' या भजनाने होतो. हे भजन नामेदवानीच सुरू केले. ' **क्लेश हो नाना परी । मुखी रामकृष्ण हरी ।।२।।** ' नामदेव.

काकडा भजनाचे बहुसंख्य अभंग नामदेवरायांचेच आहेत. उदा. उठा उठा प्रभात झाली, उठा जागे व्हारे आता, उठा उठा साधूसंत, उठा अरुणोदय प्रकाश झाला, उठा पांडुरंगा आता, उठा पांडुरंगा प्रभात समयो जाहला, इत्यादी.

भजन, कीर्तनात मध्ये **विठोबा रुक्माई**, व **विठ्ठल विठ्ठल** हे भजन घेण्याची पद्धत नामदेवरायानीच चालू केली. उदा. **सर्व सांडूनि माझाई । वाचे विठ्ठल रखुमाई ।।** नामदेव

भजन, कीर्तनाच्या सांगतेला शेवटी, ' जय विठ्ठल जय जय विठ्ठल ' म्हणण्याची पद्धत नामदेवरायानीच चालू केली. या बाबत त्यांचा अभंग आहे, तो म्हणजे, **जय विठ्ठल श्री विठ्ठल । जय जय विठ्ठल विठ्ठल ।।१।।** नामदेव

सर्व भजन, कीर्तनाचा शेवट, ' **घालीन लोटांगण वंदीन चरण । डोळ्यानी पाहीन रूप तुझे ।।१।। प्रेमे आलिंगीन अनन्य पुजीन । भावे ओवाळीन म्हणे नामा ।।२।।** ' या नामदेवरायांच्या अभंगानेच होतो.

आषाढी कार्तिकी वारीमध्ये, दिंडीने प्रदक्षिणा घालावी, एकादशीला उपवास करावा, द्वादशीला साधन द्वादशी म्हणून खिरापत करावी, पौर्णिमेला गोपाळकाला करावा, या सर्व नोंदी नामदेवरायांच्याच आहेत. **दशमी एक व्रत करी दिंडी दर्शन । एकादशी उपवास तुम्ही जागा जागरण ।।** नामदेव

## इ) - २) गोपाळ काल्याची सुरुवात नामदेवरायानी केली.

भगवान श्रीकृष्ण गाई राखण्याकरता आपल्या गोप, गोपाळ संवगड्यासह वनात गेले. बरोबर सर्वानी आपापल्या शिदोऱ्या घेतलेल्या होत्या. भगवंतानी दुपारच्या वेळी सर्व गोपाळांच्या शिदोऱ्या एकत्र केल्या. कालवल्या. तो काला प्रसाद सर्वाना सारखा वाटला. त्यावेळी श्रीकृष्ण व सर्व गोपाळ, त्या काल्याचा कवळ, एकमेकांच्या मुखात घालत असत.

वारीची सांगता गोपाळ काल्याने होते. आषाढी व कार्तिकी वारीच्या शेवटी हा काला चंद्रभागेच्या वाळवंटात करण्याचा प्रघात नामदेवरायानी पाडला. अलीकडे हा काला गोपाळपूरला होतो. या काल्याच्या वेळी सर्व संत त्यात सहभागी होत असत. जनाबाईचा एक अभंग आहे. त्यात ती म्हणते, '**एकच टाळी झाली चंद्रभागे वाळवंटी । माझा ज्ञानराज गोपाळाशी लाह्या वाटी ।।१।। नामदेव कीर्तन करी पुढे देव नाचे पांडुरंग । जनी म्हणे बोला ज्ञानदेवा अभंग ।।२।।**' या जनाबाईच्या अभंगातून, नामदेवरायांच्या काल्याच्या कीर्तनात, ज्ञानोबाराय काल्याचा प्रसाद वाटीत असत, हे स्पष्ट दिसून येते. संत नामदेवांच्या या काला सोहळ्यात वेळोवेळी स्वतः सहभागी होणाऱ्या संत निवृत्तीनाथानी या काल्याचे महत्त्व अचूक हेरले आणि या काल्याचे आद्य प्रवर्तक असणाऱ्या नामदेवरायांच्या द्रष्टेपणाचा, त्यानी मुक्तकंठाने अभंग गौरव केला, तो असा, ' **कालया कौशल्य नामदेव जाणे । तेथील हे खुणे निवृत्तीराजू ।।**' निवृत्तीनाथ. नामदेवराय या पंढरीत काल्याचा उत्सव कसा करीत असत, त्याचे नेत्र सुखद दर्शन निवृत्तीनाथानी आपल्या दहा, बारा काल्याच्या अभंगातून घडवले आहे. त्यात ते म्हणतात की नामदेवरायांच्या काल्यात, निवृत्तीनाथ, ज्ञानोबाराय, सोपानदेव, मुक्ताई, गोरा कुंभार, जगमित्र नागा, चांगदेव, नरहरी सोनार, सांवता माळी,

## काला व कीर्तन परंपरा गद्य व पद्यात सुरू केली

राका कुंभार, विसोबा खेचर, परिसा भागवत, चोखोबा, जनाबाई, इत्यादी सर्व समकालीन संत सहभागी होत असत. त्या सोबत नामदेवरायांचे पुत्र नारायण, विठोबा, आई गोणाई यांचाही उल्लेख त्यात आहे.

ज्ञानोबाराय, सोपानदेव, चांगदेव आणि निवृत्तीनाथ या संत महात्म्यांच्या संजीवन समाधीच्या वेळी, स्वतः नामदेवरायानी काल्याचे कीर्तन केलेले आहे. आणि सोहळ्याची समाप्ती केलेली आहे. नामदेवरायानी निर्माण केलेली ही परंपरा आज तागायत तशीच चालत आलेली आहे. आजही सर्व वारकरी संतांच्या पुण्यतिथींच्या उत्सवाची सांगता काल्याच्या कीर्तनानेच होते. तसेच ग्रंथ पारायण सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनानेच होते.

काल्याच्या कीर्तनात सर्वानी आणलेले चिरमुरे अथवा लाह्या व दही गोळा केले जाते. ते एकत्र कालवले जाते. त्याचा प्रथम देवाला नैवेद्य अर्पण केला जातो. नंतर तो प्रसाद सर्वाना वाटला जातो. आरती नंतर सर्वजण एकमेकांच्या मुखात प्रसाद घालत असतात.

महाद्वारात लोटांगण घालावे, गरूडपाराजवळ कान धरून नाचावे, असा उपदेश नामदेवानीच त्यांच्या, ' **लोटांगण घालिता महाद्वारी । कान धरोनि नाचता गरुड पारी ।।**' या अभंगात केलेला आहे.

चौफाळा येथे '**झळझळीत सोनसळा । कळस दिसतो सोज्वळा ।।१।।**' हा नामदेवांचाच अभंग म्हटला जातो. तसेच उध्दव घाटावर, **महामुक्ती क्षेत्र तीर्थाचे तारक । उपमेशी आणिक नाही दुजे ।।१।।** हा नामदेवांचा अभंग दिंडी प्रदक्षिणेत म्हटला जातो.

अनेक संतांच्या समाधी दिनांची, तीथींची, महिन्याची व ठिकाणांच्या नोंदी नामदेवरायानीच केलेल्या आहेत.

## इ) -३. कीर्तन परंपरा गद्य व पद्यात सुरू केली

कीर्तन परंपरा नामदेवानी सुरू केली. पूर्वी फक्त भजन केले जायचे. कीर्तनाच्या माध्यमातून त्यानी भगवत लीलाविग्रह, प्रेमभक्ती स्वरूप, भगवंताचे भक्त वात्सल्यत्व, भगवंताचे सामर्थ्य, भक्ताचा कारूण्य भाव, देवाजवळ काय मागावयाचे, मनास व जनास उपदेश, भक्त चरित्रे, आदी विषय गद्यातून सांगावयास प्रारंभ केला. या पूर्वी हे सर्व केवळ गायनातून केले जात होते. ते सर्वाना समजेल असे नव्हते. त्यामुळे पूर्वी केवळ गायन चातुर्य, रागदारी ऐकण्याकडे सर्व जाणकारांची प्रवृत्ती होती. अर्थ समजून घेणारे क्वचितच होते. या विषयी अर्जुनाने सुद्धा असाच परिहार दिलेला आहे. **एऱ्हवी नारदु अखंड जवळा ये । तो ही ऐसीच वचने गाये । परी अर्थ बुझोनि ठाये । गीत सुखचि ऐको ।।** ज्ञानेश्वरी. परंतु नामदेवरायानी लोकबोलीत सर्वाना समजेल अशा पद्धतीने देवाचे गुणगान गद्य व पद्य यामधून केले. यामुळे उच्च व नीच अधिकारी लोकानाही विषय व्यवस्थित समजू लागला. हे त्यांचे महत्त्वाचे कार्य होय. म्हणून कीर्तनाचे आद्य प्रवर्तक श्री संत नामदेवराय आहेत. तसेच ते केवळ महाराष्ट्रीय भाषेतील कीर्तनकार नव्हते, तर ते राष्ट्रीय कीर्तनकार होते. उत्तर भारतात जाऊन तेथील लोकबोलीत त्यानी कीर्तने केली.

## इ) - ४. परप्रांतात जाऊन तेथील लोकभाषेत काव्यरचना करणारे, ते आद्य हिंदी महाराष्ट्रीय संत कवी होते.

पर प्रांतात जाऊन, दीर्घ काल वास्तव्य करून, तेथील सर्व थरातील समाजाला भक्ती व ज्ञान प्रबोधन करणारे, ते पहिले महाराष्ट्रीय संत होते. तिकडील त्यांचे कार्य अमोल, अप्रतिम, अवर्णनीय आणि उत्कृष्ट होते. आपल्या या कार्याचा ठसा त्यानी त्या काळी उत्तर

भारतीय समाजाच्या ह्रदयात कोरून ठेवला. तो इतका जबरदस्त होता की आज सातशे वर्षे होऊन गेली, तरी तेथील समाज तो विसरला नाही.

शीख समाजाच्या पवित्र गुरूग्रंथसाहेब मध्ये नामदेवरायांची एकसष्ठ हिंदी पदे समाविष्ट केलेली आहेत. बहुसंख्य उत्तर भारतीय संतांची पदे गुरुग्रंथ साहेबमध्ये घेतलेली आहेत. त्यात एकमेव महाराष्ट्रीयन संत नामदेव यांची पदे समाविष्ट केली गेलेली आहेत,

पंजाबमध्ये नामदेवरायानी जेथे जेथे मंदिरे - गुरूद्वारे उभी केली, तेथे येणाऱ्या सर्वाना मोफत जेवण देण्याची पद्धत सुरू केली. तिकडे याला लंगर असे म्हणतात. लंगर सुरू करणारे ते प्रथम संत आहेत.

नामदेवरायांचे कीर्तन भक्तिभावाने ओसंडून जात असे. सर्व श्रोते भक्ती प्रेमात डुंबून जात असत. तल्लीन होत असत. त्यामुळे त्यांचे कीर्तन सर्व श्रोत्याना आवडत असे यात नवल नाही, तर ते देवालाही फार आवडत असे. श्रोते देहभाव विसरत असत, तसेच देवही आपले थोरपण विसरत असे आणि त्यांच्या कीर्तनात आवडीने नाचत असे. **नामदेव कीर्तन करी पुढे देव नाचे पांडुरंग । जनी म्हणे बोला ज्ञानदेवा अभंग ।।२।।** असे जनाबाई वर्णन करतात. श्रोत्यांचे अंतःकरण जागवून त्यात देवाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना नामदेवराय करत असत. ही गोष्ट दृष्टी पुढे असल्यामुळेच नाथराय वर्णन करतात की, **जेणे करूनि मूर्ती ठसावे अंतरी श्रीहरीची । ऐसी कीर्तन मर्यादा आहे संतांच्या घरची ।।३।।**

## ई) नामदेवांचे तत्त्वज्ञान

## नाचू कीर्तनाचे रंगी ही प्रतिज्ञा करून जगात ज्ञानदिप लावला

नामदेवांचे तत्त्वज्ञान भव्य व विशाल आहे. त्याचा जसा खोलात जाऊन निरनिराळ्या दृष्टिकोनातून अभ्यास होत जाईल, तसतसे त्यांच्या अनंत पैलूचे दर्शन होते.

भारतीय तत्त्वज्ञान हे जगाचे तत्त्वज्ञान आहे. या तत्त्वज्ञानाची कांस धरल्याने भरत खंडाच्या ज्ञानाची उंची वाढेल. ते ज्ञान भरत खंडाची सीमा ओलांडून अखिल विश्व व्यापेल, एवढे महान आहे.

भक्ताला कळिकाळाचे भय नसते. जिवाला संसारात राहून ईश्वर प्राप्ती होते. त्याकरिता संसार सोडून वनात जाण्याची आवश्यकता नाही. ब्रह्मज्ञानाची आवश्यकता नाही. योग आचरण्याची आवश्यकता नाही. फक्त भावयुक्त अंतःकरणाने देवाचे नाव घ्यावे. संसारावरची आसक्ती सोडावी व निजवृत्ती परब्रह्म स्वरूपी लीन करावी. नामदेवराय म्हणतात, '**संसारी असावे असोनि नसावे । कीर्तन करावे वेळोवेळा ।।२।।**' म्हणजे सतत देवाचे अनुसंधान ठेवावे, व आपल्या वाटेला आलेली सर्व कर्मे करत रहावे.

## ए) नामदेव हे वैष्णवांचे राव म्हणजे राजे आहेत.

'**धन्य धन्य नामदेव । सर्व वैष्णवांचा राव ।।१।।**' नाथरायानी नामदेवरायाना ते सर्व वैष्णवांचे राव म्हणजे राजे आहेत, अशी पदवी दिलेली आहे. ज्ञानोबारायानी शुद्ध भक्तीचा पाया घातला. जगाला आध्यात्मिक ज्ञानाची शास्त्रशुद्ध बैठक घालून दिली. देवालयाची उभारणी केली. '**नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार ।।२।।**' तुकोबा. या देवालयाचा विस्तार नामदेवरायानी केला. म्हणजे देव प्राप्ती विषयी जगाला सर्वात सोपा मार्ग दाखवला. ते कार्य त्यानी अत्यंत तातडीने हाती घेतले. त्या करिता भव्य व दिव्य '**नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।।**' अशी प्रतिज्ञा त्यानी केली. पंढरीरायाची भक्तीची पताका खांद्यावर घेतली

**नामदेव चरित्र - सर्वा बरोबर आत्मियतेने वागणारे, जवळचे वाटणारे**

आणि सर्व भरत खंडात अविरत पायी भ्रमण करून ज्ञानाचा दिवा लावला. नामदेवराय जेथे जात असत, तेथील लोकबोलीत अभंग रचना करत असत. तेथे तेथे कीर्तन करत असत. तेथील लोकाना त्याना समजेल अशा सोप्य पद्धतीने भक्तिमार्ग समजाऊन सांगत असत. समाजातील सर्व थरातील लोकाना आपल्यात सामावून घेत असत. उत्तर भारतामध्ये अशा पद्धतीने सांगणारे नामदेवराय हे पहिले संत होत. उत्तर भारतातील लोकाना नामदेवरायांची शिकवण पटली. त्यानी रचलेले अभंग आवडले. कारण त्यांच्या अभंगाची गोडी अमृताहून गोड होती. लोकानी ते अभंग पाठ केले. उत्तर भारतात दऱ्या खोऱ्यातून सुद्धा नामदेवरायांचे अभंग लोक गाऊ लागले. नामदेवकाला नंतर उदयाला आलेल्या संताना नामदेवांचा उपदेश हा मार्गदर्शक दिवा ठरला. खरोखरच नामदेवरायानी घेतलेली ही प्रतिज्ञा पूर्ण केली. सर्व भारतभर त्यानी लावलेल्या ज्ञानाच्या दिव्याचा प्रकाश आज सातशे वर्षे उलटून गेली, तरी तो अद्याप तेवत राहिलेला आहे. उत्तर भारतात नामदेवरायांची आठवण आजही ताजी आहे. नाथरायांच्या उक्ती प्रमाणे खरोखरच नामदेवराय हे वैष्णवांचे राजे आहेत.

## ऐ) **नामदेवरायांच्या मनाची ठेवण**

नामदेवरायांच्या बाबतीत व्युत्पन्नतेपेक्षाही अंतःकरण प्रवृत्तीचे महत्त्व अधिक आहे. त्यामुळेच त्यांचे पारमार्थिक तत्त्वज्ञान पांडित्या ऐवजी, जीवनाच्या अनुभुतीतून स्फुरले आहे. तसेच आपल्या विचार दर्शनाबरोबरच त्यानी शुद्ध नैतिक वर्तनाचे वस्तुपाठ, आपल्या आचार धर्मातून मांडून दाखवले. क्षमा, कर्तव्य, भूतदया, इत्यादी नीती मूल्ये सर्वाना सांगितली. ऐहिक जीवनास आवश्यक असलेली सदाचार संपन्नता शिकवली. आणि

## नामदेव चरित्र - नामदेवरायांचा सर्व समावेशक भागवत धर्म

उदास वृत्तीने राहून ईश्वर भक्ती करावी, असा अनासक्त प्रपंचयोग मांडला. ऐहिक जीवनाच्या उत्कर्षासाठी संसारात अलिप्ततेने पण अभिमानाने कसे रहावे, याचा आदर्श आत्मजीवनातून त्यानी उभा केला.

नामदेवरायांचे पावन चरित्र व प्रेरक व्यक्तिमत्व यांचा ह्रदयंगम आविष्कार करणारी त्यांची अमृत मधुर अभंगवाणी, वारकऱ्यांची संजीवनी ठरली. नामदेवरायानी पुरस्कारलेला वारकरी संप्रदाय काल प्रवाहात खंबीरपणे टिकून राहिला. त्यामध्ये सतत वाढ होत राहिली. गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, पंजाब, हरियाना, हिमाचल प्रदेश, इत्यादी प्रांतोप्रांती आजही उभी असलेली नामदेव मंदिरे पाहिली, म्हणजे भारताचा सांस्कृतिक इतिहास घडविण्यासाठी नामदेवरायांचे व्यक्तित्व व कतृत्त्व केवढे उपकारक ठरले, याची साक्ष पटते.

नामदेवरायांच्या मनाची ठेवण सर्वसामान्यात मिसळण्याची होती. ते सर्वांबरोबर मित्र भावाने वागत असत. सर्वांना नामदेवराय हे आपले मित्र आहेत, असे वाटे. नामदेवराय आपल्या फार जवळचे आहेत, आपल्या पैकीच आहेत, असे सर्वांना वाटत असे. आपण व नामदेवराय यामध्ये फारसा फरक आहे, असे त्याना वाटत नसे. परंतु खरे पाहिले असता, त्यामध्ये फार मोठा फरक आहे. पण नामदेरायांच्या व्यक्तिमत्वामध्ये जो साधेपणा आहे, त्यामुळे ते आपल्या बरोबरीचे वाटतात. ते आपले मित्र आहेत असे वाटते. एवढेच नव्हे, तर नामदेरायांची श्रोत्याबद्दल सुद्धा काही खास अपेक्षा नव्हती. कोणीही या, कोणीही बसा. ज्याला मुखाने हरिनाम उच्चारता येत असेल आणि हातानी टाळ्या वाजविता येत असतील, त्याने बेलाशक नामदेवरायांच्या कीर्तनाला जाऊन बसावे. फार काय, टाळ्या वाजवता येत नसेल, तरी चालेल. नंतर ज्या प्रमाणे गोरोबा काकाना नामदेवरायांच्या कीर्तनात गेलेले हात फुटले, त्याच प्रमाणे त्यांचे असलेले हात आपोआप टाळ्या वाजवायला लागतील.

---

याबाबत नामदेवरायांची काहीएक अट नाही. कोणीही या. सर्वाना पूर्णपणे मोकळीक होती. म्हणून सर्वांकरिता ते वाळवंटात कीर्तन करत असत.

## ओ) नामदेवरायांचा भागवत धर्म

**आम्हा सापडले वर्म । करू भागवत धर्म ।।१।।** नामदेव. असे नामदेवराय म्हणतात. नामदेवरायांचा धर्म म्हणजे भगवंताचे प्रेमयुक्त अंतःकरणाने नामस्मरण करणे. सर्व प्राणीमात्रांच्या ठिकाणी भगवतभाव ठेवणे. जिवाचे अंतिम साध्य देव प्राप्त करून घेणे हे आहे. ते स्वतः साध्य करून घ्यावयाचे, तसेच इतरानाही त्या कामात सहाय्य करणे.

त्यांची शिकवण कर्तव्य निष्ठेला व सामाजिक नीतिमत्तेला पोषक आहे. देव दगडात नाही, तो सर्वांच्या ह्रदयात आहे. तो सर्वाभूती आहे. '**सर्वाभूती पाहे एक वासुदेव । पुसोनिया ठाव अहंतेचा ।।१।।**' असे नामदेवराय म्हणतात. अहंतेचा ठाव ठिकाणा नाहीसा करावा. अहंतेमुळेच मोठमोठे नाडले गेले आहेत. अहंता ही ज्ञानवानाच्या ठिकाणी जास्त दिसून येते. परंतु ज्ञानापेक्षा भक्ती चांगली, कारण तेथे अहंकार नाही. देवाच्या प्राप्तीसाठी दुर्गम अशा योगमार्गाची गरज नाही. व्रत, वैकल्ये व कर्मठपणा यांचे स्तोम माजवणारा धर्म खरा धर्म नाही. नाम हेच सर्व धर्माचे सार सर्वस्व आहे. '**हेचि हेचि तत्त्व सार । नाम म्हणे निरंतर ।।२।।**' नामदेव

हेमाद्रिपंतासारख्या पंडितानी दोन हजारावर व्रते शोधून काढली आहेत. आणि आपल्या ग्रंथात त्याचा विधी दिलेला आहे. एकदा व्रत स्वीकारले की ते आयुष्यभर करावे लागते. व्रतात अनेक प्रकारच्या भीती घातलेल्या आहेत. पुढे ते व्रत केले नाही, तर त्यात घातलेल्या भीतीमुळे, अंध श्रद्धेमुळे, लोक कटाक्षाने व्रत करत असतात. अशा व्रताचरणात, एक व्रत चुकले, तर मागे केलेली सर्व व्रते फुकट जातात. '**व्रत करिता**

**सांग । एक चुकता भंग ।।२।।** तुकोबा. तसेच व्रत करत असताना त्याचा विधी बरोबर करावयास पाहिजे. सर्व सामान्याना ते जमेलच असे नाही. तो विधी चुकला तर पतनाला जावे लागते. **'कर्म धर्म नव्हती सांग । उणे अंग पतन ।।१।। भलत्या काळे नामावळी । सुलभ भोळी भाविका ।।२।।'** तुकोबा. त्यापेक्षा नामस्मरण हे श्रेष्ठ व सर्वात सोपे साधन नामदेवरायानी जगाला दाखवून दिले.

भक्ताला कळिकाळाचे भय नसते. संसारात राहूनही ईश्वर प्राप्ती होते, असे चैतन्यदायी विचार मांडून, नामदेवरायानी जनतेचे बाह्य दरिद्री असलेले जीवन सुसह्य व संपन्न केले. आपल्या तत्त्वदर्शनाने सामान्य जनांचे जीवन त्यांनी आनंदमय बनवले.

## औ) **हिंदी भक्तीकाल**

हिंदी साहित्यातील भक्तिकालाचा आरंभ सन १३२५ च्या आसपास मानतात. उत्तर आयुष्यातील पन्नास वर्षाच्या दीर्घ काळात नामदेवरायानी उत्तर भारतामध्ये , भक्ती प्रचाराचा प्रचंड उद्योग केला. प्रामुख्याने संतमताची जी वैशिष्ठे म्हणून सांगितली जातात, ती सर्व नामेदवरायांच्या हिंदी साहित्यात सापडतात. त्यांच्या या कार्याचा व व्यक्तिमत्वाचा स्पष्ट ठसा, उत्तरेतील नंतर झालेल्या भक्त ह्रदयावर व ज्ञानी संत काव्यावर उमटलेला आहे.

भक्तिकालात पुढे ज्या ज्या भावना व सिद्धान्त दृढमूल झाले, त्या सर्वाना प्रथम नामदेवरायानी शब्दरूप दिले. आणि याच पार्श्वभूमीवर रैदास, कबीर, दादू दयाळ, रज्जबजी, धन्ना जाट, पीपाजी, गुरू नानक, या हिंदीतील ज्ञानाश्रयी संत कवीनी काव्य रचना केली. म्हणून निष्कर्ष असा निघतो की नामदेवरायांची हिंदी वाणी या पूर्वीच्या काळात म्हणजे

## नामदेव चरित्र - नामदेवरायांच्या जीवनातील काही अलौकिक घटना

इ. सन १३२५ पूर्वी वीस वर्षे जनमानसात व लोक जीवनात रुजली. आणि भक्ती काळाची भूमिका व नव्या संत परंपरेची निर्मिती होण्यात तिचे पर्यवसान झाले. नामदेवरायांच्या या कार्यातूनच पुढे सेना महाराज (१३०१), कबीर, निपट निरंजन, नानक, रोहिदास, जटू तापसी, धन्नाजी, पीपाजी, परमानंदजी (१५५०), नरसी मेहता (१५०० - १५८०), सूरदास (१४७८ - १५६३), दादू दयाळ (सन १५४४ - १६०३), मीराबाई, कृष्णभक्त रसखान (सन १५४८), रहिम दास, रज्जब, इत्यादी संत कवींचा उदय झाला. नामदेवांच्या नंतर २०० वर्षानंतर गुरू नानक जन्मले. गुरू नानकानी आपल्या गुरू मंत्राचा ५

प्रचार केला, तेव्हा नामदेवरायांच्या हिंदी भजनांचा मोठा प्रभाव पडला होता. दऱ्या खोऱ्यात नामदेवरायांचे अभंग गुणगुणले जात होते. हे अभंग म्हणजे संत साहित्याचे प्रारंभिक स्वरूप आहे. तसेच या रचनेत संत संप्रदायी कवितेचा प्राचिनतम नमुना पहावयास मिळतो.

## नामदेवरायांच्या जीवनातील काही अलौकिक घटना

नामदेवरायांचा पंढरपुरात जन्म कार्तिक शुद्ध एकादशी शके ११९२ ला झाला.

नामदेवरायाना लहानपणा पासून भक्तीची, नामस्मरणाची आवड.

लहानपणीच पाचव्या वर्षीच नामदेवरायानी देवाला नैवेद्य खावयाला लावले.

नामदेवरायांचे लग्न ११ व्या वर्षी देवानी लावून दिले.

नामदेवरायानी संसाराकडे दुर्लक्ष करून परमार्थ यथासांग केला.

नामदेवरायांचा बाजारहाट, दगड सोन्याचा केला.

नामदेवरायानी मराठी व हिंदी भाषे मध्ये कवित्व केले.

नामदेवरायांच्या कीर्तनात देव नाचत असत.

---

## नामदेव चरित्र - नामदेवरायांच्या जीवनातील काही अलौकिक घटना

नामदेवरायानी जनाबाईला शिष्यत्त्व बहाल केले.

नामदेवरायानी परसा भागवताला उपदेश केला.

नामदेवरायानी वाळवंट परीस केले.

नामदेवरायानी चोखोबा सारख्या हरिजनाला शिष्यत्त्व बहाल केले.

नामदेवरायांच्या कीर्तनात थोट्या गोरोबाला हात फुटले. त्याचे मेलेले मूल जिवंत झाले.

द्वारकेचा भोपा आरतीवेळी पेटला असता, पंढरपुरातून नामदेवरायानी ती आग विझवली.

मेव्हणे दशमी दिवशी संध्याकाळी आल्यावर भोजन न देणे, देवानी दिलेल्या सोन्याच्या मोहरा दान करणे.

देवानी विप्रवेशाने एकादशीला भोजन मागणे

नामदेवरायानी चोखोबाच्या मंगळवेढ्याहून अस्थी आणून महाद्वारात समाधी बांधली.

नामदेवरायानी राका कुंभाराची निष्कामभाव परीक्षा घेतली.

ज्ञानोबारायांच्या बरोबर पदयात्रा केली.

नामदेवरायानी भोपाळला कमलाकर ब्राह्मणाचा मुलगा पद्‌माकर याला जिवंत केले.

नामदेवरायानी हिंदी भाषेमध्ये कवित्व केले.

नामदेवरायानी राजस्थानात बिकानेर जवळ विहिरीचे पाणी वर आणले.

नामदेवरायानी औंढ्या नागनाथाचे देऊळ फिरविले.

नामदेवरायानी काल्याचे कीर्तन करण्याची पद्धत चालू केली.

पंजाबकडील घटना

दिल्लीत बादशहाने मारलेली गाय नामदेवरायानी जिवंत केली.

नामदेवरायानी पंजाबात गहू कापणी केली.

नामदेवरायानी बहोरदासाला जिवंत केले.

---

नामदेवरायानी मरडगावी आंधळ्याला दृष्टी दिली.

नामदेवरायानी केशोकलंदरचा महारोग नाहीसा केला.

घुमानमध्ये युद्धात मुंडके उडवले गेलेल्या फिरना शिष्याला नामदेवरायानी शक्ती दिली.

धारिवाल येथील लद्धा खत्रीच्या तेलाच्या कुपीत नामदेवरायानी तेल निर्माण केले.

भट्टिवाल येथे कोतवालाच्या वाळलेल्या बोराच्या काठीला नामदेवरायानी पालवी फुटली.

भट्टिवाल येथे एकाच्या गव्हाच्या शेतात गहू कापणी केली. त्या पेंढ्या नामदेवरायांच्या मागोमाग उड्या मारत शेतकऱ्याच्या घरा पर्यंत आल्या.

घुमानमधील तापियाना जवळ पाण्याचा तलाव निर्माण केला.

नामदेवरायानी पंढरपूर येथे महाद्वारात घरच्या चवदा माणसासह जिवंत समाधी घेतली.

## १) नामदेवांचे पूर्वज मूळ रिळे गावाचे, नंतर वास्तव्य नरसीला

सांगली जिल्ह्यात शिराळा नावाचा एक तालुका आहे. शिराळा गावच्या पश्चिमेला रिळे नावाचे एक गाव आहे. या गावी नामदेवांचे पूर्वज रहात होते. ते रहात असलेल्या रिळे, या गावच्या नावावरून त्याना रिळेकर हे आडनाव मिळाले. कालांतराने रिळेकर या आडनावाचा उच्चार रेळेकर असा झाला. नामदेवांचे पूर्वज नंतर रिळे या गावातून पुढे नरसी-बामणी या गावी रहावयास गेले. तेथे ते शिंप्याचा व्यवहार करत असत. कदाचित नरसीला रहावयास आल्यावर त्यांचे आडनाव रिळेकर - रेळेकर असे पडले असावे.

नामदेवरायांच्या पूर्वीच्या सहा पिढ्या परभणी जिल्ह्यातील हिंगोली तालुक्यातील नरसी-बामणी (नरसी) नावाच्या गावी राहात होत्या. हे गाव आवंढ्या नागनाथ पासून ८-१० कोसावर आहे. या गावी गोदावरी लाईनवरील हिंगोली स्टेशनवरून जावे लागते. या स्टेशनवरून नरसीस जाण्याचा १० मैलांचा रस्ता आहे. हे गाव कयाधु किंवा क्याड नावाच्या नदीच्या काठी आहे. येथे नामदेवरायांच्या पूर्वजांचे घरही दाखवले जाते. नदीकाठच्या एका लहानशा देवालयात नामदेवरायांचे दोन पितळी मुखवटे आहेत. नरसीस केशवदेवाचे एक मंदिर आहे. यालाच केशिराजाचे मंदिर म्हणतात.

**केशव आराध्य देवाचाही देव । पंढरीचा राव पांडुरंग ।।१।। पांडुरंगाविण नाही त्रिभुवनी । भोळ्या चक्रपाणि वाचुनिया ।।२।। नामा म्हणे ध्यानी ध्यावे विठोबासी । अखंड माणसी भजा देवा ।।३।।**

नामदेव ३८३ आ, ३८१ स, १४६२ गोरखपूर, १४११.

---

**नामदेवरायांचे मूळपुरुष - यदुशेट रेळेकर**

पंढरीचा पांडुरंग हे नामदेवरायांच्या कुळातील आराध्य दैवत व ग्रामदेव नरसिंह हे कुलदैवत समजले जात असे. नृसिंह-नरसिंह- नरहरि-नरकेसरि-केसरीराज-केसीराज-अशी केसी-केशिराज या शब्दाची व्युत्पत्ति आहे.

## २) नामदेवरायांचे मूळपुरुष - यदुशेट रेळेकर (नरसी)

नामदेवरायांचे मूळ पुरुष यदुशेट रेळेकर हे नरसी बामणी येथे रहात होते. हे शिंप्याचा व्यवसाय करत असत. तसेच यांचा कपडे विकण्याचा धंदा होता. त्यांच्या घराण्यात आषाढी व कार्तिकी या दोन पंढरीच्या वाऱ्या नियमाने चालत आलेल्या होत्या.

**पंढरीची वारी आहे माझे घरी । आणिक न करी तीर्थव्रत ।।१।। व्रत एकादशी करीन उपवासी । गाईन अहर्निशी मुखी नाम ।।२।।**

तुकोबा २३१६ व, १५९९ जोग, २५५१ घुले, जोशी, २४३ मा, ३२३ प. मा.

आनुवंशिक गुणांच्या वाढीचा मनोरंजक इतिहास एकाच कुळातील अनेक पिढ्यांच्या सूक्ष्म निरीक्षणाने पहावयास मिळतो. सागरात सर्वात मोठी जी लाट असते, तिच्यामागे असंख्य लहान लहान लाटा असतात. पुढील मोठी लाट म्हणजे मागाहून येणाऱ्या लाटांचे एक सामुदायिक स्वरूप असते. त्या दृष्टीने अनेक पिढ्यांच्या सद्‌गुणांचा विकास ज्या व्यक्तीत पूर्णत्वास पोहोचलेला असतो, अशा व्यक्तीच्या कुळकथेत या आनुवंशिक गुणांच्या परंपरेची माहिती मिळण्या सारखी असते नामदेवरायांची कुळकथा म्हणजे त्यांच्या ठिकाणी विकसित झालेल्या भक्तीच्या उत्कर्षाचा इतिहास होय. यदूशेट विठ्‌ठलभक्त होते. ते रात्रंदिवस श्रीविठ्‌ठलाचे नामस्मरण करत असत. त्यांच्या वारी करण्याच्या नेमात कधीही खंड

## नामदेवरायांचे मूळपुरुष - यदुशेट रेळेकर

पडत नसे. जन्मोजन्मी अखंड वारी घडावी हीच त्यांची इच्छा होती.
**हीच व्हावी माझी आस । जन्मोजन्मी तुझा दास ।।१।। पंढरीचा वारकरी । वारी चुको नेदी हरी ।।२।।**
तुकोबा ९६९ व, ३१२६ जोग, ११८५ घुले, जोशी, मा. ५५६, ७९१ प. मा.

यदूशेटचा मुलगा हरिशेट. हे पंढरीची वारी करू लागले. तेही वडिला प्रमाणेच श्रीविठ्ठलाची भक्ती करत. हरिशेटचा मुलगा गोपाळशेट. हे व्यापारात दंग होते. हरिशेटला वृद्धाप काळामुळे वारी करण्याची ताकत उरली नव्हती. तेव्हा त्यानी आपला मुलगा गोपाळशेटला वारी करण्यास सांगितले. तरी पण त्या वर्षाची वारी करण्यास हरिशेटच गेले. वारीच्या नियमाप्रमाणे चंद्रभागेचे स्नान करून श्रीविठ्ठल दर्शनाला गेले. व विठ्ठल चरणी मस्तक ठेवून म्हणाले, आता मला वारी करण्यास ताकत नाही, तरी आपल्या चरणी ठाव मिळावा.
**तुका आला लोटांगणी । मज ठाव द्यावा जी चरणी । हेचि करितसे विनवणी । भव बंधनी सोडवावे ।।६।। सकळ देवाआदी देवा । कृपाळुवा जी केशवा । महानंदा महानुभावा । सदाशिवा सहज रुपा ।।२।।**
तुकोबा ४२५ व, ४०९९ जोग, ६९८ घुले, ६४६-१ जोशी, १८८ मा, २५३ प. मा.

त्या वरून त्यांची ती निष्ठा पाहून तेथेच हरिशेटला श्रीविठ्ठलाने आपल्या स्वरुपी मिळवले. ही बातमी गोपाळशेटला कळली. त्याबद्दल त्यास वाईट वाटले. परंतु ते व्यापारातच मग्न राहिले. गोपाळशेटला गोविंदशेट व रघुशेट या नावाची दोन मुले होती. त्यापैकी रघुशेट व त्याची आई गंगाबाई ही दोन दिवसातच एकाएकी मरण पावली. त्या बद्दल गोविंदशेट याना आश्चर्य वाटून त्यानी श्रीविठ्ठलाच्या वारीचा क्रम चालू केला. गोविंदशेटने आपले सर्व आयुष्य हरी चिंतनात घालवले.

---

**नामदेवरायांचे वडील दामाशेटी व आई गोणाबाई**

गोविंदशेटना नरहरशेट व जिवाजीशेट अशी दोन मुले झाली. या मुलाना लहान पणापासून श्रीविठ्ठलाचा सोहळा करण्याचा नाद लागला. नरहरशेट हे पंढरीची वारी करू लागले. नरहरशेटच्या पोटी परम भक्त दामाशेटी जन्मास आले.

## ३) नामदेवरायांचे वडील दामाशेटी व आई गोणाबाई

दामाशेटी दोन वर्षाच्या वया पासून विठ्ठल नामाचा उच्चार करू लागले. दामाशेटीची हुशारी व भगवत निष्ठा पाहून कल्याणी येथील (गोमा) यानी आपली मुलगी गोणाबाई बरोबर दामाशेटीचे लग्न लावून दिले. उभयतांची गोत्रे भारद्वाज व गाधिज अशी होती.

**कल्याणीचा शिंपी हरिभक्त गोमा । त्याची कांता उमा नरहर भजनी ।।१।। सरिता सुकृताची त्या पोटी उत्पन्न । जाली संबोधन गोणाबाई ।।२।। गोणाई दामाशेटी झाले पाणिग्रहण । संसारी असोन नरसी गावी ।।३।। गोत्र संज्ञा ऐका पूर्वजाची सहज । गाधिज भारद्वाज दोनी कुळे ।।४।।**

नामदेव १२४४ आ, १२३२ स, १११ गोरखपूर, ९४ मा, १२४५ प. मा.

नामदेवरायांचे आजोळ कल्याणी - काणणी बामणीपासून तीन कोसावर आहे. या नरसीगावी असताना दामाशेटीना प्रथम आउबाई नावाची कन्या झाली.

**आउबाई कन्या झाली गोणाईसी । पुढे देवा नवसी पुत्रासाठी ।।५।। सरिता सुकृताची त्या पोटी उत्पन्न । झाली संबोधन गोणाबाई ।।६।। नामा म्हणे होते विठोबाचे मनी । तेचि नित्य जननी नवस करी ।।७।। सरिता सुकृताची त्या पोटी उत्पन्न । झाली संबोधन गोणाबाई ।।२।।**

नामदेव १२४४ आ, १२३२ स, १११ गोरखपूर, ९४ मा, १२४५ प. मा.

---

मुलगा व्हावा अशी त्यांची इच्छा होती, पण अगोदर मुलगीच झाली. त्याना मुलगा लवकर होईना. म्हणून पूर्वजांचे गाव सोडून, उदास होऊन, ते श्रीक्षेत्र पंढरीस येऊन राहिले. व पंढरपुरास कायमचे वास्तव्य केले. पंढरपुरातच राहून पांडुरंगाची पूजाअर्चा व सेवा करून काळ घालवावा, असे त्यानी ठरवले. त्या प्रमाणे त्यानी दररोज चंद्रभागेचे स्नान, पुंडलिकरायाचे व भगवंताचे दर्शन, काकड आरती, इत्यादी करावयाचे असा नियम सुरू केला. तसेच प्रत्येक दिवशी श्रीविठ्ठलास नैवेद्य समर्पण केल्या वाचून, अन्नग्रहण करावयाचे नाही, असाही नेम चालू केला. ते नित्य मुखाने श्रीविठ्ठल या नामाचा जप करत काळ घालवू लागले. तसेच पुत्र प्राप्ती साठी गोणाई मनोभावे पांडुरंगास नवस करू लागली.

**गोणाईने नवस केला । देवा पुत्र देई मला ।।३।। आदी ठाणे पंढरपूर । नांदे कान्हाई सुंदर ।।२।।**

जनाबाई १३६ आ, २७४ स, ११३ - गोरखपूर, १२४६ प. मा.

## ४) नामदेवरायांचा पंढरी मध्ये अवतार

गोणाईची ईश सेवा फलद्रूप झाली.

**शुद्ध देखोनिया भाव । पोटी आले नामदेव ।।४।। दामाशेटी हरुषला। दासी जनीस आनंद झाला ।।५।। आदी ठाणे पंढरपूर । नांदे कान्हाई सुंदर ।।२।।**

जनाबाई १३६ आ, २७४ स, ११३ - गोरखपूर, १२४६ प. मा.

काही दिवसानी भगवंताच्या कृपेने गोणाई पुन्हा गर्भवती झाली. त्या वेळी डोहळ्याची चिन्हे अति शुभकारक होऊ लागली. कारण त्या डोहळ्यावरून गर्भाची आवड स्पष्ट बिंबत असते.

---

## नामदेवरायांचे जन्म पत्र प्रमोद संवत्सरामध्ये

**गर्भाचे आवडी मातेचा डोहळा । तेथीचा जिव्हाळा तेथे बिंबे ।।३।। काय सांगो जाले काही चिया बाही । पुढे चाली नाही आवडीने ।।२।।**
तुकोबा ३६३८ व, २३९८ जोग, ३९१४ घुले, जोशी,

गोणाईस संसाराचा कंटाळा येऊ लागला. एकांती जाऊन श्रीहरिचे भजन करावे, असे तिला वाटत असे. तसेच ज्याला त्याला,' तुम्ही श्रीहरीचे भजन करा, असे सांगावेसे वाटत असे.' ती सतत परमार्थपर भाषणे करत असे.

शके ११९२, प्रमोदनाम संवत्सर, विक्रम संवत १३२७, कार्तिक शुद्ध एकादशी, रविवार, दिनांक २६ आक्टोबर १२७० ला सूर्योदयाला नामदेवरायांचा अवतार झाला. याबाबत नामदेवराय स्वतः म्हणतात,
**माझे जन्म पत्र बाबाजी ब्राह्मणे । लिहिले त्याची खूण सारू ऐका ।।१।। अधिक ब्याण्णव गणित अकरा शते । उगवता आदित्य रोहिणीशी ।।२।। शुक्ल एकादशी कार्तिक रविवार । प्रमोद संवत्सर शालिवान शके ।।३।। प्रसवली माता मज मळमूत्री । तेव्हा जिव्हेवरी लिहिले देवे ।।४।। शतकोटी अभंग करील प्रतिज्ञा । नाममंत्र खुणा वाचोनि पाहे ।।५।। ऐशी वर्षे आयुष्य पत्रिका प्रमाण । नामसंकीर्तन नामया वृद्धी ।।६।।**
नामदेव १२५४ आ, १२४० स, ११५ गोरखपूर, ९५ पा, ७४८ मा, १२४८ प. मा.

संवताच्या तीन विशतिया आहेत. (१) ब्रह्म विशती, (२) विष्णू विंशती, व (३) रुद्र विशती. प्रत्येकात वीस संवत असतात. ब्रह्म विशतामध्ये खालील वीस संवत आहेत.
१. प्रभव २. विभव ३. शुक्ल ४. प्रमोद ५. प्रजापती ६. अगिरा ७. श्रीमुख ८. भाव ९. युवा १०. धाता ११. ईश्वर १२. बहुधान्य १३. प्रमाथी १४. विक्रम १५. वृष १६. चित्रभानु १७. सुभानु १८.तारण

१९ पार्थिव २०. व्यय.

श्रीज्ञानोबारायांचा जन्म शके ११९७ युवा संवत्सरात झाला.

| | | |
|---|---|---|
| ११९२ | - | **प्रमोद** |
| ११९३ | - | प्रजापती |
| ११९४ | - | अंगिरा |
| ११९५ | - | श्रीमुख |
| ११९६ | - | भाव |
| ११९७ | - | **युवा** |

म्हणजे नामदेवरायांचा जन्म शके ११९२, प्रमोद नाम संवत्सरात झाला.

## ५) नामदेवांचे जन्म कूळ व व्यवसाय -

नामदेवरायानी शीव या शब्दावर सहजसुंदर श्लेष साधला आहे व संक्षेपाने आपला जन्म, कूळ व व्यवसाय इत्यादी गोष्टी सांगितलेल्या आहेत,

**शिंपियाचे कुळी जन्म मज झाला । परी हेतू गुंतला सदाशिवी ।।१।। रात्री माजी शिवी दिवसा माजी शिवी । आराणुक जीवी नाही कदा ।।२।। सुई आणि सातुळी कात्री गज दोरा । मांडीला पसारा सदाशिवी ।।३।। नामा म्हणे शिवी विठोबाची अंगी । त्याचेनि मी जगी धन्य झालो ।।४।।**

नामदेव १२४३ आ, १२३२ स, ११६ गोरखपूर, ९६ पा, प. मा, १२५०.

नामदेवराय म्हणतात की माझा जन्म शिंप्याच्या कुळात झाला. पण माझा हेतू सदाशिवाच्या ठिकाणी गुंतलेला आहे. रात्र आणि दिवस मी शिवण्याचे काम करतो. मी सुई, सातुळी, कात्री, गज व दोरा यांचा

## ५. नामदेवरायानी पंढरीरायाला नैवेद्य खावयाला लावला

पसारा मांडलेला आहे. मी विठ्ठलाचे कपडे शिवतो. म्हणजे मी विठ्ठलाचे शब्दरुपी कपडे शिवतो. म्हणजे विठ्ठलाचे गुणानुवाद गातो.

**मन मेरी गज जिभ्या मेरी काती । राम रमे काटौ जम की फासी ।।१।। का करौ जाती का करौ पाती । राजाराम सेऊ दिन राती ।।२।।**

नामदेव २१२४ स, ४ गोरखपूर हिंदी अभंग, ४ पा.

नामदेवराय बालपणापासून विठ्ठल भक्त होते. नामदेवरायांच्या घराण्यात विठ्ठलभक्ती पूर्वापार चालत आलेली होती. त्यामुळे त्याना अगदी बालपणापासून विठ्ठलभक्तीचा छंद जडला होता. ते दोन वर्षाचे असतानाच श्रीविठ्ठल नामाचा उच्चार करू लागले. पुढे पाच वर्षाचे वय झाल्यावर दामाशेटीने शुभमुहूर्त पाहून नामदेवरायाना शाळेत घातले. परंतु त्यांचे लक्ष गुरुजीनी सांगितलेले पाठ करण्याकडे व लिहिण्याकडे जात नव्हते. ते सतत विठ्ठलनामाचा उच्चार करू लागले. तसेच दुसऱ्या मुलानाही विठ्ठलनामाचा उच्चार करा असे सांगू लागले.

**विठ्ठल विठ्ठल म्हणा वेळोवेळा।हा सुख सोहळा स्वर्गी नाही।।२।।**

तुकोबा २२०९ व, २०९५ जोग, २४३८ घुले, जोशी, ९३४ मा, ८० प. मा

**विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी।विठ्ठल तोंडी उच्चारा।।१।।विठ्ठल अवघ्या भांडवला।विठ्ठल बोला विठ्ठल।।२।।**

तुकोबा ५४२ व, १०२८ जोग, ७७३ घुले, जोशी, ९२० मा.

नामदेवरायाना लहानपणापासूनच भजनाचा नाद लागला. आणि सतत ते नामस्मरण करत.

**पंच वरुषी झाला नामा।छंद विठूचा लागला।।१।।जाऊनिया राउळात।तेथे सावकाश बैसत।।२।।विठ्ठल हरी वाचे छंद। विठ्ठले लाविलासे वेध।।३।।एका जनार्दनी सार।मंत्र जपे त्रिअक्षर ।।४।।**

नाथ ३५५५

---

**६. नामदेवरायानी पंढरीरायाला नैवेद्य खावयाला लावला**

नामदेवरायांचे मूळपुरुष यदुशेट हे होते. त्यांची वंशावळ या प्रमाणे. यदुशेट - हरिशेट - गोविंदशेट - नरहरशेट - दामाशेटी - नामदेव महाराज.

## ६) नामदेवरायानी पंढरीरायाला नैवेद्य खावयाला लावला

एके दिवशी दामाशेटीना लवकर परगावी बाजारला जावयाचे होते. त्यानी नामदेवराया कडून देवाला नैवेद्य पाठवावयाला गोणाईला सांगितले. गोणाईने नामदेवा जवळ नैवेद्य दिला व पांडुरंगाला अर्पण करून येण्यास सांगितले. नामदेवराय नैवेद्य घेऊन पांडुरंगाच्या राऊळात आले. देवा जवळ गेले. देवाला नैवेद्य भक्षण करण्यास सांगितले.

**केशवा माधवा गोविंदा गोपाळा । जेवी तू कृपाळा पांडुरंगा ।।१।।**
**अच्युता वामना दशरथ नंदना । जेवी तू गा कृष्णा पांडुरंगा ।।२।।**
**कृष्ण विष्णू हरी मधुसूदन मुरारि । जेवी तू नरहरी पांडुरंगा ।।३।।**
नामदेव १२४६ आ, १२३४ स, १२४ गोरखपूर, १०२ पा.

थोडा वेळ त्यानी वाट पाहिली. पण देव नैवेद्य खाईनात. नामदेवरायानी पुन्हा देवाला प्रार्थना केली. पण देव नैवेद्य खाईनात. नामदेवरायाना वाटले रोज बाबा येतात. आज मी आलो. त्यामुळे कदाचित देव नैवेद्य खात नसावेत. नामदेवरायानी आज बाबा येऊ शकत नाहीत, असे देवाला सांगितले. व परत देवाला नैवेद्य खाण्या विषयी प्रार्थना केली. तरी देव नैवेद्य खाईनात.

**दूध कटोरे गडवे पाणी । कपिला गाई नामै दुही आनी ।।१।। दूध पिऊ गोविंद राइ । दूध पिऊ मेरो मनु पतिआई । नाही त घरको बापु रिसाई ।।२।। सोईन कटोरी अमृत भरी । लै नामे आगे धरी ।।३।। एकु भगतु मेरे हिरदे बसे । नामे देखी नारायण हसै ।।४।। दूध पिजाई**

---

## ६. नामदेवरायानी पंढरीरायाला नैवेद्य खावयाला लावला

**भगतु घरी गहआ । नामे हरीका दरसनु भईआ ।।५।।**

नामदेव २३१९ स. ४० गोरखपूर, गुरु ग्रंथ.

परत देवाला म्हणाले की देवा तुम्ही जो पर्यंत नैवेद्य खात नाही तो पर्यंत मी येथून हलणार नाही. असे बोलून बराच वेळ तेथे बसले. बराच वेळ होऊनही, देव नैवेद्य घेत नाहीत असे दिसल्यावर व परोपरीनी देवाची विनवणी करूनही देव नैवेद्य घेत नाहीत, असे पाहून शेवटी नामदेवराय म्हणाले, 'विठ्ठला, तू जर आता नैवेद्य खाल्ला नाहीस, तर मी तुझ्या पायावर डोके आपटून प्राण देईन. नामदेवरायानी थोडा वेळ वाट पाहिली, पण देव नैवेद्य खात नाहीत असे पाहिल्यावर त्यानी डोके आपटण्याचा पवित्रा घेतला. त्या बरोबर भक्तवत्सल भगवंताने त्याना आवरले, व नैवेद्य आनंदाने खाल्ला.

**ऐसी ग्लानी करीता विठ्ठल पावला । नैवेद्य जेविला नामयाचा ।।४।।**
**अच्युता वामना दशरथ नंदना । जेवी तू गा कृष्णा पांडुरंगा ।।२।।**

नामदेव १२४६ आ, १२३४ स, १२४ गोरखपूर, १०२ पा.

**जेऊनिया हाती देवे दिधली वाटी । आला उठाउठी नामा घरा ।।१।। गोणाई म्हणे रे ऐक नामदेवा । नैवेद्य आणावा माझे हाती ।।२।। तेव्हा नामदेवे हाती दिधली वाटी । पाहू गेली दृष्टी रिकामी ते ।।३।। काय तुज घरी उणे होते अन्न । नैवेद्य आपण तेथे खावा ।।४।। ते दोघे बोलता दामाशेटी आला । पुसे त्या दोघाला काय गुह्य ।।५।। देखियेले नाही नाही ऐकियेले । ऐसे सांगितले नामदेवे ।।६।। दामाशेटी म्हणे आता असो द्यावे । सकाळी पहावे प्रचित हे ।।७।।**

नामदेव १२४७ आ, १२३५ स, १२५ गोरखपूर, १०३ पा.

देवानी नैवेद्य खाल्या नंतर नामदेवरायाना आनंद झाला. समाधानाने रिकामी वाटी घेतली. घराकडे आले. गोणाई म्हणाली नैवेद्याची वाटी दे. नामदेवरायानी वाटी दिली. वाटी रिकामी पाहून गोणाई म्हणाली, तू

---

## ६. नामदेवरायानी पंढरीरायाला नैवेद्य खावयाला लावला

नैवेद्य का खाल्लास? घरी काय अन्न नव्हते काय? नामदेवराय म्हणाले, आई मी नैवेद्य खाल्ला नाही. देवानी नैवेद्य खाल्ला. पण गोणाईला ते पटेना. गोणाईने अनेक प्रकारे विचारून पाहिले. धाकदपटशा दाखवून पाहिले. पण नामदेवरायांचे उत्तर एकच. नैवेद्य देवानी खाल्ला. थोड्या वेळाने दामाशेटी परत आले. त्यानी पण चौकशी केली. नामदेवरायांचे उत्तर एकच. गोणाई म्हणाली, देवानी नैवेद्य भक्षण केल्याचे कधी पाहिले नाही, व कधी ऐकले नाही. आणि नामदेव म्हणतो, देवानी नैवेद्य खाल्ला. दामाशेटीनी परत विचारले. पण नामदेवरायांचे उत्तर एकच. शेवटी दामाशेटी म्हणाले, उद्या प्रत्यक्ष पाहू.

**आम्ही हाटा जाउ लवकरी येऊ । नैवेद्य पाठवू नाम्या हाती ।।१।।**
**दुसऱ्या दिवशी नैवेद्य धाडीला । दामाशेटी गेला त्याचे मागे ।।२।।**
**जाऊनिया नामा उभा राहे सन्मुख । म्हणे विठोबास जेवी बापा ।।३।।**
**देव म्हणे नाम्या बसावे दारात । लवकरी जेवतो पाहे आता ।।४।।**
**जेऊनिया देवे हाती दिधली वाटी । तेव्हा दामाशेटी काय बोले ।।५।।**
**बारा वर्षे तुज उपवासी मारीले । आजी जेवविले नामदेवे ।।६।।**

नामदेव १२४८ आ, १२३६ स, १२६ गोरखपूर, १०४ पा.

दुसरे दिवशी नामदेवरायांचे बरोबर नैवेद्य पाठवला. दामाशेटी लपत लपत त्याच्या मागोमाग गेले. नामदेवराय देवाजवळ गेले. देवाला सांगितले, देवा आज लवकर जेवा. कालच्या सारखी माझी परीक्षा पाहू नका. देव ठीक आहे म्हणाले. मी लवकर जेवतो. तू दारात बैस. देवानी नैवेद्य घेतला व तो भक्षण करून वाटी नामदेवराया कडे परत दिली. ते पाहून दामाशेटीना गहिवरून आले. एकापरीने त्याना धन्य वाटले व एकापरीने खेद वाटला. आज बारा वर्षे आपण देवाला नैवेद्य दाखवतो, पण देवानी कधी तो खाल्ला नाही, पण आज नामदेवाच्या हातून तो देवानी खाल्ला. आपणही देवाला तसा आग्रह धरला असता, तर देवानी

तो खाल्ला असता. विनाकारण आपण देवाला बारा वर्षे उपवासी ठेवले. आणि आज आपल्या पुत्राने देवाचे प्रत्यक्ष रूप साकार करून दाखवले. दामाशेटीच्या गेल्या कित्येक पिढ्यांची हरिभक्ती आज खरीखुरी फळाला आली होती. दामाशेटीने घरी येऊन मुलाला प्रेम भराने मिठीच मारली. ते म्हणाले, आज नाम्याने माझ्या घराण्याचा उद्धार केला. देवाला नैवेद्य दाखवूनही मी आजवर उपवासीच ठेवले होते, पण आज नामदेवाने देवाला जेऊ घातले. आज मी धन्य झालो, आज मी धन्य झालो.

नामदेवाला कोठे ठेवू आणि कोठे नको असे दामाशेटीना होऊन गेले. गोणाईची कूस धन्य झाली होती. नामदेवरायांच्या आई वडिलाना अस्मान ठेंगणे झाले होते. ते ज्याला त्याला नामदेवाचे कौतुक सांगत सुटले.

## ७) नामदेवरायांचे राजाई बरोबर लग्न झाले

नामदेव हा बालभक्त सर्वकाळ पांडुरंगाच्या भक्तीत दंग असे. हे पाहून दामाशेटी व गोणाबाई चिंतातूर झाली. नामदेवरायानी संसाराकडे लक्ष द्यावे व उद्योगधंदा करावा ही त्यांची इच्छा. म्हणून त्यांच्या लग्नाचा विचार दामाशेटी करू लागले. परंतु जवळ पैसा नाही. कसे लग्न करावयाचे? असा विचार दामाशेटी करत होते. त्याना झोप येईना. रात्रंदिवस हाच विचार मनात घोळत होता.

**नाम्याचे लग्नासाठी । चिंता करी दामाशेटी ।।१।। नाही आपुले जवळी धन । कैसे होईल याचे लग्न ।।२।। रात्रंदिवस गोणाईशी । निद्रा नये पै नेत्राशी ।।३।। माझ्या नामयाचे लग्न । एकाजनार्दनी करील कोण ।।४।।** नाथ ३६०४ आ,

भक्ताची चिंता देवाला असते. देवानी लगेच ते कार्य हाती

## ७) नामदेवरायांचे राजाई बरोबर लग्न झाले

घेतले. नामदेवासाठी सोयरिक जमवून आणली.

**सर्वांचा तो आत्मा कळली तया खूण । नामयाचे लग्न करावे ते ।।१।। जाऊनिया स्वये देवे माव केली । सोयरिक आणिली नामयाशी ।।२।। लग्नाचे कारण मेळविले देखा । एकाजनार्दनी ऐका नवल चोज ।।३।।**
नाथ ३६०५ आ,

**दामाशेटीचा कारकून । स्वये झाला नारायण ।।१।। लग्न तिथी धरली निकी । नोहे कोणा पै ओळखी ।।२।। विठ्ठल शेटी ऐसे नाम । एकाजनार्दनी प्रेम ।।३।।**
नाथ ३६०६ आ,

**कोणाशी न कळे हा पंढरीचा राणा । केली विवंचना लग्नाची ते ।।१।। सह परिवार आपण निघाला । लग्नाचा सोहळा करितसे ।।२।। एकाजनार्दनी करूनि पाणिग्रहण । निघाला आपण तेथोनिया ।।३।।**
नाथ ३६०७ आ,

देव दामाशेटीचे कारकून बनले. गोविंदशेट सदावर्ते यांच्या कडे गेले. स्वतःचे नाव विठ्ठलशेटी असे सांगितले. सदावर्ते यांची मुलगी राजाई बरोबर नामदेवांचे लग्न ठरवले. देवानी दामाशेटीची पार्टी मोठी आहे, असे सांगितले. लग्न तिथी ठरवली. लग्न सदावर्ते यानी करून द्यावयाचे असे ठरले. देव म्हणाले की आता मी वऱ्हाड घेऊन येतो. देव दामाशेटी कडे आले. लग्न ठरवल्याची बातमी त्याना सांगितली. दामाशेटी कडील नामदेवाच्या लग्नाचे वऱ्हाड घेऊन गेले. लग्न यथासांग पार पडले.

**प्रातःकाळ झालिया पाहती नरनारी । नोवरा आणि नोवरी व्याहीही ना ।।१।। विठ्ठल शेटी नाही परिवारासहित । राजाई मनात शोक करी ।।२।। एकाजनार्दनी राजाईचा भाव । का हो देवाधिदेव ठकवले ।।३।।** नाथ ३६०८ आ,

---

## ७) नामदेवरायांचे राजाई बरोबर लग्न झाले

**न देता दरुशन गेला चक्रपाणि । राजाई तो मनी दुःख करी ।।१।। न कळे कवणाशी अघटित करणी । करुनि चक्रपाणि का हो गेला ।।२।। एकाजनार्दनी राजाईचा हेत । नित्य आठवीत पांडुरंग ।।३।।**

नाथ ३६०९ आ,

**लग्नाचा सोहळा यथासांग जाहला । नामा वेगी आला पंढरीशी ।।१।। येवोनिया सर्व पाहती संपदा । येथे तो आपदा न मिळे आन ।।२।। एकाजनार्दनी माता आणि पिता । राजाईचा तत्वता शीण करिती ।।३।।**

नाथ ३६१० आ,

**उभयतांचे समाधान राजाईने केले । माझे तो घडले उत्तम कार्य ।।१।। मनाशी तुम्ही नका करू दुःख । विठ्ठलाचे सुख मज जाहले ।।२।। एकाजनार्दनी राजाईची वाणी । ऐकताचि मनी संतोषले ।।३।।**

नाथ ३६११ आ,

लग्नाचे वऱ्हाड पंढरीला आले. राजाईने नामदेवारायांचे मोडके घर पाहिले. तिला आपली फसवणूक झाल्याचे कळाले. पण आता इलाज नव्हता. आहे तो संसार सुखाने करण्याचा राजाईने प्रयत्न केला. राजाई पासून नामदेवरायाना नारायण, महादेव, गोविंद आणि विठ्ठल हे चार मुलगे व लिंबाई नावाची मुलगी अशी पाच अपत्ये झाली. त्यांच्या एकंदर कुटुंबाचे वर्णन जनाबाईने केले आहे.

**गोणाई राजाई दोघी सासू सुना । दामा नामा जाणा बाप लेक ।।१।।
नारा विठा गोंदा महादा चवघे पुत्र । जन्मले पवित्र त्याचे वंशी ।।२।।
लाडाई गोडाई येसाई साखराई । चवघी सुना पाही नामयाच्या ।।३।।
लिंबाई ती लेकी आऊबाई बहिणी । वेडी पिसी जनी नामयाची ।।४।।**

जनाबाई २८० आ, ४१७ स, १२९ गोरखपूर, ११४ पा,

**ऐसे काही दिन लोटलेसे जाण । परीसा कारण देवाचे ते ।।१।।**

**नाम्यासी चौघे पुत्र पै जाहले । नाम ते ठेवले विठ्ठलराये ।।२।। एकाजनार्दनी भक्ताचा सोहळा । दाखवितसे डोळा उघड ऐका ।।३।।** नाथ ३६१२ आ,

नामेदवरायाना मुले झाली तेव्हा प्रत्येक बारशास देव येत असत. जनाबाई देवाना मुलांची नावे ठेवण्यास सांगत असे.

**नामदेवा पुत्र झाला । विठो बारशाशी आला ।।१।। अंगडे टोपडे पेहरण । शेला मुंडासा घेऊन ।।२।। माझ्या जिवीच्या जीवना । नाम ठेवी नारायणा ।।३।। जनी म्हणे पांडुरंगा । नाव काय ठेवू सांगा ।।४।।**

जनाबाई १३७ आ, २७५ स, ११४- गोरखपूर, १११ पा, १२४७ प. मा.

**नारा महादा गोंदा विठा चौघे पुत्र जाहले । आनंदे लागले हरी भजनी ।।१।। नित्यकाळ वाचे विठ्ठलाचा छंद । आठवती गोविंद वेळोवेळा ।।२।। एकाजनार्दनी कायावाचामन । वेधलेसे जाण विठ्ठल चरणी ।।३।।** नाथ ३६१३ आ,

## ८) गोणाई व नामदेवरायांचा प्रपंच कर्तव्या विषयी संवाद

नामदेवराय विठ्ठल मंदिरात जात असत. तेथेच नामस्मरण करत बसत. भगवंताला आपले हितगुज सांगत. तेथेच नामस्मरणात तल्लीन होत असत. एकदा गोणाई स्वयंपाक करून नामदेवरायांची वाट पहात बसली. पण त्यांचा काही पत्ता नाही. तेव्हा संतापाने ती अगदी लाल झाली. नामदेवाना शोधण्या करता ती देवळा कडे गेली. तेथे पाहाते, तो नामदेव जणूकाय चित्रातील पुतळ्या सारखे देवापुढे उभे होते. रागाच्या भरात तिने त्याना हाताने ओढले मात्र, तोच ते प्रेता सारखे जमिनीवर धाडकन पडले. त्यांची ती अवस्था पाहून त्या प्रेमळ

---

## ८) गोणाई व नामदेवरायांचा प्रपंच कर्तव्या विषयी संवाद

माऊलीचा राग जागच्याजागी जिरला. अंतःकरण गहिवरून आले. नामदेवाना पोटाशी धरून ती रडू लागली. नामदेवरायानी सावध होताच तिला प्रेमालिंगन दिले. पण लागलीच ते तिला म्हणाले,

**माऊली नव्हेसी तू वैरीन जाण । माझ्या केशवाची खूण अंतरली ।।१७।। ऐसे मज पाहाता हेचि घडे साधे । विठ्ठली मन त्याचे गुंतले असे ।।२।।**

नामदेव १२६४ आ, १२५० स, १३७ गोरखपूर, १११ पा.

आई मी विठ्ठलाच्या ध्यानात मग्न असताना, तू त्याची व माझी अशी ताटातूट केलीस, म्हणून तू माझी आई नव्हेस. आता तू येथून निघून जा. गोणाई म्हणाली, नामदेवा, अरे काय म्हणतोस?

**नव मासवरी वाहिलासी उदरी । आस केली थोरी होसी म्हणोनि ।।१।। शेखी त्वा रे नाम्या ऐसे काय केले । वनी मोकलीले निरंजनी ।।२।।**

नामदेव १२६५ आ, १२५१ स, १३८ गोरखपूर, ११२ पा.

नऊ महिनेपर्यंत पोटात वागवून तुला लहानाचा मोठा केला. तो एवढ्या करताच काय? अरे बाबा, या विठोबाचा नाद सोड. याने कधी कोणाचे बरे केले नाही. आपला संसार बुडवू नकोस. काही पराक्रम करून जन्माचे सार्थक कर. लौकिकाची काही चाड धर.

**शिवण्या टिपण्या घातलेसे पाणी । न पाहसी परतोनि घराकडे ।।४।। तुज सईल लेकुरे वर्तताती कैसी । तू मज जालासी कूळक्षय ।।२।।**

नामदेव १२६७ आ, गोरखपूर, ११४ पा.

ही तुझ्या भक्तीची तऱ्हा कोणती? संसाराची होळी केलीस. इतरांची मुले कशी संसारिक आहेत. आईबापाना विसरत नाहीत. सुखाने संसार करतात.

---

## ९) नामदेवरायांचा बाजारहाट, नामदेवरायानी दगड सोन्याचा केला.

नामदेवरायांचे लौकिक व्यवहारात लक्ष नव्हते. भगवत चिंतना शिवाय दुसरी कोणतीही गोष्ट त्याना आवडत नव्हती. त्यामुळे कोणताही उद्योग करावयाला त्याना जमत नसे. त्यानी आता संसारात लक्ष घालावे अशी घरच्या मंडळींची इच्छा होती. आईतर सारखे म्हणायची,

**अन्नेसी उपवासी बैसलासी येथे । काय तू ते देईल विठ्ठल हा ।।५।।**
**शिवण्याटिपण्याशी त्वा घातले पाणी । न पहासी परतोनि घराकडे ।।२।।**

नामदेव १२६९ आ, १४० गोरखपूर, ११६ पा.

तुला खाण्यापिण्याचीसुद्धा शुद्ध नाही. उपवासीच देवापुढे जाऊन बसतोस. देव काय तुला खावयाला देणार आहे काय? लोकांची मुले कशी व्यवस्थित संसार करतात. व्यापारउद्योग काळजीपूर्वक करतात. पैसे चांगले मिळवतात. तू तर आपला धंदा काहीच करत नाहीस. घरात शिवण कामाकडे लक्ष घालत नाहीस. निदान कापडे घेऊन बाजारला तरी जा. एकदा दामाशेटी पण बोलले. मी आता थकलो आहे. आता तू काही तरी व्यवसाय कर. चरितार्थ चालव. शेवटी नामदेवराय एके दिवशी बाजारला जातो म्हणून कबूल झाले. कपडे घेऊन बाजारला गेले. बाजार परिसरापासून थोडे दूर एका शेतात दुकान मांडले. बोलणाराची माती खपते, न बोलणाराचे गहू खपत नाहीत, असे म्हणतात. त्याप्रमाणे नामदेवराय काही बोलत नसल्यामुळे, त्यांच्याकडे कोणी गिऱ्हाईक येईना. ते आपले देवाचे नाम घेत बसले. तसेच एवढ्या आडबाजूला गिऱ्हाईक कसे येणार? बसून बसून ते कंटाळले. त्याना खरी ओढ होती ती

## ९) नामदेवरायांचा बाजारहाट, नामदेवरायानी दगड सोन्याचा केला.

पंढरीरायाना भेटण्याची. कधी एकदा देवाला भेटावयास जाईन असे त्याना झाले होते. शेजारी एक गणपतीची मूर्ती होती. त्यानी त्या गणपतीस सांगितले की ही सर्व कापडे विका. मी पुढच्या आठवड्यात पैसे न्यावयास येतो. शेजारी एक दगड होता. त्याला म्हणाले की आपल्या बोलण्याचा तू जामीन आहेस. तेथून उठले, ते थेट देवळात आले. तेव्हा त्याना समाधान वाटले. मग देवाला बाजार आवरून कसे आलो, ते सांगतले. व जवळच्या दगडाला जामीन ठेवले आहे.

**केशवासी नामा सांगतसे भावे । व्यवसाय स्वभावे झाला तैसा ।।१।।**
**मालिक गणोबा धोंडोबा जामीन । घेतलीसे पूर्ण निशा चिठ्ठी ।।२।।**
**आठवड्याची बोली करुनिया आलो । नामा म्हणे धालो तुज पाहाता ।।३।।**

नामदेव १३१० आ, १७८ गोरखपूर, १५५ पा.

नामदेवरायांचे बोलणे ऐकून देवाना चिंता पडली. याची आता समजूत कशी घालायची? घेण्यादेण्याचा व्यवहार हा समान व्यक्तीमध्ये होतो. विजातीय व्यक्तीमध्ये व्यवहार कसा होईल? देव म्हणाले नामदेवा, असा धंदा होत नसतो. नामदेवराय म्हणाले, आम्हाला तसला धंदा नको. आमचा एकच धंदा ,

**केशव पै देणे केशव पै घेणे । केशव करणे धंदा आम्ही ।।२।।**

नामदेव ५३९ आ, ५३१ स, १९०७ गोरखपूर,

नंतर नामदेवराय घरी आले. दामाशेटीनी विचारले,

**दामाशेटी म्हणे वेव्हार कोणाशी ।केला तो आम्हाशी सांग नाम्या ।।१।।**
**गणोबा नाईक नाम हे जयाचे । सावकार साचे पुरातन ।।२।।**

नामदेव १३११ आ, १२९२ स, १७९ गोरखपूर, १५६ पा,

नामदेवराय म्हणाले गणोबा सावकारा बरोबर व्यवहार केला.

---

## ९) नामदेवरायांचा बाजारहाट, नामदेवरायानी दगड सोन्याचा केला.

आठ दिवसांची बोली करून आलो आहे. आठ दिवस झाले. दामाशेटी म्हणाले, नामदेवा आता व्यापाराचे पैसे घेऊन ये. मग नामदेवराय त्या शेतात गेले. तेथे गणोबाकडे पैसे मागू लागले. तो कोठले देणार? शेवटी जामीन ठेवलेल्या दगडाला घेऊन घरी आले. घरातील एका खोलीत ठेवले. खोलीला कुलुप लावले व देवळात गेले.

**जावोनिया नामदेव । बोले गणोबासी भाव ।।१।। द्रव्य द्यावे हो सत्वरी । आम्ही जातो आपुल्या घरी ।।२।। मग म्हणे धोंडोबासी । तुम्ही जामीन ऐवजाशी ।।३।। द्रव्य द्यावे हो लवकरी । नाही तरी चलावे घरी ।।४।। ऐसे बोलोनी धोंडोबासी । पुढे लोटिले तयासी ।।५।।**

नामदेव १३१२ आ, १२९३ स, १८१ गोरखपूर, १५८ पा,

**कुलूप अर्गळा घालोनि कोठडीशी । घातले धोंड्याशी बंदिखाणी ।।१।। गोणाई दामाशेटी नव्हती तेव्हा घरी । गेली भीमातीरी स्नानालागी।।२।। नामदेव गेले राउळा त्वरित । सांगतसे मात केशवासी ।।३।। दामाशेटी आले स्नान करुनिया । राजाई त्या पाया लागुनि बोले ।।४।। ऐका हो मामांजी पुत्राची हे मात । धोंड्याशी घरात कोंडियेले ।।५।।**

नामदेव १३१३ आ, १२९४ स, १८२ गोरखपूर, १५९ पा,

त्यावेळी गोणाई, दामाशेटी घरी नव्हते. बायको राजाई घरी होती. तिने आपल्या नवऱ्याचे हे सर्व प्रताप पाहिले. काही वेळाने दामाशेटी स्नान करून घरी आले. राजाईने त्याना आपल्या नवऱ्याच्या प्रतापांची सर्व माहिती सांगितली. मग त्यानी नारा व महादास नामदेवरायाना बोलावून आणण्यास देवळात पाठवले. नामदेवरायानी देवाकडे पाहिले. देव म्हणाले आता निश्चिंत मनाने घरी जा. ते घरी आले. दामाशेटी त्याना बरेच बोलले.

**अरे नाम्या काय केले । कासया धोंड्याशी कोंडिले ।।१।। उदीम बरवा फळा आला । हरवले भांडवला ।।२।। संसारिक चतुर बहू ।**

---

## ९) नामदेवरायांचा बाजारहाट, नामदेवरायानी दगड सोन्याचा केला.

**माती समान घेसी गहू ।।३।। नामा म्हणे दामाशेटी । माझी ऐकावी हे गोष्टी ।।४।।**

नामदेव १३१४ आ, १२९५ स, १८३ गोरखपूर, १६० पा,

दामाशेटी म्हणाले, नामदेवा तू चांगला व्यापार केलास. सर्व भांडवल घालवून बसलास. गहू म्हणून माती आणण्या सारखा हा प्रकार आहे. नामदेवराय म्हणाले,

**ऐका दामाशेटी सांगतो तुम्हाशी । द्रव्यही कुळाशी मागून घ्यावे ।।१।।**
**मालधनी आलो घेऊनिया घरा । तुम्ही का दातारा गांजितसा ।।२।।**
**नामदेव म्हणे धोंडोबा नाईका । मिती आणि पैका द्यावा वेगी ।।३।।**

नामदेव १३१५ आ, १२९६ स, १८० गोरखपूर, १५७ पा,

नामदेवराय म्हणाले, मी मालधनी घरी घेऊन आलो आहे. कुळा कडून पैसे मागून घ्या. तुम्ही मला का गांजता? दामाशेटी म्हणाले, मालधनी म्हणजे दगड काय? त्या दगडाचा काय उपयोग. त्याची किंमत किती? नामदेवरायानी कुलूप काढले. दार उघडले.

**धोंडोबा नामदेवे काढिला बाहेरी । अंतर्बाह्यात्कारी सोने झाले ।।१।।**
**दामाशेटी पाहुनी नामयासी बोले । व्यर्थ म्या छळिले तुज बाळा ।।२।।**
**राजाई गोणाई धावोनिया आली । विनीत होऊनि बोली बोलताती ।।३।। आम्ही हे कुटुंबी द्रव्य नाही घरी । म्हणोनि श्रीहरी पावलाशी ।।४।। गोणाई दामाशेटी सांगे नामदेवा । न बोलावे भावा जनी बापा ।।५।। जगा मात कळलियावरी । नेतील हिरोनि धोंडोबासी ।।६।। नामदेव म्हणे आपुले द्रव्य घ्यावे । उरले ते धाडावे गणोबासी ।।७।।**

नामदेव १३१६ आ, १२९७ स, १८४ गोरखपूर, १६१ पा,

नामदेवरायानी दगड बाहेर काढला. तो साधा दगड न राहाता, पूर्ण सोन्याचा झाला होता. मग दामाशेटी म्हणू लागले, की अरेरे, व्यर्थ तुला मी छळले. आपले दारिद्र्य पाहून देवाला दया आली. व तो

---

## ९) नामदेवरायांचा बाजारहाट,नामदेवरायानी दगड सोन्याचा केला.

आपल्याला पावला. आता ही गोष्ट बाहेर बोलू नका. नामदेवराय म्हणाले की, आपल्या कपड्याचे जेवढे पैसे होतात, तेवढ्या किंमतीचे सोने यातून काढून घ्या. बाकीचे सोने आपल्याला नको.

**ऐसे ऐकोनिया राजाई ते आली । रोषे येऊनि बोली बोलतसे ।।१।।**
**देवाने हे दिले तुम्ही का पाठवा । काशाचा गणोबा बोलतसा ।।२।।**
**ऐसे बोलोनिया हाते लोटी धोंडा । तुमचिया वितंडा कोण पुसे ।।३।।**
**देवे मज दिले तुम्ही का मागता । अलंकार आता घडीन मी ।।४।।**
**नामा म्हणे धन ज्याचे त्याशी द्यावे । आपुले ते घ्यावे आपणचि ।।५।।**
नामदेव १३१६ आ, १२९८ स, १८५ गोरखपूर, १६२ पा,

परंतु राजाईला राग आला. ती रोषाने म्हणाली की, तुम्ही गप्प बसा. हे धन देवाने आपल्याला दिले आहे. आणि उरलेले गणोबाला द्या म्हणता. आता तुमचे मत कोण विचारतो आहे. देवाने हे मला दिले आहे. आता मी सोन्याचे दागिने करून घेणार. पाटल्या, बिलवर, गंठन, चपलाहार, अंगठी, कमरपट्टा, बाजूबंद, सर बोरमाळ, नेकलेस, बांगड्या वगैरे करून घेणार. प्रत्येकजण आपल्याला कायकाय पाहिजे ते सांगू लागले. हळुहळू ही बातमी ज्याच्या शेतातून दगड आणला होता त्याला समजली. तो लोक बरोबर घेऊन आला. दगड परत मागू लागला. नाही तर पंचायतीत चला म्हणू लागला. नामदेवराय म्हणाले, कपड्याचे पैसे दे व दगड घेऊन जा. त्या प्रमाणे त्याने कपड्याचे पैसे दिले व सोन्याचा दगड घेऊन गेला. घरी गेल्यावर तो नेहमी सारखा दगड झाला.

## १०) ज्ञानदेवादी संतांना भेटावयास आळंदीला गेले

## १०) देवानी नामदेवाना ज्ञानदेवादी संताना भेटावयाला पाठवले

ज्ञानोबारायानी रेड्याकडून वेद वोलवला, ज्ञानेश्वरी लिहिली, चांगदेवावर अनुग्रह केला. या गोष्टी नामदेवरायांच्या कानावर आल्या. तेव्हा या भावंडाना भेटावे म्हणून नामदेवराय आळंदीला गेले. त्यांच्या जवळ गेल्यावर नामदेवाना निवृत्तीनाथानी पाहिले व नामदेवांच्या पायावर डोके ठेवून नमस्कार केला.

**उठले निवृत्ती संतांच्या दरुशना । पंढरीचा प्रेमा घरा आला ।।१।। केली प्रदक्षिणा वंदिले चरण । जाला अभिमान नामयाशी ।।२।। देवाचे जवळी आम्ही निरंतर । याशी अधिकार नमस्कारा ।।३।।**

नामदेव १३३४ आ, १३१५ स, २६४ गोरखपूर, २४१ पा,

निवृत्तीनाथानी नामदेवाना नमस्कार केल्यावर, नामदेवाना अभिमान उत्पन्न झाला. मी देवाचे जवळ नित्य असतो. देव माझ्याशी बोलतो. त्यामुळे मी श्रेष्ठ आहे. असे नामदेवाना वाटले. म्हणून त्यानी नमस्कार केला. मी परत त्याना नमस्कार करावयाची आवश्यकता नाही, असे नामदेवरायाना वाटले. म्हणून नामदेवानी प्रती नमस्कार केला नाही.

**उठले ज्ञानेश्वर केले ते वंदन । मस्तकी चरण नमस्कारीले ।।१।। नामा म्हणे आम्हा वडील अधिकारु । यासाठी नमस्कारु योग्य आहे ।।२।।**

नामदेव १३३५ आ, १३१६ स, २६५ गोरखपूर, २४२ पा,

नामदेवाना वाटले मी ज्ञानेश्वरा पेक्षा वयाने मोठा आहे. म्हणून त्यानी नमस्कार केला. मी नेहमी देवा जवळ असतो, म्हणून मला सर्वजण नमस्कार करतात. आता मी परत त्याना नमस्कार करण्याचे

कारण नाही. म्हणून त्यानी ज्ञानेश्वराना प्रती नमस्कार केला नाही.
**आले ते सोपान वंदिले या पायी । पांडुरंगा ठायी मानियेला ।।१।। रंजल्या गांजल्याचा घेतला समाचार । संत माया थोर अनाथांची ।।२।।**
नामदेव १३३६ आ, १३१७ स, २६६ गोरखपूर, २४३ पा,

सोपान लहान आहे, म्हणून त्याला प्रती नमस्कार करण्याची आवश्यकता नाही असे नामदेवाना वाटले व म्हणून त्याना नामदेवानी प्रती नमस्कार केला नाही. मुक्ताईला हे पटले नाही. तिने उठून नामदेवाना नमस्कार केला नाही. ती म्हणाली,

**अखंड जयाला देवाचा शेजार । का रे अहंकार नाही गेला ।।१।। मान अपमान वाढविसी हेवा । दिवस असता दिवा हाती घेसी ।।२।। परब्रह्मासंगे नित्य तुझा खेळ । आंधळे पा डोळे का बा जाले ।।३।। कल्पतरू तळवटी इच्छिली ते गोष्टी । अद्यापि नरोटी राहिली का ।।४।। घरी कामधेनू ताक मागू जाय । ऐसा द्वाड आहे जगामाजी ।।५।। म्हणे मुक्ताई जाई दरुषणा । आधी अभिमाना दूर करा ।।६।।**
नामदेव १३३८ आ, १३१८ स, २६७ गोरखपूर, २४४ पा,

## ११) परमार्थात गुरू कृपेची नितांत आवश्यकता आहे

मुक्ताई म्हणाली, अरे नामदेवा, तुला देवाचा शेजार निरंतर आहे. परंतु देवा जवळ कायम राहूनही तुझा अहंकार अद्याप गेलेला नाही. मी मोठा हा मान बाळगतोस, इतराना कमी लेखतोस, हे बरोबर नाही. दिवस असताना सुद्धा अज्ञाना मुळे हातात दिवा घेऊन फिरतोस. परब्रह्म परमात्म्या बरोबर तुझा नित्य खेळ चालू असतो, तरी पण तू आंधळाच आहेस. तुला परब्रह्माची खरी ओळख झालीच नाही. कल्पतरू

## ११) परमार्थात गुरू कृपेची नितांत आवश्यकता आहे

खाली बसले असताना, इच्छा करील ती गोष्ट मिळत असते. परंतु एखादा भिकारी कल्पतरू खाली बसून सुद्धा, हातातील नरोटी जवळ ठेवून भीकच मागण्या करता फिरत असतो. त्याला कल्पतरूची महती समजलेली नसते. तसे तुझे आहे. कामधेनू मागेल तितके दूध देते. पण अज्ञानी लोक इतरा कडे ताक मागतात. हे बरोबर नाही. नामदेवा, आधी तुझा अभिमान दूर कर, मग मी तुझ्या पाया पडेन. तू हरिभक्त झालास, परंतु आतली सोय तुला कळली नाही.

**गुरूविण तुज नव्हेची गा मोक्ष । होशील मुमुक्षु साधक तू ।।३।। घेऊनि टाळदिंडी हरिकथा करिसी । हरिदास म्हणविसी श्रेष्ठपणे ।।२।।**

नामदेव १३३९ आ, १३१९ स, २६८ गोरखपूर, २४५ पा,

गुरू शिवाय शिष्याला मोक्ष प्राप्त होत नाही. स्वतःची ओळख पटत नाही. आत्मदृष्टी येत नाही. अहंकारबंध तुटत नाही. परमार्था मध्ये गुरूचे फार महत्त्व आहे.

गुरू शिवाय कोणत्याही कामाची सफलता होत नाही. आत्मज्ञाना करता स्वबुद्धीने ग्रंथ वाचून व विवेक वैराग्यादी धारण करून जे प्रयत्न करतात, त्या मध्ये फलकामना, व्यभिचार इत्यादींचा प्रवेश होतो. मग त्यांचे प्रयत्न निष्फळ होतात. एवढ्या करता गुरूची आवश्यकता आहे.

**गुरूविणा प्राण्या नव्हेची सद्‌गती । ऐसे वेद श्रुति बोलताती ।।११।।**
**बोलताती सिद्ध साधू महानुभाव । गुरूविण वाव सत्कर्मे ती ।।१२।।**
**ब्रीद तुझे जगी पतितपावन । भक्ताशी रक्षणे सर्वकाळी ।।२।।**

नाथ १७९३

वेद शास्त्राच्या आधारे स्वबुद्धीने प्रयत्न करून सद्‌गती मिळत नाही. त्या करता सदगुरू कृपा पाहिजे. ज्या प्रमाणे भाग्य अनुकूल असेल, तर सर्व व्यापार सफल होतात, त्या प्रमाणे गुरुकृपा असेल, तरच साधने फल देतात.

---

## ११) परमार्थात गुरू कृपेची नितांत आवश्यकता आहे

**म्हणौनि भाग्य जै सानुकूळ । जालिया केले उद्यम सदा सफळ । तैसे श्रुतादिक सकळ । गुरुकृपा साच ।।** ज्ञानेश्वरी १०-१६८

**व्यवसाय निमित्त । फळ देतसे संचित ।।३।। देह प्रारब्धा आधीन । सोसे अधिक वाढे शीण ।।२।।**

तुकोबा ३०४४ व, १०३६ जोग, ३५७९ घुले, १६३४-२ जोशी,

गुरूकृपे करता फार कष्टाची आवश्यकता असते. मनुष्य जन्माला आला, की त्याचे करता सोळा संस्कार सांगितलेले आहेत. गर्भाधान, पुसंवन, जातकर्म वगैरे संस्कार होतात. नंतर उपनयन म्हणजे मौजीबंधन, हा संस्कार होतो. म्हणजे याला दुसरा जन्म म्हणतात. म्हणजे तो द्विज होतो. मग त्याला गुरुकुला मध्ये पाठवतात. त्या ठिकाणी साधकाने ब्रह्मचर्य व्रताचे पालन करावयाचे. तेथे इंद्रियांचा निग्रह करून रहावयाचे. त्याने गवताचा कडदोडा कमरेला बांधावयाचा. पळसाचा दंड, कृष्णाजिन, माळा व यज्ञोपवीत धारण करावयाचे. जवळ नेहेमी कमडंलु बाळगावयाचा. जटा धारण करावयाच्या. कटिंग करावयाची नाही. दात घासावयाचे नाहीत. कपडे धुवावयाचे नाहीत. म्हणजे दात व कपडे धुण्यात फारसा वेळ घालवावयाचा नाही. आपले आसन रंगवावयाचे नाही. हातात दर्भ धारण करावयाचे.

**मळ मूत्र का करीता स्नान । जप होम आणि भोजन । उभय संध्याकाळी जाण । निश्चित मौन धरावे ।।** नाथ भागवत १७-२८१

स्नान, भोजन, अग्निकार्य करत असताना, मौन धारण करावे. मल, मूत्र विसर्जन समयी, मौन असावे. गायत्री मंत्र म्हणत असताना मौन धारण करावे. काख, गुह्यस्थान येथील केस काढू नयेत. म्हणजे त्या करता वेळ घालवू नये.

सकाळ, संध्याकाळ संध्या करताना वाणीचे नियमन असावे. अग्नी, सूर्य, आचार्य, गाय, ब्राह्मण, गुरू, वडील माणसे व देवता यांची

---

## ११) परमार्थात गुरू कृपेची नितांत आवश्यकता आहे

काया वाचा मनाने, शुचिर्भूत राहून, अनन्य भावाने सेवा करावी. वेद विद्या शिकवणारे आचार्य म्हणजे देवच समजावे.

**गुरू क्षेत्र गुरू देवता । गुरू माता गुरू पिता । जो गुरू पुजे परौता । मार्गू नेणे ।।** ज्ञानेश्वरी १३-४४५

आचार्याचा कधीही अपमान करू नये. त्यांच्या आज्ञेचे उल्लंघन करू नये.

**सेवके करावे स्वामीचे वचन । त्याशी हू तू पण कामा नये ।।१।। घेईल जीव का सारील परते । भंगलिया चित्ते सांडिजेना ।।२।।**

तुकोबा ३९२५ व, ३३७८ जोग, ५३४ घुले, २३३९-२ जोशी,

मालकाने सांगितल्या प्रमाणे चाकराने वागावे. तेथे मी तू पणा उपयोगाचा नाही. आपला जीव घेवो किंवा कामावरून दूर करो, परंतु स्वामीचा आज्ञाभंग करू नये. कारण त्या योगाने एकदा चित्त फाटले म्हणजे ते पुन्हा जुळून येत नाही. गुरूशी हुज्जत घालू नये. त्यांच्या ठिकाणी मनुष्य बुद्धी कल्पू नये. मत्सराला लेशमात्र जागा देऊ नये. गुरूचे ठिकाणी सर्व दैवते एकवटली आहेत, असे पहावे.

**अन्न धन पुष्पी फळी । सायंप्रात मध्यानकाळी । भिक्षा मिळे ते गुरूजवळी । अर्पूनि कृतांजुळी राहावे ।।** नाथ भागवत १७-३०७

सकाळी, दुपारी व संध्याकाळी भिक्षा मागून आणावी. आणलेली भिक्षा गुरूला अर्पण करावी. त्यांच्यासमोर हात जोडून उभे रहावे. नंतर गुरूनी आज्ञा करून, त्या भिक्षे पैकी जेवढे देतील, तेवढेच संयमाने खावे. त्याना गोडच पाहिजे, चांगलेच पाहिजे, जादा पाहिजे, असे म्हणावयाचे नाही. सर्व काळ आचार्यांची सेवा करावी.

**सर्वदा अति सादर । न पडताही अंतर । गुरू सेवेशी निरंतर । अति तत्पर उल्हासे ।।** नाथ भागवत १७-३१५

त्यांच्या जवळ अत्यंत नम्र पणाने असावे. गुरू झोपले असता

---

अगर बसलेले असता, त्यांच्या पासून फार दूर जाऊ नये. त्यांच्या समोर नेहेमी हात जोडलेले असावेत.

अशी बारा वर्षे गुरूची विनम्र भावाने सेवा करावी लागते.

**नाम म्हणे सेवा करणे हे कठीण । तेणे व्हावे जाण सावधान ।।४।। सेवेशी चुकता होय तू किरात । ऐसे इंद्रे त्याते शापियेले ।।२।।**

नामदेव ५६६ आ, ५५८ स, १०९९ गोरखपूर, १००१ पा.

गुरु कृपेचा अधिकारी होण्या करता, शिष्य हा विवेक वैराग्यवान, तत्त्व जिज्ञासू साधक असावा लागतो.

**विरक्तीचे पात्र अन्वयाचे मुख । पाहोनि सम्यक अनन्यता ।।५।। तेचि प्रेममुद्रा गोरक्षा दिधली । पूर्णकृपा केली गहिनीनाथा ।।२।।**

ज्ञानोबा

ज्या प्रमाणे बीज पेरण्यासाठी, भूमी तयार करावी लागते. त्या प्रमाणे साधू बोधाच्या बीजासाठी, अगोदर मनोभूमि तयार करावी लागते. विवेक वैराग्यवान तत्त्व जिज्ञासू साधकच या बोधाचा अधिकारी होऊ शकतो. वेदांत शास्त्रात व उपनिषदात बोधाकरता अधिकारी कोण, हे सांगितले आहे.

**तस्मात् शांतो दान्त, उपरतः तितिक्षुः । श्रद्धा वानते भूत्वा, आत्मन्येवात्मानं पश्येत् ।।** श्रुति

शांत, दान्त, उपरत, तितिक्षावान, श्रद्धायुक्त होऊन आत्म्यातच आत्म्याला पहावे, असा अधिकारी पाहिजे.

## १२) बोधाकरता चार मार्गाने वाटचाल करणे आवश्यक

**नित्यानित्य विवेक उत्पत्ती । इहामूत्रार्थ फलभोग विरक्ति । शमदमादि संपत्ती । अढळ चित्ती दृढ होवावी ।।** २७७ नाथ हस्तामलक

---

## १२) बोधाकरता चार मार्गाने वाटचाल करणे आवश्यक

**येही अवस्था वरुति । निश्चये वांछी निजमुक्ति । ती नाव मुमुक्षा म्हणती । चित्तशुद्धी चित्ती मुमुक्षत्व हे ।।** २७८ नाथ हस्तामलक

या साधनानाच वेदांत ग्रंथा मध्ये साधनचतुष्टय संपत्ती असे म्हटले जाते. यात,

१) **नित्यानित्य विवेक** - नेहमी सारासार विचार करणे

२) **इहामूत्रार्थ फलभोग विराग** - इह व पर लोकातील भोगा विषयी पूर्ण विरक्ति

३) **शम, दम, उपरती, तितिक्षा, श्रद्धा, व समाधान**.

४) **मुमुक्षत्व** - साधकदशा.

या प्रमुख साधनांचा अंतर्भाव होतो. या साधनांची अंतरंग साधने व बहिरंग साधने या उभय प्रकारे नाथरायानी आपल्या अभंगातून विस्तृत व्याख्या केली आहे.

**विवेक वैराग्य शमादि ते षटक । चौथी ती देख मुमुक्षता ।।१।।** नाथ

**अंतरंग साधने** -१) **श्रवण** २) **मनन** ३) **निदिध्यासन** ४) **तत् त्वंम पदार्थ शोधन** ( आत्म साक्षात्कार )

**मुमुक्षुते पुढे श्रवण मनन । निदिध्यासन ते पाहिजे की ।।२।।** नाथ.

असा अधिकार संपन्न मुमुक्षु श्रवण, मनन, निदिध्यासन व तत् त्वम् पदार्थ शोधन या चार अंतरंग साधनांची प्राप्ती करून घेतो.

१) **श्रवण** - श्रवणाने प्रमाण वेदवाक्या विषयी, तसेच साधू संतांची वचने, या विषयी येणारे संशय नाहीसे करून घेतो.

२) **मनन** - मननाने जीव ब्रह्माचा अभेद हे वेदांत शास्त्राचे प्रमेय आणि देहादिका विषयी सत्यत्व भावना, या विषयीचे संशय नाहीसे करून घेतो. म्हणजे मी देही नाही, तर ब्रह्म स्वरूपच आहे,
असा दृढ निश्चय करतो.

३) **निदिध्यासन** - जीवब्रह्माचे भेदा विषयी सत्यत्व भावना, हीच

## १२) बोधाकरता चार मार्गाने वाटचाल करणे आवश्यक

विपरीत भावना, निदिध्यासनाने नाश करतो.

४) **तत् त्वम पदार्थ संशोधन** - तत् त्वम पदार्थ शोधन केल्या नंतर, श्रीगुरूचे मुखाद्वारे तत्वम असि या महावाक्याचे श्रवण केल्या बरोबर जीवब्रह्म ऐक्य ज्ञान उत्पन्न होते. असा जो ज्ञानी होतो, तो निष्प्रतिबंध ब्रह्मसुखात निमग्न होतो. ( विचार सागर तरंग १, पाने ६ ते १६ )

**देईल गुरूसेवा ज्ञान । इया बुद्धी पांडवा । जन्माचा सांडोवा । टाकीत जे ।।** ज्ञानेश्वरी १३-१६७

अर्जूना, गुरू सेवेच्या योगाने, ते ज्ञान मिळेल, या बुद्धीने, त्या सेवे वरून आपला जन्म ओवाळून टाकतात.

**जया ज्ञानालागी । गगन गिळिताती योगी । स्वर्गाची आडवंगी । उमरडोनि ।।** ज्ञानेश्वरी १३-१६२

ज्या ज्ञाना करता योगी हे स्वर्गाचा आड मार्ग उल्लंघून, आकाश गिळतात, म्हणजे योग मार्गातील मूर्ध्नि आकाशाचा लय करतात.

**लय लक्षी मन न राहे निश्चल । मुख्य तेथे बळ आसनाचे ।।१।। हे तो असाध्य जी सर्वत्र या जना । भले नारायणा आळविता ।।२।।**
तुकोबा २२९७ व, १८९४ जोग, २५२८ घुले, २६६६-२ जोशी,

योगाभ्यासाने लक्ष्य स्वरूपाच्या ठिकाणी लय लावून बसावे, तर त्या ठिकाणी मुख्यत्वे करून आसनमुद्रा साधली पाहिजे. पण सर्वांचे मन एकाग्र होत नाही.

**न करिती सिद्धीची चाड । न धरिती रिद्धीची भीड । योगाऐसे दुवाड । हेळसिती ।।** ज्ञानेश्वरी १३-१६३

ज्या ज्ञानाकरता योगी सिद्धीची इच्छा करत नाहीत. आणि ऐश्वर्याची पर्वा करत नाहीत. आणि योगा सारखी कष्ट साध्य गोष्ट तुच्छ मानतात.

## १२) बोधाकरता चार मार्गाने वाटचाल करणे आवश्यक

**तपो दुर्गे वोलांडित । ऋतू कोटी वोवांडित । उलथुनि सांडीत । कर्म वल्ली ।।** ज्ञानेश्वरी १३-१६४

ज्या ज्ञाना करता कित्येक लोक तप रूपी डोंगरी किल्ले ओलांडून पलीकडे जातात आणि कोट्यावधी यज्ञांच्या अनुष्ठानातून पार पडतात. आणि कर्मरूपी वेलाची उलथा पालथ करून (चरण करून) त्याचा त्याग करतात.

**न करीता सद्‌गुरू भक्ती । कदा नव्हे परमार्थ प्राप्ती । यालागी सद्‌गुरू भक्ती । बोलिली ग्रंथी शिष्य हितार्थ ।।** नाथ भागवत ३-३२२

**ज्याचे सेविता निजचरण । देही न बाधी देह बंधन । ज्याशी जाहलिया अनन्य शरण । दे अगाध कोण हे न कळे वेदा ।।** नाथ भागवत ३-३२१

**ऐसा सद्‌गुरू चित्सागरू । ज्याचा वेदाशी न कळे पारू । नारायणादी नाना अवतारू । ज्याचेनि साचारू उपजती ।।** नाथ भागवत १४-१५

**भक्तीचे अगाध महिमान । जेथे रिघेना भवबंधन । ते करावया भगवद्‌भजन । सद्‌गुरू चरण सेवावे ।।** नाथ भागवत २-४८०

**येथ भावे विण तत्वता । परमार्थु न ये हाता । सकळ साधनाचे माथा । जाण तत्वता सद्‌भावो ।।** नाथ भागवत २-४९९

मुक्ताई नामदेवाना गुरूचे महत्त्व सांगत होत्या. शेवटी निवृत्तीनाथ म्हणाले, नामदेव हा मोठा संत आहे. धन्य भाग्याने ते आपल्या घरी आलेत. आपण आपले स्वहित करावे. त्यांचा योग्य सन्मान करावा. परंतु मुक्ताई म्हणाली की नामदेव हे कच्चे आहेत. मेणाची पुतळी असते, ती अग्नी शेजारी राहू शकत नाही. वितळून जाते. मृगजळाला तरंग येत नसतात. कुंभार मातीची मडकी बनवितो, परंतु ती भाजल्या शिवाय, पक्की होत नाहीत. ही गोष्ट देवाला सुद्धा पक्की माहीत आहे. म्हणून तर देवानी नामदेवाला इकडे पाठवले आहे. तो देवाचा लडिवाळ भक्त आहे. त्याचा तुम्ही उद्धार करावा.

---

**तुम्ही संत जन उद्धराल तत्काळ । नामा लडिवाळ विठोबाचा ।।३।। हरिशी वरदळ लावितो निशीदिनी । धाडीला म्हणोनि तुम्हा पाशी ।।२।।**

नामदेव १३४७ आ, १३२७ स, २७६ गोरखपूर, २५३ पा,

## १३) मुक्ताईने गोरोबा कडून परिपक्वतेची परीक्षा घेतली

निवृत्तीनाथाना देखील पटले. नामदेवाना आपल्या संप्रदायात घ्यावे. आपल्या पंगतीला बसवून घ्यावे, असे त्याना वाटले. मुक्ताई म्हणाली की आपण गोरोबाकाकाना बोलावून घेऊ व नामदेवाचे मडके कच्चे आहे की नाही ते तपासून पाहू. कडाडून वीज चमकली. सर्वत्र मोत्यांचा चुरा फेकल्या प्रमाणे सर्वाना वाटले. मुक्ताई विजेच्या वेगाने गोरोबाकाका कडे गेली. त्याना घेऊन आळंदीला आली. त्याना सांगितले की येथील सर्वांची तपासणी करावी. कोणते मडके कच्चे आहे व कोणते मडके पक्के आहे, याची खात्री करून घ्यावी.

गोरोबाकाकानी थापटणे हातात घेतले. प्रथम ते त्यानी निवृत्तीनाथांच्या मस्तकावर मारले. निवृत्तीनाथानी हू का चू केले नाही. गोरोबा म्हणाले हा डेरा पूर्ण परब्रह्म आहे.

**प्रथम थापटणे निवृत्तीच्या माथा । डेरा झाला निका परब्रह्म ।।३।। तेचि थापटणे ज्ञानेश्वरावर । आता कैचे कोरे उरे तेथे ।।४।। तेचि थापटणे सोपानाचे डोई । यात लेश नाही कोरे कोठे ।।५।। तेचि थापटणे मुक्ताबाईला हाणी । अमृत संजीवनी उतू आली ।।६।।**

नामदेव १३५३ आ, १३३३ स, २८२ गोरखपूर, २५९ पा,

नंतर ते थापटणे ज्ञानोबारायांच्या मस्तकावर मारले. त्यानीही हू का चू केले नाही. नंतर ते थापटणे सोपानदेवावर, मग मुक्ताईवर

मारले. त्यानीही हू का चू केले नाही. मग ते थापटणे नामदेवाच्या मस्तकावर मारले. नामदेव डोके चोळू लागले.

**तेचि थापटणे नामदेवावर । डोई चोळू मोहरे रडो लागे ।।७।। गोरा म्हणे कोरा राहिला गे बाई । सुन्नेभरी नाही भाजियेला ।।८।। तैसे थापटणे पारखियाचा हात । वाफ झाल्या घात वाया जाय ।।२।।**

नामदेव १३५३ आ, १३३३ स, २८२ गोरखपूर, २५९ पा,

नामदेव म्हणाले की मला चांगला संत समागम फळला. यानी माझा चांगला सन्मान केला. मुक्ताईने अथितीचा चांगला आदर केला. लाकडाने माझे डोके फोडले. आता येथून निघून जावे हे बरे. नाहीतर यांचा काय नेम? ते मला भाजून काढतील.

## १४) देवानी गुरू करून घेण्या विषयी समजावणे

**नामा म्हणे जावे पळोनिया आता । संतसंग होता भाजतील ।।४।। वैराग्य कसवटी सोसवेना घाये । पळावया पाये मार्ग काढी ।।२।।**

नामदेव १३५५ आ, १३३५ स, २८४ गोरखपूर,

**न पुसता संता निघाला तेथूनि । पैलपार इंद्रायणी प्राप्त झाला ।।१।। मागे पुढे पाहे पळत तातडी । आला उठाउठी पंढरीशी ।।२।।**

नामदेव १३५७ आ, १३३७ स, २८६ गोरखपूर,

ज्ञानोबारायादी संताना न विचारता नामदेराय पळत सुटले. इंद्रायणी नदी ओलांडली. तेथून थेट पंढरपूरला आले. आले ते थेट देवा जवळ गेले. त्यानी विठ्ठलाच्या पायाला कडकडून मिठी घातली. देवाला सांगितले की मला निवृत्तीच्या हातात देऊ नकोस. मुक्ताईने तेथे भांडण काढले. गोरा कुंभाराला बोलावून आणले. त्याने माझ्या मस्तकावर थापटणे मारले. नंतर मला भाजावयाचा त्यांचा विचार होता. तुझी ही

## १४) देवानी गुरू करून घेण्या विषयी समजावणे

संत मंडळी मला कपटी दिसली. तेथून मी पळून आलो. पूर्व पुण्याईने तुझ्या पर्यंत पोहोचलो. नाही तर मी जिवानिशी गेलो असतो. कदाचित ते परत इकडे येतील. तू मला त्यांच्या कडे सोपवशील. तुझा काय भरंवसा? मग ते मला भाजतील. तुम्ही मला अभय द्या. देव म्हणाले,

**संताशी विन्मुख जालासी गव्हारा । नाही आता थारा इहपर लोकी ।।१।। नाही वेड्या संतांचा अंगवळा । झोप बैसली डोळा अज्ञानाची ।।२।।**

नामदेव १३६४ आ, १३४४ स, २९३ गोरखपूर,

देव नामदेवाना म्हणाले की तू वेडा आहेस. तू मूर्खा सारखे वागलास. संत संगती सोडून तू पळून आलास. संताना विन्मुख होणे योग्य नाही. आता तुझे इहलोकी अथवा परलोकी सुद्धा कल्याण होणार नाही. तुझ्या डोळ्यावर अज्ञानाची झोप आलेली आहे. लाभ हातात आलेला होता. तो तू गमावलास. मोह सर्पाने तुझे अंग व्यापले आहे. श्रीगुरुला शरण गेल्या शिवाय, तुझे कल्याण होणार नाही. त्या शिवाय माझे यथार्थ स्वरूप तुला कळणार नाही. त्यामुळे तू सद्‌गुरुला शरण जा.

**श्रीविठ्‌ठले आपुल्या मुखवचने । नामदेवाशी करी आज्ञापण । होवोनि दिनाचे अती दीन । सद्‌गुरुशी शरण रिघावे ।।१।। जोडल्या सद्‌गुरु कृपालेश । मग सर्वत्र माझाची प्रकाश । तुज मज भेदाचा भास । तो निरसोन जाईल ।।२।।**

नामदेव १३६५ आ, १३४५ स, २९५ गोरखपूर,

## देव म्हणाले सद्‌गुरू शिवाय संशय निवृत्ती व तरणोपाय नाही

**सद्‌गुरू वाचूनि संसारी तारक । नसेची निष्टंक आण कोणी ।।१।।**

## १४-१ देव म्हणाले सद्‌गुरू शिवाय संशय निवृत्ती व तरणोपाय नाही

**इंद्र चंद्र देव ब्रह्मादि करूनि । संशयाची श्रेणी छेदिती ना ।।२।।**

ज्ञानोबा ६२० जोशी, पांगूळ, ८८९ प. मा.

या जगात एका सद्‌गुरू शिवाय संसार समुद्र कोणी तारून नेऊ शकत नाही. इंद्र, चंद्र, ब्रह्मदेव इत्यादी देवही जिवांच्या मनातील संशय कधीच दूर करू शकत नाहीत. माणसाच्या मनात अनेक शंका असतात. त्या व्यवहारातील असोत अथवा परमार्थातील असोत. व्यवहारातही अनेक शंका, कुशंका असतात. अन्नात विष तर कालवले नसेल.? पाण्यात पटकीचे किडे तर नसतील.? न्हावी वस्तऱ्याने गळा तर कापणार नाही.? चालताना बस अंगावर आली तर.? औषध घेतो आहे, पण निश्चित बरा होईन का.? परीक्षेत यश मिळेल का.? इत्यादी अनेक शंका व्यवहारात असतात. तशा परमार्थात देखील शंका असतात. प्रत्यक्षात देव आहे का.? असल्यास तो सगुण आहे की निर्गुण आहे.? कोणी खरोखर पाहिला आहे काय.? मेल्यावर पुनर्जन्म आहे काय? बंध खरा आहे काय? मोक्ष खरा आहे काय.? परलोकात केलेल्या कर्माची सुखदुःखादी फळे खरोखर भोगावी लागतात काय.? याचे कारण त्याच्या ठिकाणी पूर्ण श्रद्धा नसते.

**अविश्वासीयाचे शरीर सुतकी । विटाळ पातकी भेद वाहे ।।१।। काय त्याचा वेल जाईल मांडवा । होता तैसा ठेवा आला पुढे ।।२।।**

तुकोबा ३४६२ व, ३३७५ जोग, ५३८ घुले, जोशी, १४३६ प. मा.

परमार्थात ज्याचा विश्वास नाही, त्याचा देह सुतकी आहे. तो पातकी अंतःकरणा मध्ये भेद बुद्धीचा विटाळ वागवतो. अशांचा वंश वाढेल काय?

**म्हणवूनि संशयाहूनि थोर । आणिक पाप नाही घोर । हा विनाशाची वागूर । प्राणियासी ।।** ज्ञानेश्वरी ४-२०३

याचा अर्थ असा नव्हे की, मनुष्याने चिकित्सा किंवा मीमांसा

---

## १४-१ देव म्हणाले सद्‌गुरू शिवाय संशय निवृत्ती व तरणोपाय नाही

मुळीच करू नये. संशय निवृत्तीचा प्रयत्न न करता, केवळ मनात तो सांभाळून ठेवणारा मनुष्य कधीही आपल्या मनाला स्थिर करू शकणार नाही. त्याला कोणत्याही गोष्टीचा निश्चय न करता आल्यामुळे, सतत अशांतच रहावे लागले. या संशयाचे स्थान ह्रदय म्हणजेच बुद्धी हे आहे. या संशयासच बंध, अज्ञान, भ्रांती, चिद् चिद् ग्रंथी व बुद्धिभेदही म्हणतात.

**असतो मा सद गमय । तमसो मा ज्योतिर्गमय । मृत्योर्मा अमृतं गमय ।। हरी ॐ शांती शांती शांती ।।**

परमार्थ मार्ग हा अज्ञाना कडून ज्ञाना कडे जाणारा आहे. म्हणून संशय निर्माण होतातच. संशय हा देखील ज्ञानाचाच प्रकार आहे. पण त्याचा समावेश भ्रम ज्ञानात होतो. पण ती प्रमा नव्हे. जिज्ञासू विचारी पुरुषास संशय येतो की, आपण जे समजून सर्व व्यवहार करतो आहोत, हे योग्य आहेत की अयोग्य.? स्थाणूर्वा पुरूषो वा। हा भ्रम आंधळ्याला होणार नाही. तो डोळसालाच होणार.

**पैल खांबु का पुरूखु । ऐसा निश्चयो नाही एकू । परी काय नेणो आणिकु । दिसत असे ।।** ज्ञानेश्वरी १४-७६

मुमुक्षु जेव्हा विचार करू लागतो, तेव्हा त्याला अनेक संशय येऊ लागतात. अनादि अविद्येने आत्मज्ञान आच्छादीत झालेले असते. म्हणून अक्षय व अमोघ ज्ञानाचा उपदेश करणारा व अनायासे स्वस्वरूपाची प्राप्ती करून देणारा सदगुरू पाहिजे.

**जो शब्दपर निष्णात । शिष्य प्रबोधनी समर्थ । तोचि सद्‌गुरू येथ । जाण निश्चित उद्धवा ।।** नाथ भागवत १२-४८०

जो शब्दज्ञाना मध्ये निष्णात आहे. शिष्याला प्रबोधन करण्यात समर्थ आहे. शिष्याच्या सर्व शंकांचे निरसन करतो. तोच खरा सद्‌गुरू आहे, असे निश्चित समजावे.

**जो स्वरूपी करी समाधान । तोचि सद्‌गुरू सत्य जाण । त्या वेगळे**

---

## १४-१ देव म्हणाले सद्‌गुरू शिवाय संशय निवृत्ती व तरणोपाय नाही

**सद्‌गुरूपण । होआवया कारण असेना ।।** नाथ भागवत १२-४८१

जो शिष्याला आत्मस्वरूपाची ओळख करून देतो. स्वस्वरुपा विषयीच्या सर्व शंकांचे समाधान करतो. तोच खरा सद्‌गुरू आहे.

हे सर्व संशय सद्‌गुरू निरसन करतात. ते भगवंताची जिवाला ओळख करून देतात.

**सद्‌गुरू सारिखा सोयरा सज्जन । दाविले निधान वैकुंठीचे ।।१।।**
**सद्‌गुरू माझा जिवाचा जिवलग । फेडियला पांग प्रपंचाचा ।।२।।**
**सद्‌गुरू हा अनाथा माऊली । कृपेची साऊली केली मज ।।३।।**
**ज्ञानदेव म्हणे अवचित घडले । निवृत्तीने दिधले निजबीज ।।४।।**

ज्ञानोबा ६५३ जोशी, पांगूळ, ८९० प. मा.

**सद्‌गुरू नायके पूर्णकृपा केली । निजवस्तु दाविली माझी मज ।।१।।**
**माझे सुख मज दावियेले डोळा । दिधली प्रेमकळा ज्ञानमुद्रा ।।२।।**

नामदेव १३९० आ, १३६८ स, ३१२ गोरखपूर, ८९४ प. मा.

गुरू शिवाय कोणत्याही कामाची सफलता होत नाही. आत्मज्ञाना करता स्वबुद्धीने ग्रंथ वाचून व विवेक वैराग्यादी धारण करून जे प्रयत्न करतात, त्या मध्ये फलकामना, व्यभिचार इत्यादींचा प्रवेश होतो. मग त्यांचे प्रयत्न निष्फळ होतात. एवढ्या करता गुरूची आवश्यकता आहे.

**गुरूविणा प्राण्या नव्हेची सद्‌गती । ऐसे वेद श्रुति बोलताती ।।११।।**
**बोलताती सिद्ध साधू महानुभाव । गुरूविण वाव सत्कर्मे ती ।।१२।।**
**ब्रीद तुझे जगी पतित पावन । भक्ताशी रक्षणे सर्वकाळी ।।२।।**

नाथ १७९३ आ, .

वेद शास्त्राच्या आधारे स्वबुद्धीने प्रयत्न करून सद्‌गती मिळत नाही. त्या करता सदगुरूकृपा पाहिजे. ज्या प्रमाणे भाग्य अनुकूल असेल, तर सर्व व्यापार सफल होतात, त्या प्रमाणे गुरुकृपा असेल, तरच साधने फल देतात.

---

**देवानी नामदेवाना विसोबा खेचराला शरण जाण्यास सांगितले.**

**म्हणौनि भाग्य जै सानुकूळ । जालिया केले उद्यम सदा सफळ । तैसे श्रुतादिक सकळ । गुरुकृपा साच ।।** ज्ञानेश्वरी १०-१६८

**व्यवसाय निमित्त । फळ देतसे संचित ।।३।। देह प्रारब्धाआधीन । सोसे अधिक वाढे शीण ।।२।।**

तुकोबा ३०४४ व, १०३६ जोग, ३५७९ घुले, १६३४-२ जोशी,

**१४-२ देवानी नामदेवाना विसोबाला शरण जाण्यास सांगितले**

देवानी नामदेवरायांची बरीच समजूत घातली. मग नामदेवराय तयार झाले. देवानी सांगितले की तू आवंढ्या नागनाथाला जा. तेथे विसोबा खेचर आहे. त्याला गुरू करून घे.

## १५) विसोबा चाटी पुढे औंढ्या नागनाथला विसोबा खेचर

विसोबांचे मूळ नाव विसोबा चाटी होते. ते मुळचे श्रीक्षेत्र आळंदी येथील होते. यानी ज्ञानदेवादी भावंडांचा फार छळ केला. एकदा मुक्ताबाईने मांडे केले होते. सर्वानी खाऊन झाल्यावर खरकट्या पत्रावळ्या बाहेर टाकल्या. त्यातील खरकटे विसोबानी खाल्ले. त्यावेळी ज्ञानोबाराय म्हणाले की अरे खेचरा सारखे काय करतोस? तेव्हा पासून त्यांचे नाव विसोबा खेचर असे पडले. तो आत आला. ज्ञानोबारायाना शरण गेला. ज्ञानोबारायानी त्याच्यावर अनुग्रह केला. पुढे ते ज्ञानोबारायांच्या सांगण्यावरून औंढ्या नागनाथाला जाऊन राहिले.

पांडुरंगाच्या सांगण्यावरून नामदेवराय औंढ्या नागनाथाला गेले. तेथे विसोबा खेचराना ते शरण गेले. विसोबा खेचरानी नामदेवरायावर अनुग्रह केला.

---

## १६) नामदेवराय विसोबा खेचराना शरण गेले

## १६) नामदेवराय विसोबा खेचराना शरण गेले

**देव म्हणे नाम्या विसोबा खेचराशी । शरण तयाशी जावे वेगी ।।१।। इतुके ऐकोनि नमियेले देवा । चालयेला तेव्हा विसोबा पाशी ।।२।। चिंताग्रस्त नामा आला आवंढ्याशी । पुढे देऊळाशी देखियेले ।।३।।**

नामदेव १३६८ आ, १३४८ स, २९६ अ गोरखपूर,

देवानी नामदेवरायाना सांगितले की तू आवंढ्या नागनाथाला जा. तेथे विसोबा खेचर आहे. त्याला गुरू करून घे. चिंतामग्न स्थितीत नामदेवराय आवंढ्याला आले. देवळात त्यानी नवल पाहिले. विसोबा खेचर देवावर पाय ठेवून झोपले होते.

**देवावरी पाय ठेऊनि खेचर । निजेला परिकर निवांतचि ।।१।। देखोनिया नामा पावला विस्मया । कैसा हा प्राणिया देवो नेणे ।।२।। उठी उठी प्राण्या आंधळा तू काये । देवावरी पाय ठेवियेले ।।३।। विसोबा खेचर बोले नामदेवा । उठविले जिवा का रे माझ्या ।।४।। देवाविण ठाव रिता कोठे आहे । विचारुनि पाहे नामदेवा ।।५।। जेथे देव नसे तेथे माझे पाय । ठेवी पा अन्वय विचारुनि ।।६।। नामा पाहे अवघा जिकडे तिकडे देव । कोठे रिता ठाव न देखेचि ।।७।।**

नामदेव १३६९ आ, १३४९ स, २९६ गोरखपूर, ८९६ प. मा.

नामदेवराय विसोबाला म्हणाले की तुम्ही देवावर पाय ठेवले आहेत. ते काढा. तुम्हाला कसे कळत नाही? तुम्ही आंधळे आहात काय? विसोबा म्हणाले की नामदेवा, तुझा देव मला कळत नाही. माझ्या मते देव नाही अशी जगात कोणतीही जागा नाही. जेथे देव नाही, तेथे माझे पाय तू ठेव. नामदेवानी विसोबाचे पाय उचलले व दुसरी कडे ठेवले. त्या पाया खाली लिंग निर्माण झाले. असे अनेक वेळा

## १६) नामदेवराय विसोबा खेचराना शरण गेले

झाले. मग विसोबानी सांगितले की देव सर्व ठिकाणी आहे.
**अवघे सम ब्रह्म पाहे । सर्वाभूती विठ्ठल आहे ।।२।।**
तुकोबा

परंतु भगवंत म्हणतात की असा मनुष्य जगात दुर्लभ आहे.
**बहूनां जन्मनामन्ते, ज्ञानवान् मां प्रपद्यते । वासुदेवः सर्वम् इति, स महात्मा सुदुर्लभः ।।** गीता ७-१९
**जयाचिये प्रतितीचा वाखौरा । पवाडू होय चराचरा । तो महात्मा धनुर्धरा । दुर्लभु आथी।।** ज्ञानेश्वरी ७-१३७.
**सर्वा चित्ती सम भाव । सर्व मानी वासुदेव ।।३।। जेव्हा सुखाची उन्नती । मोह पायाशी लागती ।।२।।**
नामदेव ८५३ आ, ८४३ स, २०५५ गोरखपूर, पा,
**रिता नाही कोणी ठाव । सर्वाभूती वासुदेव ।।३।। अवघे सम ब्रह्म पाहे । सर्वाभूती विठ्ठल आहे ।।२।।**
तुकोबा व, जोग, घुले, जोशी,
**हे समस्तही श्रीवासुदेवो । ऐसा प्रतिती रसाचा वोतला भावो । म्हणौनि भक्ता माजी रावो । आणि ज्ञानिया तोचि ।।** ज्ञानेश्वरी ७-१३६
**सर्वाभूती पाहे एक वासुदेव । पुसोनिया ठाव अहंतेचा ।।१।। तोचि संत साधू ओळखावा निका । येर ते आईका मायाबद्ध ।।२।।**
नामदेव ८५१ आ, ८४१ स, २०५३ गोरखपूर, पा,
**जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत । हा भक्तियोगु निश्चित । जाण तू माझा ।।** ज्ञानेश्वरी १०-११८
**नामा म्हणे विठ्ठल सर्वाभूती आहे । आणिक उपाय न लगती ।।४।। वोळगलो हरी भूत भावा निर्धारी । दिसे चराचरी भावरूप ।।२।।**
नामदेव १७५९ आ, १८०० स,  गोरखपूर, पा,

---

## १६) नामदेवराय विसोबा खेचराना शरण गेले

**सर्व भावे एक विठ्ठलुचि ध्याये । सर्वाभूती पाहे रूप त्याचे ।।१६।। येर कर्मधर्म सर्वही पाल्हाळ । श्रमुचि केवळ जाणिवेचा ।।२।।**

नामदेव ९२६ आ, ९१७ स, २१७ गोरखपूर, १९४ पा, १४०४ प. मा.

परंतु भाग्यहीनते मुळे यथार्थ दर्शन होत नाही.

**सर्प विंचू दिसे । धन अभाग्या कोळसे ।।१।। आला डोळ्याशी कवळ । तेणे मळले उजाळ ।।२।। अंगाचे भोवंडी । भोय झाडे फिरे धोंडी ।।३।। तुका म्हणे नाड । पाप ठाके हिता आड ।।४।।**

तुकोबा ३४०४ व, ११७ जोग, ३३८८ घुले, २४८-१ जोशी,

एकाला समजले की या ठिकाणी धन आहे. त्याने तेथे उकरले. त्याला हंडा दिसला. तो त्याच्या भाग्यात नसल्या मुळे, त्याला त्यावर साप दिसू लागला. विंचू दिसू लागले. हंड्यात कोळसा दिसू लागला. असे भाग्य नसल्या मुळे होते. एखाद्याला कावीळ झाली तर त्याला सर्व पिवळे दिसू लागते.

**आला डोळ्याशी कवळ । तेणे मळले उजाळ।।२।।**

तुकोबा ३४०४ व, ११७ जोग, ३३८८ घुले, २४८-१ जोशी,

**जव कवळ आथि डोळा । तव चंद्रु देखावा की पिवळा । काय मृगीही मृग जळा । भाळावे नाही ।।** ज्ञानेश्वरी १८-३८९

**कामीन जयाच्या जाहाली नेत्राशी । देखे तो चंद्राशी पितवर्ण ।।३।। तेवी परमार्थ जीही दुरावला । तयालागी झाला सन्निपात ।।२।। जेवी नवज्वरे तापले शरीर । लागे तया क्षीर विषतुल्य ।।१।।**

तुकोबा २८५८ व, ४१६ जोग, ३०९४ घुले, ८१६-१ जोशी,

भगवंत म्हणतात,

**म्हणोनि आपणपा विश्व देखिजे । आणि आपण विश्व होईजे । ऐसे साम्यचि एक उपासिजे । पांडवा गा ।।** ज्ञानेश्वरी ६-४०९

---

## १६) नामदेवराय विसोबा खेचराना शरण गेले

म्हणून आपल्या ठिकाणी जगत पहावे, आणि आपणच जगत व्हावे, अशा एका साम्याचीच, हे अर्जुना तू उपासना कर.

सर्व जगत ब्रह्मरूपाने अनुभवाला येण्यापूर्वी, प्रथम आपण ब्रह्मरूप झाले पाहिजे.

**होईल झाला अंगे देव जो आपण । तयाशी हे जन अवघे देव ।।१।। येरानी सांगावी रेमट कहाणी । चित्ता रंजवणी करावया ।।२।। धाला आणिकांची नेणे तानभूक । सुखे पाहे सुख आपुलिया ।।३।। तुका म्हणे येथे पाहिजे अनुभव । शब्दाचे गौरव कामा नये ।।४।।**

तुकोबा ३८०१ व, २०६५ जोग, ३८०८ घुले, २८४३-२ जोशी, १४३८ प. मा.

**आदौ ब्रह्माहम् अस्मि इति अनुभव उदिते । खलू इदं ब्रह्म पश्चात ।। शंकराचार्य शतश्लोकी ।।३।।**

जिवाच्या दृष्टीने हीच परिपूर्ण अवस्था आहे. असा उपदेश विसोबानी नामदेवाना केला.

**श्रवणी सांगितली मात मस्तकी ठेवियेला हात । पद पिंडा विवर्जित केला नामा ।।१।। खेचरु विसा प्रेमाचा पिसा । तेणे नामा कैसा उपदेशिला ।।२।।**

नामदेव १३८० आ, १३५९ स, ३०४ गोरखपूर,

मग नामदेवरायाना भगवंताच्या स्वरुपाचे यथार्थ ज्ञान झाले. त्यांच्यावर गुरु कृपा झाली. त्यांच्या दृष्टीतील एकदेशी पणा जाऊन, ती दृष्टी व्यापक झाली. समदृष्टी झाली. आनंदाने ते परत येऊ लागले. देवाना वाटले की त्यांची परीक्षा घ्यावी.

## १७) कुत्रे भाकरी घेऊन पळाले, नामदेवाचा समभाव

**नामा स्वयंपाक करोनि बैसला । केशव श्वानरुपे आला । रोटी घेऊनि पळाला । सर्वाभूती केशव ।।१।। हाती घेऊनि तुपाची वाटी । नामा लागला श्वानापाठी । तूप घे गा जगजेठी । कोरडी रोटी का खाशी ।।२।।**

नामदेव १३८९ आ, १३६७ स, ३२० गोरखपूर, ८९७ प. मा.

नामदेव प्रवास करत होते. वाटेत त्यानी तीन दगड मांडले. तव्यावर भाकरी भाजली. भाजी करू लागले. तो पर्यंत कुत्र्याने एक भाकरी पळवली. कुत्रा फक्त भाकरीच घेऊन पळाला, म्हणून नामदेवरायाना वाईट वाटले. तुपाचे भांडे घेऊन नामदेवराय कुत्र्याच्या मागे लागले. कुत्रा वेगात पळू लागला. नामदेवरायही वेगात मागे पळू लागले. पण ते कुत्र्याला गाठू शकले नाहीत. दोघातील अंतर तसूभरही कमी होईना. शेवटी थकून नामदेवराय उभे राहिले. ते ओरडून म्हणाले, देवा, सुकी भाकरी खाऊ नकोस. घशात अडकेल. हे तूप लावून खा. असे म्हणून तुपाचे भांडे तेथे खालीच ठेवले.

**रुकडी न खाईयो स्वामी । रुकडी न खाईयो । हात हमारे घिरत कटोरी । अपना वाटा ले जाईयो ।।१।।**

नामदेव गुरुग्रंथसाहेब ४४

नामदेव आता पाठलाग करत नाहीत, असे पाहून कुत्रे जवळ आले. त्याने तूप घेतले. व तूप भाकरी खाऊ लागले. ते पाहून नामदेवरायाना धन्यधन्य वाटले. त्याना वाटले की आता आपले श्रम सफल झाले. आपला नैवेद्य पांडुरंगाने स्वीकारला, याचा त्याना अतोनात आनंद झाला. नामदेवरायांच्या डोळ्यात प्रेमाश्रु आले. त्यानी आपले डबडबलेले

## १७) कुत्रे भाकरी घेऊन पळाले, नामदेवाचा समभाव

डोळे पुसले. आणि पहातात, तर तेथे काळा कुत्रा नव्हता. तर तेथे साक्षात पंढरीनाथ होता. तो दोन्ही हातात भाकरी घेऊन, तूप लावून खात होता. नामदेवरायांचे देहभान हरपले. आपल्या भाकरीच्या लोभाने पंढरीनाथानी केवढी यातायात केली, हे पाहून त्यांच्या अंतरंगात सहस्त्रक्षते पडल्या सारखी कळ आली. आपला नैवेद्य त्याना मिळेना. तो मिळवण्या करता प्रेमाचा भुकेला भगवंत एवढ्या लांबवर चालून आला.

**तव श्वान हासोनि बोलिले । नामया तुज कैसे कळले । येरु म्हणे खेचरे उपदेशिले । सर्वाभूती विठ्ठल ।।३।।**

नामदेव १३८९ आ, १३६७ स, ३२० गोरखपूर, ८९७ प. मा.

नामदेवराय म्हणाले की मला श्रीगुरु खेचरानी उपदेश केला की सर्वा भूती विठ्ठलास पहावे. जगाकडे समत्त्व भावनेने पहायला हवे. कारण जगाचा आकार, स्वरूप, नावे भिन्न असली, तरी त्या सर्वामध्ये परमात्मा समत्त्वाने आहे.

**विचित्र भुते विचित्र नाम । विचित्राकारे जग विषम । तेथे देखे सर्वी सर्व सम । परब्रह्म समत्त्वे ।।** नाथ भागवत १४-१७४

जग हे विचित्ररुपाने नटलेले आहे. प्रत्येकाचा आकार, रूप, वेश व नावे वेगवेगळी असतात. त्यांचे वागणे, बोलणे, हावभाव, लकबी वेगवेगळी असतात. बाह्य दृष्टीने त्यांच्यात भेद दिसतो. पण अंतरंग दृष्टीने भेद नसतो. सर्वांच्या रुपाने देवच नटलेला असतो. म्हणून संत सर्वाकडे देवरुपानेच पहातात.

**एक अनेक विआपक पूरक जत देखउ तत सोई । माईया चित्र बचित्र विमोहित बिरला बुझै कोई ।।१।। सभु गोविंद है, सभु गोविंद है, गोविंदुबिनु नही कोई । सुतु एकू मणि सत सहस्त्र, जैसे उति पोति प्रभू सोई ।।२।।** नामदेव गुरुग्रंथसाहेब २

---

## १७) कुत्रे भाकरी घेऊन पळाले, नामदेवाचा समभाव

गोविंद एक आहे, तसा तो अनेकही आहे. तो व्यापक असून परिपूर्ण आहे. जेथे पहावे तेथे तोच आहे. परंतु या चित्र विचित्र मायेमुळे, लोक मोहीत होतात व ते देवास ओळखत नाहीत. कोणी एखादा विरळा मनुष्यच त्याला ओळखतो. जीव, जगत व परमात्मा यांचा अभेद आहे. त्यामुळे सर्व जगत म्हणजे गोविंदच आहे. सर्वत्र गोविंदनाम परमात्माच आहे. गोविंदा वाचून अन्य काहीही नाही. जसा शेकडो, हजारो मण्यात एकच दोरा ओवलेला असतो, तसे त्या भगवंताने जगाला आपल्या सूत्रात बांधलेले आहे. पाण्यावरील लहरी, फेस, बुडबुडा, हे पाण्याहून भिन्न असत नाहीत. ते एकरूपच असतात. तसेच हे सर्व जगत परमात्मरुप आहे.

**इ भै बिठ्ठलु उ भै बिठ्ठलु । बिठ्ठल बिनु संसार नही । थान थनंतरी नामा प्रणबे । पुरी रहिऊ तू सरब मही ।।४।। जत जाऊ तत बीठलु भैला । महा आनंद करे सद केला ।।२।।**

नामदेव गुरुग्रंथसाहेब २

गुरुकृपे मुळे नामदेवराय हे असे पक्के झाले. परिपूर्ण झाले. त्यांच्या ठिकाणचे द्वैत मावळले. सर्वत्र त्याना सच्छिदानंद परमात्माच दिसू लागला.

**तेणे सुखे माझे निवविले हे अंग । विठ्ठल हे जग देखियेले ।।१।। कवतुके करुणा भाकितसे लाडे । आवडी बोबडे बोलोनिया ।।२।।**

तुकोबा ३५२८ व, २५०८ जोग, ३७६८ घुले, ३३६७-३ जोशी,

तुकोबारायांचाही समदृष्टीचा असाच अनुभव आहे. बोधानंतर त्यानाही सर्व जग विठ्ठल रुपाने दिसले.

---

## १८) नामदेवाना कवित्व करण्याची स्फूर्ती

## १८. नामदेवरायाना कवित्त्व करण्याची स्फूर्ती झाली.

वाल्मिकीने शतकोटी रामायण लिहिल्याची कथा नामदेवरायानी चंद्रभागेच्या वाळवंटात ऐकली. तेव्हा त्याना वाटले की आपणही भगवंताचे गुण वर्णन करणारे शंभर कोटी अभंग करावेत. आतापर्यंत आपण वाल्मिकीप्रमाणे लेखनकार्य केले नाही, त्यामुळे आपले आयुष्य व्यर्थ घालविले, म्हणून त्याना दुःख झाले. मग ते पंढरीरायाकडे आले. देवाला म्हणाले की मी शंभर कोटी अभंग करावेत असे म्हणतो.

**चंद्रभागे तीरी आयकिल्या गोष्टी । वाल्मिके शतकोटी ग्रंथ केला ।।१।। माझिया चित्ताशी फार झाले क्लेश । व्यर्थ म्या आयुष्य गमाविले ।।२।। जाऊनि राऊळा विठोशी विनवले । वाल्मिकाने केले रामायण ।।३।। असेन मी खरा तुझा भक्त देवा । सिद्धीस हा न्यावा पण माझा ।।४।।**

नामदेव १४०४ आ, १३८० स, १२९ गोरखपूर, १०७ पा.

त्यावर देव म्हणाले की अरे नामदेवा, पूर्वीच्या लोकांचे आयुष्य भरपूर होते. त्यामुळे ते मोठे ग्रंथ लिहू शकले. आताच्या लोकांचे आयुष्य कमी आहे. तुझे पण आयुष्य त्या मानाने कमी आहे. मग तुझे शंभर कोटी अभंग कसे पूर्ण होणार.

**शतकोटी तुझे करीन अभंग । म्हणे पांडुरंग ऐक नाम्या ।।५।। माझिया चित्ताशी फार झाले क्लेश । व्यर्थ म्या आयुष्य गमाविले ।।२।।**

नामदेव १४०४ आ, १३८० स, १२९ गोरखपूर, १०७ पा.

त्यावर नामदेवराय म्हणाले की मी तेवढे अभंग करणारच. तुम्ही माझा पण पूर्ण करा. तेव्हा देवानी शारदेला नामदेवरायाच्या जिभेवर बसावयास सांगितले.

**निश्चय पाहून उपजली दया । स्वामी देवराया पांडुरंगा ।।१।। सारजेशी सांगे भीमातीरी हरी । बैस जिव्हेवरी नामयाच्या ।।२।।**

नामदेव १४०५ आ, १३८१ स, १३० गोरखूपर, पा,

मग नामदेवराय देवाचे अभंग करू लागले. त्यांचा हा पण पूर्ण

## १८) नामदेवाना कवित्व करण्याची स्फूर्ती

व्हावा म्हणून त्यांच्या घरातील सर्वजण अभंग करू लागले. नामदेवरायांचे अभंग गोड असत. सर्वाना ते अभंग आवडत असत. या बाबत परसा भागवत म्हणतात,

**कवित्वा परीस आगळे पै आहे । परी ते न कळे सोय नामयाची ।।१।। नाम बरवे नामदेव बरवा । एकत्व बरवा परमात्मा ।।२।। दुधावरील साय ते मी वाणू काय । तैसे गाणे गाय नामदेव ।।३।। नामा तोचि कुडी केशव तोचि देव । तेथील अनुभव परसा म्हणे।।४।।**

परसा भागवत १५ स,

नामदेवांच्या अभंगाला परसा भागवताला एकच उपमा सुचली. ती म्हणजे दुधावरील सायीची होय. कडकडीत तापवलेल्या दुधावर चांगली साय धरते. त्या प्रमाणे नामदेवरायांचे कवित्व आहे. जगामधील त्रिविध तापानी पोळलेल्या नामदेवरायांच्या व्यक्तिमत्वावर, त्यांच्या कवित्वाचे एक प्रकारचे पूट जमलेले आहे. म्हणजे कवित्वाचे एक प्रकारचे आवरण जमलेले आहे. दुधावरची साय दुधातच मिसळून टाकल्यावर, दुधाला जो विशिष्ट गोडवा येतो, त्या प्रमाणे नामदेवरायांच्या कवित्वामध्ये त्यांचे व्यक्तिमत्त्व मिसळलेले आहे. त्यामुळे त्याच्या अभंग रचनेला अवीट गोडी आलेली आहे. त्या गोडीचा अनुभव शब्दानी सांगण्या सारखा नाही. आपल्या सारख्या रसिकानी तो अनुभवण्या सारखा आहे. आणि तो जर आपण अनुभवला, तर एका महान आणि अत्यंत समृद्ध अशा व्यक्तिमत्त्वाशी आपला परिचय होतो. आणि आपण कृतार्थ झालो आहोत, असे आपल्याला वाटते.

नामदेवराय प्राचीन काळातळे अकराव्या शतकातले संत होते. पण आपल्या सारख्या एकविसाव्या शतकातील दुःखी आयुष्या मधले क्षण आनंदाने उजळून टाकतात. नामदेवरायांच्या रुपाने एक अभूतपूर्व अशा प्रकारची देणगी महाराष्टाराला आणि भारताला मिळालेली आहे.

## १९) नामदेवानी एकादशी व्रताची निष्ठा दाखवून दिली

नामदेवरायांच्या संसारात दारिद्रयाने उच्चांक गाठला होता. घरात सकाळी जेवण असेल तर, संध्याकाळी नाही, अशी परिस्थिती होती. तशातच वडील माणसे मुलांचे पोट कसे भरेल इकडेच लक्ष देत. त्यामुळे घरात नेहमीच चिडचीड, भांडणे, एकमेकावर ओरडणे, असे प्रकार चालू होते. नामदेवरायानी सगळ्या संसाराचे मातेरे केले, याबद्दल घरातील समंजस माणसात एकमत होते. अशा कठीण परिस्थितीत राजाईचे दोघे भाऊ पाहुणे आले.

### १९-२ नामदेवाकडे मेव्हणे दशमीला दुपारी आले

**नामदेवा घरी पाहुणे मेहुणे । आले दोघेजण पंढरीस ।।१।। राजाईने बंधू देखोनि दृष्टीशी । उल्हास माणशी थोर झाला ।।२।। कडकडुनि भेटी लोभाची आवडी । टाकली घोंगडी बैसावया ।।३।। भ्रतार लागले विठोबाचे ध्यानी । संसाराची मनी आस्था नाही ।।३।। नाचतो निर्लज्य होऊनि निःशंक । सांडिला लौकिक देहभाव ।।४।। ऐसे जव सांगे राजाई बंधुशी । तव घराशी आले नामदेव ।।५।।**

नामदेव १३२७ आ, १३०८ स, १९६ गोरखपूर, १७३ पा,

नामदेवांच्या घरी त्यांचे दोघे मेव्हणे आले. त्याना पाहून राजाईला आनंद झाला. त्याना बसावयास तिने घोंगडी टाकली. आणि आपले गाऱ्हाणे सांगावयास सुरुवात केली. आपल्या नवऱ्याला संसाराची आस्थाच नाही. त्याना नेहमी विठोबाचे ध्यान असते. त्याच्याच ध्यानात मग्न असतात. घरात त्यांचे लक्ष नसते. त्यानी लौकिक देहभाव सोडून दिलेला आहे. देवाच्या कीर्तनात निर्लज्य होऊन निःशंकपणे नाचत असतात. सारखे बाहेरच असतात. आताही घरी नाहीत. राजाई आपल्या

## १९-२ नामदेवाकडे मेव्हणे दशमीला दुपारी आले

भावाना असे सांगत होती. इतक्यात नामदेवराय घरी आले. पण ते आपल्याच नादात होते. त्याना पाहून त्यांचे दोघे मेव्हणे उभे राहिले. परंतु नामदेवरायानी त्यांच्या कडे न पाहिल्या सारखे केले व आत गेले. राजाईला या गोष्टीचा फार राग आला. ती भावाना म्हणाली, पाहिलत, आमचा संसार असा असून नसल्या सारखा आहे. कोणी तरी एखादा टाळ, वीणा घेऊन आला, तर त्याच्या वेळो वेळा पाया पडतात. इतक्या दिवसानी तुम्ही दोघे घरी आला, तर तुमच्याशी बोलले सुद्धा नाहीत. उलट कितीतरी भोंदू लोक घरी येतात, हरिनाम गर्जतात, तर त्यांचे पाय धुवून पाणी पितात.

मग नामदेवरायाना म्हणाली, एवढे माझे भाऊ घरी आलेत, त्यांची तुम्ही विचारपूस सुद्धा करत नाही. त्यानी तुम्हाला रामराम केला, तर तुम्ही त्यांची दखलही घेतली नाही. नामदेवराय म्हणाले, आम्ही रामाला ह्रदयात साठविले आहे व त्या योगे तृप्त झालो आहे.

**नामा म्हणे आम्ही राम ह्रदयात । साठवूनि तृप्त जालो आम्ही ।।१३।।**
**राजाईने बंधू देखुनि दृष्टीशी । उल्हास माणशी थोर झाला ।।२।।**

नामदेव १३२७ आ, १३०८ स, १९६ गोरखपूर, १७३ पा,

**राजाई ते पुसे अहो नामयाला । करा जेवायाला काही याशी ।।१।।**
**प्रातःकाळी घरी सारुनि भोजन । आले ते चालून माझे भेटी ।।२।।**

नामदेव १३२८ आ, १३०९ स, १९७ गोरखपूर, १७४ पा,

घरी काही धान्य नव्हते. तेव्हा राजाई नामदेवरायाना म्हणाली, मला भेटावयाला माझे भाऊ लांबून आलेत. केव्हा सकाळी त्यानी काही खाल्ले असेल. एवढे लांब चालत आलेत. बिचारे भुकेने व्याकुळ झालेत. त्याना जेवावयास काय द्यावयाचे? काही तरी धान्याची तजवीज करा. नामदेवराय म्हणाले,

**नामा म्हणे कांते दशमी एक भुक्ति । भोजन निश्चिती करू नये ।।३।।**

---

## १९-३ उपाशी पोटी मेव्हण्याना झोप आली नाही

**द्वादशी पारणे झालिया भोजन । ऐकोनि पाहुणे चिंतातूर ।।४।। प्रातःकाळी घरी सारुनि भोजन । आले ते चालून माझे भेटी ।।२।।**
नामदेव १३२८ आ, १३०९ स, १९७ गोरखपूर, १७४ पा,

नामदेवराय म्हणाले, पण, आता आपण काय करणार? आज दशमी असल्या मुळे आपण दुपारी जेवलो. दशमीला एकवेळ जेवावयाचे. म्हणजे एक भुक्त रहावयाचे. आता रात्री जेवण नाही. शिवाय उद्या एकादशी आहे. तेव्हा उद्या काही खावयाचे नाही. दिवसभर उपास करावयाचा. भगवंताचे नामस्मरण, कीर्तन करावयाचे. द्वादशीला पारणे, मग जेवण करावयाचे. नामदेवराय अगदी सहजतेने म्हणाले. त्यांचा चेहरा निर्विकार होता.

**क्षुधातुर पोटी निद्रा नलगे काही । वर्षाएवढी पाही रात्र झाली ।।६।। प्रातःकाळी घरी सारूनि भोजन । आले ते चालून माझे भेटी ।।२।।**
नामदेव १३२८ आ, १३०९ स, १९७ गोरखपूर, १७४ पा,

नामदेवरायांचे मेव्हणे हे ऐकून अगदी गांगरून गेले. दिवसभर उपाशी होते. रात्री जेवण नाही. उपाशी पोटी झोप लागेना. रात्र वर्षा एवढी मोठी वाटू लागली. रात्री या अंगावरून त्या अंगावर असे झोपून पाहिले. पण झोप नाही. रात्रभर भुकेने तळमळत राहिले. दुसरे दिवशी एकादशी. नामदेवराय आपले सर्व विधी उरकून देवळात निघून गेले. राजाईला काय करावे ते सुचेना. दुःख वाटू लागले. आपल्या दारिद्रयाची कीव वाटू लागली. कसले जिणे हे.

**ऐसी चिंताक्रांत मनी दुःख धरिले । म्हणे का बापे दिधले ऐसियासी ।।१।। खाया ना जेवाया लेया ना नेसाया । दैन्य भोगावया आले जन्मा ।।२।। जयाची करी भक्ती त्याचेचि करणे । घरोघरी हिंडणे न चुके माझे ।।३।। लाज सांडुनिया निलाजरा जाला । सूड पडसूड मारिला जोग ज्याने ।।४।। देवासुरी वाहिली तेचि दैना आली । उचिते**

---

## १९-४ राजाईने देवाला व दैवाला दोष देणे

**राहिली तैहूनि ।।५।।**

नामदेव १३२९ आ, १३१० स, १९८ गोरखपूर, १७५ पा,

राजाई चिंतेने व दुःखाने ग्रासून गेली. म्हणू लागली, बापाने मला अशा माणसाच्या गळ्यात का बांधले. दुसऱ्या कोणाला द्यायचे होते. या ठिकाणी ना खायला आहे, ना जेवावयाला. अंगावर ल्यावयाला सुद्धा धड कापड नाही. ज्याची भक्ती करतो, त्यानेच ही अवस्था केली. त्यामुळे काही ना काही मागण्या करता घरोघरी हिंडण्याची पाळी माझ्यावर आली. केवळ दैन्य भोगावयाला मी जन्माला आले. राजाई अशी चिंता करू लागली.

**ऐसी भक्तकांता मनी वाहे चिंता । काय झाला करिता पंढरिराव ।।६।। वेष वाणियाचा सवे बैल द्वयाचा । म्हणे नामा आमुचा केउता गेला ।।७।। बिदी उभा राहिला घर पुसो लागला । म्हणे नामा राहिला कोणे ठायी ।।८।। सांगितले बिराड तुळसीवन अपार । तेचि जाणा घर नामयाचे ।।९।। बाहेर तरी कोणी बैसलासे द्वारी । बोलावली नारी नामयाची ।।१०।। अहो घ्यावो बाई हे ठेवावी गोणी । नामा येतो परतोनि येईन मी ।।११।। येरी म्हणे तुम्ही त्याचे काय जाणा । आपुली नाम खुणा सांगा तुम्ही ।।१२।। खाया ना जेवाया लेया ना नेसाया । दैन्य भोगावया आले जन्मा ।।२।।**

नामदेव १३२९ आ, १३१० स, १९८ गोरखपूर, १७५ पा,

राजाई मना मध्ये चिंता करत होती. भावाना आता जेवावयास काय द्यावयाचे? या विचाराने ती अगदी रडकुंडीला आली होती. तेव्हा देवानी वाण्याचा वेष घेतला. बैलगाडी घेतली. नामदेवरायांच्या दारात आले व त्यांचे घर कोठे आहे असे विचारू लागले. राजाई बाहेर आली. देव म्हणाले ही गोणी ठेवून घ्या. ती म्हणाली, आपण कोण? ही गोणी कसली.

---

## १९-५ देव शेट्या झाले व गोणाईजवळ होन दिले

**शेट्या झाला हरी । द्रव्य गोणी लोटी द्वारी ।।१।। गुज सांगे राजाईसी । तुम्ही न छळावे नाम्यासी ।।२।। अवघ्या वित्ताशी वेचावे । सरल्या मज पाशी मागावे ।।३।। विठ्ठल शेट्या नाम माझे । नामदेवा सांगा वोजे ।।४।। आता उचित दासाशी । ऐसे बोले राजाईसी ।।५।। ऐसे बोलोनिया गेला । जनी म्हणे नामा आला ।।६।।**

जनाबाई १३१ आ, २६९ स, १२७ गोरखपूर, ११३ पा,

राजाई म्हणाली, ते बाहेर गेलेत. आपण बसा घरी. ते येतील थोड्या वेळात. देव म्हणाले. असू दे. नामदेव नसला तरी हरकत नाही. हे माझे गाठोडे आहे. यात होन आहेत. ते तुमच्या घरात ठेवा. आणि हे पहा, तुम्हाला लागतील तेवढे यातील होन घ्या. नामदेवाला मी माझा समजतो. त्याच्यावर माझा लोभ आहे. तेव्हा अनमान न करता, तुम्हाला पाहिजे तेवढे यातले होन काढून घ्या. राजाई म्हणाली, तुमचे नाव काय?

**नाम पुसेल तरी केशवशेटी सांगावे । लागेल तितुके वेचावे हे द्रव्य ।।१३।। आणिक मज मागावे काही न ठेवावे । माझे क्षेम सांगावे सखा म्हणोनि ।।१४।। इतुके बोलुनि देव पाठिमोरा झाला । सवेचि घरा आला विष्णुदास ।।१५।। म्हणे कैंची गोणी टाकून गेला वाणी । परी आम्ही कोणी ओळखू ना ।।१६।। त्याने नाव केशवशेटी म्हणीतले । तव येरे जाणिले माझा देव ।।१७।। का गे धावा केला देव माझा कष्टला । अपराध झाला तुज पाशी ।।१८।। राजाई म्हणे आम्हा थोर लाभ झाला । बिडवई भेटला केशवशेटी ।।१९।।**

नामदेव १३२९ आ, १३०१ स, १९८ गोरखपूर, १७५ पा,

नामदेवराय घरी आले. त्यानी विचारले कोण वाणी आला होता? ही गोणी कोणी येथे टाकली? राजाईने सांगितले, तुम्हाला भेटावयास दुरून केशवशेट आलेत. त्यानी हे होन असलेले गाठोडे आपल्याला

## अग्नी लागल्यावर देव घाबरणे, नामदेवाना बाजूला काढणे

दिले आहे. ते तुम्हाला चांगले ओळखतो म्हणतात. यातील हवे तेवढे होन वापरा म्हणतात. केशवशेट नाव ऐकल्यावर नामदेवरायानी ओळखले. त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. ते म्हणाले, भगवंता, विठ्ठला, या सामान्य नामदेवासाठी, कशाला एवढी तसदी घेतोस? माझ्यासाठी वेगवेगळी रुपे घेऊन, तू माझ्या संकटाच्या वेळी धावून येतोस. पांडुरंगा, केशवा, खरेच तुझे सगळे अगम्य आहे. असा प्रकारे त्यानी भगवंताचा धावा केला. तंद्रीतून जागे झाल्यावर ते म्हणाले, अग यातल आपल काही नाही. हे सगळ मी ब्राह्मणाना वाटून टाकणार. राजाई म्हणाली, अहो, तुम्हाला वेडे म्हणावे की खुळे. परमेश्वराने आपल्या साठी एवढे दिले, ते तुम्ही दान करून टाकणार. आम्ही काय उपाशी मरावे अशी तुमची इच्छा आहे काय? राजाई अगदी निराश झाली. देव देतो आणि नामदेवाच्या रुपाने कर्म नेते, अशी तिची अवस्था झाली.

**वराईची गोणी कळली राजाईसी । नामा ब्राह्मणाशी बोलाविती ।।१।। इतक्या मध्ये होन मडकेभर काढिले । गोणी ते शिवली होती तैसी ।।२।।** नामदेव १३३० आ, १३११ स, १९९ गोरखपूर, १७६ पा,

नामदेवराय ब्राह्मणाना बोलवावयास गेले. राजाईने मडकेभर होन बाजूला काढून घरात दडवून ठेवले. थोड्या वेळाने ब्राह्मणाना घेऊन नामदेवराय घरी परत आले. त्यानी केशवशेटने दिलेले गाठोडे बाहेर आणून त्यातील सर्व होन त्याना वाटून टाकले. सुटकेचा सुखद निःश्वास टाकला. त्याना आपल्या जिवावरचे एक प्रचंड ओझे खाली उतरल्याचा आनंद झाला. ते बाहेर निघून गेले. इकडे राजाई घरात दडवून ठेवलेले होन डोळे भरून पहावेत म्हणून आत गेली. तो त्या होनाचे कोळसे झालेले तिच्या दृष्टीस पडले. ते पहाताच तिला रडू कोसळले.

**द्विज मेळवूनि आला नामदेव । वाटियेले सर्व द्रव्य त्याने ।।३।। राजाई**

---

## १९-७ राजाईने लपवलेले होन नामदेवानी वाटले

**ते होन राखावया गेली । हाता राख आली कोळशाची ।।४।। कोळसे देखोनि खोचियेली मनी । धन्य तुझी करणी पांडुरंगा ।।५।। नामदेवा पुढे सांगे वर्तमान । चोरून म्या होन ठेविले होते ।।६।। इतक्या मध्ये होन मडकेभर काढिले ।।धृ।।**

नामदेव १३३० आ, १३११ स, १९९ गोरखपूर, १७६ पा,

नामदेवराय बाहेरून आले. त्याना पहाताच राजाई रडू लागली. त्यानी कारण विचारले. तिने खरी हकीगत सांगितली. नामदेवराय म्हणाले बघू ते कोळसे. राजाईने ते लपवलेल्या होनाचे मडके बाहेर आणले. नामदेवरायानी कोळसे झालेल्या होनाकडे पहाताच ते परत सोन्याचे होन झाले.

**नामदेवा पुढे सांगे वर्तमान । चोरून म्या होन ठेविले होते ।।७।। पाहाता होनाचे झाले वो कोळसे । नामा पाहाता ते झाले सोने ।।८।। वाटीले ब्राह्मणा ते होन तयाने । फेडियेले ऋण गोविंदाचे ।।९।। इतक्यामध्ये होन मडकेभर काढिले । गोणी ते शिवली होती तैसी ।।२।।**

नामदेव १३३० आ, १३११ स, १९९ गोरखपूर, १७६ पा,

आपल्या पतीच्या अंगी असलेले अलौकिक सामर्थ्य पाहून राजाईला अपार आनंद झाला. नामदेवराय परत बाहेर गेले. ब्राह्मणाना बोलावून आणले. उरलेले सर्व होन त्याना वाटून टाकले. पण या वेळी राजाईने आडकाठी केली नाही किंवा दुसरे काहीही बोलली नाही. आपल्या पतीच्या अंगी दिव्य शक्ती आहे याची तिला आता पूर्ण खात्री पटली. आता तिने नामदेवरायाना वेळोवेळी अपशब्दानी प्रहार करावयाचे सोडून दिले. उलट आपला पती भगवंताचा अत्यंत लाडका भक्त आहे, म्हणून तिचा ऊर अभिमानाने भरून आला होता. ऐन संकटाच्या वेळी परमेश्वर आपल्या पाठीशी उभा राहील याबद्दल तिला आता विश्वास वाटू लागला

होता. नामदेवरायाना आता घरातही शांतता मिळू लागली. पण घरातल्या दारिद्रयात मात्र किंचितही बदल झाला नव्हता. परंतु झाली असलीच तर दारिद्रयात वाढच झाली होती.

## २०) देवानी विप्र वेषाने एकादशीला भोजन मागणे

देवाचे सगळेच नेहमी अतर्क्य असते. आपल्या भक्तावर आपणच संकटे आणावयाची आणि या ना त्या रुपाने आपणच ती निवारण करावयाची. देवाचा आपल्या भक्तावर पूर्ण विश्वास असतो. परंतु ते इतराना दाखवून द्यावयाचे असते. म्हणून देव आपल्या भक्ताची परीक्षा घेतल्या सारखे दाखवत असतो. मग देव त्या साठी नाना युक्त्या योजतो. भक्ताला कात्रीत पकडतो. आणि गंमत पहातो. असा देवाचा नेहमीचा खाक्या आहे. थोडक्यात देवाला केव्हा कसली लहर येईल याचा नेम नाही. त्यामुळे देवाचा कोणता भक्त केव्हा व कोणत्या संकटात पडेल याचा भरवसा नाही. नामदेवराय विठ्ठलाचे आवडते व लाडके भक्त. ते अगदी सलगीतले भक्त होते. परंतु देवाच्या मनात त्यांची परीक्षा पहावयाचे आले. त्या दिवशी महाएकादशी होती. नामदेवरायानी देवळात जाऊन पांडुरंगाची मनोभावे पूजा केली. आरती केली. सर्व पूजा रोजच्या प्रमाणे यथासांग उरकल्यावर ते घरी परतले. आषाढी एकादशी असल्यामुळे निराहार रहावयाचे होते. ते भगवंताच्या नामस्मरणात दंग होते. इतक्यात त्यांच्या दारा समोर एक ब्राह्मण येऊन उभा राहिला.

**करुनि आरती । नामा आला घराप्रती ।।१।। तेणे धरियेले व्रता । अन्न न घ्यावे सर्वथा ।।२।। ऐसा जाणोनिया नेम । अनुभवी पुरुषोत्तम ।।३।। आषाढी एकादशी । विप्रवेशे ऋषिकेशी ।।४।। आला नामयाचे सदनी । नाम गाय दासी जनी ।।५।।**

---

## २०-१ ब्राह्मणाचा हट्ट उपवासाचे नको, जेवणच पाहिजे

जनाबाई २९० आ, ४२७ स, १४० गोरखपूर, १२५ पा,

नामदेवरायानी त्याला आस्थेने घरात आणले. आणि नम्रतापूर्वक म्हणाले, भू देव आपली काय सेवा करू?

**नमुनी ब्राह्मण । म्हणे मज द्यावे अन्न ।।१।। नामा म्हणे एकादशी । इच्छित घ्यावे फराळाशी ।।२।।**

जनाबाई २९१ आ, ४२८ स, १४१ गोरखपूर, १२६ पा,

ब्राह्मण व्याकुळतेने म्हणाला, नामदेवा, मला भूक लागली आहे. मला भोजन हवे आहे. नामदेवराय हात जोडून म्हणाले, महाराज, आज आषाढी एकादशी आहे. आज घरात अन्न शिजवायचे नाही. आपण दुसरे काहीही मागा. ब्राह्मण हट्टाने म्हणाला, नाही, मला दुसरे काही नको. मला भोजनच पाहिजे, आणि तेही तुझ्याच घरात. नामदेवरायानी विनंती केली, की भूदेवा, तुम्हाला हवे तर फराळाचे करून घालू. पण इतर अन्न भोजन आज मिळणार नाही. आपण मला अडचणीत टाकू नका. ब्राह्मण म्हणाला,

**अन्नावाचोनि आता । मज नको रे सर्वथा ।।३।। नामा म्हणे एकादशी । इच्छित घ्यावे फराळाशी ।।२।।**

जनाबाई २९१ आ, ४२८ स, १४१ गोरखपूर, १२६ पा,

ब्राह्मण हट्ट सोडीना. तो म्हणाला, हे पहा मी उपाशी मरावे, असे तुला वाटत नसेल, तर माझ्या भोजनाची सिद्धता कर. प्रसंग अवघड होता. अथिती देवो भव । असे शास्त्रवचन आहे. नामदेवरायाना विचार पडला, याला भोजन घातले, तर याचा उपास मोडल्याचे पाप आपणास लागणार. आणि भोजन घातले नाही तरी, आपणास पाप लागणारच. दोन्ही कृत्यानी पाप लागणारच. असा विचार केल्यानंतर, नामदेवराय म्हणाले की मी फराळा शिवाय काहीही देणार नाही.

**हाता पायांची बेगडी । विप्रे घातली मुरकुंडी ।।४।। जीव सोडी चक्रपाणि**

---

## २०-२ उपवासामुळे देवानी प्राण सोडणे, स्मशानात नेणे

**। म्हणे नामयाची जनी ।।५।। नामा म्हणे एकादशी । इच्छित घ्यावे फराळाशी ।।२।।**

जनाबाई २९१ आ, ४२८ स, १४१ गोरखपूर, १२६ पा,

नामदेवरायांचे हे बोलणे ऐकताच ब्राह्मणाने तेथेच बैठक मारली. हात पाय आकडले. आणि भुकेने व्याकुळ होऊन त्याने त्याच ठिकाणी प्राण सोडला. नामदेवरायांच्या घरातच ब्राह्मणाला मृत्यू आल्यामुळे जो तो नामदेवरायाना दूषण देऊ लागला. थोड्या वेळात गावातले इतर काही ब्राह्मण गोळा झाले. आणि त्यानी अंत्य विधीची तयारी सुरू केली. सर्व जण नामदेवरायाचा धिक्कार करत होते.

**जन समुदाय मिळाला । धिक्कारिती नामयाला ।।१।। विप्र बोलावूनि वेगे । प्रेत नेले चंद्रभागे ।।२।।**

जनाबाई २९२ आ, ४२९ स, १४२ गोरखपूर, १२७ पा,

ती प्रेतयात्रा निघाली. देवळा जवळ आली. महाद्वारात आली. नामदेवरायानी देवाला निरोप द्या म्हणून सांगितले.

**अहो पांडुरंगा रखुमाईच्या कांता । निरोप द्यावा आता येतो आम्ही ।।१।। राही रुक्माबाई सत्यभामा माता । निरोप द्यावा आता येतो आम्ही ।।२।। नमस्कार माझा गरुड हनुमंता । निरोप द्यावा आता येतो आम्ही ।।३।। नामा विनवी चरणी ठेवूनिया माथा । निरोप द्यावा आता येतो आम्ही ।।४।।**

नामदेव ५३४ स, २३४८ पा, २३३६ गोरखपूर, पा,

नामदेवराय देवाला म्हणाले की देवा आता मला शेवटचा निरोप द्या. आम्ही आता इहलोकाची यात्रा संपवणार आहोत. नामदेवरायानी देवाच्या चरणावर मस्तक ठेवले. आणि निरोप मागितला. देवळाला प्रदक्षिणा घातली. प्रेतयात्रा चंद्रभागेत आणली. सरण रचले.

**मोठे रचूनि सरण । मध्ये निजविला ब्राह्मण ।।३।। शय्या गमनी**

---

## २०-३ नामदेव प्रेता शेजारी झोपले, अग्नी लागल्यावर देव घाबरणे

**पहुडला । म्हणे अग्नी द्या आम्हाला ।।४।।**

जनाबाई २९२ आ, ४२९ स, १४२ गोरखपूर, १२७ पा,

जमलेले सर्व लोक नामदेवरायाना दूषण देऊ लागली. त्यांचा धिक्कार करू लागली. ते प्रेत चंद्रभागेला आणले. मोठे सरण रचले. प्रेत सरणावर ठेवले.

नामदेवरायानी विचार केला की आपल्या मुळे हा ब्राह्मण मेला. आपल्या कडून न जाणून ब्रह्महत्या घडली आहे. ब्रह्महत्तेचे प्रायश्चित म्हणजे देहदंडच आहे. आपल्या उपवासाच्या हट्टापायी ब्राह्मण मेला, याचा लोकाना पण राग आलेला आहे. तर आपणच प्रायश्चित्त घेऊ. जगातील सर्व गोष्टी देवाच्याच सत्तेने घडत असतात. देवाच्याच मनात होते म्हणून हा ब्राह्मण मेला. देवाच्याच मनात मी प्रायश्चित्त घ्यावे असे दिसते. तर मग आपणही सरणावर झोपावे व अग्नी लावून घ्यावा.

**करणे का न करणे । हे एकची तो जाणे । विश्व चळतसे जेणे । परमात्मेनि ।।** ज्ञानेश्वरी

नामदेवराय प्रेता शेजारी झोपले. व म्हणाले की आता आम्हाला अग्नी द्या. ब्राह्मणांचा नामदेवरायावर राग होताच. त्यानी वेळ न लावता अग्नी दिला.

**अग्नी दिला जयाप्रती । देव विमानी पहाती ।।५।। विस्मित झाला चक्रपाणि । प्रगट होय म्हणे जनी ।।६।।**

जनाबाई २९२ आ, ४२९ स, १४२ गोरखपूर, १२७ पा,

**अग्नी लागता अंगाशी । घाबरले ऋषिकेशी ।।१।। निजरुपे प्रगटले । चरणी मस्तक ठेविले ।।२।। सोनसळा वैजयंती । कोटी सूर्य ते लोपती ।।३।। नामा म्हणे विठोबाला । भला अंत रे पाहिला ।।४।। हाती धरुनि नामयासी । पाठ थापटी ऋषिकेशी ।।५।। गेला राऊळी चक्रपाणि । भावे वंदी दासी जनी ।।६।।**

---

## २१) ज्ञानदेव भेटावयाला आले, ज्ञानदेव नामदेव सख्यत्त्व

जनाबाई २९३ आ, ४३० स, १४३ गोरखपूर, १२८ पा,

अग्नी अंगाला लागल्यावर देव घाबरले. मग देव निज रुपाने प्रगट झाले. नामदेवरायानी देवाला नमस्कार केला. देवाच्या गळ्यात वैजयंती माळ होती. देवाचे तेज कोट्यावधी सूर्याना लोपविणारे होते.

नामदेवराय म्हणाले, देवा, आज तुम्ही माझा चांगलाच अंत पाहिलात. देव म्हणाले, अरे आज मी तुझी सत्त्व परीक्षा पाहिली. पण तू माझ्या परीक्षेत पूर्णपणे उत्तीर्ण झालास. जिवाचा देवावर किती विश्वास असावा हे मला जगाला दाखवून द्यावयाचे होते. म्हणून तुझी परीक्षा घेण्याचे नाटक केले.

## २१) ज्ञानदेव भेटावयाला आले, ज्ञानदेव नामदेव सख्यत्त्व

**नामयाचे भेटी ज्ञानदेव आले । लोटांगण घातले नामदेवे ।।१।। देऊनि आलिंगन प्रीती पडिभरे । पूजिले आदरे यथाविधी ।।२।। धन्य तो अवसरू संतसमागमु । करितसे संभ्रमु आवडीचा ।।३।। नामदेव म्हणे सुफळ माझे जिणे । स्वामीच्या दर्शने धन्य झालो ।।४।।**

नामदेव ९१३ आ, ९०३ स, २०२ गोरखपूर, १७९ पा.

ज्ञानोबाराय नामदेवरायांच्या भेटीला पंढरीला आले. त्याना पाहून नामदेवरायाना अत्यंत आनंद झाला. नामदेवरायानी त्याना लोटांगण घातले. आलिंगन दिले. त्यांची पूजा केली. व म्हणाले, आज माझे जीवन सुफळ झाले. स्वामींचे दर्शन झाले. आज मला प्रत्यक्ष पांडुरंगच भेटले. एकमेकाना अत्यंत आनंद झाला. कारण दोघांचे एकमेकावर अत्यंत प्रेम होते. दिसावयाला दोन व्यक्ती परंतु अंतःकरणाने दोघे एकच होते. दोघांचे दैवत एक, भक्ती समान, बोलणे एक, अंतरंग एक अशी

अवस्था होती.

**दो दांडी एकी श्रुति । दोहो फुली एकी दृति । दोहो दिवी दीप्ति । एकीची जेवी ।।** अमृतानुभव १-१८

जशा दोनटिपऱ्या पण नाद एक असतो, सजातीय दोन फुले असतात, पण वास एक, दोन दिवे असतात, पण प्रकाश एक असतो. दो दांडी एकी श्रुति, म्हणजे दोन टिपऱ्या, पण त्यांचा नाद एकच. म्हणजे एकाच्याच हातातल्या दोन टिपऱ्या असे म्हणण्याचे कारण नाही. रासक्रीडेत, दांडिया नृत्यात आपण पाहातो, हिच्या हातातील टिपरी व त्याच्या हातातील टिपरी असते. अशा रीतीने जर दोन भिन्न टिपऱ्या एकमेकीवर आदळल्या, तरी त्यांचा नाद एकच असतो. त्या टिपऱ्या भिन्न असतील, त्यांचा आकारही कदाचित कमी जास्ती असेल, त्यांचे रंगही वेगवेगळे असतील, पण नाद मात्र एकच असतो. तेव्हा टिपऱ्या दिसावयाला जरी भिन्न असल्या, तरी असावयाला एकत्व आहे. म्हणजे दिसावयाला भिन्नत्व, पण मुलता अभिन्नत्व.

**दोन्ही टिपरी एकची नाद । सगुण निर्गुण नाही भेद रे । कुसरी अंगी मोडतील परी । मेळविती एकएका छंदे रे ।।१।। काहीच न वजे वाया रे खेळिया । एकची बसवंत अवघिया रे । समविषम तेथे होऊच नेदी । जाणऊनि आगळिया रे ।।२।।**

तुकोबा २३६ व, ३७३६ जोग, २४४ घुले,  जोशी,

**दो ओठी एकी गोठी । दो डोळा एकी दिठी । तेवी दोघी जीही सृष्टी । एकीच जेवी ।।** अमृतानुभव १-१९

दोन ओठ पण त्यातून निघणारा शब्द एक, दोन डोळे पण दृष्टी एक, या दृष्टान्ता प्रमाणे जगत म्हणून नाममात्र आहे. ओठ व एक कान यातून शब्द येणार नाही, त्याला दोन ओठच पाहिजेत. म्हणजे त्यात परस्पर पूरकता आहे. एक डोळा उघडला, दुसरा डोळा झाकून ठेवला,

---

## २१-२ ज्ञानदेव भेटल्यावर नामदेवाना फार आनंद झाला

तर सबंध दृष्टीचे सुख मिळणार नाही. दोन डोळ्यांचेच एकाग्रत्व व्हावयाला पाहिजे. म्हणजे परस्पर पूरकतेचा तिसरा अर्थ त्याच्या मध्ये आहे. तेव्हा वरकरणी भिन्नता, पण परमार्थता अभिन्नता आणि परस्पर पूरकता हे तीनही अर्थ वरील ओळीत आहेत. असे ज्ञानोबारायांचे व नामदेवरायांचे सख्यत्व होते. नामदेवराय म्हणाले,

**पूर्वपुण्य माझे फळाशी हे आले । प्रत्यक्ष भेटले पांडुरंग ।।१।। संसारी आसक्त माया मोहे रत । तापत्रय संतप्त जाले जीव ।।२।। ऐसिया पतितांचा करावया उद्धार । यालागी अवतार तुमचा जगी ।।३।। तरी मी एक दीन मूढ मति हीनु । चरणीचा रजरेणू संताचिया ।।४।। म्हणोनि पंढरीनाथ पाळितसे माते । प्रेम जीवन भाते देऊनिया ।।५।। आजी स्वामीनी पाहिले कृपा दृष्टी । केली सुख वृष्टि अनिवार ।।६।। नामा म्हणे तुमच्या चरणाचा आधार । ठाकीन पैलपार भवनदीचा ।।७।।**

नामदेव ९१३ आ, ९०४ स, २०२ गोरखपूर, १८० पा, १४०२ प. मा.

नामदेवराय म्हणाले, जग हे संसारातील पंच विषयरुपी अरण्या मध्ये अडकलेले आहे. माया मोह आदी विकारामध्ये रममाण झालेले आहे. संसारातील त्रिविध तापा मध्ये होरपळून जात आहे. त्यामुळे जिवाचे अघोर पतन झालेले आहे. म्हणून तुमच्या सारखे संत महात्मे, पतित जिवांचा उद्धार करण्या करता, अवतार घेऊन येत असतात. अशा शब्दात ज्ञानोबारायांचे गौरवपूर्ण स्वागत केले. आणि स्वतःला एक दीन, मूढ, मती हीन आणि संतांच्या चरणाचा रजरेणू म्हणवून घेतले. मी असा दीन असल्या मुळे पंढरीनाथ माझे पालन करत असतो. आज तुम्ही माझ्याकडे कृपा दृष्टीने पाहिले व माझ्यावर अनिवार सुख वृष्टी केली. तुमच्या चरणाच्या आधाराने मी भवनदी पार करू शकेन.

**ज्ञानदेव म्हणे तू भक्त शिरोमणी । जोडिले जन्मोनि केशव चरण**

## २२) ज्ञानदेवांचा नामदेवा बरोबर तीर्थ यात्रा विचार

**।।१।। प्रेम सुख गोडी तुजचि फावली । वासना मावळली समूळ तुझी ।।२।। धन्य तुझा जन्म धन्य तुझे कूळ । धन्य तुज राऊळ जवळी असे ।।३।। भक्ती प्रेम धन्य साधिले तुवा सार । केला पै संसार देश धडी ।।४।।**

नामदेव ९१४ आ, ९०५ स, २०४ गोरखपूर, १८१ प. मा.

ज्ञानोबारायानी नामदेवरायांच्या भक्ती सुखाला हार्दिक धन्यवाद दिले. ते म्हणाले, तू भक्त शिरोमणी आहेस. जन्माला येऊन तू भगवंताची जोड करून घेतली आहेस. भगवंताच्या प्रेम सुखाची गोडी तुला प्राप्त झालेली आहे. लौकिक संसारामधील सर्व प्रकारच्या तुझ्या वासना समूळ नष्ट झालेल्या आहेत. म्हणून तुझा जन्म धन्य आहे, तुझे कूळ धन्य आहे. देव सतत तुझ्या जवळ आहे.

## २२) ज्ञानदेवांचा नामदेवा बरोबर तीर्थयात्रा करण्याचा विचार व देवाची परवानगी मागणे

**क्षण एक एकांती बैसोनि सहज । अंतरीचे गुज बोलो काही ।।५।। जीवन्मुक्त ज्ञानी जरी जाले पावन । तरी देव तीर्थ भजन न संडिती ।।६।। भक्त शिरोमणी धन्य तू संसारी । परी एक अवधारी वचन माझे ।।७।। भूतळींची तीर्थे पहावी नयनी । असे आर्त मनी आहे मज ।।८।। तुझिये संगतीचे नित्य सुख घ्यावे । सार्थक करावे संसाराचे ।।९।। ऐसी उत्कंठा बहुत माझे पोटी । भाग्ये झाली भेटी तुजसी आजी ।।१०।। ज्ञानदेव म्हणे पुरवी मनोरथ । करावा मुहूर्त प्रयाणाशी ।।११।।**

नामदेव ९१४ आ, ९०५ स, २०४ गोरखपूर, १८१ पा.

मग दोघे जण एकांतात बसून अंतरीचे गुज बोलू लागले. ज्ञानोबाराय म्हणाले, ज्ञानी जरी जीवन्मुक्त झाले, तरी ते देव, तीर्थ,

## २२) ज्ञानदेवांचा नामदेवा बरोबर तीर्थ यात्रा विचार

भजन हे सोडत नाहीत. तू भक्त शिरोमणी आहेस. म्हणून तुझ्या सोबत, देशातील पवित्र तीर्थे प्रत्यक्ष डोळ्यानी पहावीत, तुझ्या समागम सुखाचा लाभ घ्यावा, आणि जीवन सार्थक करावे, अशी उत्कंठा मला लागली आहे. म्हणून मी तुला तीर्थ यात्रेला नेण्याकरता मुद्दाम आलो आहे. तरी माझे हे मनोरथ पूर्ण कर. या प्रमाणें ज्ञानोबारायानी आपला तीर्थ यात्रेचा मनोदय प्रगट केला.

**ऐसे ऐकोनि नामा विचारी मानसी । काय द्यावे यासी प्रति वचन ।।१।। विठोबाचे पाय आठवले मनी । बोले अमृत वचनी तया प्रति ।।२।। सर्वसुख मज आहे पांडुरंगी । जावे कवणा लागी कोण्या तीर्था ।।३।। ...जन्मोनि पाळिलो पोशिलो जयाचा । विकिलो काया वाचा मने त्याशी ।।१०।। नामा म्हणे स्वामी विठोबासी पुसा । आज्ञा देईल शिरसा वंदीन त्याशी ।।११।।**

नामदेव ९१५ आ, ९०६ स, २०६ गोरखपूर, १८३ पा.

ज्ञानोबारायांचे बोलणे ऐकून, नामदेवराय मनात विचार करू लागले. नामदेवराय विठ्ठलाचे अनन्य भक्त होते. त्यांचे मन पंढरी क्षेत्र व पांडुरंग याना सोडून तीर्थयात्रेस जाण्यास तयार होईना. विठ्ठलाचे पाय मनात आठवले मग बोलू लागले. ते नम्रपणाने म्हणाले, माझे सर्व सुख या पांडुरंगाच्या पायाशी आहे. मग हे सोडून इतरत्र जाण्याची काय गरज आहे? मला पुरुषार्थ नकोत, चारी मुक्तीही नकोत. मी पंढरीरायाचा भिकारी होऊन महाद्वारात पडून राहीन. या सुखा करता मी शरीरावर उदास झालो आहे. त्याकरता दुर्जय असलेले मायाजाल तोडले. त्रिभुवनातील सर्व वैभवाचा त्याग केला. पंढरीरायाचा मी भिकारी झालो आहे. मी पांडुरंगरुपी कल्पतरूच्या छायेत आहे. पांडुरंगरुपी कामधेनूचे दुभते मला नित्य प्राप्त आहे. मी अवाप्त सकलकाम आहे. माझ्या सर्व इच्छा पांडुरंग कृपेने पूर्ण होतात. नामदेवराय जरी असे

## २२-१ तीर्थयात्रेकरता देवाची परवानगी मागणे, देवानी परवानगी देणे

म्हणाले, तरी त्याना ज्ञानोबारायांच्या संगती सुखाचा मोह आवरणे शक्य होईना. म्हणून ते शेवटी म्हणाले, की पंढरीरायाना विचारा. त्यानी आज्ञा दिली, तर मी ती शिरसावंद्य मानीन. यावर ज्ञानोबाराय म्हणाले,

**ज्ञानदेव म्हणे भला भक्तराज । कळले गौप्यगुज सर्व तुझें ।।१।। धीर आणि चतुर सर्वस्वे उदार । साजे तुज अधिकार प्रेमभक्ति ।।२।। धन्य तू संसारी भक्त भावशीळ । साधिले तुवा केवळ प्रेमसुख ।।३।। देउनि आलिंगन नामा धरियेला करी । वंदियेले शिरी चरणरज ।।४।। राउळाभीतरी चला जाऊ वेगे । आज्ञा मागो दोघे तीर्थयात्रे ।।५।। सत्वर उठोनि आले स्वामी जवळी । मस्तके ठेवियेली चरणावरी ।।६।। जीवीचा निजभावो सांगे ज्ञानदेवो । ऐकोनि पंढरीरावो हासिन्नले ।।७।। म्हणे तू ज्ञानशीळ चिद्रूप केवळ । सबाह्य निर्मळ स्फटिक जैसा ।।८।। स्वये तीर्थरूप तूचि निरंतर । असता हा विचार काय करीसी ।।९।। येरु म्हणे स्वामी बोलिलेती बरवे । परी सार्थक करावे देहाचे या ।।१०।। प्रसंगे नामयाचे संगती सुख घ्यावे । म्हणोनि ज्ञानदेवे धरिले चरण ।।११।।**

नामदेव ९१६ आ, ९०७ स, २०७ गोरखपूर, १८४ पा.

ज्ञानोबाराय म्हणाले, तुझ्या अंतःकरणातील भाव कळाला. तू चतुर आहेस आणि प्रेम भक्ती तुला शोभून दिसते. तू संसारी असून धन्य आहेस. भगवंताचे प्रेमसुख तू साधून घेतले आहेस. असे म्हणून नामदेवरायाना आलिंगन दिले. नामदेवरायांचे चरणरज वंदन केले. आणि दोघे राऊळात भगवंता जवळ आले देवाचे चरण दर्शन घेतले. ज्ञानोबारायानी नामदेवासह आपला तीर्थयात्रेचा मनोदय प्रकट केला. तीर्थयात्रा निमित्ताने नामदेवरायांचे संगती सुखाचा लाभ घेता येईल, असे ते म्हणाले. यावर देव म्हणाले,

**हासोनि पंढरीनाथ पाहे नाम्याकडे । म्हणे नवल केवढे भाग्य तुझे**

---

## २२-२ देवानी परवानगी दिली व दोघे पदयात्रेला निघाले

**।।१।। प्रत्यक्ष परब्रह्म मूर्ती ज्ञानेश्वर । करितसे आदर संगतीचा ।।२।। ऐसे भाग्य जेणे सर्वस्वे साधावे । तरीच जन्मा यावे विष्णुदासा ।।३।। जावे स्वस्ति क्षेम यावे शीघ्रवत । करावे स्वहित कळेल तैसे ।।४।।... चरणी ठेवूनि माथा निघते झाले दोघे । आले चंद्रभागे केली स्नाने ।।१४।। पुंडलिकाचे चरण वंदुनिया माथा । उतरले भीमा पैल तीरी ।।१५।।**

नामदेव ९१७ आ, ९०८ स, २०८ गोरखपूर, १८५ पा.

भगवंतानी हासून नामदेवाकडे पाहिले. व म्हणाले, तुझ्या भाग्याची मला नवलाई वाटते. ज्ञानोबा म्हणजे प्रत्यक्ष परब्रह्म मूर्ति आहे. व तो तुझ्या संगतीची इच्छा करत आहे. जन्माला यावे आणि असे श्रेष्ठ भाग्य प्राप्त करूण घ्यावे. ते तुला प्राप्त झाले आहे. तुम्ही सुखाने प्रयाणाचा मुहूर्त करा. निश्चित मनाने तीर्थ यात्रेला जाऊन लवकर परत या. वाटेमध्ये अडचणी आल्या तर योग्य त्या प्रमाणे त्यातून मार्ग काढा. देव ज्ञानोबारायाना म्हणाले, नामदेव हा माझा अत्यंत लाडका आहे. भोळा भाबडा आहे. मला त्याची फार चिंता वाटते. प्रवासात त्याची योग्य काळजी घे. मग देवानी नामदेवाचा हात ज्ञानोबारायांच्या हातात दिला, व तुझी इच्छा म्हणून नामदेवाला तुझ्याबरोबर पाठवत आहे असे सांगितले. दोघानी भगवंताच्या चरणावर मस्तक ठेवले व देवाची परवानगी घेऊन चंद्रभागेला आले, स्नान केले, पुंडलिकरायांचे दर्शन घेतले. भीमानदी ओलांडून पुढील प्रवासास निघाले. नामदेव व ज्ञानदेव यांचे तीर्थाटन म्हणजे भक्ती व ज्ञानाचा प्रीती संगमच. ज्ञाना व नामाची दुक्कल प्रसन्न अंतःकरणाने मार्ग आक्रमण करत होती.

**ऐसा सुखरूप दोघे चालताती मार्गी । परी चित्त पांडुरंगी नामयाचे ।।१।। क्षणक्षणा वास परतोनि पाहे । वियोग न साहे पंढरीचा ।।२।।**

नामदेव ९२१ आ, ९१२ स, २१२ गोरखपूर, १८९ पा.

---

## २३) ज्ञानभक्ती व एकविध भक्ती विषयी दोघांचा संवाद

सुरवातीला हे दोघेच तीर्थ यात्रेला निघाले होते. इतर संत तीर्थ यात्रेत मागाहून सामील झाले असे म्हणतात. पण त्याचा उल्लेख नामदेवरायानी कोठे केल्याचे दिसून येत नाही. नामदेवराय जरी तीर्थयात्रेला देहाने निघाले, तरी त्यांचे चित्त पांडुरंगा कडेच ओढ घेत होते. लहान मूल आपल्या आईची पुन्हा पुन्हा आठवण काढते, त्या प्रमाणे नामदेवरायाना यात्रा मार्गात श्रीविठ्ठलाची आठवण वारंवार व्हावयाची. पांडुरंगाचा विरह त्याना सहन व्हावयाचा नाही. कंठ दाटून येई. पुन्हा पुन्हा पंढरीच्या दिशेने वळून पहात. विरहव्यथा असह्य होऊन म्हणावयाचे,

**म्हणे का गा केशिराजा बोळविले माते । न येशीच सांगाते सांभाळीत ।।३।। चिंतातूर थोर पडिलो ये परजनी । न दिसे माझे कोणी जिवलग ।।४।। फुटोनि ह्रदय होती दोन्ही भाग । बहू मज उद्वेग वाटताती ।।५।। तू माझी जननी तू माझा जनिता । तू बंधू चुलता पंढरीराया ।।६।। इष्ट मित्र तूचि गणगोत । तूचि कुळदैवत आवडते ।।७।। तूचि माझे व्रत तूचि माझे तीर्थ । तूचि धर्म अर्थ काम देवा ।।८।। तूचि ज्ञान दक्षु तूचि माझा लक्षु । तूचि माझा साक्षु स्वभावाशी ।।९।।**

नामदेव ९२१ आ, ९१२ स, २१२ गोरखपूर, १८९ पा.

## २३) ज्ञानभक्ती व एकविध भक्ती विषयी दोघांचा संवाद

**कीटकी भृंकुटीये जैसे अनुसंधान । निके निजध्यासन एकविध ।।१५।।**

**भिंगुरटी कीटकीते धरी । कोंडी भिंती माजिले घरी । ते मरणभये ध्यान करी । निरंतरी भ्रमरीचे ।।** नाथ भागवत ९-२३९

**तेणे तीव्रध्याने ती कीटी । होऊनि ठाके भिंगुरटी । गगनी चढे उठाउठी । प्रत्यक्ष दृष्टी देखिजे ।।** नाथ भागवत ९-२४०

भ्रमरी किड्याला धरून आणते, त्याला आपल्या भिंतीतल्या घरात कोंडून ठेवते. येता जाता त्या किड्याला चावते. त्यामुळे तो

## २३-१ हरीण नादाला भुलते, कृपनाला धनाचे चिंतन असते

किडा घाबरतो. त्याला सारखी भ्रमरीची भीती वाटू लागते. आता ती भ्रमरी येईल व मला चावेल, असा त्याला सारखा तिचा ध्यास लागतो. त्यामुळे तो किडा मरणाच्या भीतीने त्या भ्रमरीचे निरंतर ध्यान करावयास लागतो. त्या तीव्र ध्यानामुळे तो किडा शेवटी प्रत्यक्ष भ्रमरीच बनून जातो. हे व्यवहारातील प्रत्यक्ष उदाहरण आहे.

**भिंगुरटी जड असंत । मूढ कीटी तिचे ध्यान करीत । तेणे तद्रुपता प्राप्त । तैसा भगवंत तव नव्हे ।।** नाथ भागवत ९-२४१

**तो अजड चिद्रूप सुखदाता । ज्ञाता अधिकारी ध्यान करीता । तेथ तद्रुपता पावता । विलंबु सर्वथा पै नाही ।।** नाथ भागवत ९-२४२

भिंगुरटी व कीटक हे दोन्ही जड व ज्ञानहीन आहेत, तरी सुध्दा तीव्र ध्यासाने किडा हा भ्रमरी बनू शकतो, मग ज्ञानपूर्वक जर ईश्वर स्वरुपाचे ध्यान केले असता, निश्चितच तादात्म्य मिळेल यात शंका नाही. म्हणून अखंड ह्रदया मध्ये भगवंताची आठवण असणे म्हणजे ध्यान असे मला वाटते.

**नादी लुब्ध जैसे आसक्त हरीण । जाय विसरोन देहभाव ।।१०।। यापरी तल्लीन दृढ राखे मन । या नावे श्रवण आवडीचे ।।११।। येर कर्मधर्म सर्वही पाल्हाळ । श्रमुचि केवळ जाणिवेचा ।।२।।**

नामदेव ९२६ आ, ९१७ स, २१७ गोरखपूर, १९४ पा, १४०४ प. मा.

हरणाचा स्वभाव हा नादाला लुब्ध होणारा असतो. नादापुढे तो आपला देहभावसुद्धा विसरतो. याप्रमाणे परमार्था विषयी ऐकत असताना जो ऐकण्या मध्ये पूर्णपणे तल्लीन होतो, त्या ऐकण्याला मी श्रवण असे म्हणतो.

**व्यवसायी चित्त ठेवूनि कृपण । लाभाचे चिंतन सर्वकाळ ।।१२।। यापरी अखंड स्वहित विचारण । करीजे ते मनन सत्वशीळ ।।१३।। येर कर्मधर्म सर्वही पाल्हाळ । श्रमुचि केवळ जाणिवेचा ।।२।।**

---

## २३-१ हरीण नादाला भुलते, कृपनाला धनाचे चिंतन असते

नामदेव ९२६ आ, ९१७ स, २१७ गोरखपूर, १९४ पा, १४०४ प. मा.

कृपण असतो तो आपल्या व्यवसायावर आपले पूर्ण लक्ष केंद्रित करूण असतो. आपल्याला फायदा कसा होईल याचाच विचार तो सर्वकाळ करत असतो. अशा लोभी माणसास फक्त धनच आवडत असते. त्याचे मन नेहमी पैशाच्या चिंतनात गुंतलेले असते. कितीही धन मिळाले, तरी त्यास धन लाभाचाच सोस असतो. तुकोबाराय म्हणतात,

**लाभाचिया सोसे पुढे धावे मन । धनाचा कृपण लोभी जैसा ।।३।।**
**माझी मज झाली अनावार वाचा । छंद या नामाचा घेतलासे ।।२।।**

तुकोबा ३५८४ वडा, ९७५ जोग, ३९७८ घुले, जोशी, ८७० मा.

धनाचा कृपण हा फार लोभी असतो. जिकडे लाभ दिसेल, तिकडे त्याचे मन धाव घेत असते. लोभ्याला त्या धनाच्या प्रेमापुढे त्या धनाच्या सहाय्याने काही विषय भोगावेत, असे सुद्धा वाटत नाही.

**कृपण चित्तवृत्ति जैसी । रोवोनि घाली ठेवयापाशी । मग नुसधेनि देहेसी । आपण असे ।।** ज्ञानेश्वरी ११-६३३

कंजूस मनुष्य आपले सर्व लक्ष ज्या प्रमाणे आपण पुरून ठेवलेल्या द्रव्याच्या साठ्या पाशी जखडलेले ठेवतो आणि मग केवळ देहाने आपले इतर सर्व व्यवहार करत असतो.

**सर्वभावे लोभ्या आवडे हे धन । आम्हा नारायण तैशापरी ।।२।।**

तुकोबा ४९६ व, ५४१ जोग, ७३७ घुले, जोशी, ९५६ मा, ६९४ प. मा.

लोभ्याची, कृपणाची उपमा फक्त धना विषयीच्या त्याच्या तीव्र आसक्ती बद्दल, तीव्र प्रेमा बद्दल घेतली आहे. त्याला जसे धन सर्व भावानी आवडते, त्या प्रमाणे देव आम्हाला आवडतो. कृपण जसे धनाचे अखंड चिंतन करतो, त्या प्रमाणे आम्ही भगवंता विषयी मनात नेहेमी चिंतन करत असतो. नामदेवराय म्हणतात, यालाच मी सात्त्विक मनन असे म्हणतो.

---

## २३-२ कीटकाला भुंग्याचे जसे ध्यान लागते, तसे ध्यान लागावे

**परपुरुषी जैसी आसक्त व्यभिचारिणी । न लागे तिच्या मनी कामधाम ।।१४।। कीटकी भृंगुरटीये जैसे अनुसंधान । निके निज ध्यासन एकविध ।।१५।। येर कर्मधर्म सर्वही पाल्हाळ । श्रमुचि केवळ जाणिवेचा ।।२।।**

नामदेव ९२६ आ, ९१७ स, २१७ गोरखपूर, १९४ पा, १४०४ प. मा.

एखादी व्यभिचारिणी स्त्री ही पर पुरूषाशी नेहेमी आसक्त झालेली असते. त्याच्या ध्यासा पुढे तिला घरातील कामधंदा सुद्धा सुचत नाही. सतत तिचे लक्ष पर पुरुषावर केंद्रित झालेले असते. किंवा कीटकीला जसे भ्रमरीचे अनुसंधान लागलेले असते, त्याप्रमाणे देवाचा निज ध्यास लागणे, म्हणजे एकविध भक्ती असे नामदेवराय म्हणतात.

**सर्वभावे एक विठ्‌ठलुचि ध्याये । सर्वाभूती पाहे रूप त्याचे ।।१६।। सर्वाहूनि निराळा रज तम वेगळा । भोगी प्रेमकळा तेचि भक्ती ।।१७।। येर कर्मधर्म सर्वही पाल्हाळ । श्रमुचि केवळ जाणिवेचा ।।२।।**

नामदेव ९२६ आ, ९१७ स, २१७ गोरखपूर, १९४ पा, १४०४ प. मा.

सर्व भावानी एका विठ्‌ठलाचीच भक्ती करावी. सर्व प्राणीमात्रा मध्ये भगवंताचेच रूप पहावे. सर्वा पेक्षा अलिप्त असावे. रज तम या गुणा पासून दूर असावे. व भगवंताची सेवा प्रेम युक्त अंतःकरणाने करावी, याला मी भक्ती असे म्हणतो.

**सत्वाचा सुभटु असंग एकवटू । वैराग्य उद्‌भटू एकनिष्ठ ।।१८।। प्रारब्धाचा भोगी नेणे देहस्मृती । अखंड ते धृति निर्विकार ।।१९।। निर्वासना मन निजलाभे संपूर्ण । नेणे स्वरूप ज्ञान निकल्पाचे ।।२०।। काया वाचा मने हा माझा अनुभव । सांगितला सर्व आवडीचा ।।२१।। नामा म्हणे हे ही बोलवले तेणे । उदार सर्वज्ञे पांडुरंगे ।।२२।। येर कर्मधर्म सर्वही पाल्हाळ । श्रमुचि केवळ जाणिवेचा ।।२।।**

नामदेव ९२६ आ, ९१७ स, २१७ गोरखपूर, १९४ पा, १४०४ प. मा.

स्थिर बुद्धी होऊन, अनासक्तपणे वैराग्ययुक्त अंतःकरणाने भगवत

## ज्ञानोबा म्हणाले की नामदेवाचे बोलणे म्हणजे भक्तीचा अद्‌भूत रस

प्रेमात तल्लीन होऊन देहभान हरपणे व प्रारब्ध भोग, तक्रार न करता भोगणे यालाच मी धृति मानतो. एकांत अवस्थेतील ध्यान हीच खरी विश्रांती होय. याहून दुसरे विश्रांतीचे लक्षण नाही. काया वाचा मनाने जो मला अनुभव आला, तो मी सांगत आहे. नामदेवरायांचे हे सर्व बोलणे ऐकून ज्ञानोबाराय म्हणाले,

**भक्त भागवत बहुसाल ऐकिले । बहू होऊनि गेले होती पुढे ।।१।। परी नामयाचे बोलणे नव्हे हे कवित्व । हा रस अद्‌भुत निरुपमु ।।२।। हे सुख विश्रांती नाही हो कल्पांती । विचारावे संती दूरदृष्टी ।।३।। होतु शास्त्र वक्ते व्युत्पत्तीचे माथे । होतु बहू श्रोते बुद्धिवंत ।।४।। होतु कर्मनिष्ठ विद्येचे उत्कृष्ठ । होतु सर्वश्रेष्ठ पूज्यलोका ।।५।। होतु कलावंत कवित्व कुशल । होतु का वाचाळ चतुरतेचे ।।६।। होतु का पाठक होतु का साधक । होतु का वाचक ग्रंथकार ।।७।। होतु आत्मज्ञानी होतु निजध्यानी । होतु वज्रासनी बैसकेचे ।।८।। होतु योगयुक्त होतु जीवन्मुक्त । होतु का विरक्त सर्व संगी ।।९।। ऐसे होतु का सभाग्य संपन्न सर्वज्ञ । परी मी न म्हणी तुजविण विष्णूदासा ।।१०।। ही खूण जाणता एक पंढरीरावो । रुक्मादेवी नाहो श्रीविठ्‌ठल ।।११।।**

नामदेव ९२७ आ, ९१८ स, २१८ गोरखपूर, १९५ पा.

भक्त भागवतांच्या विषयी पुष्कळ ऐकलेले आहे. पूर्वीही पुष्कळ होऊन गेले. पुढेही पुष्कळ होतील. परंतु नामदेवरायांचे बोलणे म्हणजे केवळ कवित्व नव्हे. या बोलण्याला उपमा देता येणार नाही, असा अद्‌भुत रस आहे. नामदेवरायांचे बोलणे ऐकले की सुखाची विश्रांती प्राप्त होते. अशी दुसरी विश्रांती कल्पांता पर्यंत मिळणे शक्य नाही. इतर शास्त्र वक्ते असतील, बुद्धिवंत असतील, कर्मनिष्ठ असतील, उत्कृष्ठ विद्या जाणणारे असतील, सर्व लोकाना पूज्य असे सर्व श्रेष्ठ

असतील, कलावंत, कवित्व कुशल, वाचाळ, चतुर, पाठक, साधक, वाचक, ग्रंथकार, आत्मज्ञानी, निजध्यानी, योगयुक्त, जीवन्मुक्त, विरक्त, संपन्न असतील, नामदेवा पुढे मी त्याना मानत नाही. ही खूण जाणणारा एक पंढरीराव आहे. त्यांच्या शिवाय हे इतर ही खूण कोणाला जाणता येणार नाही, असे ज्ञानोबाराय म्हणाले.

## २१) नामदेवरायानी राजस्थानातील वाळवंटातील खोल विहिरीचे पाणी ओसंडून वर आणले.

नामदेवरायानी राजस्थानातील वाळवंटातील विहिरीचे पाणी ओसंडून वर आणले.

**पश्चिमे प्रभास आदी करोनि द्वारका । पाहिल्या सकळिका मोक्षपुऱ्या ।।१।। पंथी पावन तीर्थे करुनि सकळिके । प्रक्षाळली पातके वासनेची ।।२।। परी पंढरीचे प्रेम नामयाचे जीवी । माऊली आठवी पांडुरंग ।।३।। जीवन्मुक्त दोन्ही भक्त आणि ज्ञानी । परतोनि तेथोनि येती मार्गी ।।४।। तृषाकांत वनी होतसे पीडणी । पडले चिंतवणी जीवनालागी ।।५।।**

नामदेव ९२८ आ, ९१९ स, २१९ गोरखपूर, १९६ पा.

ज्ञानोबाराय व नामदेवरायानी पश्चिम प्रभास पट्टण, सोमनाथ तीर्थ, द्वारका इत्यादी क्षेत्रे पाहिली. याप्रमाणे आनंदात कालक्रमण व मार्गक्रमण करत होते. परतीचा प्रवास सुरू होता. नामदेवरायाना आता पंढरीचे वेध लागले होते. राजस्थानात असलेल्या बिकानेर नजीक ते आले. तेथून पन्नास मैलावर असलेल्या वालुकामय प्रदेशात वाटचाल करत होते. प्रवास व उष्मा, त्यात वालुकामय प्रदेश, यामुळे दोघेही तहानेने व्याकुळ झाले. जवळपास वस्ती नाही, पाणी नाही. तहान तर

**नामदेवरायानी वाळवंटातील विहिरीचे पाणी वर आणले.**

फार लागली. पाण्याच्या शोधात असता एक अतिशय खोल विहीर त्याना दिसली.

**तव दृष्टी एक कूप देखिला अवचिता । उदक तेथे पाहाता न लगे अंतु ।।६।। कवणेपरी येथे करू रिघवणी । प्राण संतर्पणी वाचवावे ।।७।। पंथी पावन तीर्थे करुनि सकळिके । प्रक्षाळली पातके वासनेची ।।२।।**

नामदेव ९२८ आ, ९१९ स, २१९ गोरखपूर, १९६ पा.

राजस्थानातील विहिरी फार खोल असतात. त्यातील पाणी काढण्यापूर्वी, एक पुरुष हातात ढोल घेऊन पाण्यात उतरतो. नंतर वरुन घागर खाली सोडतात. विहिरीत उतरलेला पुरुष घागर भरतो. मग ढोल वाजवतो. तेव्हा वरील पुरुष घागर वर ओढतो. अशा खोल विहिरीला पायऱ्याही नसतात. सापडलेल्या विहिरीला दोर, भांडे काही नव्हते. त्यामुळे विहिरीत पाणी असूनसुद्धा तहान भागणे अवघड झाले.

**मग त्या नाम्याप्रती बोले ज्ञानदेवो । मज एक उपावो साध्य असे ।।८।। लघिमेचे लाघव करुनि ते अवसरी । उतरोनि भीतरी घेतले उदक ।।९।। घेऊनि उदक निघाला बाहेरी । मग म्हणे अवधारी नामदेवा ।।१०।। आणूनि उदक देईन तुझ्या हाती । न दिसे आन युक्ती आणिक काही ।।११।। पंथी पावन तीर्थे करुनि सकळिके । प्रक्षाळली पातके वासनेची ।।२।।**

नामदेव ९२८ आ, ९१९ स, १९६ पा. २१९ गोरखपूर,

ती विहीर फार खोल आहे असे पाहून ज्ञानोबाराय म्हणाले, मला एक उपाय ठाऊक आहे. सिद्धीच्या सहाय्याने मी पाणी पिऊन येतो. ज्ञानोबारायानी लघिमेचे लाघव करून पक्षाचे रुप घेतले व पाणी पिऊन वर आले. मग नामदेवरायाना म्हणाले, मी तुला पाणी आणून देतो. याशिवाय आता दुसरा मार्ग दिसत नाही.

**नामा म्हणे धीर करावा नावेक । दावीन कवतुक स्वामीजवळी ।।१५।।**

---

## नामदेवरायानी वाळवंटातील विहिरीचे पाणी वर आणले.

**पंथी पावन तीर्थे करुनि सकळिके । प्रक्षाळली पातके वासनेची ।।२।।**

नामदेव ९२८ आ, ९१९ स, १९६ पा. २१९ गोरखपूर,

पण नामदेवरायाना योग सामर्थ्याचे सहाय्य घेणे योग्य वाटेना. त्याना तो भक्तीचा कमीपणा वाटला. भक्ताला जर जीव वाचवण्या करता योग सामर्थ्याचा आश्रय करावा लागेल, तर त्यात भक्तीचे महात्म्य राहिले कोठे?. म्हणून नामदेवराय म्हणाले, थोडा वेळ थांबा. मी तुम्हाला कौतुक दाखवतो.

**मग लावूनिया नेत्र निर्धारु पै केला । हृदयी आठविला केशिराज ।।१।।**

**तू इष्टमित्र बंधू सोयरा जननी जनकु । नेणे मी आणिकु तुज वाचोनि ।।२।। येई पंढरीराया मजलागी धावतु । झणी पाहसी अंतु कृपाळुवा ।।३।।**

नामदेव ९२९ आ, ९२० स, १९७ पा. २२० गोरखपूर,

मग नामदेवरायानी मनात पक्का निर्धार केला. केशवराजाची आठवण काढली. पांडुरंगाचा धावा सुरू केला. आपले प्राण व भक्तीची प्रतिष्ठा राखण्याची निर्वाणीची विनवणी केली. इकडे पंढरीरायाना नामदेवरायाची हाक पोचली. रुक्मिणी आईसाहेब देवाना म्हणाल्या,

**तव ती विश्वमाता विचारी नावेक । अवचिता शोक पडिला कानी ।।८।। म्हणे तृषाक्रांत नामा करितसे धावा । वेगी जाऊनि देवा सांभाळावे ।।९।। तव तो आर्त बंधू ऐकोनि वचन । मनाचेनि मने वेगू केला ।।१०।। तव गडगडित कूप उदके वोसंडला । कल्पांती खवळला सिंधू जैसा ।।११।। कृपेचा वोरसु होता देवा पोटी । तेचि करी गोष्टी रुक्माईसी ।।२।।**

नामदेव ९३० आ, ९२१ स, १९८ पा. २२१ गोरखपूर,

नामदेवरायांचा धावा आईसाहेबाना ऐकू आला. त्यानी भगवंताना

## नामदेवरायानी वाळवंटातील विहिरीचे पाणी वर आणले.

सांगितले की नामदेवरायाना तहान लागली असून, तुमचा धावा करत आहेत. तरी तुम्ही लवकर तेथे जाऊन त्यांचा सांभाळ करावा. आर्त बंधू असलेल्या भगवंतानी आईसाहेबांचे वचन ऐकल्या बरोबर मनाच्या वेगाने तेथे गेले. भक्तिचे सामर्थ किती अपरंपार आहे, याचे प्रत्यंतर दाखवण्या करता भगवंतानी चमत्कार केला. त्या विहिरीचे पाणी तुडुंब भरवून खळखळून वर आणले व ते ओसंडून वाहू लागले. जसा काय महासागर खवळल्यावर वेगाने त्याच्या लाटा वाहू लागतात, त्या प्रमाणे पाणी वेगात वाहू लागले. मग नामदेवराय पोट भरून पाणी प्याले. ज्ञानोबाराय म्हणाले,

**ज्ञानदेव म्हणे झाले अभिन्नव । कैसा ऋणिया देव केला येणे ।।१२।।**
**कृपेचा वोरसु होता देवा पोटी । तेचि करी गोष्टी रुक्माईसी ।।२।।**

नामदेव ९३० आ, ९२१ स, १९८ पा. २२१ गोरखपूर,

ज्ञानोबाराय म्हणाले, केवढी नवलाव्याची गोष्ट घडली. जगाच्या दृष्टीने हे फार अभिन्नव आहे. या नामदेवाने देव आपल्या ऋणी करून ठेवला आहे. हा म्हणेल तसा हा देव वागतो. देव सतत याच्याजवळ असतो.

**केला ऋणी नारायण । नव्हे क्षण वेगळा ।।२।।**

तुकोबा १९११ व, २०२७ जोग, २१३८ घुले, २८००-२ जोशी, ८८२ मा, १२८० प. मा.

ज्ञानोबारायानी नामदेवरायांचा गौरव खालील शब्दात केला आहे,

**योगी परम ध्यानी बैसलिया जाणा । काही या रे मना विश्रांती नुपजे ।।१।। तुजविण दुसरे काहीच नाठवे । लागली तुझी सवे विष्णूदासा ।।२।। कवण कुळी तू जन्मलासी नामा । केशव परमात्मा तुज जवळी ।।३।। धेनु वसे वनी वत्स असे घरी । चित्त तयावरी ठेवुनि चरे ।।४।। ते तया देखोनि संतोषली मनी । तैसा तुझ्या गुणी वोल्हावलो ।।५।।**

---

**नामदेवरायानी वाळवंटातील विहिरीचे पाणी वर आणले.**

**तीर्थयात्रे जाणे न लगे काही करणे । ऐकोनि तुझे गाणे सुखरूप ।।६।। वेडावल्या श्रुति स्मृती आणि पुराणे । योगियांची ध्याने विसर्जिली ।।७।। तुझे प्रेम सांडावे आणि मने कोठे जावे । जावोनिया पहावे काय कोठे ।।८।। समाधी सोहळा लयलक्ष वैराग्य । आम्हालागी भाग्य आणियेले ।।९।। ऋषी गण गंधर्व ब्रह्मादिक सर्व । लक्षिताती ठावो अरुपाचा ।।१०।। तो तुवा आम्हा सन्मुख उभा केला । चरणाशी लागला ज्ञानदेव ।।११।।**

नामदेव ९३० आ, ९२१ स, १९८ पा. २२२ गोरखपूर,

ज्ञानोबाराय म्हणाले, योगी ध्यान लावून बसतो, परंतु त्याच्या मनाला तेथे विश्रांती मिळतेच असे नाही. पण ती विश्रांती तुझ्या संगतीत मिळते. तुझ्या संगतीची मला गोडी लागली आहे. तुझ्या शिवाय मला दुसरे काही आठवतच नाही. नामदेवा तू कोणत्या कुळात जन्माला आलास, ते कूळ धन्य आहे. कारण केशव परमात्मा हा सतत तुझ्या जवळ आहे. तू जगात कोठेही असलास, तरी तो परमात्मा अखंड तुझ्या जवळ आहे. आणि तुझे चित्त हे त्या भगवंताच्या चरणी स्थिर आहे. ज्या प्रमाणे धेनु ही वनात चरत असते, पण तिचे चित्त हे आपल्या वत्सावर असते. तसा तू कोठेही असलास, तरी तुझे सर्व लक्ष देवाकडेच असते. ते पाहून माझ्या मनाला मोठा संतोष वाटला. या तुझ्या गुणा मुळे मी अगदी भारावून गेलो. तीर्थयात्रेला जाण्याचे काहीच कारण नाही, कारण तीर्थयात्रेला जाऊन जे फळ मिळते, ते तुझे भगवंता विषयीचे गाणे ऐकले, की तेच फळ अगदी घर बसल्या मिळते. तुझ्या प्रेमभक्ती पुढे श्रुति, स्मृति, पुराणे वगैरे वेडी झाली. योग्यानी जे भगवतस्वरुप ध्यान लाऊन पहावयाचे, त्याची आता गरजच उरली नाही. ते ध्यान सहजच आता दृष्टीला पडते. तुझे भक्तीप्रेम सोडून देऊन दुसरे काही पहावे अथवा दुसरीकडे जावे असे आता वाटतच नाही. समाधी सोहळा

अथवा तपा करता लय, लक्ष, वैराग्य यानी जे प्राप्त करुन घ्यावयाचे, ते भक्तिने कसे प्राप्त करुन घ्यावयाचे ते भाग्य, तू आमच्याकरता सहज रीतीने आणले आहेस. ऋषीगण, गंधर्व, ब्रह्मदेवादीक सर्व देव निर्गुण निराकार अशा अरुपाच्या ठिकाणी लक्ष ठेऊन असतात. तो परमात्मा तू आमच्या पुढे सगुण साकार स्वरुपात आणून उभा केला आहेस.

या नंतर ज्ञानोबाराय व नामदेवराय पहिली पदयात्रा करून महाराष्ट्रात शके १२१८ च्या दरम्यान परत आले. नंतर ज्ञानोबा, सोपानदेव, चांगदेव, मुक्ताई व निवृत्तीनाथानी समाधी घेतली.

नामदेवरायाना करमेना. शके १२२० च्या दरम्यान नामदेवराय दक्षिण भारतात दुसरी पद यात्रा करून परत आले. शके १२२१ च्या दरम्यान नामदेवराय परत उत्तर भारत पदयात्रेला गेले.

## ३१) परसा भागवताचे नामदेवरायासी अहंकार युक्त भाषण व तो वृत्तांत स्वतःच्या पत्नीस सांगणे.

परसा भागवत हा रूक्मिणी आई साहेबांचा उपासक होता. तो निष्ठा पूर्वक आई साहेबांची भक्ती करीत होता. त्याला आईसाहेब प्रसन्न झाल्या.

**आदिमाया जाहली ती प्रसन्न । दिला त्या कारणे परीस एक ।।३।। लोहाशी लावूनि सुवर्ण तो करी । सुखे हा संसारी राहतसे ।।४।। तेचि गावी असे परसा भागवत । करितसे भक्ती रुक्मिणीचा ।।२।।**

परसा ५ आ, ११ स, ४९७ गोरखपूर, ४६५ पा,

परसाने तो परीस काळजी पूर्वक जपून आपल्या देव्हाऱ्यात ठेवला. परसा रोज थोडे थोडे लोखंड परिसाला लावीत असे. त्या

## ३१) परसा भागवताचे अहंकार युक्त भाषण

लोखंडाचे सोने होत असे. ते तो बाजारात विकून पैसे मिळवीत असे. अशा प्रकारे तो आपला प्रपंच मोठ्या थाटात चालवीत असे.

परसा भागवत नामदेवांच्या समकालीन होता. परंतु तो नामदेवांचा नेहमी द्वेष करीत असे. परसा भागवत एकदा नामदेवरायाना म्हणाले,

**तुवा कोठवरी काय देखिले । नाही वेद शास्त्र म्हणितले । एक तुजचि जाणितले । इतुके जाले सांगावया ।।३।। परसा वदे नामयासी । तुझे पूर्वज माझे चरणा पाशी । जरी तू हरिदास जालासी । तरी याती हीनची ।।२।।**

परसा भागवत १ आ, ७ स, ४९३ गोरखपूर, ४६१ पा,

अरे नामदेवा, जरी तू हरिदास झालास तरी तुझी जात हलकी आहे. तुझे पूर्वज आम्हा ब्राह्मणांच्या चरणा पाशीच होते. तू काही वेद शास्त्र जाणत नाहीस. श्रुती स्मृतीचे ज्ञान तुला नाही. तू जरी विष्णूची सेवा करीत असलास, तरी तू माझा सेवकच आहेस.

यावर नामदेवराय म्हणाले की आज माझ्या मनाला संतोष झाला. माझ्या पूर्वजा विषयीचे शब्द ऐकले. माझे ह्रदय आनंदाने भरून गेले. तुमच्या चरणाचा महिमा अगाध आहे. त्याची जाणीव माझ्या पूर्वजाना समजली होती. ते तुमची चरण सेवा करीत होते. हे तुमचे बोलणे ऐकून मला फार समाधान झाले. एवढे दिवस मी विचार करीत होतो, पण मला हे नीट समजले नव्हते. ते तुम्ही आता मला सांगितल्यावर समजले. तुम्ही माझ्या पूर्वजाना आपल्या चरणा जवळ ठाव दिलेला होता. माझेच काय कर्म आडवे आले ते समजत नाही. तुम्ही मला का दूर लोटलेत. त्यामुळे मी तुमच्या चरण तीर्थाना पारखा झालो आहे. आता तुमचे चरण तीर्थ मला द्यावे. असे म्हणून नामदेवराय परसोबाच्या पाया पडले. हे पाहून परसोबाला फार गर्व निर्माण झाला. आज नामदेवराया सारखा श्रेष्ठ भक्त माझ्या पाया पडला. परसा घरी आला व आपल्या

## ३१) परसा भागवताचे अहंकार युक्त भाषण

बायकोला सांगू लागला,

**परसा सांगे स्त्रिये पाशी । अवो अपूर्व वर्तले पंढरीशी । मज आणि नामयासी । जाला विवाद परस्परे ।।१।। परसा सांगे आपुला महिमा । आजि फजित केला नामा । पुढती शरण आला आम्हा । सकळ जना देखता ।।२।। आम्ही तयाशी निर्भत्सिले । परी ते आमच्या पायी लागले । काकुळती शरण आले । मग सोडिले तयाते ।।३।। आम्ही साक्षात विष्णुदास । त्याने म्हणवावे विप्रदास । ऐसे असावे प्रत्यक्ष । विष्णुदास का म्हणवी ।।४।। तू म्हणसी एक नामा । येर वाउगीच उपमा । त्या पाशी असता परमात्मा । तरी का आम्हा शरण येता ।।५।। खालील पायरी तयाची जाण । वरी आम्हाशी महिमान । आमुच्या ह्रदयी परमात्मा आपण । सदा जागृत वसतसे ।।६।। धन्य माझे कूळ गोत्र । नाम पावलो भागवत । केलिया पुण्या नाही मात । आणि वेदांत मी जाणे ।।७।। याती हीन विष्णुदास म्हणविती । तेणे ते नर भय पावती । तयासी न चुके पुनरावृत्ती । विष्णुदास म्हणे परसा ।।८।।**

परसा ३ आ, ९ स, ४९५ गोरखपूर, ४६३ पा,

परसा भागवत म्हणाले की मी नामदेवाशी आज वाद विवाद केला. त्याची मी निर्भत्सना केली. तो फजित झाला. शेवटी तो मला शरण आला. त्याने माझे पाय धरले. मग मी त्याला सोडले. तू उगीचच त्या नामदेवाला फार मोठा समजत असतेस. तो खालच्या पायरीचा आहे. आमच्या ह्रदयात परमात्मा असतो. तो सतत जागृत असतो. माझे कूळगोत्र श्रेष्ठ आहे. मी वेदात जाणतो. मी देवाची कथा सांगत असतो. म्हणून माझे नाव भागवत असे प्रसिद्ध झाले आहे. हीन यातीचे लोक विष्णूची सेवा करतात. त्याना विष्णूदास म्हणतात. पण ते खरे विप्रदास असतात. त्यांची योग्यता माझ्या बरोबरीला येऊ शकत नाही. असे

## ३२) परसाचे रामायण वाचन व लंका दर्शन

परसाने आपल्या पत्नीला मोठ्या अहंकाराने सांगितले.

## ३२) परसाचे रामायण वाचन व लंका दर्शन व नामदेवांचा प्रश्न लंका दर्शन व नामदेवांचा परसाना उपदेश.

**नित्य महाद्वारी वाची रामायण । करिती श्रवण साधू संत ।।५।। तेचि गावी असे परसा भागवत । करितसे भक्ती रुक्मिणीचा ।।२।।**
परसा ५ आ, ११ स, ४९७ गोरखपूर, ४६५ पा,

परसा भागवत हे रोज देवळाच्या महाद्वारात रामायण सांगत असत. नामदेवराय भजन करून आले की रामायण ऐकीत बसत. एकदा लंकेतील माहिती परसोबा सांगत होते. नामदेवरायानी परसाला विचारले की लंकेची रचना कशी आहे. कोण कोण कोणत्या ठिकाणी रहात होते. परसोबाना ते सांगता येईना. तेव्हा ते म्हणाले की शास्त्र पाहून ते सांगतो. या प्रमाणे दोघांचा संवाद ऐकून सर्व श्रोते संत आश्चर्य करू लागले.

परसा भागवताने आईसाहेबाना सांगितले की नामदेव माझा अपमान करतो. मला तो लंकेची रचना विचारतो आहे. तेव्हा माझी तुला विनंती आहे की तू मला लंकेची रचना दाखव. मी लंकेची रचना पाहून येईन. मग ती नामदेवाला सांगेन. तेव्हा कृपा करून मला लंका दाखवा.
**परसोबा सांगत रुक्मिणी लागून । करितो अपमान नामा माझा ।।११।। तेचि गावी असे परसा भागवत । करितसे भक्ती रुक्मिणीचा ।।२।।**
परसा ५ आ, ११ स, ४९७ गोरखपूर, ४६५ पा,

आईसाहेबानी परसाला ठीक आहे म्हटले. त्याला आपल्या हातावर बसावयास सांगितले. त्याला लंकेमध्ये नेले. लंका पाहून यावयास सांगितले.

---

## ३२-१ लंकेत नामदेवाना कीर्तन करताना परसाने पाहिले

परसा भागवतास आनंद झाला. तो हातावरून उतरला. सर्व लंका पाहू लागला. लंका हे ठिकाण अत्यंत रम्य होते. त्याची रचनाही अपूर्व होती. कोठे देवाचा नामघोष चालू होता. कोठे वेद पारायण चालू होते. सर्वत्र आनंदी आनंद होता. लंका पहात पहात परसा बिभीषणाच्या सदनात आला,

**पाहातो तो नामा उभा कीर्तनास । गुण गात असे देवाजीचे ।।२४।। शरण जे गेले माझ्या पंढरीनाथा । नाहीं भय चिंता त्यास काही ।।२५।। तेचि गावी असे परसा भागवत । करितसे भक्ती रुक्मिणीचा ।।२।।**

परसा ५ आ, ११ स, ४९७ गोरखपूर, ४६५ पा,

त्या ठिकाणी बिभीषणाच्या सदनामध्ये नामदेवराय कीर्तनास उभे होते. ते देवाचे गुण गात होते. जे माझ्या पंढरानाथाला शरण गेले, त्यांच्या जीवनाचे सार्थक होते. त्याना कोणत्याही गोष्टीची कमतरता पडत नाही. त्याना सर्व काही मिळते. त्याना कोणत्याही गोष्टीचे भय रहात नाही. मरणाची भीती सर्वाना भेडसावत असते. मरणाची भीती सर्वात जास्त असते. पण देवाला शरण गेल्यावर ती भीतीही रहात नाही. तसेच कोणत्याही प्रकारची चिंता रहात नाही. कोणत्याही प्रकारचा संशय शिल्लक रहात नाही. भगवंत म्हणतात,

**मी ह्रदयी प्रगटल्या पुढे । भक्ताशी अलभ्य लाभ जोडे । फिटे संसाराचे साकडे । ऐक पा फाडोवाडे सांगेन ।।** नाथ भागवत २०-३७३

**भिद्यते ह्रदय ग्रंथीः, छिद्यन्ते सर्व संशयाः । क्षीयंते चास्य कर्माणी, मयि दृष्टेखिलात्मनि ।।** श्रीमत भागवत ११-२०-३०

भगवंत उध्दवाला सांगतात. अखिल प्राणी मात्रांचा आत्मा मी आहे. माझे यथार्थ दर्शन झाल्याने ह्रदयातील सूक्ष्म अहंकार बंध तुटून जातो. भक्ताचे सर्व संशय दूर होतात. त्याचे सर्व प्रारब्ध संपते. त्याची

---

## ३२-२ परसने दुसरे दिवशा नामदेवाना लंकेची रचना सांगितली

सर्व कर्मे नाहीसी होतात. कर्मे संपल्यामुळे, त्याला त्या कर्माचे फळ भोगावे लागत नाही.

**काय नोहे केले । एका चिंतीता विठ्ठले ।।१।। सकळ साधनाचे सार । भवसिंधु उतरी पार ।।२।। योग याग तपे । केली तयाने अमूपे ।।३।। तुका म्हणे जपा । मंत्र त्रि अक्षरी सोपा ।।४।।**

तुकोबा २२३३ व, ३८८ जोग, २४६२ घुले, ७७२-१ जोशी, ९७९ प. मा.

परसा भागवताने नामदेवरायाना तेथे कीर्तन करीत असलेले पाहिले. थोडे ऐकले. त्याना अत्यंत आश्चर्य वाटले. नामदेव येथे कसा याचे कोडे पडले. तेथे कोणाला न भेटता परसा भागवत परत फिरले. आईसाहेबा जवळ आले. आईसाहेबानी परसाला हातावर बसवले. परत पंढरीत आणून सोडले.

दुसरे दिवशी परसाने नामदेवाना लंकेची रचना सांगितली. कोण कोणत्या ठिकाणी रहातात ते सांगितले. नामदेवरायानी परसाला काही प्रत्युत्तर केले नाही. नामदेवराय म्हणाले की अरे, परसोबा, तू एवढा अहंकार का धरला आहेस? मनुष्याचे भाग्य उदयाला येत असते. परंतु काही लोकाना त्याचा लाभ घेता येत नाही. तसे तुझे झाले आहे. तुझ्या हातात चिंतामणी आला होता. पण त्याचा उपयोग कसा करावयाचा हे तुला न कळल्यामुळे, तू तो चिंतामणी गोफणीला लावून भिरकावून दिलास. कल्पवृक्षाचे झाड तुझ्या अंगणात उगवलेले होते. ते न समजल्यामुळे तू उपडून टाकलेस. तुझ्या हातात अमृताचा घट आलेला होता, पण तू तो उलटून टाकलास. हे तुझे केवढे मोठे दुर्भाग्य आहे.

**तैसा महाराज तोचि बिभीषण । का नाही नमन केले त्याशी ।।३४।।**
**सदोदित ज्याचे ह्रदयी रामचंद्र । दुजा का विचार धरिला तेथे ।।३५।।**
**अहंकारे मोठे मोठे नाडलेती । सांगसी त्या युक्ती शास्त्राच्या ते ।।३६।।**
**तोचि अहंकार धरिलासी अजून । होई आता लीन संतापायी ।।३७।।**

---

## ३२-३ परसाने आईसाहेबाना देवाची भेट घडवून द्या असे सांगितले

**तेणे हा झडेल अंतरीचा मळ । दिसेल सकळ ब्रह्मरुप ।।३८।। समजला तेव्हा परसोबा तो मनी । न कळे करणी नामा तुझी ।।३९।। गळोनिया गेला त्याचा अभिमान । जाला तो लीन संतापायी ।।४०।। संताची करणी असे अघटित । करी दंडवत नामदेवा ।।४१।। तेचि गावी असे परसा भागवत । करितसे भक्ती रुक्मिणीची ।।२।।**

परसा भागवत ५ आ, ११ स, ४९७ गोरखपूर, ४६५ पा,

नामदेवरायानी परसाला समजावून सांगितले. अहंकारामुळे सर्व जण नाडले जातात. तू शास्त्राच्या युक्त्या सांगतोस, पण स्वतः मात्र अहंकार धरून बसला आहेस. अहंकार सोड आणि संतांना शरण जा. मग तुझ्या अंतरातला मळ झडून जाईल. तुला सर्व जगत ब्रह्मरूप दिसेल. परसोबाच्या लक्षात सर्व गोष्टी आल्या. त्याचा अभिमान गळून गेला. तो शरमिंदा झाला. त्याला नामदेवांचा अधिकार समजला. तो नामदेवाच्या पाया पडला. परंतु त्याना सर्वभावानी शरण गेला नाही.

त्याला वाटू लागले की नामदेव हे पंढरीरायाचे भक्त आहेत. त्यामुळे त्यांचा अधिकार मोठा आहे. त्यांचे सामर्थ्य जास्त आहे. आपली व पंढरीरायाची भेट होणे आवश्यक आहे. आपण आईसाहेबाना तसे सांगू. देवाची भेट घेऊ. तशी विनंती त्याने आई साहेबाना केली.

**माते पांडुरंगी मज भेट करावी । धरीन मी जीवी चरण त्याचे ।।११।। नावे वेगळाली इतकेचि जाणा । परी काय केले येणे सांग माते ।।२।।**

परसा भागवत ६ आ, १२ स, ४९८ गोरखपूर, ४६६ पा,

परसा भागवताने आईसाहेबाना देवाची भेट घडवून आणा अशी विनंती केली. परंतु आईसाहेबानी परसोबाला सांगितले की हे माझ्या हातात नाही. तो अधिकार देवानी मला दिलेला नाही. देवांची आज्ञा होईपर्यंत मला तुला देवाना भेटवता येत नाही. देव माझ्यावर रागावतील. तू नामदेवाला शरण जा.

---

## ३२-४ संतांच्या कृपे शिवाय देव प्राप्त होत नाही

**तू नाम्या विनवी निरभिमान होई । तो दाखविल सोई देवाजीची ।।१५।। नावे वेगळाली इतकेचि जाणा । परी काय केले येणे सांग माते ।।२।।**
परसा भागवत ६ आ, १२ स, ४९८ गोरखपूर, ४६६ पा,

तू तुझा सर्व अभिमान सोड. नामदेवाना शरण जा. तोच तुला देवाची भेट घडवेल. हा अधिकार फक्त संतांना आहे. कारण तेच देवाचे लाडके लडिवाळ असतात. देव त्यांच्या आज्ञेत रहातो. ते म्हणतील त्यांचा उद्धार करतो. त्यामुळे संतांच्या शिवाय तरणोपाव नाही.

## ३२-४ संतांच्या कृपेशिवाय देव प्राप्त हेत नाही.

**संताचे संगती मनोमार्ग गती । आकळावा श्रीपती येणे पंथे ।।१।। हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा । पुण्याची गणना कोण करी ।।धृ।।**
ज्ञानोबा ५५ जोशी, पांगूळ, ८६० प. मा.
**तया परी श्रीगुरु । करिती जै अंगीकारू । ते होऊनि ठाके संसारू । मोक्षमय अवघा ।।** ज्ञानेश्वरी १५-२४१

श्रीभगवानुवाच -

**न रोधयति मां योगो, न सांख्यं धर्म एवच । न स्वाध्यायः तपः त्यागो, न इष्टापूर्तम् न दक्षिणा ।।** श्रीमद भागवत ११-१२-१
**व्रतानि यज्ञः छंदांसि, तीर्थानि नियमा यमाः । यथाझवन् रूधे सत्संगः, सर्व संगापहो हि माम् ।।२।।** श्रीमद भागवत ११-१२-२

श्री भगवान म्हणाले, चित्तवृत्ति निरोध पूर्वक केलेला योग मला वश करू शकत नाही. तत्त्वातत्त्व विवेक, त्याच प्रमाणे अनुष्ठान पूर्वक आचरलेला श्रुति स्मृती प्रणीत धर्म, नित्य वेदाचे अध्ययन, शरीराला व मानाला श्रमवून केलेली अनुष्ठाने, कर्माचा त्याग, अग्निहोत्रादी वैदिक

## ३२-४ संतांच्या कृपे शिवाय देव प्राप्त होत नाही

आचार, किंवा दान, ह्यापैकी कोणतेही साधन, मला वश करू शकत नाही.

नाना प्रकारची व्रते, यज्ञ यागादी साधने, मंत्र पठण, तीर्थ यात्रा, त्याच प्रमाणे यम नियमही मला वश करू शकत नाहीत. या सर्वा पेक्षा सर्व संगाचा, आसक्तीचा नाश करणारी संतांची संगती मात्र मला वश करू शकते.

**संतावीण प्राप्ती नाही । ऐसी वेद देती ग्वाही ।।३।। तेणे साधती साधने । तुटती भवाची बंधने ।।२।।**

नाथ

**संत संगती वेगळे जाण । तत्काळ पावावया माझे स्थान । आणिक नाहीच साधन । सत्य जाण उध्दवा ।।** नाथ भागवत १२-४५

**उपास्ति वरि राबतिया । उपाय फळी येती मोडोनिया । वरीवंडले जयाचिया । अनुज्ञा का ।।** अमृतानुभव २-१७

ज्या शिष्याने श्रीगुरूंची इतकी दृढतर सेवा केली आहे, की आपला जीवभाव त्याने श्रीगुरूंच्या आज्ञेवरून ओवाळून टाकला आहे. अशा शिष्याला, त्याने केलेल्या अध्ययनादी साधनांचे फळ अगदी भरघोस मिळते.

ज्या शिष्याने श्रीगुरूंच्या आज्ञेवरून आपल्या जिवाची कुरवंडी केली आहे, त्याचेच सकल उपाय सफल होतात.

**जयाचा जिठीचा वसंतु । जंव न रिघे निगम वना आतु । तव आपुलिये फळी हातु । न घेपतीही ।।** अमृतानुभव २-१८

जसा वनात वसंत ऋतूचा प्रवेश झाल्याशिवाय, त्या वनातील झाडाना फळे येत नाहीत. त्या प्रमाणे श्रीगुरूंच्या कृपादृष्टी शिवाय, शिष्याने केलेल्या श्रवण, मनन, निदिध्यासनादी साधनाला, आत्म प्राप्ती रूप फळ मिळत नाही.

---

**अवघा भार वाटे देवा । संत सेवा न घडता ।।१।। कसोटी हे असे हाती । सत्य भूती भगवंत ।।२।।**

तुकोबा २१४८ व, २३१८ जोग, २३८० घुले, जोशी,

**आघवियाचि दैवा । जन्म भूमी हे सेवा । जे ब्रह्म करी जीवा । शोच्याते ।।** ज्ञानेश्वरी१३-३६९

ही गुरू सेवा सर्व भाग्यांची उत्पन्न होण्याची जमीन आहे. व जी सेवा शोकग्रस्त जिवाला ब्रह्म करते.

अविद्येमुळे शोकग्रस्त असा जो जीव, त्याची अविद्या निवृत्त करून, सकल दुःख निवृत्ती व परमानंद स्वरूप जो परमात्मा, त्याची प्राप्ती सद्‌गुरु करतात.

**गुरू घाली ज्ञानांजन । गुरू दाखवी निज धन । गुरू सौभाग्य देऊन । साधू बोध नांदवी ।।५।। गुरू हा सुखाचा सागरू । गुरू हा प्रेमाचा आगरू । गुरू हा धैर्याचा डोंगरू । कदा काळी डळमळीना ।।२।।**

ज्ञानोबा जोशी, पांगूळ, प. मा.

## ३३) परसा भागवत नामदेवाना शरण गेले

म्हणून आईसाहेब परसोबाला म्हणाल्या की तू नामदेवाना शरण जा. तो तुला देवाची जोड करून देईल. हे ऐकून शेवटी परसा भागवत नामदेवरायाना शरण गेला. व म्हणाला,

**मागे होते ते अवघेचि विसरलो । लोटांगणी आलो नामयासी ।।१६।। परसा म्हणे नाम्या तुझे बरवे गाणे । जैसे का नाणे टांकसाळीचे ।।१७।। नावे वेगळाली इतकेचि जाणा । परी काय केले येणे सांग माते ।।२।।**

---

## ३४) परसा करिता नामदेवानी वाळवंट परीस केले

परसा भागवत ६ आ, १२ स, ४९८ गोरखपूर, ४६६ पा,

परसा भागवत नामदेवरायाना म्हणाले की मी तुला आता सर्व भावानी शरण येत आहे. मागील सर्व गोष्टी मी आता विसरून गेलो आहे. तुला मी लोटांगण घालीत आहे. मला देवाची जोड करून दे. अशा प्रकारे परसा भागवत नामदेवरायाना शरण गेले. ते नामदेवांचे शिष्य बनले. मग नामदेरायानी त्याना देवाची जोड करून दिली.

## ३४) परसा करिता नामदेवानी वाळवंट परीस केले

**नामयाची कांता धुणे धुया गेली । परसा भागवताची आली कन्या तेथे ।।१।। उभयता बैसोनि केलासे एकांत । आपदा आमुची होत संसारात ।।२।। तुम्हाशी तो देवे द्रव्य दिले फार । वस्त्र अलंकार शोभताती ।।३। एकाजनार्दनी बोलोनिया गोठी । होत असे कष्टी राजाई ते ।।४।।**

नाथ ३६१८,

एकदा नामदेवांची पत्नी राजाई कपडे धुण्यासाठी चंद्रभागेवर आली होती. त्याच वेळी परसा भागवताची मुलगी नदीवर आली होती. एकमेकींची वास्तपुस्त केली. बोलता बोलता दोघींच्या प्रपंचाचा विषय निघाला. राजाईने सांगितले की आमचा नवरा लक्ष देऊन उद्योग करत नाही. त्यामुळे आमची मिळकत फार कमी आहे. संसारात फार आबदा होते. सकाळी खावयास असले तर रात्री काही नसते. आमची फारच आभाळ होते. राजाईची परिस्थिती पाहून परसाच्या मुलीस फारच वाईट वाटले. ती म्हणाली की नामदेवरायावर भगवंताचे एवढे प्रेम आहे, तर ते देवाजवळ काही मागत का नाहीत? मागितले तर काही कमी पडणार नाही. आमच्या बापाने बघ, आईसाहेबाजवळून परीस मागून घेतला.

## ३४) परसा करिता नामदेवानी वाळवंट परीस केले

आम्ही रोज त्याला थोडे लोखंड लावतो. त्याचे सोने होते. मग ते बाजारात विकून पैसे मिळवतो. त्यामुळे आमचा संसार अगदी सुखात चालला आहे.

**येऊनिया माते पाशी सांगे वृत्तांत । नामयाची होत आपदा घरी ।।१।।**
**आपुला परीस देऊ क्षणभरी । आपदा ते दुरी करू त्यांची ।।२।।**
**एकाजनार्दनी करुनि विचार । परीस तो साचार घेऊनि आली ।।३।।**

नाथ ३६१९ आ,

नंतर परसाची मुलगी घरी आली. आपल्या आईला म्हणाली की नामदेवाच्या घरची परिस्थिती फार बिकट आहे. त्याना आपण एक दिवस परीस देऊ. ते लोखंडाचे सोने करतील. ते विकून पैसे मिळवतील. आई ठीक आहे म्हणाली.

**येऊनिया घरा बोले राजाईस । या परीसे सुवर्णाशी करी आता ।।१।।**
**आजचिये दिन ठेवी आपुले घरी । आपदा ती हरी प्रपंचाची ।।२।।**
**सरलिया काम देई मजलागी । म्हणोनिया वेगे गृहा आली ।।३।।**
**एकाजनार्दनी झाली ऐसी मात । नामयाशी श्रुत केले नाही ।।४।।**

नाथ ३६२० आ,

दुसऱ्या दिवशी परसा भागवत पूजा करून बाहेर गेला. कमळजाने परीस आणून राजाईस दिला. आजच्या दिवस तुमच्याकडे ठेवून घ्या. वापरा आणि उद्या परत करा असे सांगून गेली. राजाईने त्यास थोडे लोखंड लावून ते सोने बाजारात विकले. धान्य घेऊन घरी आली. ती तो परीस परत द्यावयाचा विसरून गेली. ती स्वयंपाक करू लागली. नामदेवराय घरी आले, तर घरातून भरपूर धूर येताना दिसला. आत आले तर तेथे बरेच घर सामान, धान्य दिसले.

**येईनिया घरा नामदेव पाहे । आजी दिसताहे विपरीत ।।१।। राजाई तो पुढे येऊनिया बोले । देवे नवल केले आपुले घरी ।।२।। जाता**

---

## ३४) परसा करिता नामदेवानी वाळवंट परीस केले

**चंद्रभागे परीस सापडला । आपुला तो गेला दैन्यकाळ ।।३।। एका जनार्दनी ऐकोनिया मात । क्रोधे पै संतप्त मनी नामा ।।४।।**

नाथ ३६२१ आ,

नामदेवरायानी राजाईकडे चौकशी केली. राजाई म्हणाली की आज मोठे विपरीत घडले. मी चंद्रभागेला जात होते. मला वाळवंटात एक परीस सापडला. तो घेऊन घरी आले. त्याला थोडे लोखंड लावले. त्याचे सोने झाले. ते मी बाजारात विकून धान्य आणले. आता आपले दैन्य दारिद्रय नाहीसे झाले.

**राजाईस तेव्हा म्हणतसे नामा । दैन्य काळ आम्हा नाही नाही ।।१।।**
**आम्ही हरिदास कुबेर भांडारी । संपदा ती थोरी घरी वसे ।।२।।**
**कृपावंते मज नाही उपेक्षिले । आम्ही का वहिले दैन्य वाणे ।।३।।**
**एकाजनार्दनी बोलोनिया मात । गेला राउळात तेव्हा नामा ।।४।।**

नाथ ३६२२ आ,

ते ऐकून नामदेवरायाना राग आला. पण तो त्यानी दाबून ठेवला. ते म्हणाले की आम्हाला दैन्य, दारिद्रय काही नाही. आमच्याकडे कुबेराची संपत्ती आहे. कोणत्याही गोष्टीची उणीव आमच्याकडे नाही. मी आता राऊळात जात आहे. तो परीस कसला
असतो ते दाखव.

**जाताना राउळी परीस मागे नामा । पाहू द्या तो आम्हा कैसा आहे ।।१। राजाईने त्वरे आणुनिया दिला । नाम्याने तो घेतला सव्य करी ।।२।। जाऊनि चंद्रभागे टाकूनिया दिला । नामदेव आला राउळासी ।।३।। एकाजनार्दनी मस्तक चरणी । ठेवूनि विनवणी करी नामा ।।४।।**

नाथ ३६२३ आ,

---

## ३४) परसा करिता नामदेवानी वाळवंट परीस केले

राजाईने तो परीस आणून नामदेरायाकडे दिला. नामदेवरायानी तो उजव्या हातात घेतला आणि बाहेर पडले. जाताना तो परीस चंद्रभागेमध्ये टाकून दिला. देवा जवळ आले आणि म्हणाले,

**आमुचिये घरी । परीस पाहिला श्रीहरी ।।१।। आवडीने नामा सांगे । पांडुरंग हासू लागे ।।२।। आमुचा दैन्य काळ । गेला म्हणती सकळ ।।३।। एकाजनार्दनी मात । नामा देवाशी सांगत ।।४।।**

नाथ ३६२४ आ,

देवा, मी आज आमच्या घरी परीस पाहिला. देवाला हासू आले. नामदेवराय म्हणाले की देवा, आमचा दैन्य काळ गेला असे लोक म्हणतात.

**देव म्हणे नाम्या परीस कोठे आहे । पाहू लवलाहे दावी मज ।।१।। हासूनिया नामा पांडुरंगा सांगे । परीस चंद्रभागे टाकियेला ।।२।। ऐसे प्रेम भरीत बोलताती दोघे । तो राजाई ती मागे त्वरे आली ।।३।। घालूनि दंडवत देवाशी आदरे । नामयासी उत्तरे बोलतसे ।।४।। एकाजनार्दनी मागावया परीस । परीसा घरास त्वरित आला ।।५।।**

नाथ ३६२५ आ,

देव म्हणाले, नामदेवा, तो परीस कोठे आहे. मला दाखव बघू. नामदेवरायानी हासून देवाला सांगितले की तो परीस मी चंद्रभागेत टाकला. इकडे परसाभागवत घरी आले. त्याना जागेवर परीस दिसला नाही. त्यानी बायको जवळ चौकशी केली. तिने घडलेली हकीगत त्याना सांगितली. परसा भागवत बायकोवर एकदम खेकसला. आताच्या आत्ता जा व परीस घेऊन ये असे तिला म्हणाला.

**येऊनिया परीसा बोले राजाईसी । आमुचा परीस मजसी देई बाई ।।१।। राजाई तव म्हणे घेऊनि नामदेवे । गेले ते स्वभावे राऊळाशी ।।२।। तुम्ही बसा घरी मी जाते राऊळी । म्हणोनिया वेगी आली**

## ३४) परसा करिता नामदेवानी वाळवंट परीस केले

**राऊळाशी ।।३।। घालुनिया नामा दंडवत देवा । सांगितला भाव सर्व मनींचा ।।४।। एकाजनार्दनी नामदेव बोले । परीसा टाकियेले चंद्रभागे ।।५।।**

नाथ ३६२६ आ,

ती राजाईकडे आली. तिच्या जवळ परीस मागू लागली. राजाईने सांगितले की तो परीस नामदेव परीस घेऊन गेलेत. मी जाऊन घेऊन येते.

**राजाई येऊनिया घरी । नमस्कार करी नामदेवा ।।१।। परीस देणे झडकरी । परीसा उभा असे द्वारी ।।२।। पुंडलीकाशी नमस्कार । केला जयजयकार नाम घोष ।।३।। एकाजनार्दनी स्नान । नामा करितसे जाण ।।४।।** नाथ ३६२७ आ,

मग राजाई तेथे आली. ती नामदेवरायाकडे परीस मागू लागली. ती म्हणाली की तो परीस परसा भागवत यांचा होता. ते आता परीस मागण्यास घरी आलेले आहेत. तरी तो लवकर द्या. नामदेवराय म्हणाले चल घरी जाऊ.

वाट पाहून परसा भागवत पण तेथे आला. नामदेवरायाना तो परीस मागू लागला. नामदेवराय म्हणाले की अरे, आपल्या सारख्याला परीस काय करावयाचा? मी तो नदीत फेकून दिला.

परंतु परसा भागवत ऐकेना. नदीवर गर्दी जमली. वादविवाद सुरू झाला. शेवटी नामदेवरायानी नदीत बुडी मारली. नदीतून ओंजळ भरून वाळूचे गोटे घेऊन ते वर आले. ते परसा भागवताला म्हणाले की यातील तुझा परीस घेऊन जा. सर्व लोक हसू लागले. नामदेवराय वाळूला परीस म्हणतात. असे कधी होते का?

**करूनिया स्नान नामा बाहेरी आला । परिसाचा मेळा घेउनि हाती**

---

## ३४) परसा करिता नामदेवानी वाळवंट परीस केले

**।।१।। घेउनि परीस सांगे परिसाशी । तुझा निश्चयेसी वोळखून घेई ।।२।। ऐकताचि ऐसे नामयाचे बोलणे । परीस कर जोडून विनवितसे ।।३।। ऐसा आनंद सोहळा होतसे संपूर्ण । आनंद निमग्न सर्व जाहले ।।४।। एकाजनार्दनी आनंद पै जाहला । आनंदाने गेला परीसा घरी ।।५।।**

नाथ ३६२८ आ,

**घेऊनिया परीस सांगे परिसाशी । तुझा निश्चयेसी ओळखूनि घेई ।।२।।**

नाथ ३६२८ आ,

परसा भागवतही म्हणाला की ही वाळू आहे. त्यात माझा परीस नाही. नामदेवराय ठामपणे म्हणाले की हे सर्व परीसच आहेत. तेव्हा परीक्षा पहावी म्हणून लोकानी बऱ्याचशा सुया आणल्या. नामदेवरायांच्या हातातील वेगवेगळ्या गोट्याना लावून पाहिल्या. त्या सर्व सोन्याच्या झाल्या. नामदेवरायांच्या हस्त स्पर्शाने ते सर्व वाळूचेकण परीसरूप झालेले होते.

**धन्य धन्य नामदेव । सर्व वैष्णवांचा राव ।।१।। प्रत्यक्ष दाविली प्रचीत। वाळवंटी परीस सत्य ।।२।। कवित्व केले शतकोटी । तारिले जीव कल्प कोटी ।।३।। देव जेवी सवे । ऐसी ज्याची देवा सवे ।।४।। धन्य धन्य नामदेवा । एकाजनार्दनी चरणी ठेवा ।।५।।**

नाथ ३६२९ आ,

**प्रत्यक्ष प्रचीत हे वाळुवंट परीस केले । हारपली विषमता द्वैतबुद्धी निरसली ।।३।। जय जयाजी भक्तराया जिवलगा नामया । आरती ओवाळिता चित्त पालटे काया ।।२।।**

परिसा भागवत २३३८ गोरखपूर, २३५० पा, ७६१ मा, १४१० प. मा.

---

## ३५) देवानी नामदेवरायाच्या घराचे छप्पर शाकारले

एके रात्री जोराचे वादळ झाले. जोरात पाऊस पडू लागला. घरातील सर्वजण झोपलेले होते. देवाला काळजी पडली. देव धावून आले. तो पर्यंत नामदेवांच्या घराचे छप्पर मोडलेले होते.

**वारा पाणी मुसळ धारा । तेणे मोडिले छपरा ।।१।। मग विठाई धावली । हाती चक्र धावत आली ।।२।। वासे लाविले चौफेर । क्षणामाजी केले घर ।।३।। जागा झाला नामदेव । द्वारी उभे पंढरीराव ।।४।। डोयी ठेवून पाया वरी । दासी जनी चरण चुरी ।।५।।**

जनाबाई २८६ आ, स, १३५ गोरखपूर, पा,

नामदेवराय उत्तर भारतात गेले होते. तेथील लोकाना देवानी नामदेवरायाचे घर शाकारल्याचे समजले होते. उत्तर भारतातील त्यांच्या शेजारी रहाणारी एक बाई नामदेवरायाना म्हणाली की तुमचे घर कोणी शाकारले? ते फार छान शाकारले होते. त्याचा पत्ता मला द्या. माझे पण घर शाकारावयाचे आहे. हवे तर त्याला मी दुप्पट मजुरी देते, पण त्याला बोलवा.

**पास पडोसणि पुछिले नामा कापही छानि छवाई हो । तोपहि दुगणी मजुरी दैहउ मोकउ बेडी देहू बताई हो ।।१।।**

नामदेव आ, स, १० गोरखपूर, पा, गुरू ग्रंथ साहेब

## ३६) जनाबाईचा जन्म व बालपण

गोदावरीच्या काठावर गंगाखेड नावाचे एक गाव आहे. तेथे दमा नावाचा एक शूद्र रहात होता. त्याच्या पत्नीचे नाव करूंड असे होते. ती पतिव्रता व सत्वशील स्त्री होती. दमा हा महान भगवत भक्त होता. त्याची पंढरीची वारी होती. दमा व करूंड या शूद्र दांपत्याच्या पोटी जनाबाईचा जन्म झाला. जनाबाई सात वर्षाची असताना दमा व करूंड तिला घेऊन कार्तिक वारीस पंढरपूरला आले. देवाचे दर्शन झाले. ते सर्वजण महाद्वारात आले. तेव्हा जनाबाई म्हणू लागली, की मी आतां परत गावी येणार नाही. येथेच रहाणार. देवाची सेवा करणार. माता पित्यानी तिची बरीच समजूत घातली. परंतु जनाबाईची निष्ठा पांडुरंगाच्या ठिकाणी दृढपणाने जडली होती. त्यामुळे आई वडील तिचे मन वळवू शकले नाहीत. शेवटी कंटाळून तिचे आई वडील तिला देवाच्या दारात एकटीला सोडून निघून गेले.

या लहानशा मुलीला देवाच्या दारात एकटीला बसलेली पाहून नामदेवरायांचे अंतःकरण कळवळले. ती यात्रेत चुकली असावी असे वाटून, त्यानी तिला आपल्या घरी नेले. नामदेवरायांच्या घरच्या भक्तीमय वातावरणात जनाबाई हळू हळू मोठी झाली. ती स्वतःस नामदेवरायांची अनन्य दासी, असे लोकाना सांगे. ती नामदेवरायांच्या घरातील सर्व कामे करू लागली.

## ३७) जनाबाईवर देवाच्या पदकाच्या चोरीचा आरोप

एके दिवशी रात्रीच्या वेळी देव जनाबाईकडे आले. गुज गोष्टी

## ३७) जनाबाईवर देवाच्या पदकाच्या चोरीचा आरोप

बोलता बोलता देवाना झोप येऊ लागली. देव म्हणाले की मी आता झोपतो. जनाबाई जवळ चांगले अंथरूण कोठले असणार. ती म्हणाली अशा अंथरुणावर देवा तुम्ही कसे झोपणार.

**खडतरले आसन त्यावरी धुडतरले वसन । रत्न जडीत सिंहासन तुजला कैसे रे विठोबा ।।१।। काय करू उपचार भक्ती भावाचा लाचार । तू विश्वी विश्वाधार सर्व साक्षी रे विठोबा ।।२।।**

जनाबाई आ, स, गोरखपूर, पा, १३१७ प. मा.

देव म्हणाले तुझी वाकळ दे. त्यावर मी झोपतो. जनाबाईने वाकळ अंथरून दिली. बोलता बोलता देव झोपी गेले. पहाट होत आली. देव आपले झोपलेलेच. जनाबाई त्याना जागे करू लागली.

**उठा पांडुरंगा प्रभात समयो जाहला । वैष्णवांचा मेळा गरुड पारी दाटला ।।१।। वाळवंटा पासूनि महाद्वारा पर्यंत । सुरवरांची दाटी उभे जोडूनि हात ।।२।।**

जनाबाई ३४८ आ, ४८४ स, ३२ गोरखपूर, पा, १२२१ प. मा.

देव घाई घाईने उठले. पदक, माळा तेथेच टाकल्या. अंगावर घोंगडे घेतले व निघाले.

**पदक माळा सकळाते । तेथे टाकिले गोविंदे ।।१।। देव तातडी निघाले । वाकळ घेऊनि पळाले ।।२।।**

जनाबाई १४८ आ, २८६ स, ११५ गोरखपूर, ९९ पा,

वाकळ अंगावर घेऊन देव तसेंच विटेवर उभे राहिले. पहाटे बडवे आले. पहातात तर देवाच्या अंगावर वाकळ आहे. वाकळ काढली. देवाच्या अंगावर पदक, माळा नाहीत. वाकळ कोणाची आहे ही चौकशी करू लागले. काहीजण म्हणाले की ती वाकळ जनाबाईची असावी. चौकशी केली तर ती वाकळ जनाबाईचीच आहे असे समजले. बडव्यानी जनाबाईला बोलावले. देवाचे पदक कोठे आहे? असे विचारले. ती

## ३७) जनाबाईवर देवाच्या पदकाच्या चोरीचा आरोप

म्हणाली मला माहीत नाही. वाकळ माझी आहे, पण पदक मी घेतलेले नाही.

तिच्या घरी तपासून पाहू म्हणून सर्वजण जनाबाईच्या घरी आले. अंथरून झटकले तर तेथे पदक आणि माळा मिळाल्या. जनाबाईवर चोरीचा आळ आला. जनाबाई म्हणाली की मी चोरी केली नाही. पण मुद्देमाल जनाबाईकडे सापडला.

**पदक विठ्ठलाचे गेले । ब्राह्मण म्हणती जनीने नेले ।।१।। अगे शिंपियाचे जनी । नेले पदक दे आणूनि ।।२।।**

जनाबाई १४९ आ, २८७ स, ११६ गोरखपूर, १०० पा,

त्यामुळे तिच्या दंडाला काढण्या बांधल्या. तिला सुळावर द्यावे असे ठरले. सूळ चंद्रभागेत रोवला. जनाबाई म्हणाली की प्रथम मला देवाकडे न्या. नंतर सुळावर द्या. त्या प्रमाणे तिला देवा जवळ आणले. जनाबाई देवा जवळ भांडू लागली. देवाला शिव्या देऊ लागली.

**अरे विठ्या विठ्या । मूळ मायेच्या कारट्या ।।१।। तुझी रांड रंडकी झाली । जन्म सावित्री चुडा ल्याली ।।२।। तुझे गेले मढे । तुला पाहून काळ रडे ।।३।। उभी राहूनि अंगणी । शिव्या देत दासी जनी ।।४।।**

जनाबाई १९ आ, १६३ स, ११७ गोरखपूर, १०१ पा,

लोक म्हणू लागले की फार वेळ होतोय. जनीला लवकर सुळावर द्या. मग तिला वाळवंटात सुळाजवळ आणले. जनी म्हणाली की देवाचा मुडदा बसवला. तो विठोबा आता मेला आहे.

**ऐसा येळकोट केला । जनी म्हणे विठो मेला ।।२।। तंव सुळाचे झाले पाणी । धन्य म्हणे दासी जनी ।।१३।।**

जनाबाई १४९ आ, २८७ स, ११६ गोरखपूर, १०० पा,

जनाबाईने शिव्या दिल्या, तरी देवानी तिला वाचविले. कारण तिने भक्तीच्या जोरावर देवाला आपलेसे केलेले होते. देवाला प्रेम रूपी

---

दोरीने बांधलेले होते. ती देवाला ओढत नेईल तसे देव जात होते.

**धरिला पंढरीचा चोर । गळा बांधोनिया दोर ।।१।। ह्रदय बंदिखाना केला । आत विठ्ठल कोंडीला ।।२।।**

जनाबाई १८० आ, ३१६ स, २१७ गोरखपूर, १९६ पा,

**प्रेम रसडी बांधी गले । खैंच चले तब उधर चले ।।२।।**

तुकोबा  व, जोग, घुले, जोशी,

## ३८) जनाबाईच्या शेणीतून विठ्ठल नामाचा गजर होई

कबीर महाराजांच्या काला बद्दल निश्चित माहिती उपलब्ध नाही, परंतु वारकरी संप्रदायात एक कथा प्रचलित आहे. कबीर महाराजानी नामदेवरायांची कीर्ती ऐकली. त्याना वाटले की आपण नामदेवरायाना भेटावे. म्हणून ते काशीहून निघाले. ते पंढरपूर जवळ आले. रस्त्याने जाताना त्यानी पाहिले की दोन स्त्रिया शेणीवरून भांडत आहेत. एक म्हणत होती की माझ्या शेणी तू घेतल्या आहेस. कबीर महाराजानी चौकशी केली. त्याना समजले की एकीने दुसरीच्या शेणी चोरल्या आहेत. कबीर महाराज म्हणाले की बायानो तुम्ही साध्या शेणी करिता कशाला भांडता आहात. तेव्हा जनाबाई म्हणाली की महाराज माझ्या शेणी या सामान्य शेणी नाहीत.

कबीर महाराजानी सहज तिला तिचे नाव विचारले. ती म्हणाली की माझे नाव जनाबाई आहे. मी नामदेवांची दासी आहे. कबीराना वाटले की आपण नामदेव व जनाबाई यांच्याविषयी खूप ऐकलेले आहे. दोघेही थोर भक्त आहेत. परंतु प्रत्यक्षात काही वेगळाच प्रकार दिसतो आहे. ही जनाबाई साध्या शेणी करिता भांडते आहे. म्हणजे व्यावहारिक

## ३८) जनाबाईच्या शेणीतून विठ्ठल नामाचा गजर होई

वस्तूविषयी तिला एवढे प्रेम आहे. त्यासाठी ती चक्क भांडत आहे. संताना सामान्य वस्तू विषयी एवढी आसक्ती नसावी. असली तर ती पारमार्थिक दृष्टया कमीपणाचे लक्षण दाखवते. म्हणजे जनाबाईची योग्यता पण कमी आहे. त्यावरून नामदेवरायांची योग्यता पण कमीच असणार. शितावरून भाताची परीक्षा होते. तशी शिष्यावरून गुरूची कल्पना येते. आपण उगीचच एवढ्या लांब वरून त्याना भेटावयास आलो. आपल्याला फुकट हेलपाटा झाला. अशी खंत त्याना वाटली. त्यानी विचार केला की ठीक आहे. किमान जनाबाईचे भांडण तरी आपण सोडवू. तेवढेच समाधान.

म्हणून त्यानी जनाबाईस विचारले की तुझ्या शेणी चोरल्या म्हणतेस, तर तुझ्या शेणी ओळखावयाच्या कशा? त्यावर काही खुणा आहेत काय? त्यावर जनाबाई म्हणाल्या, की ते फार सोपे आहे. ज्या शेणी मधून ' विठ्ठल विठ्ठल ' असे शब्द येतात, त्या माझ्या शेणी आहेत. ज्यातून त्या येत नाहीत, त्या शेणी माझ्या नव्हेत. हे ऐकून कबीर महाराज आश्चर्य चकित झाले. या गोष्टीची प्रतिती पहावी म्हणून त्यानी एकेक शेणी उचलली. ज्यातून विठ्ठल नामस्मरण येत होते, त्या शेणी वेगळ्या काढल्या.

**पवित्र तो देह वाणी पुण्यवंत । जो वदे अच्युत सर्वकाळ ।।१।। तयाच्या चिंतने तरतील दोषी । जळतील राशी पातकांच्या ।।२।।** तुकोबा १९८५ व, ९८९ जोग, २२१९ घुले, जोशी, ९९५ प. मा.

या मधून एक सिद्ध होते की जो अखंड भगवंताचे नामस्मरण करतो, त्याचा देह पवित्र होतो. देह एवढा पवित्र होतो की त्याचा स्पर्श जरी निर्जीव वस्तूला झाला, तर ती निर्जीव वस्तू सुद्धा पवित्र होते. एवढी पवित्र होते की त्या निर्जीव वस्तू मधून भगवंताचे नामस्मरण निघू लागते. हे पाहून कबीर महाराजाना, जनाबाईची योग्यता कळून आली.

---

जिच्या स्पर्शाने जड अचेतन वस्तूसुद्धा नामस्मरण करते. म्हणजे जनाबाईचा पारमार्थिक अधिकार केवढा मोठा आहे, ते कबीर महाराजाना कळून चुकले. आपण एवढ्या लांब आलो त्याचे सार्थक झाले, असे त्याना वाटले.

संत जनाबाईने नामदेवरायांच्या परिवारा बरोबर आषाढ वद्य त्रयोदशी शके १२७२ शनिवार दिनांक ३-७-१३५० रोजी संजीवन समाधी पंढरपुरातील महाद्वारातील देवळाच्या पायरी खाली घेतली.

## ३९) नामदेवराय मागे लागले होते तेव्हा देव सांवता माळी यांच्या पोटात लपले.

देवाचा व नामदेवरायांचा लपंडावाचा खेळ चालला होता.

**देव म्हणे नामया जातो मी पळोनि । काढी पा धुंडोनि मजलागी ।।१।।**
**ऐसे म्हणोनि घातलिसे कास । निघे ऋषिकेश पाहूनि नाम्या ।।२।।**
नाथ ३६६५

देव नामदेवाना म्हणाले की मी पळून जातो. तू मला शोधून काढ. देव पळावयास लागले. देव कोठे प्रगट होत होते, कोठे गुप्त होत होते. कोठे माळा, फुले टाकून मार्ग दाखवत होते. असा खेळ चालला असता, देव सावता माळी यांच्या मळ्यात आले. ते सावताला म्हणाले,

**देव म्हणे सांवत्या लपवी मजला । उशीर बहू झाला येईल चोर ।।१।।**
नाथ ३६६८

सावत्या मला लवकर लपव. माझ्या मागे चोर लागला आहे. सावता महाराज म्हणाले की देवा, तुम्ही सगळ्या चोराना हुडकून काढता. असे असताना तुमच्या पाठीमागे कोण चोर लागला आहे?

## ३९-१ सावताने देवाला पोटात लपावयाला जागा दिली

तेव्हा देव म्हणाले की तू बोलण्यात वेळ घालवू नकोस. मला लवकर लपावयास जागा दे. सावता महाराज म्हणाले की देवा, तिकडे केळीचा मळा आहे, ऊसाचा फड आहे, त्यात जाऊन लपा. देव म्हणाले की अरे, चोर काही साधा सुधा नाही. तो तेथे येऊन मला पकडेल. दुसरी एखादी चांगली जागा सांग. त्यावेळी सावता महाराज विळ्याने गवत कापीत होते. त्यानी काही विचार केला. देवाला कोठे लपवावे. त्याना योग्य जागा सांपडेना.

**लपावया स्थान नसे दुजे आन । उदर फाडून लपविला ।।२।।**

नाथ ३६६८

देवाचे म्हणणे ऐकल्यावर त्यानी त्या विळ्याने आपले पोट फाडले. त्या फाडलेल्या पोटात देवाला बसावयास जागा दिली. देव त्यांच्या पोटात बसले. सांवता महाराजानी अंगावर घोंगडी टाकून अंग झाकून घेतले.

**भक्ताचे उदरी बैसे नारायण । कृपेचे सिंहासन घालुनिया ।।३।। एका जनार्दनी नामा तेथे आला । माग तो वहीला नाही काही ।।४।।**

नाथ ३६६८

नामदेवराय शोधत शोधत सांवता माळी यांचे जवळ आले. देवांचा काही ठाव ठिकाणा दिसेना. शेवटी त्यानी सांवता माळी याना विचारले की देव येथे आले होते का? तेव्हा सांवता माळी म्हणाले की देव तर सर्व ठिकाणी आहे. येथे आहे, तेथे आहे, देवा शिवाय एकही जागा शिल्लक नाही.

तेव्हा नामदेवराय म्हणाले की तुमचा वेदांत बाजूला ठेवा, देव येथे आलेत का एवढे सांगा? तेव्हा सांवता महाराज म्हणाले की मला माहीत नाही. इतक्यात वारा सुटला. वाऱ्याने सांवता माळी यांची घोंगडी बाजूला झाली. देवाच्या पितांबराचा थोडासा बाहेर आलेला भाग

नामदेवरायांना दिसला.

**सांवत्याचे अंतरी झळके पितांबर । नाम्याने सत्वर ओळखिले ।।२।।**

**धरूनिया दशी काढिला बाहेर । जाहला जयजयकार तये वेळी ।।३।।**

नाथ ३६७५

नामदेवरायानी पितांबराची दशी धरली व बाहेर ओढली. त्या बरोबर देव सांवत्याच्या पोटातून बाहेर आले.

**सांठविला राहे ह्रदय संपुष्टी । बाहेर धाकूटी मूर्ती उभा ।।२।।**

तुकोबा

## ४०) नामदेवानी चोखोबास शिष्यत्व बहाल केले

नामदेवरायानी आपला मार्ग चातुर्वण्य, वर्णाश्रम धर्म, भेदाभेद धर्मभेद, स्पृश्य, अस्पृश्य, उच्च नीच भाव यांच्या गुंत्यातून व अवडंबरातून काढला. सर्वाभूती परमेश्वर पहावा अशी शिकवण दिली. सर्व मनुष्ये देवाची लेकरे आहेत असे सांगितले. देवाला कोणी उच्च नीच नाहीत. त्याला सर्व सारखेच आहेत.

**उंच नीच काही नेणे भगवंत । तिष्ठे भाव भक्ती देखोनिया ।।१।।**

तुकोबा २९६८ व, २०४७ जोग, ३६५४ घुले, जोशी,

परमेश्वर प्राप्त होण्यास जाती भेद आडवा येत नाही. देव भावाचा भुकेला आहे. तो जातीकडे, ज्ञानाकडे वा योगाकडे लक्ष देत नाही. नामदेवानी आपल्या उपदेशातून वैदिकांचे कर्म कांड व बहुजन समाजाच्या मनातील देवतांची भीती ह्यांचे थोतांड दूर केले. जातीवाद, धर्मवाद, वर्णवाद या पलीकडे मानव गेला पाहिजे, ही शिकवण त्यानी दिली. व त्या प्रमाणे प्रयत्न केला. चोखोबांचे गुरुत्व पत्करले, हा वरील

## ४०) नामदेवानी चोखोबास शिष्यत्व बहाल केले

शिकवणुकीचाच भाग होय. चोखोबा हे महार यातीत जन्म पावलेले होते. ते पतित गणले गेलेले होते. विद्या, वित्त व वस्त्र याना पारखे झालेले होते. पतितांची व पद दलितांची किंकाळी बनलेले पुण्यशील पुरुष होते. चोखोबाना आपल्याला परमार्थ कसा घडणार? असे वाटावयाचे.

**हीन याती माझी देवा । कैसी घडे तुझी सेवा ।।** चोखोबा

**जे कां द्विजन्म्याहूनि बाहेरी । वेदे वाळूनि सांडिले दुरी । जे कां मंत्रार्थी अमंत्री । अनअधिकारी श्रवणाशी ।।** नाथ भागवत २९-५५५

जे द्विजन्म्याहून म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य याहून वेगळे आहेत, त्याना वेदाने वाळीत टाकलेले आहे. त्याना मंत्र म्हणण्याचा अधिकार नाही. भक्ती विषयी काही ऐकण्याचा सुद्धा अधिकार त्याना दिलेला नाही.

**नाही अधिकार । काही घोकाया अक्षर ।।**

तुकोबा व, जोग, घुले, जोशी,

**ज्याशी नाही आश्रम धर्म । ज्याशी नाही श्रौत कर्म । ज्याशी नाही जप होम । जे वर्णाधम अति नीच ।।** नाथ भागवत २९-५५६

ज्याना आश्रमातील उचित कर्म धर्म करण्याचा अधिकार नाही. श्रौत कर्म, जप, होम, इत्यादी करण्याचा अधिकार नाही. जे वर्णाने अती नीच, अधम मानलेले आहेत. त्याना वेद सुद्धा कृपण पणाची वागणूक देतो.

**वेदु अत्यंत कृपणु जाहला । त्रिवर्णाचे कानी लागला । स्त्री शुद्रादिका अबोला । धरुनि ठेला अध्यापवरी ।।** नाथ भागवत

**वेदु संपन्नु होय ठायी । परी कृपणु ऐसा आनु नाही । जे कानी लागला तीही । वर्णाचाचि ।।** ज्ञानेश्वरी १८-१४५७

वेद मूळचाच संपन्न आहे. परंतु त्याच्या सारखा दुसरा कोणीच कृपण नाही. कारण की तो ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य, या तीन वर्णाच्याच

---

## ४०) नामदेवानी चोखोबास शिष्यत्व बहाल केले

कानाला लागला. म्हणजे वेद हा या तीन वर्णानीच ऐकावा, अशी त्याची आज्ञा आहे.

**येरा भवव्यथा ठेलिया । स्त्री शुद्रादिका प्राणिया । अनवसरु मांडुनिया । राहिला आहे ।।** ज्ञानेश्वरी १८-१४५८

संसार दुःखात सापडलेल्या इतर स्त्री शुद्रादिक प्राण्याना, आपल्या ज्ञानाचा लाभ घेण्यास अधिकार नाही, असे ठरवून वेद स्वस्थ राहिला आहे.

पण संत हे समदर्शी असतात. त्यांच्या जवळ भेद भावना नसते.

**जग पहाता दिसे विषम । परी विषमी देखे सम ब्रह्म । तोचि समदर्शी परम । हा गुण निरुपम पै चवथा ।।** नाथ भागवत २६-३२७

भगवंत म्हणतात की जगाकडे पाहिल्यावर, ते विषम आहे असे दिसते. परंतु संत हे समदर्शी असतात. हा त्यांचा चवथा गुण आहे. तो नामदेवराया जवळही होता. म्हणून अशा हीन याती चोखोबावरही नामदेवरायानी कृपा केली. चोखोबाला नामदेवरायानी शिष्यत्व बहाल केले.

**नामदेवे हात चोखियाचे शिरी । विठ्ठल त्रि अक्षरी उपदेशिले ।।** चोखोबा

पतित गणलेल्या पद दलितांचे गुरुत्व पत्करणे, त्याला ज्ञान देणे, त्याची मानवी समानता मान्य करणे, ही ध्यैर्याची, त्यागाची आणि रूढी निष्ट समाजाला आव्हान देणारी कृती होय. त्यावेळी अंत्यजाला उघड पणे समतेने व ममतेने वागवणे, हे समाजाला भयंकर पाप वाटे. आजही तसेच वाटते. वेद हा एवढा ज्ञाता, परंतु तो सुद्धा या बाबतीत कृपण झाला.

परंतु संतांनी मात्र सर्वाना सरते करून घेतले,

**गुण दोष याती न विचारिती काही । ठाव दिला पायी आपुलिया ।।२।।**

---

## ४१) नामदेवानी चोखाची समाधी देवळा समोर बांधली

तुकोबा २०२५ व, ३१७५ जोग, २२५९ घुले, जोशी,
**लिगाड उपाधी तोडिती । सरते करिती आपणामाजी ।।३।। आलिया शरण मने वाचा । चालविती त्याचा सर्व भार ।।२।।** नाथ

कारण त्यांच्या जवळ विषमता नाही.

म्हणून चोखोबाराय म्हणतात,

**चोखा म्हणे धन्य नामया तू गुरू । फेडिला अंधारु जिवित्वाचा ।।** चोखोबा

अंधार म्हणजे अज्ञान. ते नाहीसे करून, कैवल्याचे दान पदरात घातले. व ते घालताना अधिकारी अनअधिकारी असा भेद केला नाही.
**कैवल्य कनकाचिया दाना । जो न कडसी थोर साना । दृष्टयाचिया दर्शना । पाढाउ जो ।।** अमृतानुभव २-५

## ४१) नामदेवानी चोखाची समाधी पांडुरंगाच्या देवळा समोर महाद्वारात बांधली

मंगळवेढे येथे गावा भोवती कुसू घालण्याचे काम निघाले. हे सरकारी काम होते. आजू बाजूच्या सर्व महाराना कामाला बोलावून घेतलेले होते. तसेच पंढरपूरच्या महारानाही नेलेले होते. चोखोबाना पण त्यानी कामाला नेले. चार महिने काम चालले होते. अचानक ते कुसू कोसळले. त्या खाली बरेच महार मरण पावले.
**तया खाली महार बहू चूर झाले । चोख्यानें अर्पिलें प्राण देवा ।।५।। महारा समागमे चोखामेळा गेला । काम ते लागला करावया ।।२।।** नामदेव २३५४ आ, स, ६३० गोरखपूर, पा, १३८४ प. मा.

त्या दिवशी वैशाख वद्य पंचमी होती. शके १२६० होते. नामदेवराय

---

## ४१-१ देवानी नामदेवाना चोखाच्या अस्थी आणण्यास सांगितले

पदयात्रा करून वैशाख वद्य त्रयोदशीस पंढरपूरला परत आले. भगवंताला भेटावयास देवळात गेले. तेथे त्याना चोखोबाचे निधन झाल्याचे समजले. नामदेवराय समोर आल्यावर देव त्याना म्हणाले की तू मंगळवेढ्याला जाऊन चोखोबाच्या अस्थी येथे घेऊन ये.

**देव म्हणे नाम्या त्वा जावे तेथे । त्याच्या अस्थी येथे घेऊनि याव्या ।।६।। नामा म्हणे देवा कैशा ओळखाव्या । विठ्ठल नाम जयामध्ये निघे रे ।।७।। महारा समागमे चोखामेळा गेला । काम ते लागला करावया ।।२।।**

नामदेव २३५४ आ, - स, ६३० गोरखपूर, पा, १३८४ प. मा.

मंगळवेढ्यात दगडाखाली खूप महार मेलेले होते. त्यांचे सामुदायिक दहन झालेले असणार. तसेच त्यांच्या अस्थी एकत्रच असणार. मग त्यातील चोखोबांच्या अस्थी ओळखावच्या कशा, असा प्रश्न नामेदवरायाना पडला. तो त्यानी देवाला विचारला. देव म्हणाले की नामदेवा, तू अस्थी उचल आणि त्या कानाला लाव. ज्या अस्थी मधून माझे नामस्मरण येत असेल, त्या अस्थी गोळा करून घेऊन ये.

**ऐकोनिया कानी आंचळी भराव्या । आणोनिया द्याव्या आम्हापाशी ।।१।।**
**शालीवाहन शके बारासे साठ । प्रमाथी नाम स्पष्ट संवत्सर ।।२।।**

नामदेव २३५५ आ, स, ६३१ गोरखपूर, पा, १३८५ प. मा.

नामदेवराय मंगळवेढ्याला गेले. तेथील अस्थी पाहिल्या. उचलून एकेक कानाला लावल्या. ज्या मधून विठ्ठल नाम येत होते, त्या गोळा केल्या. त्या आपल्या उपरण्यात ठेवल्या. मग तेथून पंढरीला आले. त्या देवा जवळ दिल्या.

**नामदेवे अस्थी आणिल्या पारखोनी । घेत चक्रपाणि पितांबरी ।।७।।**
**शालीवाहन शके बारासे साठ । प्रमाथी नाम स्पष्ट संवत्सर ।।२।।**

नामदेव २३५५ आ, स, ६३१ गोरखपूर, पा, १३८५ प. मा.

---

## ४१) नामदेवानी चोखाची समाधी देवळा समोर बांधली

देवानी त्या आपल्या उपरण्यात घेतल्या. त्या बरोबर विठ्ठल नामाचा मोठा गजर त्या अस्थीतून झाला. जवळपासचे सर्व संत गोळा झाले. त्या वैशाख वद्य त्रयोदशी वार शुक्रवार होता. महाद्वाराच्या थोड्याशा दक्षिण बाजूला समाधी साठी जागा तयार केली. तेथे चोखोबाच्या अस्थी ठेवल्या. त्यावर झाकण म्हणून एक दगड ठेवला. अशा प्रकारे चोखोबाला देवळाच्या दारात समाधी दिली.

**देवाचे आंचळी उठिला गजर । विठ्ठल नाम अंबर गर्जतसे ।।१।। संत समुदाय पताकांचे भार । लोटले गजर ऐकावया ।।२।। वद्य त्रयोदशी वैशाख शुक्रवार । नामाचा गजर महाद्वारी ।।३।। ऐसी आनंदाने नामाच्या गजरी । दिली महाद्वारी समाधी त्या ।।४।। अस्थी निक्षेपण आपुलिया हाते । करुनि अनंत पाषाण ठेवी ।।५।। राही रखुमाई कुरवंडी करिती । सत्यभामा आरती ओवाळीत ।।६।। नामा म्हणे धन्य विठोबाची कृपा । जाईन माझ्या बापा ओवाळून ।।७।।**

नामदेव २३५६ आ, स, ६३२ गोरखपूर, पा, १३८६ प. मा.

देवळाच्या महाद्वारा समोरच चोखोबांच्या अस्थीची समाधी नामदेवरायानी बांधली. मानवाच्या विकासात अडथळा उत्पन्न करणारी अस्पृश्यता ही आजच्या प्रमाणेच आणि आजच्या पेक्षा जास्त, त्या काळी एक बिकट समस्या होती. त्या काळी नामदेवरायानी हे बिकट कार्य केले. जिवंतपणी जे आजपर्यंत केवळ गावा बाहेर रहात असत, त्याची समाधी गावात बांधली. ती ही देवळासमोर बांधली. मानसा मानसातील विषमता दूर करण्याचे त्यानी सर्व प्रथम जे प्रयत्न केले, त्या पैकी हा एक प्रमुख प्रयत्न होय.

---

## ४२) संत राका कुंभाराची निष्काम भक्ती दर्शन

राका कुंभार हा पंढरपूरमध्ये रहात होता. त्याच्या बायकोचे नाव बंका होते. त्याला एक मुलगी होती. तिचे नाव वंका होते. तो गाडगी, मडकी, डेरे बनवीत असे. ती बाजारात विकून आपला उदर निर्वाह चालवीत असे. एकदा त्याने बनवलेल्या कच्या मडक्यात एक मांजरीण व्याली. याची कल्पना राका कुंभारास नव्हती. त्याने कच्या मडक्याचा आवा रचला. आग लावली. मडकी भाजणे सुरू झाले. ती मांजरी फिरून फिरून आव्या भोवती ओरडत राहिली. राका कुंभाराच्या लक्षात आले की मांजरीने मडक्यात पिले ठेवलेली आहेत. आवा तर चांगला आगीने भडकला होता. तो विझवणे शक्य नव्हते. राका कुंभार, बंका व वंका तिघेजण रात्रंदिवस देवाचा धावा करू लागले. तीन दिवसानी आवा शांत झाला. राकाने आवा काढून पाहिले.

**सर्वस्व भाजणे भाजूनिया गेली । खेळताती पिल्ली डेरियात ।।१७।।**
**पंढरी क्षेत्रात रहाता आनंदे । वाचे गोविंद आळविती ।।२।।**

नामदेव २३४८ आ, स, ६३६ गोरखपूर, ६१४ पा,

सर्व भाजणी चांगली भाजलेली होती. अशाच एका भाजलेल्या डेऱ्यात मांजरीची पिल्ली अगदी सुखरूप राहिलेली होती. सर्व लोकानी ते देवाचे कौतुक पाहिले. राकाला आनंद झाला. आपल्या आळवण्याला देव पावला. पण परत आपण हा धंदा करीत राहिलो, तर असा प्रसंग पुन्हा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुन्हा देवाला संकट घालावे लागणार. त्यापेक्षा आता हा धंदाच बंद करावा. देवाला पुन्हा संकटात घालणे योग्य नाही. पुढे जसे नशिबात असेल तसे होईल. असा विचार करून त्याने ब्राह्मणाना बोलावले. घरातील सर्व वस्तू त्याने द्विजाहाती

---

## ४२) संत राका कुंभाराची निष्काम भक्ती दर्शन

लूटविल्या.

आता तो आपल्या कुटुंबियासहीत राना वनात जाऊन वाळलेली लाकडे गोळा करू लागला. ती विकून आपला चरितार्थ चालवू लागला. अखंड देवाचे नामस्मरण करू लागला. एकदा बंका चंद्रभागेवर स्नाना करिता आली होती. तेथे नामदेवरायाची मुलगी कपडे धुण्याकरता आली. बंका तिला म्हणाली की अग, माझ्या अंगावर तू धूत असलेल्या कपड्याचे शिंतोडे उडत आहेत. नामदेवरायाची मुलगी म्हणाली की तुम्ही जातीचे कुंभार आहात. तुमचे वैराग्य हे कामना युक्त आहे. ते ऐकून बंका म्हणाली की तुमचा नामदेव, हा रडका आहे.

**रडका हा नामा घेतलीसे आळी । त्याने वनमाळी बोलविला ।।२८।।**
**अबोल हा देव बोलविला याने । काय थोर पण आले याशी ।।२९।।**
**पंढरी क्षेत्रात रहाता आनंदे । वाचे गोविंद आळविती ।।२।।**

नामदेव २३४८ आ, स, ६३६ गोरखपूर, ६१४ पा,

तुमच्या नामदेवाने अबोल असलेल्या देवाला बोलावयास लावले. म्हणून फार काय विशेष झाले. उगीच जगात आपली कीर्ती वाढवून घेतली. त्याला काय भक्त म्हणतात काय? ही गोष्ट नामदेवरायांच्या कानावर गेली. त्यानी देवाला विचारले की देवा, राका कुंभाराने वैराग्य धारण केले आहे. प्रपंचाचा त्याग केला आहे. असे त्याने का केले? देव म्हणाले की या भक्तीला निष्काम भक्ती असे म्हणतात. त्याची तुला प्रचीती दाखवतो चल. मग देव, आईसाहेब व नामदेव रानामध्ये गेले. त्या ठिकाणी राका, बंका आणि वंका हे वाळलेली लाकडे गोळा करत होते. आईसाहेबानी एका लाकडा खाली आपल्या हातातील सोन्याचे कंकण झाकून ठेवले. लाकूड उचलल्यावर तिघाना त्या खाली सोन्याचे कंकण दिसले. त्यानी ते तेथेच टाकले. आपल्याला विटाळ झाला असे त्याना वाटले. आईसाहेबाना आश्चर्य वाटले. त्या म्हणाल्या की आज

निष्काम भक्त पाहिले. नामदेवराय म्हणाले की देवा, आता या तिघाना तुम्ही दर्शन द्या. अशा प्रकारे देवानी निष्काम भक्तीची प्रचीती नामदेवरायाना आणून दाखवली.

## ४३) नामदेवरायांच्या कीर्तनात गोरा कुंभाराने स्वतः तोडलेले हात परत फुटले.

गोरा कुंभार भगवंताचे अनन्य भक्त होते. मातीची मडकी बनवण्याचा त्यांचा पिढीजात धंदा होता. एकदा ते चिखल तुडवत होते. त्यांची पत्नी पाणी आणण्यास जात होती. तिने गोराला आपल्या लहान एकुलत्या एक मुलाकडे लक्ष असू दे असे सांगितले. गोरा ठीक आहे म्हणाला. गोरा डोळे झाकून देवाचे नामस्मरण करत माती तुडवीत होता. त्याचे मूल जवळच रांगत होते. ते रांगत रांगत मातीत आले. देहभान हरपून देवाचे नाम घेणाऱ्या गोराच्या ते ध्यानी मनीही नव्हते. त्याने चिखला बरोबर मूलही तुडवले. ते मूल त्याच क्षणी मरण पावले.

**रांगत लेकरू गेले असे तेथे । तुडवले त्याते न कळता ।।६।। असे घराश्रमी करीत व्यवहार । न पडे विसर विठोबाचा ।।२।।**

नामदेव २३४४ आ, स, ६२५ गोरखपूर, ६०३ पा,

गोरोबाची स्त्री पाणी घेऊन आली. तिने चिखलात रक्त मांस पाहिले. मूल मेल्याचे तिच्या लक्षात आले. ती आक्रोश करू लागली. ती गोरोबास बरेच बोलली. गोरोबाला तिचा राग आला. तो म्हणाला माझे भजन तू का भंग करत आहेस. रागाने गोरोबा आपल्या पत्नीस मारावयास गेला. तिने त्याला माझ्या अंगाला हात लावशीला, तर तुम्हाला विठ्ठलाची शपथ आहे, असे म्हटले. त्या वेळेपासून त्याने बायकोला हात लावण्याचे बंद केले. गोरोबाचा वंश कसा वाढणार हा विचार त्याच्या पत्नीला

## ४३) नामदेवांच्या कीर्तनात गोरा कुंभाराने तोडलेले हात फुटले

भेडसावू लागला. शेवटी तिने आपल्या धाकट्या बहिणी बरोबर गोरोबाचे लग्न लावून दिले. गोरोबाचा सासरा म्हणाला की आता तुम्ही दोघी बायकाना समान वागणूक द्या. यात फरक करू नका. तुम्हाला विठ्ठलाची शपथ आहे. आता गोरोबा दुसरीला सुद्धा जवळ घेईना. पहिली बायको म्हणाली की तुम्ही दुसरी पासून आता वंश वाढवा. गोरोबा म्हणाला तुझ्या बापाने मला शपथ घातली आहे. दोघीना समान वागणूक द्या असा म्हणाला आहे.

दोघी बहिणीनी विचार केला. रात्री गोरा झोपला की आपण दोघी दोन बाजूस झोपू. त्याचे हात आपल्या अंगावर घेऊ. एक दिवशी त्यानी गोरा निजल्यावर त्याचे हात आपल्या अंगावर ठेवून घेतले. गोरा जागा झाल्यावर पहातो, तो आपली शपथ मोडल्याचे त्याला दिसले. तो उठला. आपल्या हाताने आपला घात केला, म्हणून आपण आपले हात तोडू असा विचार केला.

**विठोबाची माझ्या मोडियेली आण । टाकावे तोडून हातचि हे ।।४८।।**
**घेऊनिया शस्त्र तोडियेले कर । आनंदला फार गोरा तेव्हा ।।४९।।**
**असे घराश्रमी करीत व्यवहार । न पडे विसर विठोबाचा ।।२।।**

नामदेव २३४४ आ, स, ६२५ गोरखपूर, ६०३ पा,

गोरोबाने विळी उघडली. त्याच्या पात्यावर आपटून आपले दोन्ही हात तोडून टाकले. आता सगळेच बंद पडले. आषाढीची पंढरीची वारी आली. गोरोबा दोन्ही स्त्रियाना घेऊन पंढरीला आला. भगवंताचे दर्शन घेतले. वाळवंटात आला. तेथे नामदेवरायांचे कीर्तन चालू होते. गोरोबा नामेदवरायांचे कीर्तन ऐकत बसला. नामदेवराय कीर्तन सांगत असताना म्हणाले की टाळी वाजवून नामाचा गजर करा.

**तव तो म्हणे करा नामाचा उच्चार । टाळीचा गजर करूनिया ।।६।।**
**असे घराश्रमी करीत व्यवहार । न पडे विसर विठोबाचा ।।२।।**

---

## ४४) नामदेवरायांच्या एकूण केलेल्या पदयात्रा

नामदेव २३४४ आ, स, ६२५ गोरखपूर, ६०३ पा,

**नामयाने टाळी पिटीली गजरे । गोरियाशी कर फुटले ते ।।६२।। रांगत लेकरू आले तया वेळी । मातेच्या जवळी आनंदाने ।।६३।। नामदेव त्याशी करी विनवणी । ठाव द्या चरणी तुमचिया ।।६९।। असे घराश्रमी करीत व्यवहार । न पडे विसर विठोबाचा ।।२।।**

नामदेव २३४४ आ, स, ६२५ गोरखपूर, ६०३ पा,

नामदेवराय धावत गोरोबा जवळ आले. गोरोबाला म्हणाले की तुम्ही धन्य आहात. मला तुमच्या चरणा जवळ जागा द्या.

## ४४) नामदेवरायांच्या एकूण केलेल्या पदयात्रा

नामदेवरायानी पहिली पदयात्रा ज्ञानोबारायांच्या बरोबर उत्तरे कडे शके १२१३ ते १२१८, (सन १२९१ ते १२९६) या दरम्यान केली. पंढरपूरहून कराड, तऱ्हेगाव, तापी, नर्मदातीर, पश्चिम प्रभास, पट्टण, सोमनाथ तीर्थ, द्वारका, मथुरा, गया, वाराणसी, कुरुक्षेत्रादी तीर्थ, बिकानेर, कोलादजी, वगैरे ठिकाणी केली.

दुसरी पदयात्रा शके १२२० ( सन १२९८ ते १२९९ ) दक्षिण भारतात एकट्याने केली. श्रीशैल शिखर, मल्लिकार्जून, अरूणाचल, चिदंबर, विष्णूकांची, रामेश्वर, ताम्र पर्णिका, आळुवा, कन्याकुमारी, हरीहरेश्वर, जनार्दन वगैरे ठिकाणी केली.

तिसरी पदयात्रा संपूर्ण भारतभर शके १२२१ ते १२२६ ( सन १२९९ ते १३०४ ) या दरम्यान केली. नीरा भीवरा संगम, गोदावरी,

---

## ४४) नामदेवरायांच्या एकूण केलेल्या पदयात्रा

नाशिक, पंचवटी, घृष्णेश्वर, ओंकार मांधाता, द्वारका, रैवतक, ढवळपूर, मुचकुंद गुंफा, प्रभास, सोरटी सोमनाथ, सिध्दपूर, पुष्कर, कुरुक्षेत्र, ठाणेश्वर, यमुना तीर, इंद्रप्रस्थ, हस्तिनापूर, अंतर्वेदी, मायापूर, हरिद्वार, ऋषिकेश, देव प्रयाग, केदारनाथ, कैलास, बद्रिनारायण, मानस सरोवर, गंडकी, अयोध्या, नैमिष्यारण्य, मधुपूरी, गोकुळ, वृंदावन, कालियाडोह, गौतमेश्वर, मिथिला, उज्जयिनी, प्रयाग, काशी विश्वेश्वर, गया, गंगा सागर संगम, महाबळेश्वर, परत पंढरपूर.

नामदेवरायानी चवथी पदयात्रा शके १२४३ ते १२६०, ( सन १३२१ ते १३३८) या दरम्यान मध्य आणि उत्तर भारतात केली. चवथ्या पदयात्रेत नामदेवरायानी राजस्थानकडे संचार केला. ठिकठिकाणच्या मुक्कामात त्यानी भजन कीर्तनाचा पाऊस पाडला. त्यामुळे राजस्थानच्या जीवनावर अनंतकाळ संस्कार करणारे परिणाम झाले.

राजस्थान मधील जयपूर येथील तीन मंदिरे, जोधपूर, अलवार, बिकानेर जवळ कोलायतजी येथील नामदेवरायांची विहीर, पुष्पराज येथील दोन मंदिरे, बगरू, संगनिर, काळाडेरा, इत्यादी ठिकाणी जुन्या नव्या स्वरूपात उभी असलेली दिडशेच्यावर नामदेवरायांची लहान मोठी सार्वजनिक मंदिरे ही त्यांच्या राजस्थान मधील प्रचार कार्याची आजही साक्ष देतात.

मराठी माणसा विषयी व महाराष्ट्रातील संता विषयी नितांत आदर निर्माण करणारी ही नामदेव मंदिरे म्हणजे अध्यात्म केंद्रेच आहेत. या ठिकाणी हिंदी साहित्यिक एकत्र येऊन नामदेवरायांचे गुण संकीर्तन करतात. शिखांच्या गुरूद्वाराचे पुजारी प्रवचने करतात. आणि नामदेवरायांच्या

## ४४) नामदेवरायांच्या एकूण केलेल्या पदयात्रा

अनुयायांची आठवड्यातून एक तरी बैठक होत असते. नामदेवरायांच्या नावाने ग्रंथालये, वाचनालये या केंद्रस्थानी आहेत. तेराव्या शतकात प्रत्येक पदयात्रेत नामदेवरायानी वैष्णव पंथाचा प्रचार व प्रसार उत्तर भारतात मोठ्या प्रमाणात केला होता, त्याची ही मंदिरे साक्ष देतात.

शके १२६१ च्या सुमारास पुन्हा नामदेवरायांच्या पायाची चक्रे गतिमान झाली. द्वारका, मारवाड, मथुरा, हरिद्वार ते पंजाब. पंजाबातील गुरूदासपूर जिल्हा ही नामदेवरायांची कर्मभूमीच बनली. भूतविंड, भट्टिवाल, घुमान ही कर्मभूमी झाली. घुमान येथे कायम वास्तव्य करून बन्सी, मरडी (जि- अमृतसर), दुनियापूर जि-मुलतान, लाहोर, अमृतसर, मुलतान, लायलपूर, जालंधर, लुधियाना, अंबाला, रोहोटक, भिवानी, हिसार या कार्यक्षेत्रात नामदेवरायानी पदयात्रा करून भागवत धर्म प्रसार केला. घुमान येथे नामदेवरायांचे वास्तव्य शके १२७१ पर्यंत होते.

पंढरपूरास जाण्याकरिता घुमानहून मकर संक्रांतीच्या दिवशी नामदेवरायानी प्रयाण केले, म्हणून तेथे प्रतिवर्षी माघ शुद्ध द्वितियेस महायात्रा भरते. सात दिवस कार्यक्रम चालतो. संपूर्ण पंजाब प्रांतातून अंदाजे सहा- सात लाख यात्रेकरू घुमानला त्यावेळी येत असतात. अखंड लंगर चालू असते. त्यावेळी घुमान जवळील सखोवाल, भट्टिवाल या गावाना लोक भेट देतात. नामदेवरायांच्या समाधी सोहळ्याचा कार्यक्रम फार मोठ्या प्रमाणात तेथे साजरा केला जातो. तेथील समाजातील लोकांचे नामदेवरायांच्यावर फार प्रेम आहे.

# ग) नामदेवरायांचे उत्तर भारतातील कार्य व तेथील शिष्य परिवार

## ४५) नामदेवरायानी भोपाळच्या मेलेल्या कमलाकर ब्राह्मणाच्या पद्‌माकर या पुत्रास जिवंत केले

नामदेवराय पंढरीहून पद यात्रेस निघाले. ते कराड, तऱ्हेगाव, तापी, नर्मदा तीर करत भोपाळ येथे आले. तेथे कमलाकर हे दशग्रंथी ब्राह्मण रहात होते. त्यांच्या पत्नीचे नाव सुमती होते. त्याना पद्‌माकर नावाचा एक मुलगा होता. कमलाकर भिक्षा मागून आणी व त्यावर आपला उदर निर्वाह करत असे. भोजनाचे वेळी आलेल्या अथितीला तो कधीही विन्मुख पाठवत नसे. एके दिवशी कमलाकर भिक्षा मागण्यास जात असता त्याला नामदेवराय समोरून येताना दिसले. कमलाकराला संत दर्शनाने अपार आनंद झाला. त्याने धावत जाऊन त्यांच्या पुढे लोटांगण घातले. आणि आपल्या घरी भोजनास येण्याचा आग्रह केला. परंतु स्वतः कमलाकरच भिक्षेवर गुजराण करत असता, तो जेवण कसे घालणार? ही शंका निघाली. कमलाकर म्हणाला, तुम्ही काही काळजी करू नका, माझा पांडुरंग समर्थ आहे. तुम्ही स्नान करून या, तोपर्यंत आम्ही भोजनाची सिद्धता करतो. मग नामदेवरायानी भोजनाचे आमंत्रण स्वीकारले. कमलाकरने घरी येऊन सुमतीला पाकसिद्धी करण्यास सांगितले. तिनेही पांडुरंगावर विश्वास ठेऊन शेजारी पाजारी जाऊन थोडे उसनवारीने साहित्य आणले व पाक सिद्धीला सुरुवात केली. स्वयंपाक चालू असता जळण कमी पडले व तिला तेथून उठता येईना. म्हणून तिने आपल्या मुलाला हाक मारली व अंगणातून गोवऱ्या आणण्यास सांगितले. पद्‌मारकर अंगणात गोवऱ्या आणण्यास गेला. गोवऱ्यात असलेल्या सर्पाने पद्‌माकराला

## ४५) नामदेवरायानी भोपाळच्या मेलेल्या पद्‌माकरला जिवंत केले

दंश केला. त्याने किंकाळी फोडून धरणीवर अंग टाकले. सापाच्या जहरी विषामुळे पद्‌माकराचे तत्काळ प्राणोत्क्रमण झाले. सुमती धावत तेथे आली. तिने तेथे आपला मुलगा मेलेला पाहिला. सर्व प्रकार तिच्या लक्षात आला. आता काय करावे? असा तिला प्रश्न पडला. तिने मनाचा निश्चय केला. आपल्या मुलाला उचलून घरी आणले. अंथरूण घातले. त्यावर पद्‌मकराला झोपवले. वर पांघरूण घातले. कारण आज संत जेवणास येणार व मध्ये विघ्न नको. म्हणून ही गोष्ट तिने कोणासही कळू दिली नाही. चेहऱ्यावर कसलेही दुःखी भाव दिसणार नाहीत याची तिने खबरदारी घेतली. भोजनाची सर्व सिद्धता झाली. संत मंडळी पानावर येऊन बसली. विठ्ठलाचा जयजयकार झाला. नामदेवरायानी मनोभावे पांडुरंगाचे स्मरण केले. परंतु पांडुरंगाची मूर्ती आज त्यांच्या डोळ्या समोर उभी राहीना. तेव्हा त्याना एकदम उदास वातावरणाची जाणीव झाली. काही तरी अशुभ घडले आहे हे त्यानी जाणले. नामदेवराय एकाएकी म्हणाले, कमलाकरा, तुझा मुलगा आमच्या पंगतीत आणून बसव. हे ऐकताच सुमती कावरी बावरी होऊन म्हणाली, तो झोपला आहे. तुम्ही तो पर्यंत भोजन करा. पण नामदेवराय ऐकेनात, ते म्हणाले, त्याच्या शिवाय मी भोजन करणार नाही. अखेर नामदेवरायानी टाळ वीणा हाती घेऊन पांडुरंगाचा धावा केला.

पांडुरंगा तू सर्व साक्षी आहेस. तुझा भक्त जो कमलाकर, याच्यावर आज तू काय दारुण प्रसंग आणला आहेस. तरी त्याच्या मुलाला जिवंत करावे.

**अशक्य ते तुम्हा नाही नारायणा । निर्जीवा चेतना आणावया ।।१।।**
**मागे काय जाणो स्वामीचे पवाडे । आता का रोकडे दावू नये ।।२।।**
**थोर भाग्य आम्ही समर्थाचे कासे । म्हणवितो दास काय थोडे ।।३।।**
**तुका म्हणे माझे निववावे डोळे । दावूनि सोहळे समर्थाचे ।।४।।**

---

तुकोबा ४०५० वडापूर, ३९५५ जोग, ६४८ घुले, जोशी,

देवा तुम्हाला जगात काहीही अशक्य नाही. निर्जीवाला तुम्ही सहज चेतना आणू शकता. या पूर्वीही तुम्ही असे करून दाखवले आहे. मग आता का दाखवू नये. अशी भगवंताला विनंती केली. थोड्याच वेळात पद्माकर जिवंत झाला. झोपेतून उठल्या सारख्या अवस्थेत तेथे आला व म्हणाला, आई मला भूक लागली, वाढ. कमलाकर व सुमती यानी नामदेवरायांच्या पायावर लोटांगण घातले.

## ४६) नामदेवरायानी औंढ्या नागनाथाचे देऊळ फिरवले

**फिरवले देऊळ जगामाजी ख्याती । नामदेवा हाती दूध प्याला ।।१।।**
**भरियेली हुंडी नरसी मेहत्याची । धनाजी जाटाची शेते पेरी ।।२।।**

तुकोबा ६६५ व, ३२५० जोग, ८८४ घुले, जोशी, १०९२ प. मा.

ज्ञानोबाराय व नामदेवराय पदयात्रा करत आंवढ्या नागनाथला आले. त्या दिवशी माघ वद्य चतुर्दशी होती. महाशिवरात्र होती. स्नान, संध्या, नित्यनेम उरकून दोघे महाद्वारात गेले. भक्तीप्रेमाने लोटांगण घालून भगवान् शंकराचे दर्शन घेतले. नंतर नामदेवरायानी तेथे कीर्तनास आरंभ केला. ते कीर्तन ऐकण्यास लोकांची फारच गर्दी झाली. सर्व लोक एकचित्ताने कीर्तन ऐकत होते. कीर्तन ऐनरंगात आले असताना, काही उपाध्ये मंडळी सोवळ्याने पूजेसाठी व देव दर्शनासाठी तेथे आली. परंतु गर्दीमुळे, त्याना आत जाण्यास मार्ग मिळेना. तेव्हा ते श्रोत्यास म्हणाले, चला दूर व्हा. आम्ही सोवळे आहोत. आम्हाला विटाळ होईल. परंतु त्यांच्या बोलण्याकडे कोणी लक्ष देईना. म्हणून ते नामदेवरायाना कीर्तन बंद करा म्हणू लागले. ते नामदेवरायाना योग्य वाटेना. तेव्हा उपाध्या मधील एकजण म्हणाला, मी नामदेवा पर्यंत जातो व त्याना

## ४६) नामदेवरायानी औंढ्या नागनाथाचे देऊळ फिरवले

कीर्तन बंद करण्यास सांगतो. भले मला विटाळ झाला तरी चालेल. मी परत स्नान करून येईन. असे म्हणून तो गर्दीत शिरला. लोकाना धक्काबुक्की करत तो नामदेवराया पर्यंत आला. त्याना म्हणाला, तुमचे कीर्तन बंद करा. तुमच्या कीर्तनाची प्रौढी पंढरपुरात चालू दे. येथे नागनाथास त्याचे महात्म्य नाही. हा कैलास पती आहे. उमारमण आहे. याला हरी कीर्तन प्रिय नाही. नामदेवराय म्हणाले, शीव व विष्णू यात भेद नाही. आणि पांडुरंगाच्या स्वरुपात दोघेही समाविष्ट आहेत.

**नामा म्हणे शीव विष्णू एकरूप । जाणोनिया जप करा त्यांचा ।।५।। संचिताचा नाश क्रियमाण बुडवले । त्या सहज जोडले मोक्ष सुख ।।२।।**

नामदेव ६०३ आ, ५९५ स, ११३६ गोरखपूर, १०३८ पा.

**भजन करारे हरिहरा । नारायण शीव शंकरा । माझे बोलणे अवधारा । भेद न करा दोघांचा ।।१।। तुम्हा सांगेन सत्यवृत्तांत । पाहे पा तेथींचा दृष्टान्त । नारायणे सेविले अमृत ।जाला श्वेत महादेव ।।२।।...एक तो एका वेगळा नाही । दृष्टान्त तू आगमी पाही । नामा म्हणे एक केशव ध्यायी । हरिहर पाही ज्याचे अवतार ।।६।।**

नामदेव ७०१ आ, ६९१ स, १०८९ गोरखपूर, ९९१ पा, ६०० प. मा.

**नामा म्हणे शीव विष्णू एकरूप । ताराया अमुप अवतार ।।५।। तारक हे नाम भोळ्या भाविकाशी । नेणते जाणत्यासी लाभ एक ।।२।।**

नामदेव ५५८ आ, ५५० स, १०८७ गोरखपूर, ९८९ पा.

**हरिहरा भेद । नाही नका करू वाद ।।१।। एक एकाचे ह्रदयी । गोडी साखरेच्या ठायी ।।२।।**

तुकोबा २९६४ व, ९९ जोग, ३६५८ घुले, १२४-१ जोशी,

नामदेवरायांच्या मना मध्ये विचार आला, आपण माणसा माणसा मध्ये भेद भाव ठेवू नका असे म्हणतो, येथे तर ही उपाध्ये मंडळी

---

## ४६) नामदेवरायानी औंढ्या नागनाथाचे देऊळ फिरवले

देवादेवात भेद निर्माण करत आहेत. नामदेवराय म्हणाले शीव व विष्णू एकरूपच आहेत. दोघात भेद करू नका. यावर तो उपाध्ये म्हणाला, तुझ्या कीर्तनाने देवळात येण्याची वाट बंद झाली आहे. लोक बाहेर पुजे करता व देव दर्शना करता खोळंबले आहेत. तू येथून जा. हवे तर देवळाच्या मागे उभा राहून खुशाल कीर्तन कर. हे ऐकून नामदेवरायानी त्या ब्राह्मणाना साष्टांग नमस्कार घातला. देवा समोरची जागा सोडली. देवळाच्या मागे गेले व कीर्तन करू लागले. सर्व श्रोतेही देवळा समोरून उठले, मागे जाऊन पुन्हा कीर्तन ऐकू लागले. कीर्तनात असा खंड पडल्या मुळे नामदेवरायांचे डोळे पाण्याने भरून आले. आपण हीन जातीतले असल्या मुळे आपल्यावर असा प्रसंग आला. तेव्हा ते देवाला म्हणाले,

**हीन दीन जात मोरी पंढरीके राया । ऐसा तुमने नामा दरजी कायकू बनाया ।।१।। टाल बिना लेकर नामा राऊलमे गाया । पूजा करते ब्रह्मन उन्होने बाहर ढकाया ।।२।।**

नामदेव २१४५ आ, २२९० स, १०३ गोरखपूर,

देवा मला हीन, दीन अशा जातीत का जन्माला घातलेस? माझी जात ही शिंप्याची. टाळ, वीणा घेऊन मी राऊळात गात होतो. तर पूजा करणाऱ्या ब्राह्मणानी मला बाहेर घालवले. देवळाच्या मागे कीर्तन कर म्हणतात.

**शिवालयच असते समोर । तरी कथेशी रंग येता फार ।। का न पावे रुक्मिणीवर । कोप मजवर का धरिला ।।**

त्याबरोबर, पूर्वाभिमुखी होते देऊळ।ते पश्चिमेस फिरले तत्काळ।।

तेव्हा असा चमत्कार झाला की, ते देऊळ जे पुर्वाभिमुख होते, ते पश्चिमेस फिरले. देवळाचे दार पुन्हा नामदेवरायांच्या समोर आले. पूजा आटोपून ब्राह्मण बाहेर येतात, तर त्याना दिसले की नामदेवरायांचे

## ४६) नामदेवरायानी औंढ्या नागनाथाचे देऊळ फिरवले

कीर्तन समोरच चालू आहे. त्यानी चौकशी केली. तर संपूर्ण देऊळ फिरल्याचे त्याना समजले. तेव्हा सर्व ब्राह्मण मंडळी नामदेवरायाना शरण गेली. त्यांच्या पाया पडली. नामदेवराय म्हणतात,

**आ भडै रे नौआ आ भणै रे । होती छोति कहि नहीं छीपा सूं । देवल मांही ना बडै रे ।।धृ।। उत्तम लोग देहरे आया । च्यारुं वरण चा भडै रे ।।१।। उठि भाई नामदेव बाहरी आव । ज्यौं पंडित वेद भणै रे ।।२।।**

नामदेव आ, २२७४ स, १०४ गोरखपूर, पा,

नामदेवरायांच्या मनामध्ये विचार आला, आपण मानसामानसा मध्ये भेद भाव ठेवू नका असे म्हणतो, येथे तर ही उपाध्ये मंडळी देवादेवात भेद निर्माण करीत आहेत. नामदेवराय म्हणाले शीव व विष्णू एकरूपच आहेत. दोघात भेद करू नका. यावर तो उपाध्ये

**नामदेव उठि जब बाहरि आयौ । कैसो नै कल न परै रे ।।३।। देवल फिरि नामा दिसि भईया । पंडित सब पांवा पडै रे ।।४।। दास नामदेव कौ ऐसा ठाकूर । पण राषै हरी सांकडै रे ।।५।।**

नामदेव २२७४ स, ४८ बा, १०४ गोरखपूर,

काही ब्राह्मण नामदेवरायाना म्हणाले, अरे नवख्या, कोणीही लोक या देवळात येतात आणि गाणे गातात. तरी पण शिंप्याला मात्र कोणीही शिवत नाहीत. त्यामुळे तू देवळात येऊ शकत नाहीस. चारी वर्णाचे लोक देवळात दर्शनाकरता येतात. पण उच्च वर्णीय उत्तम लोक देवळात आले तर, इतर वर्णीय लोक बाहेर जातात. तर हे नामदेवा, ऊठ बाबा. जोपर्यंत पंडित लोक वेद म्हणत आहेत, तो पर्यंत तू बाहेर ये. मग नामदेव उठून जेव्हा बाहेर आले, तेव्हा ते केशवाला कळले. मग नामदेव जसे देवळा मागे कीर्तन करू लागले, तसे ते देऊळ फिरले. ब्राह्मण पूजा आटोपून जेव्हा बाहेर आले, तेव्हा त्याना ते देऊळ फिरल्याचे

## ४६) नामदेवरायानी औंढ्या नागनाथाचे देऊळ फिरवले

दिसले. तेव्हा सर्व पंडित लोक नामदेवरायांच्या पाया पडले. अशा दास नामदेवांचा देव हरी हा त्यांचे सर्व संकटा पासून नेहमी रक्षण करतो.

या घटने बाबत संत कबिरानी एक पद लिहिले आहे,

**उठि भाई नामदेव परे हौ जाई । इहां दुबे तिवारी बैठे आई ।।१।। ब्राह्मण बनिया उत्तम लोग । यहां नहीं नामदेव तुम्हारा संजोग ।।२।। नामदेव कमरी लई उठाय । मंदिर पिछे बैठै जाय ।।३।। पावमें घुंगरू हात मे ताल । नामदेव गुण गावै गोपाल ।।४।। मंदिर उपर ध्वजा फरहरै । उलटी द्वार नामा तन करै ।।५।। नामदेव नरहरि दर्शन पाये । बाह पकरि ढिंग लै बैठाय ।।६।। दोऊ हिलमिल एकै भये । दास कबीर अचम्भे रहे ।।७।।** कबीर

**उठिरे नामदेव बाहरी जाइ । जहां लोग महाजन बैठे आइ ।।धृ।। बांभण बणीयां उत्तिम लोग । नहीं रे नामदेव तेरा जोग ।।१।। बार बार सीधा कुण लेह । को छिपीया ढिग बैसण देह ।।२।। हम तो पढीया बेद पुराना । तूं कहां ल्यायो ब्रह्म गियाना ।।३।। नामदेव मनि उपरति धरी । हीन जाती प्रभू काहे मोरी करी ।।४।। झाडि कबलीया चलौ रिसाइ । मठ के पिछै बैठो जाई ।।५।। पगां घूंधरा हाछां तारी । नामदेव भगति करै पछि वारी ।।६।। धज कांपी देवल धरहरया । नामदेव सनमुषि दुबारा फिरया ।।७।। नामदेव नरहरि दरसन भया । बांह पकडि मिंदर मै लिया ।।८।। जैसी मनसा तैसी दसा । नामदेव प्रणवै बीसो बिसा ।।९।।**

नामदेव २२७३ स, ५० बा, १०६ गोरखपूर,

ब्राह्मण म्हणाले, ऊठ रे नामदेवा, बाहेर जा. या ठिकाणी महाजन लोक येऊन बसले आहेत. ब्राह्मण आणि वाणी हे उत्तम लोक आहेत. अरे नामदेवा ते तुझ्या जोगे नाहीत. वारंवार सिधा कोण घेईल? आणि शिंप्याला इतका वेळ बसून कोण देईल? अरे आम्ही तर वेद पुराणे

## ४६) नामदेवरायानी औंढ्या नागनाथाचे देऊळ फिरवले

शिकलो आहोत. तू ब्रह्मज्ञान कोठून आणले आहेस? नामदेवांच्या मनात उदासिनता आली आणि ते म्हणाले, हे प्रभो, माझी हीन जाती काय म्हणून केलीस? नामदेवरायानी घोंगडे झटकले व मठाच्या पाठीमागे जाऊन बसले. पायात घुंगरू बांधले, हातानी टाळ वाजवून कीर्तनास सुरुवात केली. देवळावरील ध्वज फडफडू लागला आणि नामदेवा समोर दोन वेळा फिरला. नामदेवरायाना नरहरीचे दर्शन झाले. नामदेवराय म्हणतात, विसात वीस या प्रमाणात जशी मनाची स्थिती असेल, तशी स्थिती प्राप्त होते.

नामदेवराय म्हणतात,

**हसत खेलत तेरे देहुरे आया । भक्ती करत नामा पकरी उठाया । होनडो जात मेरी जादोराया । छीपे के जनम काहे को आया ।।१।। लै कमली चलयो पलटाई । देहुरे पीछे बैठा जाई । जिउं जिउं नामा हरी गुण उचरे । भगत जनां कऊं देहुरा फिरे ।।२।।**

नामदेव ग्रंथसाहेब पान ११६४, क्र. १२

**तूं मेरा ठाकूर तूं मेरा राजा । हौं तेरी सरनी आया हूँ ।।१।। जस तुमरा गावत गोविंदा । इन लोगन मार उठाया हो ।।२।। आलम दुनी आवती देखी । सायर पंडे कोपला हो ।।३।। सूद्र सूद्र कर मार उठाया । कहाँ करूँ मेरे बावला हो ।।४।। प्राण गये जो मुक्ती होए । सो तो मुक्ती ना जाने कोई हो ।।५।। यह बांमन मोहे सूद्र कहत है । तेरी पैज पछोडी होई हो ।।६।। भई चहूँ दिस अचरज भारी । अद्‌भुत बात अपारा हो ।।७।। दास नामा को भयो द्वारो । पण्डत को पछवारा हो ।।८।।**

नामदेव आ, स, १०५ गोरखपूर, पा,

**फेरी देहुरा रखिअन चार वर्ण लै पेरीं पाया ।।** गुरूदासजी

**हंकारिया निंदकां पीठ दे ।नामदेव मुख लाया राम ।।** गुरू नानक

---

## ४७) नामदेवरायानी दिल्लीत बादशहाने मारलेली गाय जिवंत केली

त्या वेळी उत्तर भारतात बहुतेक ठिकाणी मुसलमानी राजवट चालू होती. मुसलमान हे कट्टर धर्मवादी होते. संपूर्ण भारतात आपली राजवट चालू करण्याचे त्यांचे कार्य जोमाने सुरू होते. पंजाब, उत्तर प्रदेश त्यानी आपल्या कब्जा खाली आणले होते. अल्लाउद्दीन खिलजीने गुजरातच्या राजाला हरवून आपला करदाता बनवले होते. महाराष्ट्रातील दौलताबाद जिंकून घेतले होते. तसेच इतर मुस्लिमानी बरीचशी हिंदू राज्ये जिंकून ती लुटली होती आणि तेथील सर्व हिंदुवर आपले प्रभुत्व जमवले होते. हिंदुंचा ते अन्वनित छळ करत होते. हिंदूस्त्रियावर अमानुषी अत्याचार करत होते . त्यांच्या वर बलात्कार करत होते. काही स्त्रियांचे इतर मुसलमाना बरोबर लग्न लावत होते. हिंदुंचे धर्मपरिवर्तन करावयाचे चालले होते. हे सर्व जोर जबरदस्तीने करावयाचे. हरलेल्या हिंदुंच्या पुढे दोनच पर्याय शिल्लक असत. ते म्हणजे एकतर धर्म परिवर्तन किंवा मृत्यूला सामोरे जाणे. मुसलमानानी हिंदुची मंदिरे उध्वस्त केली. काही मंदिरांच्या जागी मशिदी उभ्या केल्या. इतर उध्वस्त मंदिरांची दुरुस्ती अथवा पुनर्बांधणी करण्यास आडकाठी निर्माण केली. अशा प्रकारे धोकेबाजी, जुलूम जबरदस्ती, अत्याचार, अनाचार या चक्कीमध्ये हिंदू पिसले जात होते. हिंदुंची देवालये उध्वस्त होत होती. देवाच्या मूर्ती फोडल्या जात होत्या. काही मूर्ती पाण्यात फेकल्या जात होत्या. यामुळे तेथील लोकांचा देवावरील विश्वास उडू लागला. कारण सर्व सामान्य लोकांची भावना देव केवळ देवळातच आहे अशी होती. याबाबत नामदेवराय म्हणतात,

**पाषाणाचा देव बोलेची ना कधी । हरी भवव्याधी केवि घडे ।।१।।**

---

## ४७) नामदेवरायानी दिल्लीत बादशहाने मारलेली गाय जिवंत केली

**दगडाची मूर्ती मानिला ईश्वर । परी तो साचार देव भिन्न ।।२।। दगडाचा देव इच्छा पुरवीत । तरी का भंगत आघाताने ।।३।।**
नामदेव १३९१ आ, १३६९ स, ३१३ गोरखपूर, पा,
**देव दगडाचा भक्त हा मावेचा । संदेह दोघांचा फिटे कैसा ।।१।। ऐसे देव तेही फोडिले तुरकी । घातले उदकी बोभातीना ।।२।। ऐसिया देवाशी वाहिले टिळेडोळे । भक्त बाळेभोळे नागवले ।।३।। ऐसीहि दैवते नको दावू देवा । नामा म्हणे केशवा विनवितसे ।।४।।**
नामदेव १६६७ आ, १६३० स, १५४९ गोरखपूर, पा,

नामदेवरायानी लोकांच्या मनातील देवा विषयीची चुकीची भावना घालवून टाकली. देव हा केवळ देवळातच आहे व इतर ठिकाणी नाही, ही कल्पना चुकीची आहे हे त्यानी सर्वाना समजाऊन सांगितले. देव केवळ मूर्तीतच नाही, तो सर्वत्र आहे, सर्वांच्या ह्रदयात आहे, हे त्यानी सांगितले. तसेच देवाला आर्तस्वराने हाक मारली तर तो मदतीला येतो, हे लोकाना आवर्जून सांगितले. यामुळे लोकांच्या मनात देवावरचा विश्वास वाढू लागला. धर्मावरचा विश्वास वाढू लागला. पर्यायाने लोकांचे धर्म परिवर्तन थांबले. धर्मयुद्ध करण्याचा विचार वाढला. मुसलमानाना जोरदार प्रतिकार होऊ लागला. सहाजिकच नामदेवराय हे मुसलमानांच्या कार्यात मोठे अडथळे ठरले गेले. त्यावेळी दिल्लीमध्ये महमद बिन तुघलक हा बादशहा सन १३२५ ते १३५१ या दरम्यान राज्य करत होता. सन १३२५ ते १३२८ च्या दरम्यान त्याला नामदेवराय हे हिंदू भक्त असून ते लोकाना भक्ती मार्गाला लावतात, लोकाना देवावर अढळ श्रद्धा ठेवावयास सांगतात, असे समजले. त्यांचा प्रभाव जनमाणसावर फार पडतो आहे, त्यामुळे हिंदू लोक देव भक्तीवर विश्वास ठेवू लागलेत. अशा रीतीने हिंदूना मुसलमान बनविण्या मध्ये नामदेवरायांचा मोठा अडसर निर्माण झाला आहे. तेव्हा नामदेवरायांचा प्रथम बंदोबस्त करणे

## ४७) नामदेवरायानी दिल्लीत बादशहाने मारलेली गाय जिवंत केली

आवश्यक आहे, हे बादशहाचे लक्षात आले. बादशहाने नामदेवरायाना पकडून आणणेस सैनिकाना पाठवले. शिपायानी नामदेवरायाना पकडून बादशहा समोर आणले. बादशहाने नामदेवरायाना हिंदूधर्म सोडून मुसलमान होण्यास सांगितले. पण नामदेवराय या गोष्टीस तयार झाले नाहीत. बादशहा म्हणाला मी तुझे हाल हाल करीन. ठार मारीन.

नामदेवराय म्हणाले, तू मारणारा कोण? व मी मरणारा कोण? मरणे व मारणे या गोष्टी देवाच्या हातात आहेत.

**करणे का न करणे । हे आघवे तोचि जाणे । विश्व चळतसे जेणें । परमात्मेनि ।।** ज्ञानेश्वरी १२-११८

कारण परमात्म्याच्या सत्तेने हे विश्व चालले आहे, त्याच्या सत्तेनेच करणे किंवा न करणे हे अवलंबून आहे. नामदेवराय म्हणाले की देव ज्याचे रक्षण करतो, त्याला कोणी मारू शकत नाही. तुकोबाराय म्हणतात,

**देव राखे तया मारील कोण । न मोडे काटा हिंडता वन ।।१।। न जळे न बुडे नव्हे काही । विष तेही अमृत पाही ।।२।। न चुके वाट न पडे फंदी । नव्हे कधी यमबाधा ।।३।। तुका म्हणे नारायण । येता गोळ्या वारी बाण ।।४।।**

तुकोबा २९४९ व, १०१७ जोग, ३६७३ घुले, जोशी,

ज्याचे रक्षण देव करतो, त्याला कोणी मारू शकत नाही. तो काट्यानी भरलेल्या वनातून अनवाणी फिरला, तरीही त्याच्या पायात काटा मोडणार नाही. तो अग्नीकडून जाळला जात नाही. पाण्यात बुडला जात नाही. त्याला मारण्या करता कोणी त्याला विष प्यावयास दिले, तर ते त्याला अमृतवतच होते. या प्रमाणे देवाच्या मनात असेल तर तो माझा सांभाळ करील, असे म्हटल्यावर, बादशहा म्हणाला,

**सुलतानु पुछै सुनु बे नामा । देखउ राम तुम्हारे कामा ।।१।। नामा सुलताने बांधिला । देखउ तेरा हरि बीठुला ।।२।।**

---

## ४७) नामदेवरायानी दिल्लीत बादशहाने मारलेली गाय जिवंत केली

नामदेव २१४७ आ, २३२४ स, ४७ गोरखपूरर, गुरूग्रंथ साहेब.

बादशहा नामदेवरायाना म्हणाला, आता तुझ्या देवाचे सामर्थ्य मी बघतो. आणि तो तुझ्या उपयोगाला कसा येतो, ते पहातो. बादशहाने नामदेवरायाना बांधले व म्हणाला की मी आता एका गायीला मारतो, तू त्या गायीला जिवंत कर, नाहीतर तुझी गर्दन उडवतो.

**बिसमिली गऊं देहु जीवाइ । नातरू गरदनि मारउ ठाइ ।।३।। बादसाहु ऐसी किउ होई । बिसमिलि कीआ न जीवै कोइ ।।४।।**

नामदेव २१४७ आ, २३२४ स, ४७ गोरखपूरर, गुरूग्रंथ साहेब.

बादशहाने गाय बळी दिली म्हणजे मारली. नामदेवराय शांत चित्ताने सर्व पहात होते, ऐकत होते. त्यांचे मन स्थिर होते. ते थोडे सुद्धा घाबरले नाहीत. विचलीत झाले नाहीत. ते म्हणाले, हे बादशहा तुझे म्हणणे मी ऐकले आहे. परंतु ज्याला एकदा मारलेले आहे, त्याला परत जिवंत करणे कसे शक्य आहे? मी एक सामान्य माणूस आहे. त्यामुळे माझ्या सामर्थ्याला मर्यादा आहेत. मग मेलेली ही गाय मी कशी जिवंत करणार?

**मेरा कीआ कछू न होई । करि है रामु होई है सोई ।।४।।**

नामदेव २१४७ आ, २३२४ स, ४७ गोरखपूरर, गुरूग्रंथ साहेब.

नामदेवराय म्हणाले की जगात सत्य काय आहे, ते मी सांगतो. माझ्या करण्या अथवा न करण्याने काहीही होऊ शकत नाही. जगातील सर्व व्यवहार हे देवाच्या सत्तेने चालतात. शरीराने हालचाल करावयाचे ठरवले, तरी देव अनुकूल असेल, तरच हालचाल होऊ शकते. तुकोबाराय म्हणतात,

**चाले हे शरीर कोणाचिये सत्ते । कोण बोलवते हरी वीण ।।१।। देखवी ऐकवी एक नारायण । तयाचे भजन चुको नको ।।२।। माणसाची देव चालवी अहंता । मीच एक कर्ता म्हणो नये ।।३।। वृक्षाचेही पान हाले**

---

## ४७) नामदेवरायानी दिल्लीत बादशहाने मारलेली गाय जिवंत केली

**ज्याची सत्ता । राहिली अहंता मग कोठे ।।४।। तुका म्हणे विठो भरला सबाह्य । तया उणे काय चराचरी ।।५।।**

तुकोबा ३७१५ व, ३०३८ जोग, ३३१७ घुले, ३९२९-३ जोशी,

हा देह कोणाच्या सत्तेने व्यवहार करतो? तर तो भगवंताच्या सत्तेने सर्व व्यवहार करतो. देह जे बोलतो, ते त्याला हरी बोलवतो म्हणून बोलतो. डोळ्याना दृश्य दाखवणारा व कानाना ऐकवणारा एक परमात्माच आहे. देव माणसाची अहंता चालवून घेतो, म्हणून मीच एक कर्ता आहे असे म्हणू नये. जगातील सर्व व्यवहार भगवंताच्या सत्तेने घडतात. साधे झाडाचे पान हालावयाचे असेल, देवाच्या सत्ते शिवाय हालू शकत नाही.

**परी मने वाचा देहे । जैसा जो व्यापारू होये । तो मी करितु आहे । ऐसे न म्हणे ।।** ज्ञानेश्वरी १२-११७

परंतु मनाने, वाचेने व देहाने, जसे जे कर्म होईल, ते कर्म मी करत आहे, असे म्हणू नकोस.

नामदेवराय म्हणाले, सर्व सत्ताधीश परमात्मा आहे. तो सर्व काही करू शकतो. पण मनुष्याचे सामर्थ्य तोकडे आहे. माझेही सामर्थ्य तोकडे आहे. त्यामुळे मेलेल्या गायीला जिवंत करणे मला अशक्य आहे. नामदेवरायांचे बोलणे सहज होते, पण बादशहाला राग आला.

**बादिसाहु चडिओ अहंकारी । गज हसती दीनो चमकारि ।।५।।**

नामदेव २१४७ आ, २३२४ स. ४७ गोरखपूरर, गुरूग्रंथ साहेब.

नामदेवराय गायीला जिवंत करू शकत नाहीत असे समजल्यावर बादशहाला गर्व निर्माण झाला. त्याचा अहंकार जागा झाला. आता नामदेवाना मारावयास आपण मोकळे, असा विचार करून त्याने नामदेवरायांच्या अंगावर हत्ती सोडण्यास सांगितले. पूर्वी हत्तीच्या पाया खाली माणसाना देण्याची शिक्षा असे. हत्तीला दारू पाजत, मग हत्ती

## ४७) नामदेवरायानी दिल्लीत बादशहाने मारलेली गाय जिवंत केली

अंधाधुंद होई. माजत असे, व पाया खाली सापडलेल्याना चिरडून टाकत असे. नामदेवरायाना हत्तीच्या पाया खाली देणार म्हणल्यावर लोक कालवा कालव करू लागले. हिंदू लोक हवालदिल झाले. त्या ठिकाणी नामदेवरायांची मानलेली आई होती. ती रडू लागली.

**रूदनु करै नामेकी माई । छोडी राम की, न भजहि खुदाई ।।७।।**

नामदेव २१४७ आ, २३२४ स, ४७ गोरखपूरर, गुरूग्रंथ साहेब.

ते भयंकर दृश्य पाहून तिचे ह्रदय द्रवले. ती रडू लागली. ती रडत रडत नामदेवरायाना म्हणाली, की तू रामाचे नाम सोडून दे, खुदाचे नाव घे. त्यामुळे फारसा काही फरक पडणार नाही. तुला देह दंडाची शिक्षा दिली जावी, असे मला वाटत नाही. म्हणून मेहेरबानी कर व अल्लाचे नांव घे. परंतु नामदेवराय पंढरीरायाचे अनन्य भक्त. या देवाच्या नामा व्यतिरिक्त, अन्य देवाचे नाव घेणे त्याना कसे आवडेल? दुसऱ्या देवाचे नाव घेतले तर जीवनदान मिळत असेल किंवा राज्य मिळत असेल, तरी ते घेणार नाहीत. तसा परिहार त्यानी यापूर्वीच दिलेला आहे.

**नको दिवट्या छत्र घोडे । जेणे तुजसी अंतर पडे । तुझे नामचि आवडे । मज बापुडे म्हणोत का ।।८।। तुज म्या जीवे अनुसरावे । तुम्ही तैसेचि अपंगावे । आणिकांचे न म्हणवावे । जन्मो जन्मी दातारा ।।२।। वदनी तुजचि वर्णावे । श्रवणी गुण नाम ऐकावे । नयनी चरण न विसंबावे । क्षण एक दातारा ।।३।।**

नामदेव १७८४ आ, १७४३ स, २२९८ गोरखपूर, २३१५ पा, ४५६ मा, ६५५ प. मा.

नामदेवराय देवा जवळ म्हणतात की, देवा मला दिवट्या, छत्र, घोडे, सार्वभौम राज्य नको. इतर रिद्धी सिद्धी मोक्ष या गोष्टी मला नकोत. यामुळे तुझ्या भक्ती मध्ये अंतर पडेल. अशा गोष्टी मला नकोत.

## ४७) नामदेवरायानी दिल्लीत बादशहाने मारलेली गाय जिवंत केली

मला तुझे नामच आवडते. इतराना राज्य, रिद्धी सिद्धी मोक्ष इत्यादी गोष्टी आवडत असतील. मी त्या नको म्हणतो, म्हणून ते मला बापडा म्हणतील. त्यानी मला नावे ठेवली तरी चालतील. पण मी मात्र सर्व सोडून तुमचे नामस्मरण करणार. म्हणून नामदेवरायानी त्या आईस उत्तर दिले,

**न हऊ तेरा पुंगडा न तू मेरी माई । पिंडू तजै तउ हरि गुण गाई ।।८।।**

नामदेव २१४७ आ, २३२४ स, ४७ गोरखपूरर, गुरूग्रंथ साहेब.

नामदेवराय म्हणाले, की मी तुझा मुलगा नाही व तू माझी आई नाहीस. असली आई काय करावयाची. मी मात्र हरिचेच गुण गाणार.

**सांडुनिया पंढरीराव । कवणाते म्हणो देव ।।१।। बहू लाज वाटे चित्ता । आणिकाचे नाव घेता ।।२।।**

तुकोबा ४०३ व, ३४४२ जोग, ४१५ घुले, जोशी, ४८१ मा,

पंढरीरायाला सोडून मी इतराना देव मानणार नाही. भलेही यामुळे माझे प्राण जाणार असतील, तर जावोत. मी माझ्या देवाचेच नाम गाणार.

याचा परिणाम काय झाला? बादशहाला हे कसे पटणार? त्याने माहुताला आज्ञा दिली. हत्तीला नामदेवरायांच्या अंगावर सोडले.

**करै गजिंदु सुंड की चोट । नामा ऊबरै हरीकी ओट ।।९।।**

नामदेव २१४७ आ, २३२४ स, ४७ गोरखपूरर, गुरूग्रंथ साहेब.

हत्तीने आपली सोंड नामदेवरायांच्यावर उगारली. सोंडेने त्याना मारावयाचा प्रयत्न केला. परंतु नामदेवरायाना सोंड लागली नाही. हत्तीने खूप प्रयत्न केला, पण नामदेवराय वाचले. शेवटी हत्तीने नामदेवरायांना सलाम केला. यावर बादशहा म्हणाला,

**काजी मुला करहि सलामु । इनि हिंदू मेरा मलिआ मानु ।।१०।।**

नामदेव २१४७ आ, २३२४ स, ४७ गोरखपूर, पा, गुरूग्रंथ साहेब.

---

## ४७) नामदेवरायानी दिल्लीत बादशहाने मारलेली गाय जिवंत केली

काजी, मुल्ला व सर्वजण मला सलाम करतात. माझ्या पुढे हांजीहांजी करतात. पण या हिंदुने मला सलाम केला नाही. माझ्या समोर झुकला नाही. याने माझ्या अस्मितेला धक्का लावला. याला आता कडक शिक्षा करावी. त्यावेळी तेथे काही हिंदू लोक हजर होते. त्यानी हा वाद मिटवावयाचा प्रयत्न केला. त्यानी आपला प्रस्ताव सादर केला.

**बादिसाह बेनती सुनेहु । नामे सर भरि सोना लेहु ।।११।।**

नामदेव २१४७ आ, २३२४ स, ४७ गोरखपूरर, गुरूग्रंथ साहेब.

हिंदूलोकानी बादशहाला प्रार्थना केली, की आम्ही नामदेवरायांच्या वजना एवढे सोने देतो, ते घ्या व नामदेवरायाना सोडून द्या.

**मालु लेऊ तऊ दोजकि परऊ । दीनु छोडि दुनिआ कऊ मरऊ ।।१२।।**

नामदेव २१४७ आ, २३२४ स, ४७ गोरखपूरर, गुरूग्रंथ साहेब.

बादशहा म्हणाला, की मी जर तुमच्या कडून सोने घेईन, तर माझी स्थिती काय होईल? मला नरकात जावे लागेल. माझे इमान, माझा धर्म सोडून मी धनदौलत गोळा करू? हे काही बरोबर नाही. बादशहा विचार करत होता, पण तो त्याच्या दृष्टीने करत होता. परंतु नामदेवराय विचार करत होते, ते स्वतः करता नाही. तर तो विचार सर्वाकरता होता. ते शांत राहिले. त्यानी आपल्या बाजूने काहीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही.

**पावहु बेडी हाथहु ताल । नामा गावै गुण गोपाल ।।१३।।**

नामदेव २१४७ आ, २३२४ स, ४७ गोरखपूर, गुरूग्रंथ साहेब.

मग नामदेवरायांच्या पायात बेड्या ठोकल्या. हात मोकळे होते. हातात टाळ होता. टाळ वाजवत नामदेवराय भगवंताचे गुणानुवाद गाऊ लागले. त्यांची चित्तवृत्ति स्थिर होती. त्यांच्या ठिकाणी भीतीचा लवलेश

---

नव्हता. ते आपल्या भक्तिप्रेम रसात डुंबून राहिले. भगवंताचे नामस्मरण करत राहिले. बादशहा हैराण होऊन पहात राहिला. सगळा दरबार अवाक होऊन नामदेवरायां कडे पाहात राहिला. बादशहा नामदेवरायाना म्हणाला की, तुझ्या देवाचे नाव घेऊ नकोस. नामदेवरायानी नामस्मरण तर थांबवले नाहीच, उलट बादशहाला म्हणाले,

**गंग जमुन जऊ ऊलटी बहै । तऊ नामा हरि करता रहै ।।१४।।**
नामदेव २१४७ आ, २३२४ स, ४७ गोरखपूर, गुरूग्रंथ साहेब.

गंगा यमूना वगैरे नद्यांचा प्रवाह हा, डोंगराकडून उताराला पुढे जाऊन समुद्राला मिळत असतो. तो उलट्या दिशेने कधी वाहात नाही. त्या नद्यांचा प्रवाह जरी उलट्या दिशेला वहायला लागला, तरी सुद्धा मी नामस्मरण करण्याचे थांबवणार नाही. कितीही संकटे आली, तरी नामस्मरण करावयाचे थांबवणार नाही.

**आकाश हे वोसरो । पृथ्वी वरी विरो । परि नेणे मोहरो । ह्रदय वृत्ती ।।** ज्ञानेश्वरी १३-४९५

आकाश नाहीसे झाले किंवा पृथ्वी विरघळून गेली, तरी त्याची मनोवृत्ती मागे फिरत नाही. एवढा त्याचा दृढ निश्चय असतो.

**जरी हे आकाश वर पडो पाहे । ब्रह्मगोळ भंगा जाये । वड वानळ त्रिभुवन खाये । तरी मी तुझीच वास पाहे गा विठोबा ।।१।। न करी आणिकांचा पांगिला । नामधारक तुझाचि अंकिला ।।धृ।।**
भानुदास ७६४ मा, ३१६ प. मा.

आकाश हे डोक्यावर पडते की काय असे वाटले, ब्रह्मगोळ भंगाला गेला किंवा समुद्रामधील वडवानळाचा उद्रेक होऊन ते त्रिभुवन जाळू लागले, तरी सुद्धा मी देवाचीच भक्ती करणार. दुसऱ्या कोणाचा धावा करणार नाही.

**देह जावो हेचि घडी । पाय हरिचे न सोडी ।।१।। क्लेश हो नाना परी**

**। मुखी रामकृष्ण हरी ।।२।।**

नामदेव १५९४ आ, १५६५ स, २२२० गोरखपूर, पा,

**जे जे घडेल ते ते घडो । देह राहो अथवा पडो ।।१।। परी मी न सोडी सर्वथा । तुझे पाय पंढरीनाथा ।।२।।**

नामदेव १४९५ आ, १४६८ स, २२०९ गोरखपूर, पा.

जे जे घडावयाचे, ते ते घडू दे. देह राहूदे अथवा जाऊदे, पण हे पंढरीनाथा, मी तुझे चरण सोडणार नाही.

**सात घडी जब बीती सुणी । अजहु न आईऊ त्रिभुवन धणी ।।१५।। पांखतण बाज बजाइला । गरुड चढे गोविंद आईला ।।१६।। अपने भगत परि की प्रतिपाल । गरुड चढे आए गोपाल ।।१७।।**

नामदेव २१४७ आ, २३२४ स. ४७ गोरखपूर, गुरूग्रंथ साहेब.

सात तास झाले. घंटा नाद झाला. अजून त्रिभुवननाथ आले नाहीत. इतक्यात गरुडाच्या पंखांचा आवाज आला. आणि गरुडावर स्वार होऊन भगवंत आले.

**पिवळा पितांबर गगनी झळकला । गरूडावरी बैसोनि आमचा कैवारी आला ।।३।। येई विठाबाई आई माऊलिये । निढळावरी कर ठेउनि पालविये ।।२।।**

नामदेव ३७८ आ, ३७६ स, १०५८ गोरखपूर, १७१ पा,

**उठाउठी करी स्मरणाचा धावा । धरवत देवा नाही धीर ।।२।।**

तुकोबा २९७६ व, १०२ जोग, ३६४८ घुले, १३०-१ जोशी,

**वैकुंठाहूनि आले वेगी । नामयाच्या भक्ती लागी ।।३।। दुडवा दुडवा हरी धावतु । ना भी नामयाते म्हणतु ।।२।। पैल गरुडाचे वारिके । गगनी कृष्ण येता देखे ।।१।।**

नामदेव ५१४ आ, ५०६ स, २३३१ गोरखपूर,

**कहहि त धरणी इकोडी करऊ । कहहि त लेकरि ऊपरि धरऊ**

## ४७) नामदेवरायानी दिल्लीत बादशहाने मारलेली गाय जिवंत केली

**।।१८।। कहहि त मुइ गऊ देऊ जीआइ । सभु कोई देखै पति आइ ।।१९।।**

नामदेव २१४७ आ, २३२४ स, ४७ गोरखपूर, गुरूग्रंथ साहेब.

भगवंत नामदेवरायाना म्हणाले, की नामदेवा का हाक मारलीस? तू म्हणत असशील तर ही पृथ्वी उलटी करतो. किंवा तू म्हणत असशील, तर पृथ्वीला हातात घेऊन आकाशात घेऊन जातो. तू म्हणत असशील तर गायीला जिवंत करतो. कारण लोकांचा देवावर विश्वास बसावा. देव हाच एक समर्थ आहे. तो काहीही करू शकतो. देवावर विश्वास ठेवल्यास, पूर्ण श्रद्धा ठेवल्यास, तो भक्ताचे सर्व कार्य
निर्विघ्न पणे पार पाडतो.

**नामा प्रणवै सेलम सेल । गऊ दुहाई बछरा मेलि ।।२०।। दुधहि दुहि जब मटुकी भरी । ले बादसाह आगे धरी ।।२१।।**

नामदेव २१४७ आ, २३२४ स, ४७ गोरखपूर, गुरूग्रंथ साहेब.

नामदेवरायानी प्रथम देवाचे मनःपूर्वक दर्शन घेतले. दर्शनाने नामदेवराय धन्य झाले. नामदेवरायांच्या पायातील बेड्या निघाल्या. नंतर नामदेवरायानी देवाला विनंती केली, की प्रथम या गायीला जिवंत करा. देव म्हणाले तू गायीचे शीर तिच्या धडाला लाव. नामदेवरायानी त्या प्रमाणे केले. तेव्हा देवानी गाय जिवंत केली. त्यानी गायीच्या वासराला गायी जवळ नेले. वासराला गायीचा पान्हा पिऊ दिला. नंतर गायीचे दूध काढून मडके भरले. बादशहा हे सर्व पहात होता. नामदेवरायानी त्याच्या पुढे ते मडके धरले. ही तर अजब गोष्ट घडली. बादशहा काही बोलला नाही. घडलेली घटना पाहून तो अवाक झाला. त्याला वाटले, की आता येथे आपण थांबलो, तर आपल्यावर काही तरी संकट येईल. यामुळे तो चांगलाच घाबरला.

**बादिसाहु महल महि जाई । अऊघट की घट लागी आइ ।।२२।।**

---

## ४७) नामदेवरायानी दिल्लीत बादशहाने मारलेली गाय जिवंत केली

**काजी मुल्ला बिनती फुरमाइ । बखसी हिंदू मै तेरी गाई ।।२३।।**
नामदेव २१४७ आ, २३२४ स, ४७ गोरखपूर, गुरूग्रंथ साहेब.

घाबरून बादशहा आपल्या महालात गेला. त्याला जाणवले की आपल्याला आता वाईट दिवस आले. त्याने काजी, मुल्ला मार्फत नामदेवरायाना निरोप पाठवला, की हे हिंदू, मी तुझी गाय आहे. मला सोडून दे. मला क्षमा कर. नामदेवराय व त्यांच्या देवाचा आपल्यावर कोप होऊ नये, म्हणून बादशहाने नामदेवरायांची क्षमा मागितली.

**नामा कहै सुनहु बादिसाह । इहु पतिआ मुझै दिखाइ ।।२४।। इस पतिआ का इहै परवानु । साचि सील चालहु सुलतान ।।२५।। नामदेऊ सभ रहिआ समाइ । मिली हिंदू सभ नामे पहि जाइ ।।२६।।**
नामदेव २१४७ आ, २३२४ स, ४७ गोरखपूर, गुरूग्रंथ साहेब.

नामदेवरायानी बादशहाला निरोप पाठवला, की बादशहा आता माझे म्हणणे ऐक. यापुढे तू सत्याची बाजू घेणारा हो. शीलवंत हो. यापुढे न्यायाने व नीतीने राज्य कारभार कर. धर्मांध होऊ नकोस. दुसऱ्यावर अन्याय करू नकोस. या घटने वरून जी गोष्ट सिद्ध झाली आहे, तिचा विचार कर. या पुढे कोणाला छळणार नाहीस, याचा मला विश्वास दे. देव हा फक्त माझ्या करता नाही. तो सर्वा करता आहे. तो सर्व विश्व व्यापून आहे. तुझा अहंकार टाकून दे. सर्व भूतमात्रा मध्ये परमेश्वर पहात चल.

**सर्वाभूती पाहे एक वासुदेव । पुसोनिया ठाव अहंतेचा ।।१।। तोचि संत साधू ओळखावा निका । येर ते आईका माया बद्ध ।।२।।**
नामदेव ८५१ आ, ८४१ स, २०५३ गोरखपूर, पा, ११५१ प. मा.

**हे समस्तही श्रीवासुदेवो । ऐसा प्रतिती रसाचा ओतला भावो । म्हणौनि भक्ता माजी रावो । आणि ज्ञानिया तोचि ।।** ज्ञानेश्वरी ७-१३६

हे संपूर्ण विश्व श्रीवासुदेवच आहे, अशा अनुभवरूपी रसाचा

---

## ४७) नामदेवरायानी दिल्लीत बादशहाने मारलेली गाय जिवंत केली

त्याचा भाव ओतलेला असतो. म्हणून सर्व भक्ता मध्ये तो राजा आहे. आणि ज्ञानीही तोच आहे.

**जऊ अबकी बार न जीवै गाई । त नामदेवका पतिआ जाई ।।२७।।**

नामदेव २१४७ आ, २३२४ स, ४७ गोरखपूर, गुरूग्रंथ साहेब.

सर्व हिंदू नामदेवरायांच्या जवळ आले. ते म्हणाले बरे झाले, गाय जिवंत झाली. तसे झाले नसते, तर नामदेवरायांची पत गेली असती. लोकांचा देवावरचा विश्वास उडाला असता. तसेच साधूसंता वरचा सुद्धा विश्वास उडाला असता.

**नामे की कीर्ती रही संसारी । भगति जना ले उधरिआ पारी ।।२८।।**
**सगल कलेस निंदक भइआ खेदु । नामे नारायण नाही भेदु ।।२९।।**

नामदेव २१४७ आ, २३२४ स, ४७ गोरखपूर, पा, गुरूग्रंथ साहेब.

या घटनेमुळे नामदेवरायांची कीर्ती सर्वत्र पसरली. इतर भक्तात पण देवावरचा विश्वास जागा झाला. या विश्वासा मुळे, श्रध्दे मुळेच लोकांचा उद्धार होतो. तसेच या प्रसंगा मुळे नामदेवरायांच्या निंदकांचा खेद व क्लेश वाढला. निंदकांच्या मनाला फार पीडा होऊ लागली. परंतु नामदेवराय म्हणतात, की माझ्यात आणि देवात कोणताही भेद भाव नाही. माझे आणि देवाचे ऐक्य आहे, अद्वैत आहे.

उत्तर भारतात नामदेवरायांचे लोक संग्रहाचे कार्य पदयात्रा दरम्यान चालू असे. ते लोकाना भक्ती मार्गाला लावीत. धर्माची शिकवण देत असत. तेथील प्रचलित हिंदी भाषेत अभंग रचना करीत असत. ती अभंग रचना तेथे फार लोकप्रिय झाली. तेथील लोकाना भक्ती प्रेमाची ओढ लागली. तेथे त्यांचे अनेक शिष्य तयार झाले.

---

## ४८) भट्टीवाल येथील वाळलेल्या काठीस पालवी फुटविली

नामदेवराय भट्टिवाल येथे राहिले होते. तेथे एक म्हातारा कोतवाल काठी टेकवत आला. तो हट्टी होता. दिल्लीत बादशहाने मारलेली गाय, नामदेवरायानी जिवंत केली, हे त्याला समजले होते. त्यांच्या सामर्थ्याची आपण स्वतः प्रचीती घ्यावी असे त्याला वाटू लागले. तो नामदेवरायाना म्हणाला की माझ्या हातातील काठीला पालवी फुटवून दाखवा. नामदेवराय म्हणाले की ही बोराची कोरडी काठी आहे. हिला आता पालवी कशी फुटेल? मी एक सामान्य मनुष्य आहे. माझ्या जवळ एवढे सामर्थ्य कुठले? परंतु तो कोतवाल फार हट्टी होता. त्याने आपला हट्ट चालूच ठेवला. सलग तीन दिवस तो आपला हट्ट धरून बसला होता. शेवटी नामदेवराय म्हणाले की दे इकडे ती काठी. ते थंडीचे दिवस होते. नामदेवराय धुनी पेटवून शेकत बसले होते. त्या विस्तवात ती काठी खोचली. वर चादर झाकली. थोड्या वेळाने वरची चादर काढली. खालची धुनी विझली होती. काठीला पालवी फुटली होती.

**करील ते काय नोहे महाराज । परी पाहे बीज शुद्ध अंगे ।।२।।**

तुकोबा ३९२४ व, ३३७९ जोग, ५३५ घुले, जोशी, ७९५ प. मा.

आजही ते बोरीचे झाड भट्टिवाल येथे आहे. त्याला तेथे खुंढी साहेब म्हणतात. जवळच नामदेवरायांचे मंदिर - गुरूद्वार बांधलेले आहे.

नामदेवराय भट्टिवाल मध्ये आले. ते गावाच्या बाहेर रहात होते. एक दिवस एक स्त्री गावाच्या बाहेर शेतावर आपल्या नवऱ्या करता जेवण घेऊन जात होती. वाटेत तिने नामदेवरायाना पाहिले. कोणीतरी साधू महाराज आहेत. त्यांची आपण सेवा करावी, म्हणून तिने ते सर्व भोजण नामदेवरायांचे पुढे ठेवले व जेवा म्हणाली. नामदेवराय

त्यातील काही जेवण जेवले. उरलेले जेवण घेऊन ती आपल्या नवऱ्याकडे गेली व त्याला राहिलेले जेवण तिने दिले. दुसऱ्या दिवसा पासून ती रोज नामदेवरायाना जेवण देऊ लागली. एक दिवस तिला जेवण घेऊन येण्यास फार वेळ लागला. नामदेवरायानी तिला सहज उशीर होण्याचे कारण विचारले. ती म्हणाली गावात पाण्याची विहीर नाही. दूर बियास नदी वरून पाणी आणावे लागते. त्यामुळे आज वेळ झाला. नामदेवरायानी शेजारचेच एक जमिनीचे ढिकळ उचलले. तेथे पाणी उफाळून येऊ लागले. नंतर लोकानी तेथे विहीर काढली. लोकांची पाण्याची चांगली सोय झाली. ते पाणीही फार औषधी आहे. त्या पाण्यात आंघोळ केल्यावर खरूज, नायटे वगैरे त्वचेचे रोग बरे होतात.

## ४९) भट्टिवाल येथील शिष्य जल्लो उर्फ जाल्हण सुतार

**शिष्य जल्लो उर्फ जाल्हण** ( मूळचा भट्टिवालचा, नंतर धारिवालला कायमचे वास्तव्य व समाधी )

जल्हो उर्फ जाल्हण हा व्यवसायाने सुतार होता. तो मुळचा भट्टिवाल या गावचा. तो नामदेवरायांचा शिष्य झाला. भट्टिवाल तेथे त्याचे स्मारक आहे. जाल्होचे वंशज त्याच्या समाधी स्थानाची व्यवस्था पहातात. नंतर तो धारिवाल तेथे कायमची वस्ती करून राहिला. तेथे त्याने नामदेवरायांच्या स्मरणार्थ एक गुरूद्वार बांधले. जल्लोची नामदेवरायांवर अपार श्रद्धा होती. नामदेवरायांच्या पहिल्या यात्रेमध्ये तो त्यांच्या बरोबर पंढरपूरला आला होता. त्याचा उल्लेख नामदेवरायांच्या तीर्थावळी मध्ये आहे.

**निवृत्ती ज्ञानेश्वर जनमित्र सोपान । सांवता जाल्हण घेऊनि सरिसे**

## ५०) मथुरा येथील शिष्य विष्णू स्वामी, व (५१) गहू कापणी

**।।५।।**

नामदेव आ, स, गोरखपूर, पा,

**बाबा जल्लो रहत है पिण्ड जो धालिवाल । उनकी संगत इहां बसत, भंग करत तत्काल ।।**

**गुरू अर्जुन मनमे कहयो, उनका दर्शन जोए । उनका बच नहीं मानई, तब हम वस्ती होए ।।** गुरूविलास

नामदेवरायांचा शिष्य जल्लो हा शेवटी, धारिवाल येथे कायमची वस्ती करून राहिला. तेथे त्याने एक नामदेवरायांचे मंदिर बांधले.

## ५०) मथुरा येथील नामदेवरायांचे शिष्य विष्णू स्वामी

नामदेवराय उत्तर भारतात पदयात्रा करत होते. ते मथुरा, वृंदावनाच्या परिसरात काही काळ राहिले होते. तेथे ते भजन कीर्तन करत होते. विष्णूस्वामी हे मथुरेतील एक ब्राह्मण होते. त्यांचा अध्यात्म क्षेत्रातील अभ्यास चांगला होता. त्यांची व नामदेवरायांची एकदा भेट झाली. पहिल्याच भेटीत त्याना नामदेवरायांच्या पारमार्थिक क्षेत्रातील अधिकाराची जाणीव झाली. ते नामदेवरायांचे शिष्य बनले. त्यानीही नामदेवरायांच्या सोबत काही पदयात्रा केली. नंतर ते मथुरेतच राहिले. त्यांचे वंशज मथुरेतच नामदेव परंपरा चालवीत असतात.

## ५१) भट्टीवाल येथील गहू कापणी, गुरू नामियाना साहेब

भूतविण्डवरून नामदेवराय भट्टिवाल या गावी आले होते. ते एका झाडाखाली नामस्मरण करत बसले होते. तो चैत्र महिना होता.

## ५१) भट्टीवाल येथील गहू कापणी, गुरू नामियाना साहेब

गहू कापणीचे दिवस होते. लोकवस्ती विरळ होती. शेती भरपूर, पण शेतमजूर कमी होते. जमीन मालक शेतमजूर घेऊन गहू कापणीस चालला होता. गव्हाचे शेत भरपूर मोठे होते. माणसे कमी. त्याला नामदेवराय झाडाखाली बसलेले दिसले. गावात सर्वांना काम मिळावे, या उद्देशाने त्याने नामदेवरायानापण गहू कापणीस चला म्हटले. तेही सर्वांबरोबर गेले. सर्वजण एका बाजूला गहू कापू लागले. नामदेवराय दुसऱ्या बाजूला गहू कापू लागले. नामदेवरायांचे काम झपाट्याने होत होते. दहा माणसांचे काम त्यानी एकट्याने केले. संध्याकाळी गव्हाच्या पेंढ्या बांधल्या. माणसे कमी, पेंढ्या जादा झाल्या. मालकाने विचार केला, की आज दोन खेपा करू. सर्वांच्या डोक्यावर गव्हाच्या पेंढ्या दिल्या. नामदेवरायांच्या डोक्यावर पेंढी ठेवली, ती त्यांच्या डोक्यावर टेकलीच नाही. नामदेवराय सर्वांच्या शेवटी होते. त्यांच्यामागे जल्लो होता. त्याने पाहिले.

**जल्लो दीख गुर-पोट उजागर । सिर ते ऊँची हाथ बराबर ।।** पूर्णदास

सर्वजण पुढे निघाले. नामदेवराय पाठीमागून निघाले. शेतावर उरलेल्या पेंढ्या नामदेवरायांच्या मागोमाग उड्या मारत निघाल्या होत्या. त्यांच्या मागे जल्लो चालला होता. तो हे सर्व पहात होता. त्याला आश्चर्य वाटत होते.

**आगे चले सो पुरुष सब । पाछे सद्‌गुरू जाये । गुरू पाछे जल्लो चले । चरीत देखी विसमाये ।।** ४०६, पूर्णदास जनमसाखी.

नामदेवराय सर्वांच्या आधी घरी पोहोचले.

**छुई पोट ना साधू सीसा । हाथ बराबर ऊँची दीसा ।।** पूर्णदास ३६०

घरी पोहोचल्यावर जमीन मालकाच्या लक्षात आले, की सर्व पेंढ्या घरी आल्या. तेव्हा त्याला नामदेवरायांच्या दैवी सामर्थ्याची जाणीव झाली. त्यांच्या सारख्या देवमाणसाला आपण कामाला लावले, या बद्दल

---

त्याला खंत वाटू लागली. त्याने नामदेवरायांची क्षमा मागितली.

**क्षमा करा अपराध। महाराज तुम्ही सिद्ध।।२।।**
तुकोबा

त्याने नामदेवरायाना गावाजवळच एक छोटे घर बांधून दिले. ज्या शेतात नामदेवरायानी गहू कापणी केली, ते शेत अद्यापि दाखवले जाते. त्या जागेला खुहसाहेब असे म्हणतात

## ५२) भूतविंड येथील शिष्य बहोरदासला जिवंत केले

पंजाब राज्यातील अमृतसर तहशिलात भूतविंड हे एक छोटेसे खेडे आहे. ते रैयाच्या थोडे पुढे आहे. ते अमृतसर पासून अंदाजे सहा कि. मी. अंतरावर आहे. अलीकडे त्याला रामपुरा म्हणतात. त्या गावी टाँक क्षत्रिय जातीची, अडोली नावाची एक विधवा रहात होती. तिला एक मुलगा होता. त्याचे नाव बालोदेव होते. त्याला बाला असेही म्हणत असत.

**आदि तात इस बाला नामल ।लबालक रूपी खेलत धामल ।।** भाई खेमदास

बालाचे वडील त्याच्या लहानपणीच वारले होते. त्याची आई त्याचा सांभाळ करत होती. ती गावात मोल मजुरी करत असे. एके दिवशी नामदेवराय त्या गावात आले. त्यानी गावा बाहेर एका झाडा खाली मुक्काम केला. बाला सहज तेथे खेळत गेला. तो नामदेवरायांच्या जवळ गेला. नामदेवरायानी त्याला जवळ घेतले. त्याला प्रेमाने जवळ बसवून घेतले. त्याचे नाव विचारून घेतले. दोघांचा एकमेकावर स्नेह जमला. बाला रोज सकाळी नामदेवरायांचे कडे येऊ लागला. तो दिवसभर त्यांच्या जवळ असे. संध्याकाळ झाली की त्याची आई तेथे येत असे.

## ५२) भूतविंड येथील शिष्य बहोरदासला जिवंत केले

बालोदेवला घरी घेऊन जात असे. असे रोज चालले होते. एक दिवस पोटदुखीच्या आजाराने बालोदेव मेला. नामदेवरायाना ही बातमी कोणीतरी सांगितली. नामदेवराय बालाच्या घरी गेले. त्याची आई फार रडत होती. ती म्हणाली माझ्या मुलाला जिवंत करा, तुमचे फार उपकार होतील. तुम्ही त्याला जिवंत केले, तरी तुम्हाला द्यावयास माझ्या जवळ काही नाही.

**नही कुछ पास जो देऊ भेटा । ताते भेट करूं यह बेटा ।।** बहोरदास.

नामदेवरायानी बालाच्या मस्तका वरून कृपेचा वरद हस्त फिरवला व कृपादृष्टीने त्याच्याकडे पाहिले.

**कृपा कटाक्षे न्याहाळिले । आपुल्या पदी बैसविले । बापरुक्मादेविवरु विठ्ठले । भक्ता दिधले वरदान ।।६।। आलिंगने सुख वाटे । प्रेमे चिदानंदी गोठे । हर्षे ब्रम्हांड उतटे । समूळ उठे मीपण ।।२।।**

ज्ञानोबा १८४ जोशी, ३५३ पांगूळ, ६१ मा, ९१ प. मा.

**हा दिठीवा जयावरी झळके । कि हा पद्मकरू माथा पारूखे । तो जीवचि परी तुके । महेषेशी ।।** ज्ञानेश्वरी १०-९

नामदेवरायांचा हात डोक्यावरून फिरताच, बालोदेव जिवंत झाला. मेलेला जिवंत झाला म्हणून त्याला लोक बहोरदास म्हणू लागले.

**नाम बहोडुगूर दियो मृतक लियांदा मोड । दूत देखकर नामदे बाला दीना छोड ।।** खेमदास

काही दिवसानी नामदेवराय भूतविण्ड सोडून निघून गेले. तेव्हा बहोरदासला फार दुःख झाले. पुढे नामदेवराय घुमानला राहू लागले. तेव्हा त्याना बहोरदासची आठवण झाली.

**जनके ऊर की सत्गुरू जानी । जल्लो प्रति भाषी मृदू बाणी ।। भूतविण्ड जाहो तुम ताता । बहुरदास मम सुत विख्याता ।। जननी सुत जल्लो संग आये । आ सत्गुर - पग सीस निवाए ।।**

---

## ५३) मरडला आंधळ्याला दृष्टी दिली व बरे केले

पूरणदासकृत नामदेव जनमसाखी पान ३६९

एके दिवशी नामदेवरायानी जल्लोला बोहरदासला आणण्या साठी पाठवले. जल्लो भूतविण्डला आला. नामदेवरायांची माहिती कळाल्यावर बहोरदासला आनंद झाला. त्याने आईला नामदेवरायानी बोलावले आहे, असे सांगितले. आईने जाण्यास परवानगी दिली. आईसह बहोरदास जल्लो बरोबर घुमानला आला. नामदेवराय रहात होते, तेथे जवळच बहोरदास करता घर बांधले. ती जागा म्हणजे, आज जे भांडारगृह आहे, तीच होय. बहोरदास तेथे राहून नामदेवरायांची सेवा करू लागला.

मरड या गावी धर्मा नावाचा एक मनुष्य रहात होता. तो नेहमी साधू संतांची सेवा करत असे. त्याला एक मुलगी होती. तिचे नाव सुलक्षणी असे होते. धर्माला नामदेवराय घुमानला आहेत असे कळले. तो गावची काही माणसे बरोबर घेऊन घुमानला आला. नामदेवरायाना भेटला. बहोरदास, लद्धा, जल्लो व केशवदास तेथे जवळच होते. बोलता बोलता धर्माला त्यांची सर्व माहिती मिळाली. तेव्हा धर्माने नामदेवरायाना विनंती केली, की माझ्या मुलीचे लग्न बहोरदास बरोबर करावे. नामदेवरायानी होकार दिला. लग्न ठरले. काही दिवसानी बहोरदासचे वऱ्हाड मरडगावला गेले. नामदेवराय घोड्यावर बसून लग्नाला गेले. बहोरदासचे लग्न झाले. वरात निघाली. लोक वरात पहाण्या साठी आले. त्यात एक आंधळा होता. त्या आंधळ्याला एकाची धडक बसली. तो खाली पडला. त्याच्या पायाला जखम झाली. तो रडू लागला.

**पडा उलट हो सो विच खाई । कारी जरब जंघ पर आयी ।।**

पूरणदासकृत नामदेव जनमसाखी पान ४१७

जल्लोला पाठवून नामदेवरायानी त्या आंधळ्यास जवळ बोलावून घेतले. नामदेवरायानी त्याच्या पायावर हात फिरवला. त्या बरोबर त्याचे

दुखणे बंद झाले.

**करी कीरपा तन पर कर फेरा । सकल पीड का किया निबेरा ।।**

पूरणदासकृत नामदेव जनमसाखी पान ४१७

नामदेवरायानी त्याला सरोवरात जाऊन डोळे धुवून येण्यास सांगितले. तो सरोवरात गेला. तेथे त्याने तोंड धुतले. डोळे धुतले. तेव्हा त्याला दृष्टी आली. सर्व दिसू लागले.

जा तिस नर मुख जल में धोया । मिटा अंधेर चांदना होया ।।

पूरणदासकृत नमादेव जनमसाखी पान ४१७

लग्न कार्य सर्व पार पडले. सर्वजण घुमानला परत आले. बहोरदासचा गृहस्थाश्रम चालू झाला. त्याचे नामदेवरायांची सेवा करणे चालू होते.

## ५४) घुमान येथील नामदेवांची नादी शिष्य परंपरा

नामदेवांचे प्रमुख शिष्य बहोरदास हे मानले जातात. घुमान जवळ असणारे लद्धा, जल्लो व केशवदास यानी सुद्धा हे मान्य केले असे म्हणतात. घुमान येथील नामदेव गुरूद्वाराची नादी शिष्य परंपरा खालीलप्रमाणे सांगितली जाते.

१. श्री. नामदेव
२. श्री. बहोरदास
३. श्री. केशवदासजी
४. श्री. कल्याणदासजी
५. श्री. बालकदासजी
६. श्री. तुलसीदासजी
७. श्री. महादासजी

## ५४) घुमान येथील नामदेवांची नादी शिष्य परंपरा

८. श्री. प्रेमदासजी
९. श्री. हरीदासजी
१०. श्री. रामदासजी
११. श्री. भगवानदासजी
१२. श्री. लछिमनदास जी
१३. श्री. राधिकादास जी
१४. श्री. महंत वैष्णवदास जी
१५. श्री. दयालदास जी
१६. श्री. गोविंददास जी

श्री. बाबा बहोरदासद्वारा प्रचलित बिंदी संप्रदायाचे संबंध खालील प्रमाणे आहेत.

१.बाबा बहोरदास
२.बाबा भोगिराम
३. बाबा पदार्थदास
४. बाबा मन्साराम
५. बाब कोरा राम

| | |
|---|---|
| बसतीराम | संगत राम |
| गौहरदास | रत्नदास |
| मैयादास | दुनीचंद |
| पूर्णदास | मेलूराम |
| लच्छमनदास | सुंदरदास |
| बलवंतराय | गोपालदास |

---

|

---

निरंजनदास त्रिलोकनाथ मुकुंदलाल नंदलाल

## ५५) गुरूदासपूर जिल्ह्यात नामदेवरायानी घुमान गाव वसवले

भट्टिवालहून नामदेवराय शेजारी एका रमणीय जंगलात येऊन स्थायिक झाले. नामदेवरायांच्या वास्तव्याने त्या जंगलाचा संपूर्ण कायापालट झाला. तेथे एक गावच वसले. फिरत फिरत नामदेवराय तेथे गेले, म्हणून या वस्तीस ' घुमान ' असे नाव पडले. घुमणे म्हणजे फिरणे. काहीजण या गावाला घोमान असे म्हणतात.

घुमान हे शहर पंजाबमधील गुरुदासपूर जिल्ह्यात आहे. घुमान गाव तालुक्याच्या वस्तीसारखा छोटा, स्वच्छ व टुमदार आहे. तेथे बहुसंख्य शीख लोकवस्ती आहे. त्यातील हजारो लोक नामदेवपंथीय शीख आहेत. त्याना छिपा, छिंबा, छिपी, टाँक क्षत्रिय या नावाने संबोधिले जाते.

**ईहां आन बसेरा करिया । नाम घुमान नगर का धरिया ।।**

पूरणदासकृत नामदेव जनमसाखी. पान ३९१.

आरंभी या ठिकाणी वस्ती नव्हती. जमीन नापीक होती. घुमान गाव वसल्यानंतर, लोकाना पिण्याच्या पाण्याची अत्यंत चणचण भासू लागली. यावर नामदेवरायानी विचार केला. त्यानी एका जागेची निवड केली. त्या जागेत एक तलाव खोदण्यास सांगितले. तसे करताच तेथे एक सुंदर जलाशय निर्माण झाले.तो तलाव आजही पाण्याने भरलेला असतो.

---

## ५६) घुमान येथील नामदेव दरबार

या ठिकाणी नामदेवराय रहात होते. सध्या येथे सर्वांत मोठे नामदेवरायांचे स्मृतीमंदिर आहे. मध्यभागी नामदेवमंदिर आहे. शेजारी बहोरदासची समाधी आहे. समोर ग्रंथसाहेब हॉल आहे. शेजारी मारुती मंदिर आहे. पूर्व बाजूस नामदेव भगत हॉल आहे. मागे लंगर, भंडारखाना आहे. उत्तरेस कार्यालय, बाजूला व पूर्व बाजूस दुमजली खोल्या आहेत. नामदेवरायानी येथे प्रथम लंगर - मोफत जेवणाची सोय केली. समोर तलाव खणला. नामदेवरायानी घुमान हे आपले आध्यात्मिक, सांस्कृतिक व राजकीय केंद्र बनवले. या ठिकाणी त्यांचा मुक्काम नेहमी जास्त असे. येथून ते हरियाना, राजस्थान, उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश वगैरे ठिकाणी भक्तीमार्गाचा प्रसार करण्यासाठी फिरत असत. त्यानी घुमान हे आपले केंद्र बनवल्यामुळे, फिरून फिरून तेथे येत असत. अशाप्रकारे नामदेवराय घुमानमध्ये अंदाजे १८ ते २० वर्षे राहिले होते.

## ५७) घुमान येथील तापियाना

नामदेव दरबारपासून, एक फर्लांग अंतरावर, पश्चिमेस तापियाना, हे गुरूद्वार आहे. या ठिकाणी नामदेवराय तप करत बसत असत. म्हणून या ठिकाणाला तापियाना असे म्हणतात. या ठिकाणी लोकाना पाण्याची, स्नानाची अडचण भासू लागली, म्हणून नामदेवरायानी शेजारीच एक तलाव खणला. या तलावाचे पाणी औषधी आहे. या तलावात स्नान केल्यावर खरूज, नायटे, अंग दुखणे व त्वचारोग वगैरे आजार बरे होतात. या तलावात स्नान करून नामदेवरायांचा शिष्य केशो - कलंदर याचा, कुष्ठरोग, नामदेवरायांच्या कृपेने बरा झाला. कालांतराने या तलावाशेजारी पश्चिम बाजूला नामदेवरायांचे सातमजली गुरूद्वार बांधलेले आहे. आत नामदेवरायांची संगमरवरी मूर्ती आहे. तलावाशेजारी संडास,

बाथरूम बांधलेले आहेत. चारी बाजूस नंतर दुमजली इमारत बांधली आहे. तेथे सध्या शाळा चालवली जाते. आत जागोजाग बोअर बसवलेले आहेत. दक्षिण बाजूला लंगर, भंडारखाना आहे. पूर्व व दक्षिण बाजूस आत जाण्यास प्रवेशदारे आहेत. दुमजली इमारतीत हायस्कूल चालवले जाते. मंदिरची व्यवस्था स्वतंत्र समिती बघते. घुमानमध्ये लग्नानंतर वधूवराना तपियानामध्ये आणतात. तेथे नामदेवरायांच्या चरणावर मस्तक ठेवतात. मगच वधू वराना गृहस्थआश्रमी व्यवहार करता येतात. ही पद्धत आजपर्यंत घुमानमध्ये प्रचलित आहे. येथील तलावामध्ये स्त्रियाकरता स्वतंत्र स्नानाची व्यवस्था आहे. तलावात एका बाजूला पत्रे मारून पार्टीशन
केलेले आहे.

## ५८) घुमान येथील चरण कवल साहेब

नामदेव दरबारकडून तापियानाकडे जाताना, उत्तर बाजूला, चरणकवलसाहेब, हे नामदेवरायांचे आणखी एक स्मृतीमंदिर बांधलेले आहे. चहू बाजूला दुमजली इमारत बांधलेली आहे. मध्ये नामदेव मंदिर आहे. आत संडास बाथरूमची सोय आहे. पुढील डाव्या बाजूस सरकारी दवाखाना चालवला जातो. घुमान येथील शहीद फिरना

घुमान शहराच्या उत्तर पूर्व बाजूला फिरनाचे स्मारक आहे. युद्धामध्ये येथे फिरनाचे शीर पडले. धड लढत लढत पुढे गेले. ते माडी गावच्या हद्दीत पडले.

# ५९) घुमानमधील नामदेवरायांचा शिष्य फिरना शहीद

भट्टिवालहून नामदेवराय फिरत फिरत शेजारच्या जंगलात आले. त्यावेळी घुमान नगर वसले नव्हते. त्या ठिकाणी घनदाट जंगल होते. दिवसा तेथे जंगली जनावरांचा भयानक आवाज येत असे. नामदेवराय त्या ठिकाणी राहू लागले. जंगलात जे फळ मिळेल, ते खाऊन नामदेवराय आपला उदर निर्वाह करत असत. भट्टिवाल येथील लोकाना नामदेवराय कोठे गेले ते समजलेले नव्हते. त्यामुळे ते लोक दुःखी होते. एक दिवस काही लोक गायी म्हैसी चारत त्या जंगलात आले. तेथे नामदेवरायाना पाहून त्याना आनंद झाला. आता जल्लो पण तेथे येऊन नामदेवरायांच्या जवळ राहू लागला. तेथे त्यांची सेवा करू लागला.

**पार शतद्रू देस सराबे । नगर धराचो वीच दोआबे ।। एक समय भा काल कराला । सकले देस पडा तृण काला ।।**

पूरणदासकृत नामदेव जनमसाखी पान ३६६

सतलज नदीच्या पलीकडे घराचो नावाचे एक गाव होते. त्या गावात घुमान जातीचे काही जाट लोक रहात होते. एकदा तेथे मोठा दुष्काळ पडला. लोक गाव सोडून निघाले. फिरत फिरत या जंगलात आले. येथे भरपूर गवत पाहून ते लोक तेथेच राहू लागले. ही जमीन कोणाची आहे, हे त्याना माहीत नव्हते. कोणी आपल्याला येथून हाकलून तर लावणार नाहीना अशी त्याना भीती वाटत होती. त्या दरम्यान नामदेवराय घुमान जवळ रहात होते. एक दिवस ते लोक पशूना चारतचारत नामदेवरायांच्या जवळ गेले. तेच या जमिनीचे मालक आहेत, असे समजून त्यांच्याशी बोलू लागले. जाट लोक म्हणाले, की आम्ही परदेशी लोक आहोत. आमच्या मूळ गावी मोठा दुष्काळ पडला.

## ५९) घुमान येथील नामदेवांचा शिष्य फिरना शहीद

म्हणून आम्ही इकडे आलो. आम्हाला काही दिवस येथे राहू द्या. नामदेवरायानी त्याना निसंकोचपणे येथे रहा, अशी आज्ञा दिली. मग सर्वांनी तेथे आपली घरे बांधली. नामदेवरायांच्या करता पण एक सुंदर घर त्यानी बांधून दिले.

**जल्लो दिन गुरू सेव कमावे । साँझ परी घर को चल जाबे ।।**

पूरणदासकृत नामदेव जनमसाखी पान ३६७

जल्लो दिवसभर नामदेवरायांची सेवा करावयाचा. रात्री आपल्या घरी निघून जावयाचा. पुढे या गावाला घुमान- घोमान असे नाव पडले.

**मालिक राजपूत विख्याता । माडी ग्राम बसे सो ताता ।।**

पूरणदासकृत नामदेव जनमसाखी पान ३७२

ही जमीन माडी गावच्या रजपुतांची होती. त्या लोकाना समजले की आपल्या जागेवर कोणी तरी रहात आहेत. ते घुमानला आले. चौकशी करू लागले की येथे रहाण्याचा तुम्हाला कोणी अधिकार दिला. जाट लोकानी त्याना उत्तर दिले की आम्ही दुआब्या मधील जाट हिंदू आहोत. आमच्या येथे मोठा दुष्काळ पडला म्हणून आम्ही इकडे आलो. आणि येथील संत श्रीनामदेवराय यांच्या संगतीत आम्ही सध्या रहात आहोत. माडी गावचे रजपूत मनात विचार करू लागले की याना आता येथून कसे हालवावयाचे? ते नामदेवरायांच्या जवळ घाबरत घाबरत आले.

**साधु नाम सुनि सो सकुचाए । साधु ते सब जग भय खाए ।।**

पूरणदासकृत नामदेव जनमसाखी पान ३७३

ते राजपूत नामदेवरायाना म्हणाले, की महाराज, आपण सगळ्या जगाचे मालक आहात. आम्हाला अत्यंत पूज्य आहात. आपण जाट लोकाना येथे राहाण्यास परवानगी दिलीत, हे ठीक आहे. पण पिढ्यान पिढ्या ही जमीन आमच्या मालकीची आहे. त्यानी आम्हाला काही तरी

कर द्यावा.

नामदेवराय म्हणाले की हे लोक दुष्काळ पिडीत आहेत. त्याना मदत केली पाहिजे. शेवटी रजपुतानी हे मान्य केले. परंतु ते म्हणाले, आम्हाला ज्यावेळी गरज पडेल, तेव्हा यानी आम्हाला दूध, दही, तूप वगैरे पाठवून देत जावे.

**दूध दही की कर यह देवें । और ना कछु इनसे हम लेवें ।।**

पूरणदासकृत नामदेव जनमसाखी पान ३७४

जाट लोकानी हे मान्य केले.

घुमानला रहाणाऱ्या या जाट लोका मध्ये, सल्लो नावाची एक वृद्ध व्यक्ती होती. त्यावेळी तो या जाटांचा प्रमुख चौधरी होता. त्याला एक मुलगा होता. त्याचे नाव फिरना होते. तो दिवसभर गायी चारावयाचा. संध्याकाळी घरी यावयाचा. नंतर नामदेवरायांच्या कडे यावयाचा. नामदेवरायांच्यावर त्याची फार श्रद्धा होती. उन्हाळ्याच्या दिवसात येथे पाण्याची फार कमतरता भासायची. सल्लो व फिरना हे दोघे बाप बेटे गुराना पाणी पाजण्यासाठी दोन कोस लांब घेऊन जायचे. एके दिवशी हा फिरना दुपारच्या वेळी जनावराना घेऊन येत होता. कडक ऊन होते. अंगातून घामाच्या धारा वहात होत्या. नामदेवरायानी चौकशी केली. तो म्हणाला पाण्या करता लांब गेलो होतो.

**बैठ एक सीखी ठौर मझारी । सत्गुरू ने चिल एक उखारी ।। निकसा जल सुंदर अति निर्मल । पुन सत्गुर काढी दुजी चिल ।। सब छपडी की चिला निकाली । निकले नीर सो मार उछाली ।।**

पूरणदासकृत नामदेव जनमसाखी पान ३७६

तेव्हा नामदेवरायानी जवळच एका ठिकाणी जमीन उकरली. त्या बरोबर तेथे भरपूर पाणी लागले. हाच तो तापियाना जवळील तलाव होय. आता सर्वजण त्या ठिकाणीच पाणी भरू लागले. व जनावाराना

---

## ५९) घुमान येथील नामदेवांचा शिष्य फिरना शहीद

तेथेच पाणी पाजू लागले. तसेच तेथे स्नान करू लागले. सर्व लोकांची पाण्याची गैरसोय दूर झाली. सर्वांना आनंद झाला. पुढे हा तलाव पक्क्या दगडाने बांधला गेला.

**माडीपुर को गुज्जर राणा । प्रतापी बड गुणी सयाना ।।**

पूरणदासकृत नामदेव जनमसाखी पान ३७९

माडी गावचा राजपूत गुज्जर हा मोठा प्रतापी होता. तो या जमिनीचा मालक होता. त्याला एक मुलगी होती. तिचे लग्न ठरले. लग्न कार्यामुळे त्याला दूध, दह्याची आवश्यकता होती. करारा प्रमाणे त्याने रोज दूध दह्याची मागणी या जाट लोकाकडे केली. जाटानी विचार केला की रोज दूध दही रूपी कर देणे अवघड आहे. तेव्हा राजपूतांची गंमत करावी असा विचार जाटानी केला. जाटानी मातीच्या घड्या मध्ये खाली शेण भरले व वर थोडे दूध, दही असे भरले. घागरी बंद करून पाठवून दिल्या.

**गाय गोबर घडे भराए । ऊपर दही दिया कुछ पाए ।। कर मुख बंद कहारन दीने । लेकर चले नाथ बिन चीने ।।**

पूरणदासकृत नामदेव जनमसाखी पान ३८०

गुज्जरानी आनंदाने घागरी ठेवून घेतल्या. नंतर घागरींची तोंडे उघडून पाहिल्या वर खरा प्रकार त्यांच्या लक्षात आला. त्याना फार राग आला. सर्व गुज्जर लोक, जाट लोका बरोबर युद्ध करण्यास निघाले. जाट लोकाना ही गोष्ट समजताच ते सर्व घाबरले. ते सर्व नामदेवरायांच्या कडे आले. त्याना सर्व हकीगत सांगितली. नामदेवराय म्हणाले की असे व्हावयास नको होते. पण आता झाले ते झाले. तुम्ही आता घाबरू नका. आता युद्धा शिवाय पर्याय नाही. तुम्ही युद्ध करा. फिरना नामदेवरायाना म्हणाला, की मला तुमची खूप सेवा करावयाची होती, पण मध्येच हे युद्ध आले. तुमची सेवा करता येईल की नाही, या विचाराने मला फार

## ५९-१) युद्धात मुंडके उडवलेल्या फिरनाला लढवले

दुःख होत आहे. नामदेवरायानी फिरनाच्या मस्तकावर आपल्या कृपेचा वरदहस्त ठेवला. त्याला आशीर्वाद दिला की तुझे नाव अमर राहील.

**सिमरन भजन मे तब रूचि, सिमरोगे सत्य नाम । फिरना नाम तव सत्य होई, पावोगे निजधाम ।।** ४३३

पूरणदासकृत नामदेव जनमसाखी पान ३८२

मग जाट व गुज्जर लोका मध्ये मोठी लढाई झाली. यात सर्व जाट मारले गेले. घुमान गावाच्या वेशी जवळच फिरनाचे मुंडके उडवले गेले.

**फिरने पै लै कठीण कृपाना । अति रिसखाए सिधायो राणा ।। जा कृपाण गात तीस मारा । किया बदन ते सीस न्यारा ।। जगह शहीद बनी जहं थांई । होय शहीद घुमान तिथाई ।।**

पूरणदासकृत नामदेव जनमसाखी पान ३८४

तसेच सर्व जाट मारले गेले. राजपूताना विजय मिळाला. ते जाटांची सर्व घरे लुटू लागले. नामदेवरायांचा फिरनाला आशीर्वाद होता. त्यामुळे त्याचे मुंडके उडवले गेले होते, पण तो उठला, व युद्ध करू लागला. त्याने गुज्जराना चार कोस लडवत नेले.

**मरे पुरुष को शक्ती दीनी । तिसने अद्‌भुत करनी कीनी ।। चार कोस इन पग ते धरनी । लाई जीत फिरने की करनी ।।**

पूरणदासकृत नामदेव जनमसाखी पान ३८६

**करील ते काय नोहे महाराज । परी पाहे बीज शुद्ध अंगी ।।**

तुकोबा ३९२४ व, ३३७९ जोग, ५३५ घुले, जोशी, ७९५ प. मा.

राजपूतानी हार मानली व ते पळून गेले. माडी गावच्या बाहेर फिरन्याचे शरीर पडले. त्या वेळे पासून घुमानची सीमा तेथ पर्यंत ठरली गेली. घराचो गावच्या लोकाना ही लढाईची बातमी समजली. तेव्हा तेथील बरेचसे लोक घुमानला येऊन राहिले.

---

घुमान गावाच्या उत्तर पूर्व वेशीवर फिरनाचे मुंडके उडवले गेले. तेथे त्याची समाधी बांधलेली आहे. तसेच माडी गावच्या ज्या ठिकाणी फिरनाचे धड पडले होते, तेथे एक फिरनाची स्मृति रूप समाधी बांधलेली आहे.

## ६०) शिष्य केशो कलंधर याचा महारोग बरा केला

**तारा नाम नगर विख्याता । रहे तहां केशो द्विज जाता ।। तहं तन अंतर कुछ रूज भयो । रक्त विकार बहुत चलि गयो ।।** पूरणदास पान ३९३

केशो अविवाहित होता. त्यामुळे त्यास केशो - कलंधर (म्हणजे परिव्राजक, ब्रह्मचारी ) असेही म्हणत. तारा नावच्या गावचा तो खत्री होता. त्याला कुष्ठरोग झाला होता. त्यामुळे घरची व इतर माणसे त्याचा तिटकारा करत असत. औषधोपचार करून तो थकला. शेवटी कंटाळून तो आत्महत्या करण्याच्या विचारात होता. इतक्यात त्याला कोणी तरी नामदेवराया कडे जाण्यास सांगितले. तेव्हा तो घुमान येथे आला. नामदेवरायांचे त्याने दर्शन घेतले. आपले सर्व दुःख निवेदन केले. आपल्या रोगा मुळे सर्व लोक आपली छी थू करतात. त्यामुळे आता मला जगण्याची इच्छा नाही. माझ्यावर तुम्ही कृपा करा, अशी विनंती केली. नामदेवराय म्हणाले की काही दिवस येथे रहा.

तो नामदेवरायांची सेवा करू लागला. नामदेवरायानी त्याला तपियाना सरोवरात स्नान करण्यास सांगितले. त्या प्रमाणे त्या सरोवरात स्नान केल्या वर, काही दिवसानी त्याचा कुष्ठरोग संपूर्ण नाहीसा झाला. या पुढे तो नामदेवरायांच्या साधना शिबिरात, त्यांची सेवा करू

लागला.

पुढे नामदेवरायानी त्याला भावलपूर संस्थानात मठाधीश बनवले. तेथे तो लोकाना भागवत धर्माची शिकवण देऊ लागला. त्याने तेथेच देह ठेवला. तेथे त्याची समाधी आहे. तेथे त्याचा आश्रमही होता. तेथील त्याचा आश्रम 'कलधारीकी गद्दी' या नावाने प्रसिद्ध आहे. भावलपूर हे भारताच्या विभाजना नंतर पाकिस्थानात गेले. केशोचे काहीं वंशज आता भिवानी, जिल्हा हिसार येथे राहातात. त्यानी भिवानी रेल्वे स्टेशन जवळ नामदेवरायांचे मंदिर बनवले आहे.

श्री. केशवदास संस्कृत भाषेचे चांगले विद्वान होते. त्यानी गोवर्धन शतक नावाचा एक लहान ग्रंथ लिहीला. त्यामध्ये शंभर श्लोका द्वारे गोवर्धनाच्या महिम्याचे वर्णन केले आहे. नंतर त्यानी तीर्थाटन केले. भगवान श्रीकृष्णाची कर्म भूमी वृंदावन मध्ये आले. तेथे भगवंताची पूजा अर्चा करू लागले. पुढे तेथील पूजेचे कार्य त्यांचे शिष्य श्री बालकदासजी यांच्या कडे सोपविले. तेथून सूर्य ग्रहणाच्या वेळी ते कुरूक्षेत्र येथे आले. नंतर पंजाबमार्गे मुलतान तसेच किरोर -सिंधु प्रदेश येथे गेले.

किरोर पक्का मध्ये किरोडीमल नावाची एक धनवान व्यक्ति रहात होती. त्याना काही मूलबाळ नव्हते. तो आपल्याला पुत्र व्हावा या उद्देशाने केशवजीना शरण आला. केशवजीनी त्याला आशिर्वाद दिला. फल स्वरूप त्याला एक मुलगा झाला. किरोरमध्ये काही काल मुक्काम करून ते बहावलपूर येथे आले. येथे हजारो लोक यांचे अनुयायी बनले. बहावलपूर येथे केशोजीनी नामदेवरायांच्या नावावर एका पीठाची स्थापना केली. त्या पीठाला कलधारीजीकी गद्दी या नावाने ओळखले जाते. देश विभाजना नंतर ते ठिकाण पाकिस्थान मध्ये गेले. पुढे वृंदावना मध्ये कलधारीजीका बगिचा या नावाने भारतात त्यांचे पीठ चालू राहिले.

---

## ६१) धारिवाल येथील नामदेवरायांचा शिष्य लद्धा खत्री, कुपी साहेब

पंजाब मधील गुरूदासपूर जिल्ह्यात धारिवाल नावाचे एक खेडे आहे. या गावी खत्री जातीचा, लद्धा नावाचा एक दुकानदार होता. हे गाव घुमानच्या जवळच येते. भट्टिवाल, सखोवाल, घुमान या गावा भोवती लहान लहान खेड्यातून, तो तेलाची विक्री करत असे. नामदेवरायांची कीर्तने ऐकून, तो त्यांचा शिष्य बनला. रोज तो नामदेवरायांच्या आश्रमा वरून जात असे. त्या आश्रमास लागणारे, त्या दिवसाचे तेल, तेथे घालीत असे.

**तीस दिन ते पकडा इन चाला । दीप जला नित्य करे उजाला ।।**

पूरणदासकृत नामदेव जनमसाखी पान ३९१

आश्रमात येऊन नित्य नेमाने तेल घालीन, असे वचन त्याने, नामदेवरायाना दिले होते. एके दिवशी चुकून त्याचे सर्व तेल विकले गेले.

**रहा ना तेल आज इक रत्ती । साधू समीप जले किम बत्ती ।। गिनत गिनत अस मन सकुचाई । गुरू आसन ढीग पहुँचा आई ।।**

पूरणदासकृत नामदेव जनमसाखी पान ३९१

हे त्याच्या लक्षात आल्यावर, त्याने विचार केला, की उद्या आपण आश्रमात दुप्पट तेल घालू. असा मनात विचार करून, तो खाली मान घालून, आश्रमा जवळून जाऊ लागला. आपल्या कडे न वळता, शांतपणे तो पुढे जात आहे, हे नामदेवरायांच्या लक्षात आले. त्यानी त्यास हाक मारली. नामदेवरायांच्या जवळ येऊन तो म्हणाला, 'आज चुकून सर्व तेल विकले गेले, उद्या आपण दुप्पट तेल घालू, असा विचार करून, लाजेने मी आपल्याला टाळून जात होतो.' यावर त्याचे सांत्वन करत नामदेवराय म्हणाले, ' भगवंतावर विश्वास ठेवून वागल्यास,

## ६१) धारिवाल येथील शिष्य लद्धा खत्री, कुपी साहेब

त्याच्या कडून, प्रत्येक बाबतीत तुला सहाय्य मिळेल. ज्या अर्थी तू मला नित्य तेल घालण्याचे कबूल केलेस, त्या अर्थी तू देवावर अवलंबून रहावयास पाहिजे होते.'

**निष्काम निश्चल विठ्ठली विश्वास । पाहो नये वास आणिकांची ।।२।।**

तुकोबा ३०५० व, ८८५ जोग, ३५७३ घुले, जोशी, ११२२ प. मा.

आपण शुद्ध अंतःकरणाने जो नेम करतो, तो नेम यथासांग पणे पार पाडला जाईल, याची काळजी देव घेत असतो. म्हणून तो भार आपण देवावरच टाकायचा असतो. तो नेम चालवण्याची विनंती आपण देवालाच करावयाची असते. मी पण तसेच करत असतो.

**नामा म्हणे केशवराजा । केला नेम चालवी माझा ।।४।। चरण न सोडी सर्वथा । तुझी आण पंढरीनाथा ।।२।।**

नामदेव १५८१ आ, १५५२ स, २२२१ गोरखपूर, ७५२ मा, ११२२ प. मा.

शुद्ध अंतःकरणाने दिलेल्या तुझ्या वचनांची पूर्तता, भगवंताने केली असती. आता तू तुझ्या कुपी कडे पहा, माझ्या साठी त्यात पुरेसे तेल आहे किंवा नाही? तो काय आश्चर्य ! त्यात त्याला पुरेसे तेल आढळून आले.

**लध्दे ने तब गठडी खोली । देखी कुप्पी का डट खोली ।। भरी तेल की कुप्पी देखी । लध्दा भा अचरज विसेषी ।। तेल ना था इसमें इक राई । अब राई भर नाहीं समाई ।। मन लजात पिख सत्गुर करनी । बार बार लागा गुर चरणी ।। महाराज मैं निपट अयाणा । प्रभू प्रताप ना कुछ मैं जाना ।।** पूरणदासकृत नामदेव जनमसाखी पान ३९२

भाई लद्धाला मूलबाळ नव्हते. संसारिक माणसाला आवश्यक गोष्ट म्हणजे किमान एक तरी मुलगा असावा, अशी अपेक्षा असते. त्या दृष्टिने आशीर्वाद द्यावा, अशी त्याने विनंती केली. नामदेवरायानी तथास्तु म्हणून त्याच्या इच्छे प्रमाणे, त्याला आशीर्वाद दिला. असे सांगतात, की

---

त्याचे घराण्यात, प्रत्येक पिढीत एकच मुलगा जन्मास येत गेला.

**पुरे एकची पुत्र माय पोटी । हरी स्मरणे उध्दरी कुळे कोटी ।।१।।**
**धन्य वंशी जन्मला भगीरथ । गंगा आणूनि पूर्वज केले मुक्त ।।२।।**
तुकोबा

लद्धा नंतर सखोवाल येथे कायमचा राहिला. नामदेवरायांच्या स्मरणार्थ, तेथे त्याने नामदेवरायांचे गुरूद्वार बांधले.

सखोवाल येथे लद्धाचे स्मारक मंदिर आहे. त्याला कुप्पी साहेब असे म्हणतात. घुमान मध्ये माघ महिन्यात यात्रा भरते. त्यावेळी यात्रेकरू, सखोवाल येथे जाऊन, लद्धाच्या स्मारक मंदिराचे दर्शन घेत असतात.

## ६२) नामदेवरायांचा हरिद्वार येथील शिष्य त्रिलोचन

त्रिलोचन हे हरिद्वार जवळ रहाणारे होते. त्यांची व नामदेवरायांची पदयात्रे दरम्यान भेट झाली. नामदेवरायांचा अधिकार पाहून तेही नामदेवरायांचे शिष्य बनले. नामदेवराया बरोबर हिमालयात ते पदयात्रेला गेले होते. ते नामदेवरायाना भक्ती विषयी बरेच प्रश्न विचारीत असत. नामेदवराय त्याना परमार्थामधील भक्तीची वर्मे सांगत असत. नामदेवरायांचे त्रिलोचनाला केलेल्या उपदेशाचे तीन चार हिंदी अभंग उपलब्ध आहेत. त्यातील शेवटच्या कडव्यात नामदेवराय म्हणतात,

भणत नामदेव सुनौ तिलोचन, बालक पाठाने पौढिला । आपनै मंदिर काज करती, चित्त सूं बालक राषिला ।।४।। नामदेव

भणत नामदेव सुनौ तिलोचन । गोब्यंदका गुण गाई रे । पाहुनडा दिन चारिका । बुदबुदा गया बिलाई रे ।।५।। नामदेव

भणत नामदेव सुनहु तिलोचन । ये तीरथ सब अघके मोचन ।।३।। नामदेव

---

## ६२) नामदेवरायांचा हरिद्वार येथील शिष्य त्रिलोचन

हरषि निरखी हरीके गुण गाऊं हाथन ताल बनाऊं । भणत नामदेव सुनहु त्रिलोचन । यहि विधि दास कहाऊं ।।४।। नामदेव

त्रिलोचनही पद रचना करत असत. त्यांचीही पदे गुरू ग्रंथ साहेब मध्ये आहेत

दरशन देखन नामदेव भलके उठ त्रिलोचन आवै । भगती करनी मिल दोई जने नामदेऊ हरी चलत सुनावै ।।

त्रिलोचन हे वैश्य जातीत जन्माला आलेले होते. ते श्रीमंत होते. ते लोकाना दानधर्म करत असत. त्रिलोचनाचे नामदेवरायावर अलोट प्रेम होते. एके दिवशी त्रिलोचन नामदेवराया जवळ आले. ते नामदेवरायाना म्हणाले की मला देवाचे दर्शन झाले तर फार बरे होईल. माझा जन्म सफळ होईल. नामदेवरायानी देवाला विचारले की भक्त त्रिलोचन तुमच्या दर्शनाची इच्छा करतात. देव म्हणाले की मी केवळ लोकाना दान करण्याने प्रसन्न होत नाही. श्रद्धेने लोकाना दान दिले व माझी भक्ती केली, तरच मी प्रसन्न होतो. तसे त्रिलोचन करूदे मग मी त्याला भेट देईन. नामदेवरायानी त्रिलोचनाला तसे सांगितले.

त्रिलोचनाला मुले नव्हती. नवरा बोयको दोघे रहात होते. बायको सर्व कामे करत असे. त्यांच्या कडे संतांचे नेहेमी येणे जाणे असे. कामाचा लोड वाढला. बायकोने नोकर मिळाला तर पहा असे सांगितले. एक दिवस त्रिलोचन बाजारात जात होता. त्याला एक गरीब मनुष्य भेटला. अंगावरची वस्त्रे फाटलेली होती. परंतु चेहऱ्यावर तेज होते. त्रिलोचनाने विचारले की नोकरी करणार का. तो म्हणाला की नोकरी करीन. पण माझी एक अट आहे. मला फक्त अंगावर कपडे, जेवण एवढेच पाहिजे. पगार काही नको. मला जेवण जास्त लागते. पण मी किती जेवतो याची वाच्यता करावयाची नाही. मी रात्रंदिवस जागाच असतो. जे पडेल ते काम करतो. कामात तक्रार करणार नाही. पण

---

## ६२) नामदेवरायांचा हरिद्वार येथील शिष्य त्रिलोचन

जेवणा बद्दल काही बोलावयाचे नाही. बोलला तर मी नोकरी सोडून जाणार. म्हणून तुमच्या बायकोची परवानगी काढा. मग मी काम करतो.

त्रिलोचनाने ही अट मान्य केली. नोकराला घरी आणले. बायकोला जेवणा बद्दलची त्याची अट सांगितली. त्याने किती भाकऱ्या खाल्या या बद्दल काहीही बोलावयाचे नाही, असे सांगितले. तिनेही ती अट मान्य केली. नोकराने आपले नाव अंतर्यामी असे सांगितले.

संत मंडळी येत जात होती. अंतर्यामी त्यांची सेवा मनोभावे करत होता. संत प्रसन्न होऊन जात असत. त्रिलोचनाची कीर्ती सर्वत्र पसरू लागली. अशा प्रकारे एक वर्ष झाले. त्रिलोचनाची बायको एक दिवस शेजारणीकडे गेली. म्हणतात ना की बायकांच्या पोटात एखादी गोष्ट गुप्त रहात नाही. शेजारणीने त्रिलोचनाच्या बोयकोला विचारले की तुझी तब्बेत कशी आहे. पूर्वी तू हसतखेळत होतीस. पण आता मात्र तू उदास दिसतेस. तुझा रंग हळदी सारखा पिवळा पडला आहे. काय ते खरे सांग.

त्रिलोचनाची बायको भोळी होती. तिच्या लक्षात आले नव्ते की हा अंतर्यामी स्वतः भगवान आहे. ती त्याला सामान्य मनुष्य समजत होती. त्रिलोचनाची पत्नी म्हणाली की काय सांगू तुला. जे सांगते ते कोणाला सांगू नकोस. तू माझी जवळची मैत्रिण म्हणून सांगते. एक म्हणजे आता मला म्हातारपण आलेले आहे. दुसरे संतांची आवक जावक वाढलेली आहे. किती धान्य संपते याचा विचार करून हैराण होते. तसेच जो नोकर आहे, असे म्हणून थांबली. शेजारणीने सांगितले की संकोच करू नकोस. मन मोकळे केले की ते हलके होते. दुःख कमी होते. खुल्या मनाने सांग. तिने इकडे तिकडे बघितले.

त्रिलोचनाची बायको म्हणाली की ही गोष्ट कोणाला सांगवयाची नाही, अशी अट त्रिलोचनाने घातलेली आहे. तू माझी जवळची मैत्रिण

## ६२) नामदेवरायांचा हरिद्वार येथील शिष्य त्रिलोचन

आहेस. म्हणून तुला सांगते. तू कोणाला सांगणार नाहीस, असे वचन दे. तो अंतर्यामी आहे, तो फार खातो. त्याचे पोट म्हणजे एक विहिर आहे. ती भरतच नाही. एका वेळेला तीन चार किलो अन्न खातो. अशा प्रकारे चालत राहिले, तर अन् व पैसा संपून जाईल. आम्हा मुले नाहीत. म्हातारपणी आमचे कसे होईल. खा.ला मिळे की नाही कोणास ठाऊक. शेजारीण म्हणाली की या नोकराला काढून टाका. दुसरा नोकर ठेवा. त्रिलोचनाची बायको बराच वेळ शेजारणीकडे बसली होती. नंतर घरी आली. पहाते तर दार उघडे होते. अंतर्यामी घरी नव्हता. तो निघून गेलेला होता. त्रिलोचन घरी आला. त्याने विचारले की अंतर्यामी कोठे आहे. परंतु त्याला उत्तर नीट मिळाले नाही. त्रिलोचन समझून गेला की त्याच्या बायकोने त्याची निंदा केलेली असणार. म्हणून तो निघून गेला.

त्रिलोचनाने नामदेवाना विचारले की देव केव्हा दर्शन देणार आहेत. नामदेवराय म्हणाले की देव तुमच्या घरी वर्षभर नोकर म्हणून राहिले होते. तुम्ही अट मोडली. देव निघून गेले. त्रिलोचनाने बायकोला सांगिते की अंतर्यामी हाच देव होता. तुझ्या मुळे तो निघून गेला.

नारायण निंदसि काई भुली गवारी । दुक्रितु सुक्रितु थारो करमु री ।।१।। रहाऊ ।। संकरा मसतकि बसता सुरसरी इसनान रे ।।३।। कुल जन मधे मिलियो सारग पान रे ।।४।। त्रिलोचन
करम करी कलंकु । मफिटसि री ।।१।। विश्व का दीपकु स्वामी ता चे रे सुआर थी ।। पंखा राई गरुड ता चे बांधवा ।। करम करी अरुण पिंगुला री ।।२।। पूरबलो क्रित करमु न मिटै री ।। घर गेहणी ता चे मोहि जापिअले राम चे नाम ।। बदति त्रिलोचन राम जी ।।६।।

त्रिलोचन म्हणतात की हे भाग्यवान, तू भगवंताला दोष देऊ नकोस. दोष हा आपल्या कर्माचा असतो. आम्ही जसे चांगले वाईट कर्म

---

करतो, तसेच फळ आपल्याला मिळत असते.

## ६३) नामदेवरायानी घुमानलाच समाधी घ्यावी अशी शीख शिष्यांची इच्छा होती

नामदेवरायानी घुमानलाच अखंड वास्तव्य करावे असे सर्व घुमानवाशीय शिष्याना वाटत होते. परंतु नामदेवरायाना आपले अवतारकार्य पंढरीमध्येच समाप्त करावे, असे वाटत होते. एकीकडे घुमानमधील सर्वांचा आग्रह मोडवत नव्हता, तर दुसरीकडे परब्रह्म परमात्म्याच्या सन्निध पायरीखाली समाधी घेण्याची तीव्र इच्छा होती. नामदेवरायानी मी साधना करणार आहे, तरी माझ्या आश्रमाचे दार उघडू नये, अशी आज्ञा शिष्याना दिली. ते आतच बसून राहिले. एके रात्री नामदेवराय गुपचूप आश्रमातून बाहेर पडले. दार मात्र आतून बंद होते. नामदेवरायानी थेट पंढरपूर गाठले. त्यानी पंढरपूरमध्ये कुटुंबातील चवदा जणासह श्रीविठ्ठलाच्या प्रथम पायरीखाली समाधी घेतली.

घुमानमधील शिष्यानी दोनचार दिवस वाट पाहिली. नामदेवरायाना हाका मारून पाहिल्या, परंतु आतून होकार आला नाही. शेवटी दार उघडून सर्वजण आत शिरले, पण तेथे कोणीही नव्हते. परंतु घमानमधील लोकमात्र म्हणतात की आत नामदेवरायांचे पार्थिव होते. मग तेथील सर्वानी नामदेवरायाना तेथेच समाधी दिली, असे तेथील लोक म्हणतात. संतांची करणी अगाध असते.

**करील ते काय नोहे महाराज । परी पाहे बीज शुद्ध अंगे ।।२।।**

तुकोबा ३९२४ व, ३३७९ जोग, घुले, जोशी, ७९५ प. मा.

असो. नामदेवराय माघ शुद्ध द्वितीया शके १२७१ ला घुमानहून

पंढरीला प्रयाण केले. म्हणजे त्या दिवसापासून घुमानमध्ये दिसले नाहीत. म्हणून नामदेवरायांचा समाधी दिवस पंजाबमध्ये माघ शुद्ध द्वितिया मानतात. या नंतर घुमान परिसरात नामदेवांचे प्रमुख शिष्य बहोरदास हे मानले जातात. घुमान जवळ असणारे लद्धा, जल्लो व केशवदास यानीसुद्धा हे मान्य केले, असे म्हणतात.

## ६४) हिंदी भक्तीकाल

हिंदी साहित्यातील भक्तिकालाचा आरंभ सन १३२५ च्या आसपास मानतात. उत्तर आयुष्यातील पन्नास वर्षाच्या दीर्घ कालात नामदेवरायानी उत्तर भारतामध्ये , भक्ती प्रचाराचा प्रचंड उद्योग केला. प्रामुख्याने संतमताची जी वैशिष्ठे म्हणून सांगितली जातात, ती सर्व नामेदवरायांच्या हिंदी साहित्यात सापडतात. त्यांच्या या कार्याचा व व्यक्तिमत्वाचा स्पष्ट ठसा, उत्तरेतील नंतर झालेल्या भक्त ह्रदयावर व ज्ञानी संत काव्यावर उमटलेला आहे.

भक्तिकालात पुढे ज्या ज्या भावना व सिद्धान्त दृढमूल झाले, त्या सर्वांना प्रथम नामदेवरायानी शब्दरूप दिले. आणि याच पार्श्वभूमीवर रैदास, कबीर, दादू दयाळ, रज्जबजी, धन्ना जाट, पीपा, गुरू नानक, या हिंदीतील ज्ञानाश्रयी संत कवीनी काव्य रचना केली. म्हणून निष्कर्ष असा निघतो की नामदेवरायांची हिंदी वाणी या पूर्वीच्या काळात म्हणजे इ. सन १३२५ पूर्वी वीस वर्षे जनमानसात व लोक जीवनात रुजली. आणि भक्तिकाळाची भूमिका व नव्या संत परंपरेची निर्मिती होण्यात तिचे पर्यवसान झाले. नामदेवरायांच्या या कार्यातूनच पुढे कबीर, नानक, रैदास, पीपा इत्यादी संत कवींचा उदय झाला. नामदेवांच्या नंतर २०० वर्षानंतर गुरू नानक जन्मले. गुरू नानकानी आपल्या गुरूमंत्राचा प्रचार

केला, तेव्हा नामदेवरायांचा हिंदी भजनांचा मोठा प्रभाव पडला होता. दऱ्याखोऱ्यात नामदेवरायांचे अभंग गुणगुणले जात होते. हे अभंग म्हणजे संत साहित्याचे प्रारंभिक स्वरूप आहे. तसेच या रचनेत संत संप्रदायी कवितेचा प्राचिनतम नमुना पहावयास मिळतो.

## ६५) गुरु ग्रंथ साहेब निर्मिती संबंधी

शिखांचे पाचवे गुरू अर्जूनदेव ( इ. स. १५८१ ते १६०६ ) यानी गुरू ग्रंथसाहेबाचे संकलन व प्रकाशन १६ आगस्ट १६०४ मध्ये हरिमंदिर साहेब अमृतसर येथे केले. गुरूग्रंथसाहेबची रचना गुरूमुखी लिपी मध्ये केलेली आहे. या कामी त्यानी भाई मुंझ, कल्याणा, तिलक, बहलोजी, हेमाजी, बहोडजी, विधीचंद्र, बुधाजी, जेठा पिराणा, लगाह व लद्धा परोपकारी याना हिंदुस्थानी पदे निवडण्याचे कामी नेमले. पदे निवडताना खालील कसोट्या लावल्या जात. संताची लोकप्रियता किती आहे, त्याचे चरित्र शुद्ध आहे का नाही, त्याची समाजात काय प्रतिष्ठा आहे, त्याचा निर्गुण मार्ग तसेच एकेश्वर वादातील त्याची नितांत आस्था, पद्यात काव्यगुण व भावना उद्रेक, नीती व सद्‌गुण प्रचाराची आवड, इत्यादी कसोटीवर उतरणारे पद निवडले जाई. निवडलेल्या पदाबाबत गुरू अर्जूनदेवांची संमती घेत. मग पद निवड अंतिम होई. १६ आगस्ट १६०४ मध्ये गुरूग्रंथसाहेब संकलित व प्रकाशित झाला.

त्याला शिखांचे दहावे गुरू गोविंदसिंगानी इ. सन १७०५ मध्ये दमदमा साहेबमध्ये गुरू तेगबहाद्दूर यांचे ११६ शब्द जोडून ग्रंथसाहेब पूर्ण केला. ग्रंथाची पान संख्या १४३० आहे. या मध्ये शीख धर्माचे सहा गुरू व इतर ३० हिंदू व मुस्लीम भक्तांची पदे आहेत. सोळा संत व नऊ

भाट यांची पदे आहेत. यामध्ये जयदेव, परमानंद या ब्राह्मण भक्तांची वाणी आहे. नामदेव, रविदास, सेनामहाराज, सघनाजी, छिवाजी, धन्ना, तसेच पाचवेळा नमाज पढणाऱ्या शेख फरिदचे श्लोक पण यात आहेत. संत कबिराचे दोहे यात आहेत.

यामध्ये गुरू नानकांचे बावीस मारू सोल्हे आहेत. एका सोल्ह्यात सोळा कडवी असतात. नामदेवरायांची एकसष्ट हिंदी पदे आहेत. ती वेगवेगळ्या रागात आहेत. तसेच ती वेगवेगळ्या ठिकाणी आहेत. संतामध्ये नामदेव, रामानंद, कबीर, सूरदास, जयदेव, त्रिलोचन, सेना महाराज, वगैरे संतांची आहेत.

## ६६) उत्तरेतील नामदेव मंदिरांची माहिती

**उत्तर प्रदेश**

उत्तर प्रदेशात हरिद्वार या शहरापासून आठ किलोमीटर अंतरावर ज्वालापूर हे एक खेडे आहे. नामदेवरायांच्या स्मरणार्थ येथे एक मठ आहे. या खेरीज शहापूर, महमदपूर - देवमल, पाकवडा, छपरोली, कपूरगड, भगवानपूर, सारंगा येथे नामदेवरायांची मंदिरे आहेत.

**मध्य प्रदेश**

जबलपूर येथे नामदेव मंदिर आहे.

**हरियाना**

भिवानी येथे दोन नामदेव मंदिरे आहेत.

**हिमाचल प्रदेश**

## ६६) उत्तरेतील नामदेव मंदिरांची माहिती

मंजारा व सुनवली या तीन हजार वस्तीच्या दोन गावांच्या मध्यभागी नामदेवरायांचे मंदिर आहे. तेथे अडीच फूट उंचीची, ध्यानस्थ बसलेली, नामदेवरायांची संगमरवरी मूर्ती आहे. वसंत पंचमीला येथे मोठी यात्रा भरते.

**राजस्थान**

राजस्थानातील नामदेव मंदिरे

१. पुष्कर, जिल्हा अजमेर
२. रास्ता जाटका कुवा, जयपूर
३. गंगापूर
४. कोटा,
५. घोलपूर
६. खिलचीपूर,
७. सीता मंडी,
८. नरसिंहगड,
९. छीपा बडौद,
१०. छपरा,
११. ढालर पाटन,
१२. खानपूर,
१३. गुगल, जिल्हा छापरा
१४. बगरू,
१५. सांगानेर,
१६. काळा डेरा,
१७. जयपूर येथे तीन मंदिरे आहेत.
१८. बिकानेर जवळ कोलायतजी ( कोइलाथ ) येथे नामदेव महाराजांची विहीर आहे.

---

## ६६) उत्तरेतील नामदेव मंदिरांची माहिती

पंजाब

१. घोमान, जि.-गुरूदासपूर, येथे सर्वात मोठे नामदेवरायांचे स्मृती मंदिर आहे.

२. भट्टिवाल, जि.-गुरूदासपूर, येथे नामदेवरायांचे स्मृतिचिन्ह म्हणून गुरूद्वार उभारले आहे.

३. मरड, जि.-गुरूदासपूर, येथे रामगृह सरदारजींनी नामदेव रायांच्या स्मरणार्थ एक गुरूद्वार उभारले. तेथे प्रत्येक महिन्याच्या अमावश्येला मोठा मेळावा भरतो.

४. सखोवाल, जि.-गुरूदासपूर,

५. धारिवाल, जि.-गुरूदासपूर

६. भूतविण्ड, ता-अमृतसर (अमृतसरहून सहा कि. मी.) हे बहोरदासचे मूळ गाव.

७. दुनियापूर, जि.-मुलतान,

८. पक्कावरोड, जि.-मुलतान

९. मुलतान,

१०. लायलपूर

११. जालंदर,

१२. लुधियाना,

१३. अंबाला,

१४. रोहोतक,

१५. भिवानी,

१६. हिसार,

---

## ६७) नामदेवरायानी कुटुंबातील एकूण चौदा व्यक्तीसह पंढरीत पायरी खाली संजीवन समाधी घेतली.

नामदेवराय माघ शुद्ध द्वितीया शके १२७१ ला घुमान मधून पंढरपूरला येण्यासाठी प्रयाण केले. ते पंढरपूरला आले. आपण ज्या हेतूने अवतार घेऊन आलो, ते चांगल्या प्रकारे पार पाडले आहे. आता इहलोकातील आपली यात्रा संपवावी असे त्याना वाटले. त्या प्रमाणे त्यानी देवाला विनंती केली.

**आषाढ शुद्ध एकादशी । नामा विनवी विठोबासी । आज्ञा द्यावी वो मजसी । समाधी विश्रांती लागी ।।१।। आयुष्य कळसाशी आले । अभंगत्व सिद्धी नेले । ज्ञानेश्वर संगती घडले । तीर्थ मिसे जगदोध्दार ।।२।। जन्मा आलियाचे कृत्य । जन लावावे सुपंथे । विठ्ठल मंत्र त्रिभूवनाते । जग जाणती महिमा हे ।।३।। सर्व सिद्धी मनोरथ । तुमचे कृपे पावलो समस्त । म्हणे परीसा भागवत । नामा नाम जपतसे ।।४।।**

परसा भागवत आ, ५४८ स, २२९७ गोरखपूर, २३१४ पा, १२५१ प. मा.

नामदेवराय म्हणाले की देवा, आता आयुष्य कळसाला आलेले आहे. तीर्थ यात्रेच्या निमित्ताने उद्धार करण्याचा मार्ग जगाला दाखवला. अभंगत्व सिद्धीला गेलेले आहे. जगाला उन्मार्गा पासून परावृत्त करून सन्मार्गाला लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. विठ्ठल या नामाचा मंत्र जगाला दिलेला आहे. आता मी तुमच्या पायाजवळ समाधी घ्यावी असा विचार केलेला आहे. महाद्वारात पायरी खाली समाधी घ्यावी असा विचार केला आहे. त्यामुळे पायरी वरून जाणाऱ्या येणाऱ्या संतांचे चरण रज मला प्राप्त होतील. त्यातच मला समाधान आहे. तेव्हा सर्व वैष्णवा

## ६७) नामदेवरायानी पंढरीत पायरी खाली संजीवन समाधी घेतली.

सहीत माझी बोळवण करा. हे ऐकून देवालाच अवघड वाटू लागले. नामदेवरायाचा वियोग सहन करणे देवाला कठीण वाटू लागले. आजचे मरण उद्यावर ढकलावे असे देवाला वाटले. देव म्हणाले, अरे नामदेवा, पंधरा दिवस थांब.

**देव म्हणे नामया राहे पक्षभरी । पुरतील अंतरी कोड तुझे ।।४।।**
**म्हणोनिया स्थळ पाहिले निवांत । झाले तेथे चित्त समाधान ।।२।।**

नामदेव १७७८ आ, १७३७ स, २३०० गोरखपूर, २३१७ पा, ७५५ मा, १२५२ प. मा.

हे देवाचे उत्तर ऐकून नामदेवराय रुसले. ते गरुड पाराजवळ जाऊन उभे राहिले. देव नामदेवरायांची समजूत घालू लागले. देव म्हणाले की नामदेवा, तुला पाहिजे ते देतो. माझ्या सुखाचा वाटा तुला देतो. चल आताच्या आत्ता वैकुंठाला. माझ्या जागेवर तुला बसवतो. तुझ्या मागे पुढे मी उभा रहातो. तुला हवे नको ते सर्व पहातो. तुझ्यावर मी पितांबराची छाया धरतो. व्यास, ध्रुव, अंबऋषी, रूक्मांगद, यांच्या पेक्षा श्रेष्ठ ठिकाणी तुला बसवतो.

**नामा म्हणे ऐसे नाही माझे चित्ती । मज आहे विश्रांती तुझे पायी ।।७।।**
**आपुल्या सुखाचा तुज देईन वाटा । जरी येशी वैकुंठा याची वेळी ।।२।।**

नामदेव १७६४ आ, १७२३ स, २३०६ गोरखपूर, २३२१ पा, १२५३ प. मा.

नामदेवराय देवाला म्हणाले की देवा, माझ्या मनात असे काही नाही. मला वैकुंठ नको आहे. ते वैकुंठ एक जुनाट झोपडी आहे. मोडकळीला आलेले ते एक खोपट आहे. तसल्या अडगळीत मला टाकू नकोस. शिवाय तेथे जाऊन काय करावयाचे? उगीच मौनरूप धारण करून बसावयाचे.

**आम्ही विष्णुदासी सांडिली वासना । तुम्हा नारायणा कळो आले ।।१**

## ६७) नामदेवरायानी पंढरीत पायरी खाली संजीवन समाधी घेतली.

**।। अज्ञान बालक ठकविला धुरू । तैसा मी अधीरू नव्हे देवा ।।२।।**
**उपमन्या बालका दुधाचा पै छंद । तैसा मी मतिमंद नोहे देवा ।।३।।**
**शरण आला तुज मूर्ख बिभीषण । लंका राज्य तेणे मागितले ।।४।।**
**नामा म्हणे तुझे नलगे आम्हा काही । वास सदा देई चरणा जवळी ।।५।।**

नामदेव १६२३ आ, १५९१ स, २३०२ गोरखपूर, २३१९ पा, १२५८ प. मा.

तुम्ही जगाला फसविता. ध्रुव हा एक अज्ञान बालक होता. त्याला तुम्ही अढळपदावर बसवले. मी तसा अधीर नाही. तो उपमन्यु वाटीभर दूध मागण्यासाठी तुमच्याकडे आला होता. त्याला तुम्ही क्षीराचा सागर दिला. बिभीषण तुम्हाला शरण आला. त्याने लंका राज्य मागितले. तुम्ही तत्परतेने त्याला लंका बहाल केली. तोही खूष, तुम्हीही खूष. परंतु देवा, मला तसे नको आहे. माझे वतन पंढरी हे आहे. तुमच्या या घरातच मला नांदावयाचे आहे. तुमच्या या महाद्वारातच मला सेवा करावयाची आहे. येथेच राहून साधूसंतांना शरण जावयाचे आहे. या पायऱ्या वरूनच साधूसंत तुमच्या दर्शनाला येतात. आम्ही तुमच्या पायरीचे दगड आहोत.

**नामा म्हणे आम्ही पायरीचे चिरे । संत पाय हिरे वरी देती।।४।। सेवा तेथे करू नित्य महाद्वारी । नामाच्या उजरी जागवूनि ।।२।।**

नामदेव १७७३ आ, १७३२ स, २३१३ गोरखपूर, २३२८ पा, १४० प. मा.

येथेच मला समाधी द्या. शेवटी देवानी नामदेवरायांचे म्हणणे मान्य केले. आषाढ वद्य त्रयोदशीला नामदेवरायाना समाधी द्यावयाचे निश्चित झाले.

**वैष्णवांचा थाट पताकांचे भार । करिती जयजय कार नामघोष ।।१।।**
**पुष्पांचा वर्षाव विमानाची दाटी । नाम घोष सृष्टी न समाये ।।२।।**
**ऋषी गण गंधर्व इंद्र प्रजापती । धन्य धन्य म्हणती नामयासी ।।३।।**

---

## ६७) नामदेवरायानी पंढरीत पायरी खाली संजीवन समाधी घेतली.

**देव वेळाईत केला सेवा ऋणी । अनन्य अनन्य भक्ती याची ।।४।। आळंकापूर ज्ञानिया इंद्रनीळ सोपाना । निवृत्तीशी जाणा त्रिंबक शिखरी ।।५।। नामा महाद्वारी श्रेष्ठ हे पंढरी । प्रत्यक्ष भूमिवरी वैकुंठ हे ।।६।। देवे नामयासी पोटाशी धरिले । नेत्रोदके क्षाळिले सर्वांगी हे ।।७।। जन्मोनिया सार्थक तुवा बरवे केले । वनी मोकलिले मजलागी।।८।। राही रखुमाई सत्यभामादि प्रभूति । नामा आलंगिती प्रेमे करुनि ।।९।। धन्य दिन सुखाचा वेदघोष विप्रांचा । वैष्णवी नामाचा घोष केला ।।१०।। तेथे पूजा नमस्कारें परसा याने केली । ह्रदयी धरिली चरण कमळे ।।११।।**

परसा भागवत.

सर्व वैष्णव पंढरीस एकत्र जमले. देवाचा नामघोष जोरात चालू होता. नामदेवरायांच्या समाधीची तयारी जोरात चालू होती. सर्व कार्य देव स्वतःहून करीत होते. सर्वजण नामदेवरायाना धन्य, धन्य म्हणत होते. परिसा भागवतानी या सोहळ्याचे वर्णन केलेले आहे. देवानी नामेदवरायाना पोटाशी धरले. देवाच्या नेत्रातून अश्रू येत होते. ते नामदेवरायांच्या अंगावर पडत होते. राही, रखुमाई, सत्याभामा यानी नामदेवरायाना आरती केली. आलिंगन दिले. परसा भागवत म्हणाले की नामदेवा तू धन्य आहेस. जन्माला येऊन तू सार्थक करून घेतले आहेस. आजचा दिवस धन्य आहे. ब्राह्मणांचा वेद घोष चालू आहे. सर्व वैष्णव नामाचा घोष करताहेत.

**ऐसा आनंदाने नामाच्या गजरी । दिली महाद्वारी समाधी त्या ।।४।। संत समुदाय पताकांचे भार । लोटले गजर ऐकावया ।।२।।**

नामदेव २३५६ आ, स, ६३२ गोरखपूर, पा,

पंढरपूरमध्ये देवानी नामदेवरायाना आपल्या पायरी खाली समाधी दिली. त्या वेळी नामदेवरायांचा परिवार म्हणाला की नामदेवा बरोबर

---

## ६७) नामदेवरायानी पंढरीत पायरी खाली संजीवन समाधी घेतली.

आम्हीही समाधी घेणार. देवानी त्यानाही समाधी त्याच वेळी दिली.

नामदेवरायानी विकृतनाम संवत्सर, शके १२७२, आषाढ वद्य त्रयोदशी रोज शनिवार, इ. स. ३-७-१३५० रोजी घरच्या एकूण १४ व्यक्ती सह महाद्वाराच्या पायरी खाली संजीवन समाधी घेतली.

त्यांचे आई वडील - दामाशेटी व गोणाई.
त्यांची पत्नी - राजाई
त्यांचे चार पुत्र - नारायण, विठ्ठल, गोविंद व महादेव.
त्यांच्या तीन सुना - गोडाई, येसाई व साखराई,
त्यांची बहीण - आऊबाई
त्यांची मुलगी - लिंबाई
त्यांची दासी - जनाबाई

पुंडलीक वरदा हरी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम, म्हणून फुले टाकली जातात.

भजन ।। **नामदेव जनाबाई** ।।

या समाधीच्या वेळी नामदेवरायांची थोरली सून लाडाई ही बाळंतपणा करता आपल्या माहेरी, कल्याणीला गेली होती. तिला नंतर हा महासमाधीचा वृत्तांत कळाला. बाळंतपणा नंतर ती पंढरीला आली. आपला मुलगा मुकुंद हा, तिने भगवंताच्या स्वाधीन केला व देवाला म्हणाली,

**पूर्व संबंधे मज दिधले बापाने । शेखी काय जाणे कैसे झाले ।।१।।**
**प्रसुता लागी मज आणीले कल्याणा । अंतरला राणा पंढरीचा ।।२।।**
**मुकंदे मजशी थोर केला गोवा । लोटियेले भव नदी माजी ।।३।।**
**ऐकिला वृत्तांत सर्व झाले गुप्त । माझेचि संचित खोटे कैसे ।।४।।**
**द्वादश बहात्तरी कृष्ण त्रयोदशी । आषाढ हे मासी देव द्वारी ।।५।।**
**सर्वांनी हा देह अर्पिला विठ्ठली । मज कां ठेविले पापिणीशी ।।६।।**

---

**लाडाई म्हणे देह अर्पीन विठ्ठला । म्हणोनि आदरिला प्राणायाम ।।७।।**
लाडाई ४ स, ४८७ गोरखपूर, पा,

देवानी तिला आश्वासन दिले. तुमच्या वंशाचा मी सांभाळ करीन असे सांगितले.

**तुम्हा न विसंबे सर्वथा । तुमचा भार माझ्या माथा ।।२।। करीन तळहात साऊली । पोसीन तुमची वंशावळी ।।३।।** विठा ८१ स,

नंतर लाडाईने प्राणायाम मांडला व तीही समाधीस्त झाली.

## ६८) नामदेव संजीवन समाधी सोहळ्याचे दिवशीची आरती

१४) **जन्मता पांडुरंगे जिव्हेवरी लिहिले । शतकोटी अभंग कवित्व रचिले ।।१।। जय जयाजी भक्तराया जिवलगा नामया । आरती ओवाळिता चित्त पालटे काया ।।२।। घ्यावया भक्ती सुख पांडुरंग अवतार । करूनियां तीर्थ मीसे केला जगाचा उद्धार ।।३।। प्रत्यक्ष प्रचीत हे वाळुवंट परीस केले । हारपली विषमता द्वैत बुद्धी निरसली ।।४।। समाधी महाद्वारी श्री विठ्ठल चरणी । आरती ओवाळितो परिसा कर जोडोनि ।।५।।**
परिसा भागवत २३५० पा, ७६१ मा, १४१० प. मा.
**घालीन लोटांगण । वंदीन चरण । डोळ्यानी पाहीन रूप तुझे ।। प्रेमे आलिंगीन अनन्ये पुजीन । भावे ओवाळीन म्हणे नामा ।।** नामदेव

## ६९) संत नामदेवरायांच्या जवळची केशी राजाची मूर्ती

नामदेवरायांच्या जवळ केशी राजाची एक पितळेची मूर्ती होती. ती एक फूट उंचीची होती. ती चतुर्भुज होती. तिच्या एक हातात शंख

---

## नामदेवांच्या जवळची केशीराजाची मूर्ती व पंढरीरायाची आरती

व दुसऱ्या हातात पद्म होते. बाकीचे दोन हात वेणू वाजवीत असलेल्या स्वरूपातील आहेत. कानात मकर कुंडले आणि पायात तोडे आहे. भागवत पुराणामध्ये वेणूधारी श्रीकृष्णाचे जसे वर्णन आहे, तशी ही केशवाची मूर्ती आहे.

नामदेवरायांचे वंशज ह.भ.प. जानबा महाराज याना श्री पांडुरंगाचा दृष्टान्त झाला की सदर मूर्ती हरीदासाना दे. त्या प्रमाणे जानबा महाराजानी शके १६४९ मध्ये हरिदासांच्या घरी नेऊन दिली. तेव्हा पासून पंढरपूरातील हरिदास गल्लीतील काल्याच्या वाड्यामध्ये देवघरात ती मूर्ती आहे. तेथे रोज तिची यथासांग पूजा केली जाते. भाविकाना तिचे दर्शन घेता येते.
पंढरपूरातील प्रतिपदेचा काला - दिंडी - खडावा.

दरवर्षी आषाढ व कार्तिक वद्य प्रतिपदेला नामदेवरायांची दिंडी काल्याच्या वाड्या कडे जाते. तेथील ह. भ. प. हरिदासाच्या डोक्यावर तेथील श्री पांडुरंगाच्या खडावा देतात. तेथून दिंडी पंढरीरायाच्या मंदिरात येते. तेथे काल्याचे कीर्तन व दही हंडी होते. त्या नंतर त्या खडावा मंदिरातून चंद्रभागेवर मध्यान काळी येतात. भाविक लोक चंद्रभागेचे तीर्थ ओंजळीने खडावावर घालतात. सदर खडावा मूळच्या चंदनाच्या आहेत. त्या भगवंतानी पागोटे धारी वारकऱ्याच्या स्वरूपात पांडुरंग हरिदास याना, ते चंद्रभागेचे स्नान करून पांडुरंग मंदिरात येत असताना दिल्या होत्या.

सदर खडावा झिजू लागल्या म्हणून, हरिदासानी त्याला चांदीचे आवरण घातले आहे.

### ७०) पंढरीरायाची काकड आरती

अनुपम्य नगर पंढरपूर । भीमा मनोहर । संतांचे माहेर । अव्याक्त आदी मूर्ती । परब्रह्म साकार ।। जय देवा पांडुरंगा । जय

---

आनंद कंदा । आरती ओवाळीन । पुंडलीक वरदा पांडुरंगा । जय पांडुरंगा ।।

पंढरपूरातील हरिदास गल्लीमध्ये काल्याच्या वाड्यात, कन्हैया महाराज हरिदास यांचा जन्म शके १७०० मध्ये झाला. त्यानी वरील आरती लिहिली. ही काकड आरती तेव्हा पासून आज तागायत पंढरीनाथाच्या मंदिरात रोज पहाटे केली जात असते.

## ७१) शिंपी, दर्जी जमात, नामदेवरायांचा अनुग्रह

क्षत्रियामध्ये शिंपी जमात येते. नामदेवराय पदयात्रेच्या मिषाने गावोगाव हिंडत असत. त्यावेळी लोक त्याना म्हणत असत की आम्हाला अनुग्रह करा. त्यावर नामदेवराय म्हणत की तुम्ही देवाचे नामस्मरण करा. गळ्यात तुळशीची माळ घाला. पंढरीची वारी करा. गोपी चंदन उटी लावा. या उपदेशाप्रमाणे जे वागू लागले, ते स्वतःला शिंपी, दर्जी, नामदेव शिंपी म्हणवू लागले. मध्य प्रदेशात ही शिंपी जमात मोठ्या प्रमाणात रहाते. त्यानी शिंपी समाजाची गाववार, तालुकावार, जिल्हावार संघटना केलेली आहे.

महाराष्ट्रात नामदेवरायाना अनुसरणाऱ्या शिंपी समाजाने स्वतःला नामजेव शिंपी असे उपपद लावलेले आहे. या व्यतिरिक्त इतर ठिकाणच्या शिंपी समाजाने स्वतःला क्षत्रिय शिंपी, अहिर शिंपी, रंगारी शिंपी वगैरे उपपदे लावली आहेत.

पंढरपूरमध्ये नामदेवराय रहात होते, तेथे पुढे नामदेव मंदिर बांधले गेले. नामदेवरायांचे बहुतेक सर्व वंशज पंढरपूरमध्ये नामदेव मंदिरात रहातात. आता जागे अभावी काही वंशज पंढरपूरमध्ये इतरत्र रहातात. काही वंशज आप्त स्वतःला हरिदास म्हणवून घेतात व इतरही गावी रहात आहेत.

## **नामदेवरायांची वंशावळ**

नामदेवरायांचे मूळ पुरुष यदुशेट हे होते. त्यांची वंशावळ या प्रमाणे. यदुशेट - हरिशेट - गोविंदशेट - नरहरशेट - दामाशेटी - नामदेव महाराज.

नामदेव महाराज

।

\-----------------------------------------

। । । ।

२) नारायण विठ्ठल गोविंद महादेव

।

३) मुकुंद

।

४) केशवबुवा

।

\--------------------

। ।

पांडुरंग ५) सिध्देश्वर

।

\-----------------------------------

। ।

६) संभाजीबुवा गोपाळबुवा

। ।

७) विठोजी तुकोजी

।

\--------------------------------

। ।

\-----------------------------------------

संग्राहक - ह. भ. प. नंदकुमार विश्वंभर बोंगाळे, श्रीगुरू बाबासाहेब आजरेकर फडावरील वारकरी.

## नामदेवरायांची वंशावळ

महादजी ८) सुभानजी

| |

-------------------- --------------------------------

| | | |

चिमणाजी हरी ज्ञानदेव ९) वाळुंजी

| |

तुकाराम १०) कुसुजी

----------------------------------------------------------------

| | | |

भिकाजी सखाराम ११) केदारी लक्ष्मण

| | | |

व्यंकूजी लिंबाजी ----------------------- आबा

| | | | |

------------- | उमाजी १२) शेटीबा रामजी

| | --------------- |

योगिराज धनाप्पा | | १३) केदारबुवा

| दामोदर विठोबा |

माहाळु | |

------------------ १४) पंढरीनाथ

| | |

नामदेव सावळाराम ----------------------

| |

१५) नामदेवबुवा तुकाराम

| |

--------------------------------------- --------------------

-----------------------------------------------------------

संग्राहक - ह. भ. प. नंदकुमार विश्वंभर बोंगाळे, श्रीगुरू बाबासाहेब आजरेकर फडावरील वारकरी.

**नामदेवरायांची वंशावळले व मागितलेले पसायदा**

। । । । ।

१६) तुळशीदास कृष्णदास केशवदास माधवदास मुकुंद

। । । । ।

। केदार ------------- निवृत्ती मुरारी

-------------------------------- । । । ।

। । । विठ्ल हरी वैष्णव

१७) ज्ञानेश्वर सोपान एकनाथ । ।

। । । पद्मनाभ देवराज

१८) भावार्थ अदित्य रत्ननाभ

## ७३) नामदेवरायानी देवा जवळ मागितलेले पसायदान

**आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा । माझिया सकळा हरिच्या दासा ।।१।। कल्पनेची बाधा न हो कोणे काळी । ही संत मंडळी सुखी असो ।।२।। अहंकाराचा वारा न लागो राजसा । माझ्या विष्णुदासा भाविकासी ।।३।। नामा म्हणे तया असावे कल्याण । ज्या मुखी निधान पांडुरंग ।।४।।**

नामदेव ८८३ आ, ८७१ स, २०८९ गोरखपूर, ७६२ मा, १२६७ प. मा.

## नामदेव मुखवटा व दिल्लीत बादशहाने अंगावर सोडलेला हत्ती





**पंढरपुरातील नामदेव पायरीवर ठेवण्यासाठी समाजाने तयार केलेला नामदेव मुखवठा**




**दिल्लीत बादशहाने गाय मारली व जिवंत करून दाखव, नाहीतर हत्तीच्या पायाखाली चिरडून मारतो असे बादशहा म्हणाले**

---

## नामदेवरायांचे पंढरीतील समाधीस्थान व उत्तर आयुष्यातील फोटो



**पंढरपुरातील पांडुरंगाच्या देवळाच्या महाद्वारातील पायऱ्या, जेथे नामदेवरायांच्या घरच्या चवदा सदस्यानी संजीवन समाधी घेतली.**




---



संतशिरोमणी
# नामदेव महाराज

## लेखकाचा परिचय

**नाव** - ह. भ. प. नंदकुमार विश्वंभर बोंगाळे.

**जन्म** - २० सप्टेंबर १९४१.

**शिक्षण** - वालचंद महाविद्यालयातून स्थापत्य अभियांत्रिकीची पदविका.
नोकरी कोयना प्रकल्पात अभियंता म्हणून सन १९६५ ला नोकरी मिळाली. सन १९६५ ते १९९८ पर्यंत पाटबंधारे खात्यामध्ये कोयना, अलोरे, चिपळूण, सातारा, इस्लामपूर, काळम्मावाडी व सांगली येथे मोठ्या प्रकल्पांची कार्यालयिन व क्षेत्रिय कामे केली.

**व्यासंग** - घरातील तीन पिढ्या पासून श्रीगुरू बाबासाहेब आजरेकर फड, पंढरपूर येथील वारकरी, माळकरी व मानकरी असल्याने लहानपणापासून भक्तीचे संस्कार झाले. सन १९७० पासून संत वाङ्मयाचा अभ्यास, विविध विषयावर संप्रदायिक कीर्तन, प्रवचन व आध्यात्मिक विषयाला वाहून घेण्याची आवड.

**धार्मिक कार्य** - श्रीगुरू बाबासाहेब आजरेकर फडाच्या दिंडीमधून काही वर्षे आळंदी ते पंढरी पायी वारी केली. घेतलेली वारी ही कार्तिकी, परंतु अव्याहत आषाढी व कार्तिकी वारी करीत आहे. वर्षभर वेगवेगळ्या धार्मिक उत्सवात, पारायण सप्ताहात कीर्तने, प्रवचने करत असतो.

**संपर्कासाठी पत्ता** - ह. भ. प. नंदकुमार विश्वंभर बोंगाळे, सुंदरम अपार्टमेंट, फ्लॅट नं. ५, विलींग्डन कॉलेज जवळ, विश्रामबाग, सांगली ४१६४१५. मोबाईल नंबर ९८५०९६९१६८, ७७७४८६५९२२.

---